



म. ग्रं. सं. ठाणे.
विषय शिक्षण
सं. क्र. 33600
REFBK-0025086

**मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.**

---

**सूचनाः**—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५[८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

[illegible] OCT 1986
[illegible]3 DEC 1986
15 JAN 1987
25 JAN 1987
11 MAR 1987
11 MAR 1987
27 MAY 1987

14 OCT 1987
30 NOV 1996

( क्रं. मा. पहा )
५०००-३-८४

संदर्भ निबंध राजकीय
३९७४
२५०८६
नावट८६

नि बंध ३९७४ २५०८६ नावट८६

# बखर राजधानीची

डॉ. दत्तप्रसाद दाभोळकर

REFBK-0025086
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क. ...........
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

राजहंस प्रकाशन । पुणे

बखर राजधानीची

**प्रकाशक**
दिलीप माजगावकर
राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव पेठ
पुणे ४११०३०

**मुद्रक**
ज. ता. गायकवाड
मायबोली प्रिंटर्स
४०५/९ नारायण पेठ
पुणे ४११०३०

© छाया दाभोळकर

**मुखपृष्ठ**
संजय पवार
आमची पंधरावी कला

**मूल्य : पंचवीस रुपये**

राजधानीतील कतले आमच्या वेळी
आपल्या शीख शेजाऱ्याचे रक्षण करताना
शहीद झालेले रामलाल
आणि तुरुंगातून सुटल्यावर
सर्वप्रथम दिल्लीत येऊन
रामलालच्या अजाण मुलीचे अश्रू पुसणारे
शहीद संत लोंगोवाल
या दोघांच्या चिरंतन पवित्र स्मृतीस...

* या पुस्तकाचे लेखकाला मिळणारे सर्व मानधन रामलालच्या कुटुंबीयांसाठी

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
निबंध
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

# शरद जोशींचे आव्हान....

## एक

ऋतुचक्राचे वैभव पहावयाचे असेल तर माणसान दिल्लीत येऊन स्थायिक व्हावे !

गडद थंडी, कडक उन्हाळा, झारीतून झरणारा मजेशीर पाऊस. आँधी आणि तुफान ! खरे पाहता साराच उत्तर भारत हे सारे अनुभवतो; पण दिल्लीत या ऋतुमानाप्रमाणे माणसे बदलतात. कपडे, हिंडणे, खाणे-पिणे, फार काय अगदी भाषासुद्धा. माणसे ऋतुचक्रात कशी मिसळून जातात !

दिल्ली ! शरद जोशींनी ज्याला इंडिया म्हटलंय त्या इंडियाचा आणि इंडियावाल्यांचा गाळीव अर्क येथे राहतो. येथे राहणाऱ्या माणसांनी हजारो वर्षे साऱ्या भारतावर राज्य केलंय. दावत द्यावी आणि घ्यावी. इश्क करावा आणि उधळावा. शेरशायरींनी वातावरण उधळून द्यावे. वाणीवर मिष्टास भरावी, बिनदरकारपणे पाठीत खंजीर खुपसावे. दूरवरून येणाऱ्या वादळांचा नुसत्या वासावरून अंदाज बांधावा आणि त्या वादळांना पुडीत बांधून खिशात घालण्याच्या हिकमती मनात बाळगत आणखी एखादी दावत द्यावी वा घ्यावी !

१४ फेब्रुवारी. रविवारची सकाळ ! दिल्लीत कोणते वादळ येणार आहे का ? येणाऱ्या वादळांना खिशात घालण्याचा कोणता बिरबली उपाय कोठे तयार होतो आहे का ? छट्ट ! हवेत तर त्याचा काही मागमूसही नाही. दिल्लीतील फेब्रुवारी. थंडी संपलेली आहे. उन्हाळा सुरू व्हायचाय. हवेत कसा उबदार गारवा आहे. अरे, वसंत वसंत म्हणून कवी आणि प्रेमिक ज्याची पूजा

बांधतात तो हाच तर कालखंड ! दिल्लीतील हवा आणि दिल्लीतील माणसे पहावयाची असतील तर माणसाने या वेळी दिल्लीत यावे. तसे पहावयाचे तर मुंबईत पाऊस पडतो तसा दिल्लीत वर्षभर सांस्कृतिक कार्यक्रमांचा अगदी पाऊस सुरू असतो. पण या सांस्कृतिक कार्यक्रमांचे वैभव, जुलूस आणि दिमाख खऱ्या अर्थाने पहावयाचा असेल तर तो पण याच वेळी पहावा !

१४ फेब्रुवारी. बाराखांबा रोडवरील 'मॉडेल स्कूलचे' प्रशस्त पटांगण. भव्य शामियाने लावलेत. आज 'शंकर्स विकली'ची बाल चित्रस्पर्धा आहे. नेहरूंची मैत्री आणि प्रतिभेचे वरदान लाभलेला शंकरसारखा एकटा कलावंत काय करू शकतो याचे हे जितेजागते उदाहरण. रंगीबेरंगी वेशातील चिमणी मुले हातात ड्रॉइंगचा फलक आणि रंग, ब्रश वगैरे सावरत धांदलीत हिंडताहेत. बाहेर स्कूटर्स, बसेस, गाड्या यांचा मेळावा. आत मुलांच्याबरोबर आलेले त्यांचे शिक्षक आणि आई-वडील. १०–१५ हजार चिमणे जीव जमलेत. तो कार्यक्रम पहावयास आलेले मंत्री आणि राजदूत. सारे वातावरण कसे चैतन्याने सळसळतंय ! अरे, यक्षभूमी म्हणतात ती तर हीच— कविमन लाभलेला कोणीही माणूस केवळ यावरच किंचित् काव्यापासून महाकाव्याच्या एखाद्या सर्गापर्यंत काहीही लिहू शकेल !

हे सारे गर्दीत न मिसळता बघताना मला मात्र उगाचच एकदम बरे वाटते. 'कॅमल इंक'ने आपल्या चित्रकला-सामानाचे मोठे स्टॉल्स लावलेत. मुले, त्यांचे आई-वडील विश्वासाने गर्दी करून सामान खरेदी करताहेत. दिल्ली-मुंबई विमानप्रवास फक्त दोन तासांचा आहे हे खरे; पण तरीही दिल्लीत राहताना का कोण जाणे, मराठी माणसाचे कोठे काही चांगले पाहिले की बरे वाटते. वा ! अरे वा ! कॅमल इंक तर आम्हा मराठी माणसांची. घरी बसून मराठी माणसाने आपली हुशारी, आपली मुत्सद्देगिरी, आपला प्रामाणिकपणा यावर वाटेल त्या कल्पना करून इमल्यावर इमले चढवावेत. मात्र बाहेर दिल्लीत वागताना आजकाल जाणवते ते इतकेच की, मराठी माणसाला वा महाराष्ट्राला तसे कुणी फारसे मनावर घेत नाही. खरे बोलायचे तर तसे अलपटातच काढतात. मराठी माणसाच्या प्रामाणिकपणाचे आणि कर्तृत्वाचे या दिल्लीत बनते ते यशवंतरावांचे मिंधेपण आणि काका-मामांच्या थापांच्या सुरस कथा !

पण तसे या दिल्लीला पण काही वेळा मराठी माणसाला मनावर घ्यावे लागले असेल. येथे राहणाऱ्या इंडियावाल्यांच्या अर्कांची तेव्हा झोप उडाली असेल— भर दरबारात बादशहावर ओरडणाऱ्या शिवाजीने हे केले असेल. संताजी-धनाजींनी थेट अमलगिराच्या तंबुवरील सोन्याचे कळस कापून नेले तेव्हा तर लाल किल्ल्याच्या दगडी भिंतींनी अंगावर शहारे आणत जामा मसजि-

दीच्या गोल घुमटांना ही बातमी सांगितली असेल. कारण या दिल्लीने ताकदीत आणि हिकमतीला कधीच कमी लेखले नाही. दूरवर उडालेल्या ठिणग्यांमधून आणि निखाऱ्यातून कोणत्या गाद्या बेचिराख होतील याची दखल घेताना या दिल्लीने तिळमात्र हयगय वा ढिलाई दाखवली नाही !

गेले तीन महिने दिल्लीत हिंडताना एक गोष्ट राहून राहून जाणवत होती. असा एक मराठी माणूस आज तयार होतोय. चांदणी चौक, करोलबागेतील कॉफी अड्डे, कॅनॉट प्लेस येथे याच्याबद्दल कुजबूज चालू आहे. विद्यापीठातील प्राध्यापक मी मराठी म्हणून मला त्याच्याबद्दल अधिक काही विचारताहेत. विद्यापीठ आणि आय. टी. आय. च्या वसतिगृहात विद्यार्थी गटागटाने त्याच्याबद्दल चर्चा करताहेत. शास्त्रज्ञांच्या सभेत खाजगी संभाषणाचे नारळ याच्या नावाने फुटताहेत. इंडियावाल्यांची झोप उडते आहे आणि या इंडियावाल्यांत मनोमन सामील न होऊ पहाणाऱ्या तरुण पिढीला याच्या बगावतीत आपल्या स्वप्नातील उद्याच्या भारताचा आधार दिसतोय. औरंगजेबाच्या राजवटीला मनापासून विटलेल्या तरुणांना सह्याद्रीतून उठलेल्या शिवाजीच्या ललकारीने असाच आधार दिला असेल. मूठभर मिठासाठी लोकांना घेऊन पुढे जाणाऱ्या महात्म्याने दिल्लीची झोप अशीच उडविली असेल आणि तरुण असेच अस्वस्थ झाले असतील !

– कॅमल इंकपासून मी थेट गांधीजींच्यापर्यंत या पाच मिनिटांत विचार करतो याचे कारण मॉडेल स्कूलच्या या वातावरणातही शरद जोशी भरलाय, हे मला मनोमन समजलंय. माझ्या मराठी मनाला थोडे बरे वाटतंय. उद्या दिल्लीत होणाऱ्या शेतकरी मेळाव्याबद्दल येथे जमलेल्या प्रत्येकाच्या मनात कमालीचे कुतूहल आहे. अगदी चिमण्या जिवांच्या मनातसुद्धा. कारण उद्या फक्त या शेतकरी मेळाव्यानिमित्त दिल्लीतील झाडून साऱ्या शाळांना सुट्टी आहे ! फक्त जयंती आणि मयंती यांचीच अशी अचानक सुट्टी मिळणाऱ्या मलांना उद्या कुणाचा वाढदिवस वा मृत्युदिवस असेल याचे कोडे असेल. भोवताली जमलेल्या कोणत्याच मोठ्या माणसाच्या मनात असा संदेह नाही. हा मेळावा का व कोणासाठी आहे हे सारे इंडियावाले जाणून आहेत. हा मेळावा हा सन्मान आहे शरद जोशींचा ! एका नव्या विचाराच्या तेजाने आणि झळाळीने डोळे दिपलेल्यांनी स्वतःच्या डोळ्यांवर स्वतःचा थोडा विश्वास बसावा, थोडा तोल सावरावा म्हणून केलेला हा खेळ आहे. स्वतःच्या मनावरचा स्वतःचा उडालेला विश्वास परत बसवावयाचा हा प्रयत्न आहे, आणि म्हणूनच भरपूर मेळावे आणि मिरवणुका पाहणाऱ्या प्रत्येक दिल्लीकराच्या मनात या मेळाव्याबाबत कमालीचे औत्सुक्य आहे. माझ्याबरोबर माझे तीन मित्र आहेत. डॉ.

बलकारसिंग, डॉ. कृष्णन व डॉ. बोस. एक जाट, एक बंगाली, एक मद्रदेशीय. आम्हा सर्वांचा व्यवसाय भौतिक संशोधनाचा. आज मॉडेल स्कूलच्या ग्राउंडवर भेटावयाचे कारण शरद जोशी आणि त्यांचे विचार. आम्हा चौघांच्यातील समान दुवा या क्षणी एवढाच आहे. आम्ही ठरवलंय आज-उद्या मनसोक्त भटकावयाचे. पायी, सायकलने, स्कूटरने, मोटारने जमेल त्या वाहनाने. जास्तीत जास्त अनुभव घ्यायचा. जमेल तेवढ्या लोकांना भेटायचे. आपल्यापुरते या मेळाव्याचे कोणतेही पूर्वग्रह न बाळगता एक चित्र तयार करावयाचे. आम्हाला सर्वप्रथम आठवतात ते भगत.

□

# दोन

दिल्लीवर छावण्या पसरल्यात. या छावण्यांचे नेतृत्व करणारे एच. के. एल्. भगत हेही आपल्या बंगल्याबाहेरच्या हिरवळीवर एक प्रशस्त तंबू ठोकून बसलेत. चार-पाच वेगवेगळ्या रंगांतील टेलिफोन्स. इलेक्ट्रिकल हिटर लावलेला. पाठीमागे दिल्लीचा मोठा नकाशा लावलेला. त्यावर निळे तांबडे झेंडे टाचण्यांनी रोवलेले. सारा देखावाच युद्धआघाडीचा. युद्धआघाडीचे नेतृत्व करणाऱ्या सेनापतीचा आवेश भगतांच्या चेहऱ्यावर आहे. खरे पाहता हा आवेश भगतांच्या सौम्य प्रकृतीला न मानवणारा.

भगत तसे सौम्य धिम्या प्रकृतीचे गृहस्थ. काँग्रेसच्या सध्याच्या भोवतालच्या लोकांत निष्ठावान वगैरे म्हणावयास लागावेत असे. खरे पाहता सात-आठ महिन्यांपूर्वी भगत जवळजवळ संपलेले होते. त्यांना गुंडाळले होते जगदीश टायटलरनी. त्यावेळी जगदीश टायटलरची चांदी होती. 'अमर, अकबर, अँथनी' या सिनेमातील आपण अँथनी आहोत असे समजणारा आणि एकूण सगळे कर्तृत्व तसेच असलेला जगदीश टायटलर हा एक फादरचा मुलगा. हा त्यावेळी संजयचा उजवा हात होता. तो केन्द्रीय मंत्रिमंडळात आज जाणार की उद्या एवढाच त्या वेळी लोकांना प्रश्न होता. पण संजय गेला आणि क्षणार्धात दिल्लीतील पटाचा सारा रंगच पालटला ! आपापल्या ठिकाणी राहून निष्ठापूर्वक काम करणारे भगतांसारखे लोक पुढे आले. आज तर भगत चांगलेच स्थिरावलेत. या मेळाव्यात कुणाचा वाटा किती हा प्रश्न अलाहिदा, पण आज तरी या मेळाव्याचे सूत्रधार समजले जाताहेत ते भगत !

भगत अक्षरशः दर दोन तासांनी आपल्या तंबूत एक वृत्तपत्रपरिषद घेताहेत. याला कारण परदेशी वार्ताहर. झाडून साऱ्या परदेशी वृत्तपत्रप्रतिनिधींना या मेळाव्याबद्दल कमालीचे औत्सुक्य आहे. हे असे एवढे औत्सुक्य त्यांना का आहे हे ' हिंदुस्थान टाइम्स ' व ' स्टेटस्मन 'च्या तेथे जमलेल्या वार्ताहरांना पण समजत नव्हते. भगत सांगत होते, ' या मेळाव्यासाठी एकशेपंचवीस स्पेशल रेल्वेगाड्या सोडल्या आहेत. प्रत्येकीला वीस डबे असतील. प्रत्येक डब्यात ८० ते १०० माणसे बसतील. ट्रक्स किती आणि कसे येतील हे सांगता येत नाही; पण बावीस हजार बसेसमधून – खास बसेसमधून लोक येणार आहेत ! ' सिगारेटचा चटका हाताला बसला तेव्हा भानावर आलो. कारण भगत पुढे सांगत होते– ' विमानातूनही अनेक शेतकरी येणाराहेत. खास विमानसेवा यासाठी सोडण्यात येणार आहे. ' भारतातील शेतकरी विमानाने प्रवास करतात ही माहिती सुखद होती. मेळाव्याच्या एकूण आवाक्याची पण कल्पना यायला लागली होती.

वसंतदादा तसे भगतांना वरिष्ठ; पण कामाच्या वेळी दादा असे काही मानत नाहीत. दादा तेथेच बसलेले होते. दादांनी माहिती पुरवली. हरियानामधून सात लाख शेतकरी येणाराहेत. उत्तर प्रदेशातून, पंजाबातून पाच लाख प्रत्येकी. महाराष्ट्र–कर्नाटकातूनही प्रत्येकी पन्नास हजार लोक येतील. त्यांना राहण्यासाठी एकूण पंचवीस प्रशस्त वसाहती आज दिल्लीत उभ्या आहेत. दोन हजार सफाई कामगार या जागेची सफाई करतील. दिल्ली नगरपालिकेने पाण्याचे नळ दिलेत. दहा हजारांहून अधिक संडास पुरवलेत. प्रत्येक वसाहतीच्या दारात तुम्हाला वैद्यक उपचार केंद्रे दिसतील. तेथे दूरदर्शनची सोय आहे. तेथे पाहिजे त्याला एक रुपयाला पोटभर जेवण मिळेल. याशिवाय मोफत टेलिफोनव्यवस्था आहे. या केंद्रातून २६ वैद्यकीय पथके गाडीतून पण हिंडत असतील !

भगत सांगत होते, ' मला कोणत्याच मेळाव्याशी याची तुलना करावयाची नाही, पण नुकतीच शेतकऱ्यांच्या प्रश्नावर दोन आंदोलने झाली. एक शरद पवारांचे होते. ते राजकीय होते. दुसरे शरद जोशींचे झाले. ते हिंसक होते. आमचे.... '

पण भगत पुढे काय सांगतात ते आता आम्हाला ऐकावयाचे नव्हते. कारण उद्या काय होणार ते आम्ही चारजण आठ डोळ्यांनी पाहाणारच होतो. किसान मेळाव्याचा आवाका केवढा मोठा आहे हे आम्हाला आता जाणवले होते. त्या वेळीही तेथे असलेला ' हिंदुस्थान टाइम्स 'चा वार्ताहर यातील निम्मे तंबू मोकळे राहतील आणि या फक्त गप्पा आहेत म्हणून सांगत होता. त्यामुळे

या छावण्यात खरोखरच काय घडते आहे हे आम्हाला पहावयाचे होते. आम्ही चौघेही तेथून बाहेर पडलो. दोन वाजून गेले होते. बदलणाऱ्या हवेचा आणि येणाऱ्या झंझावाताचा अंदाज रस्त्यावर आल्यावरच आला. विचारा हिंदुस्थान टाइम्सचा वार्ताहर पार चुकला होता. रस्त्यावरच्या मोकळ्या भिंती, मिळेल ती मोकळी जागा म्हणा हवी तर, पोस्टर्सनी भरलेली होती. पोस्टर्स रंगीत होती, पण प्रतिभाशून्य होती. ‘किसान शान इंदिरा जान’ अशी काही वाक्ये लावलेली होती; ‘राष्ट्रके इतिहासमें ऐसा ही कोई क्षण आता है जब नेता और जनता को मिलना जरूरी होता है’ वगैरे वगैरे. सार्वत्रिक निवडणुकांच्या वेळी कल्पक पोस्टर्स काढणाऱ्या काँग्रेसचा दर्जा एवढा का घसरावा हे समजत नव्हते. रस्त्यावर स्कूटर्स, सायकल्स, ट्रक्स, बसेस यावर काँग्रेसचे छोटे-मोठे झेंडे लावलेले होते. पायी, ट्रक्समधून मजेत किसानांच्या टोळ्या फिरत होत्या. दिल्ली पहावयास आलेल्या शाळकरी मुलांचा उत्साह त्यांच्या चेहऱ्यांवर होता. वातावरणनिर्मिती म्हणजे काय ते समजत होते. मेळाव्याची धुंदी दिल्लीवर चढत होती.

आम्हाला छावण्या पहावयाच्या होत्या. सर्वांत मोठी छावणी लाल किल्ल्यासमोर होती. विजय मार्गावर सत्तर हजार लोक ठेवले होते. निजामउद्दीन स्टेशन, मोतीयाखान, पंजाबी बाग-छावण्या तर साऱ्या दिल्लीभर पसरल्या होत्या. आम्ही चार मित्र चार दिशांना फुटलो. संध्याकाळी अजयगडकडे भेटावयाचे ठरवले. मी रिंगरोडवरून अजयगडकडे निघालो आणि अक्षरशः हरवून गेलो. रिंगरोडवर अजस्र म्हणाव्यात अशा छावण्या लागल्या होत्या. राजघाट, शांतिघाट, विजय घाट यांच्या समोर अक्षरशः नवी शहरे उठली होती! गाडी शांतिघाटच्या बगलेत उभी केली आणि एका छावणीत शिरलो, शिदोऱ्या सोडून लोक बसले होते, मजेत आंघोळी सुरू होत्या. प्रत्येकाने बिछाने आणलेच होते, पण जमिनीवर जाड जाजमे पसरलेली होती. रसोईघरात जेवण तयार होते, पण भारतीय किसानाला बहुधा फुकटात जेवावयास आवडत नसावे. फार थोडे लोक तेथे जेवण घेत होते. एका बाजूला लाकडांचे ढीग रचून ठेवले होते. रात्रभर प्रत्येक छावणीत मोठ्या शेकोट्या पेटणार होत्या. आंघोळ करून किसानांचे थवे वळत होते ते राजघाट-शांतिघाटकडे. खरे पाहता या दोन स्थानांनी तसे काय भोगले नाही? राजनारायणांचे गंगाजल पाहिले. संजयची चिता पाहिली. परकीय नेत्यांच्या दैनंदिन भेटी पाहिल्या, पण आज तेथे जमलेली जत्रा त्या स्थानांनाही नवी असेल! आई-वडिलांच्या समाधीला भेट देणाऱ्या मुलांची भावुकता ज्यांच्या चेहऱ्यावर आहे अशी माणसे थव्याने येताहेत—आणि तेथे फक्त समोरच्याच छावणीतील लोक नव्हते. लाल किल्ल्या-

वरील छावणी, पंजाबी बागमधील छावणी, बरफखान्याची छावणी येथील किसान सरळ चालत आले होते. दिल्लीतील आजची हवा चालायला तशी छान होती. त्यातून पायी चालणे ही किसानांची सवय असावी. १०-१२ किलोमीटर चालणे म्हणजे किस झाड की पत्ती !

– कोपऱ्यात काही ट्रक्स उभे होते. ट्रकड्रायव्हर गांधींची शपथ घेऊन सांगावयास तयार होता की, दोन दिवसांपूर्वी त्याला चेकपोस्टवर थांबवण्यात आले. परवाना-नंबर वगैरे लिहून घेण्यात आला आणि कोणत्या क्षणी कोठे माणसे घ्यावयास जावयाचे हे सांगण्यात आले; तो पण तसा रागावलेला नव्हता. कारण तिथे डिझेल लगेच फुकट मिळणार होते. दुसरे म्हणजे तोही या मेळाव्यात तसा रंगून गेला होता. प्रत्येकालाच तसा काही बदल आणि करमणूक हवी असते. विजयघाटावर गाजियाबाद-फरिदाबादचे काही छोटे कारखानदार भेटले. ते मात्र जाम संतापलेले होते. त्यांची वहाने तर त्यांना स्वखुशीने द्यावी लागली होतीच, पण उद्या कारखाने सक्तीने बंद ठेवायचे होते. या छोट्या कारखानदारांच्या संघटनेनेच मुळी झंझट नको म्हणून उद्या पगारी सुट्टी जाहीर केली होती !

हा फेरफटका संपवून मी अजयगडला पोचलो त्यावेळी सहा वाजून गेले होते. अजयगड हे दिल्लीत फार थोड्या लोकांना माहीत असलेले आणि आम्हा मित्रांना आवडणारे एक स्थान आहे. सब्जीमंडी बरफखान्याला टांग मारून आणि सेंट स्टिफन्स हॉस्पिटलला बगलेत मारून पहाडीच्या रस्त्याने वर गेले की अजयगड लागतो. तो नेमका तसा हिंदुराव हॉस्पिटलसमोर उभा आहे. लांबून हे एखादे उंच चर्च असावे, मिनार असावा असे काहीसे वाटते. या मिनाराच्या वर गेले की पुराणी दिल्ली दुर्बिणीशिवाय सुद्धा छान दिसते; पण आमच्या दृष्टीने या स्थानाचे महत्त्व वेगळे आहे. येथे आले की काळाच्या प्रवाहाची क्षणभंगुरता समजते, यश आणि अपयश यांची शाश्वत मूल्ये जाणवतात. अठराशे सत्तावन्न साली शेवटची लढाई ब्रिटिश दिल्लीत जिंकले. त्यांच्या वतीने लढणारे जे गोरे आणि काळे सैनिक शत्रूकडून मारले गेले, शहीद बनले त्या शहीदांच्या सन्मानासाठी हा भव्य सुंदर मनोरा टेकडीवर उभारलाय ! बाहेर तसा फलक लावलाय. मनोऱ्याच्या चारी बाजूंना शत्रूकडून मारल्या गेलेल्या गोऱ्या सेनानींची अनेक नावे आहेत. एकूण किती गोरे व काळे सैनिक शत्रूकडून कसे व केव्हा मारले गेले याची आकडेवारी आहे. अगदी १९७५ सालापर्यंत अजयगड असाच होता. त्यावेळी सरकारने फलक लावला. 'यात ज्यांचा शत्रू म्हणून उल्लेख आहे ते खरे स्वातंत्र्यसैनिक होते.'—समोर शंकराचे एक छोटे मंदिर आहे. जवळ अशोकाने मिरतला उभारलेला एक

स्तंभ, १७०० साली उपटून आणून लावलेला आहे. जवळ एक म्हातारा बैरागी कधीकधी असतो. तो तर आणखीनच मजेशीर गोष्ट सांगतो. तो म्हणतो, ' मनोऱ्यावर नावे लिहिणारा माणूस हुशार होता. त्याने मनोऱ्याच्या आत गेलेल्या बाजूवर स्वातंत्र्यसैनिकांची नावे आणि आकडेवारी उर्दूत नक्षी वाटावी अशी लिहिली होती. बाहेर आपली सरकारने सांगितलेले नावे ! १९०१-२ च्या सुमारास ही बातमी बाहेर फुटली. रातोरात बसवलेले दगड काढून बदलण्यात आले ! असो. लाल किल्ल्याजवळ पुरलेला इतिहास जनता सरकारने उकरला तो देखावा आम्ही मित्रांनी याच मनोऱ्यावर चढून पाहिला होता ! उद्या इंदिरा सरकार जेव्हा कुपी पुन्हा पुरणार आहे तेव्हा आम्ही ते येथूनच पहाणार आहो ! आज अजयगडहून दिसणारी पुराणी दिल्ली मात्र एकदम वेगळी आहे. साऱ्या शहराला अक्षरश: लष्करी छावणीची कळा आलेली आहे, रंगीबेरंगी कपड्यांत चालणारे चित्रविचित्र जथे दिसताहेत. आम्हा सर्व मित्रांना आलेला अनुभव तसा एकाच स्वरूपाचा आहे. प्रचंड गर्दी जमलेली आहे. दृष्ट लागावी अशी व्यवस्था आहे. लोकांच्यात अमाप उत्साह आहे. आपण इंदिरेला आणि राजधानीला पहावयास आलोय हे सारेचजण मान्य करताहेत. सर्वात महत्त्वाचे म्हणजे शरद जोशींना नावाने फारच थोडेजण ओळखत असले तरी महाराष्ट्रात आग्रारोडवर झालेल्या कांदा-आंदोलनाची झाडून साऱ्यांना माहिती आहे. शहरी लोकांना न समजलेले खेड्यातील लोकांचे एकमेकांना माहिती पुरवण्याचे काही साधन असावे !— निवडणुकांच्या वेळी क्षणार्धात साऱ्या देशभर एखादी लाट पसरते. केव्हा केव्हा चपातीवरून विचार पाठवले जातात, कधी ते कमळाच्या फुलांतून जातात तर कधी कांद्याबरोबर !

–चपाती, कांदा वगैरेंची आठवण यावयाचे आणखी एखादे कारण असावे. कारण आम्हा सर्वांनाच आता चापून भुका लागल्या होत्या. तसे दमलोही होतो. त्यातून उद्या पहाटेच कुंभमेळ्यात सामील होण्यासाठी बाहेर पडावयाचे होते. आम्ही एखाद्या छावणीतच जाऊन मोफतचे जेवण उरकायचे ठरवले.

—शाळा-कॉलेजातील चलाख मुले, मुंबईत, पुण्यात, वाटेवरच्या एखाद्या मंगल कार्यालयात न बोलवता घुसून साळसूद चेहऱ्याने आइस्क्रीम वगैरे खाऊन येतात तसा आमचा हा बेत होता ! कोल्हापूररोडवरून आम्ही कमलानगरच्या पिछाडीला असलेल्या छावणीकडे निघालो. दिल्लीचे तख्त फोडावयास आलेली कोल्हापूरकरांची फौज या भागात उतरली होती म्हणून याला कोल्हापूररोड नाव पडले असे म्हणतात. कुणी सांगावे, या मेळाव्यामुळे पुढे-मागे येथे सांगली-रोडही उभा राहील !

छावणीतील जेवणाची सोय खरोखरच अप्रतिम होती. दिल्लीत या मोसमात भाज्या मुळातच स्वस्त. अगदी शरद जोशींनी येथे येऊन आंदोलन उभारावे इतक्या! प्रमुख मंडीमध्ये फ्लॉवर आठ आणे किलो आणि मटार एक रुपया किलो! मुळे चार आणे किलो. या छावणीला लागूनच घंटाघर सब्जीमंडी आहे म्हणून असेल कदाचित. पुऱ्या, फ्लॉवरची भाजी, मटाराचा रस्सा, भात असा छान चमचमीत बेत होता. येथेही आलेल्यांपैकी फारच थोडेजण जेवण घेत होते. त्यामुळे आमच्यासारख्या साळसूद चेहऱ्याच्या माणसांना मजेत जेवण मिळाले. पोटाला तड लागेपर्यंत खावयाचा मोह होत होता; पण उद्या सकाळी ४-५ ला बाहेर पडावयाचा बेत होता, त्यामुळे तो मोह आम्ही टाळला. भराभर चार घास खाल्ले आणि बाराखांबारोडवरील डॉ. कृष्णनच्या घरी मुक्कामाला गेलो!

□

# तीन

मी मिरवणुका पाहिल्यात, सभा पाहिल्यात. जनसागरात नाहीसा होत हे सारे अनेकदा भोगलंय!

–१०५ हुतात्म्यांची शपथ घालत महाराष्ट्राच्या पंचप्राणांनी सत्तावन्नच्या निवडणुकांच्या आदले दिवशी शिवतीर्थावर घेतलेली ती सभा दहा हजार वर्षांत न झालेली, पुढील दहा हजार वर्षांत न होऊ शकणारी!

–संयुक्त महाराष्ट्राचा मंगल कलश घेऊन आल्यावर चव्हाण नेहरूंचा शिवतीर्थावर झालेला अभूतपूर्व सत्कार.

–आणीबाणीनंतर तुरुंगातून सुटलेल्या विरोधी पक्षनेत्यांना ऐकण्यासाठी रामलीला मैदानावर जमलेला तो अथांग जनसमुदाय.

–२३ डिसेंबर १९७८ ला चरणसिंगांनी आपला वाढदिवस साजरा करावयास जमवलेला तो हरियाणातील जाटांचा विराट मेळावा.

हे सारे मी अगदी जवळून पाहिलंय; पण आज येथे जो जनसागर ओसंडलाय त्यापुढे 'मामुली' एवढया एकाच शब्दात या साऱ्या सभांची बोळवण करावी लागेल. हा शब्दशः महासागर आहे. दिल्लीला रस्त्यावर अक्षरशः माणसांची डोकी उगवलीत. चित्रविचित्र पोशाख, चित्रविचित्र भाषा, चेहऱ्यावर

ओसंडणारे ते बालिश कुतूहल आणि संघीयांनीही हेवा करावा असे शिस्तबद्ध संथ गतीने चालणे !

दिल्लीकर यांना पाहून मनोमन हबकलेत. ४९ साली पेकिंगच्या रस्त्यावर अवतरलेल्या, माओसारख्याच फाटक्या आणि मळक्या वेशातील आणि बस-मध्ये पण तिकीट काढून नम्रतेने शिरणाऱ्या त्याच्या शेतकरी सैनिकांना पाहून पेकिंगवाल्यांना किंवा चायनावाल्यांना पण असाच हादरा बसला असेल! एक क्षणभरही या जनसमुदायाने मनात नुसता विचार आणला असता तरी सारी दिल्ली त्यांची होती. जगातील कोणतीही सेना या जमावाला अडवू शक-णार नाही.

पण अगदी क्षणभरसुद्धा हा जमाव असला काही विचार करणार नाही. कारण यांच्याकडे या क्षणी तरी कोणताच विचार नाही. त्याहूनही महत्त्वाचे म्हणजे हा मुळी जमाव नाहीच ! ही एकत्र जमलेली वा जमवलेली सुटी माणसे आहेत. अधिक काटेकोरपणे बोलावयाचे तर माणसांचे–जनता गठ्ठे आहेत वा थवे आहेत. लोकलमधून प्रवास करणारा वा कुंभमेळ्याला आलेला जमावसुद्धा मानसिकदृष्ट्या यापेक्षा अधिक एकसंध असतो. शिवतीर्थावरील मी मागे उल्लेख केलेल्या सभांत तर जमावाच्या भावनांचे अक्षरशः सिमेंट झालेले होते !

त्यामुळेच माझ्या मते हा जनसमुदाय दहा लाखांचा आहे, पंचवीस लाखांचा आहे की चाळीस लाखांचा आहे हा प्रश्न दुय्यम स्वरूपाचा होता; पण काल-पासून मला भेटणारे झाडून सारे राजकीय पुढारी या फालतू प्रश्नावरच डोके-फोड करीत होते. बाईंनी ही गुगली का व कोणासाठी टाकली आहे यावर चर्चा करावयासच कोणी तयार नव्हता ! आज सकाळी सर्वप्रथम भेटले होते ते भारतीय जनता पक्षाच्या दिल्ली शाखेचे प्रमुख श्री. गुप्ता. आम्ही तसे विकासमिनारापर्यंत एकदमच पोहोचलो. तोवर तेथे बिहारहून आलेले व लाल किल्ल्यासमोर उतरलेले किसान पोचलेही होते. मंडळी भल्या पहाटे चार-पाच वाजताच उठून पदयात्रेला बाहेर पडली असावीत. आम्हाला कोणालाच त्या जमावाची भाषा येत नव्हती. श्री. गुप्तांच्याबरोबर बिहारमधला संघाचा एखादा प्रचारकही नव्हता. मात्र गुप्ता आग्रहाने सांगत होते, यातील फक्त वीस टक्के शेतकरी आहेत. बाकी सारे मोठ्या शहरातील पांढरपेशे ! माझ्या-बरोबरचा डॉ. बलकारसिंग जाट शेतकरी. तो म्हणाला, ‘ गुप्ताजी, आप कहते है वो जचता नहीं ’ – ‘ साहेब, आपण सांगता ते अजिबात पटत नाही. खरे सांगायचे तर शहरातील पांढरपेशावर्ग आणि बनियावर्ग तुमचा. त्याला कोणी हात लावतंय म्हणून अस्वस्थ होऊ नका ! त्याला तसे कोणीच हात लावू शकणार नाही. खऱ्या अर्थाने अगदी महात्मा गांधीसुद्धा त्यांना हात लावू

शकले नव्हते; पण आपण या शेतकऱ्यांपर्यंत कसे आणि केव्हा पोचणार आहांत तेवढे सांगा !'

कालपासून भेटलेल्या झाडून साऱ्या विरोधी पक्षांच्या नेत्यांचा आणि कार्यकर्त्यांचा राग होता चरणसिंगांवर. त्यांनी उगाच काही वेडयासारखे पायंडे पाडून ठेवले म्हणून. लोहिया समाजवादी पक्षातील तसे फारसे कोणी भेटले नव्हते. पण त्यांना भेटूनही फायदा नसतो. केव्हाही भेटा, मधु लिमये आणि चरणसिंग यात कोणी कोणाला अधिक बिघडवले याच विषयावर ती मंडळी बोलावयास लागतात.

त्यापेक्षा काळ–कामाच्या खाली वाकले असतानाही आमच्यासाठी दहा मिनिटे खर्च करणारे वसंतदादा मला अधिक चांगले वाटले. दादांचे एक बरे आहे. त्यांना सध्या दिल्लीत कोण व किती विचारते हा प्रश्न वेगळा; पण दादा मात्र मराठी माणसाची जमेल तेवढी काळजी घेतात. 'ससा आणि कासव' यांच्या शर्यतीतील कासवाप्रमाणे दादा आपले बस्तान बसवतील असे मला वाटते. माणसे कशी पारखावीत, पारखलेली माणसे जोडावीत कशी आणि संघटनेचे जाळे कसे आणि कुठे पसरवावे हे दादांना पुरते माहीत आहे. त्यांच्या जवळ स्वतःचे असे बनवलेले आणि वापरलेले काही आडाखे आहेत.

दादा म्हणाले होते, 'हे वारकरी जमलेत. वारकरी कसे व कुणाच्या पैशाने आलेत ते विचारू नका ! देवदर्शनासाठी तीर्थयात्रेला माणसे जातात. पदरमोड करून जातात.' –दादा पैशाच्या प्रश्नाला चलाखीने बगल देताहेत हे पाहून मी म्हटले होते, 'दादा हे सारे खरे; पण वारकरी आणि तीर्थयात्रा हे दोन वेगळे प्रकार आहेत. त्यातून देव-दर्शनही वेगवेगळ्या स्वरूपाचे असते. म्हातारा–म्हातारी जीवनाचे सारे घेणे–देणे चुकवून निवांतपणे काशीयात्रेला जातात. याउलट कंपनीचा अधिकारी प्रमोशन समोर आले असताना वा कारखानदार धंदा पुढे आला असताना तिरुपतीला वा सत्यसाईबाबांच्या दर्शनाला जातात. यातील कोणत्या स्वरूपाचे दर्शन घ्यायला जमलेत हे लोक ?'

दादा क्षणभर गप्प बसतात. नंतर एकदम दिलखुलास हसतात. दिल्लीत आल्यापासून यापूर्वी फक्त यशवंतरावांनाच जमणारे ते दिलखुलास हास्य दादांनी हस्तगत केलंय; पण या हास्याचा माझ्यापुरता कामराजी अर्थ होता 'पारा-कलम !' दादा खरोखरच फार गडबडीत होते. पुढे केव्हाही या प्रश्नावर मोकळेपणाने बोलण्याचे त्यांनी मान्य केले, एवढीच या दहा मिनिटांची फलश्रुती होती. त्यातून कोणत्याही कारणाने व कसेही शेतकऱ्यांसाठी काही तरी होतंय म्हणून दादा मनोमन सुखावलेत हे पण जाणवले होते.

आणि दादांना काल अभिप्रेत असलेले ते शेतकरी आमच्याभोवती पसरलेत.

मंडळी मजेत-सुखात शहर बघत चाललीत, अनेकांच्या हातात काँग्रेसचे झेंडे वा इंदिरेचे फोटो आहेत, रंगीबेरंगी झेंडे. त्यांच्या काठ्यासुद्धा रंगीत ! रंगीत फोटो. राजस्थानातून आलेल्या शेतकऱ्यांच्या डोक्यावर भल्या मोठ्या भगव्या मारवाडी पगड्या आहेत. हातात भाले घेऊन हिंडणारे निळे फेटे लावलेले निहांग शिख, भगव्या कपड्यांत हिंडणारे साधूंचे थवे. एक भव्य व्यासपीठ उभारलंय. बलूनला लावून १५ फूट उंचीचे बाईंचे एक रंगीत चित्र हवेत तरंगतंय, जणू इंद्रधनुष्याच्या रंगाची पसरण दिल्लीच्या रस्त्यावर झाली आहे. 'बोट क्लबपासून इंडियागेट'पर्यंतचा दोन किलोमीटर लांबीचा रस्ता माणसांनी नुसता खचाखच भरलाय. अगदी मुंगीलाही शिरता येणार नाही असा. माईक-वरून लताची गाणी वाजवली जाताहेत. 'ओ मेरे वतन के लोगो' तर पुन्हा पुन्हा वाजतंय. वरून दोनतीनदा हेलिकॉप्टर उडत जातंय, इंदिराजी त्यात बसून हा सारा सोहळा पहाताहेत म्हणे ! घड्याळाचे काटे पुढे जात होते. आता तसा वाट पहायचा कंटाळा आला होता. बाईंनी लवकर यावे असे मनोमन वाटत होते पण नेत्यांचे काही सांगता येत नाही. आपल्या मागच्या मेळाव्यात चरणसिंग चांगले चार वाजताच आले होते; पण बाईंनी असला काही प्रकार केला नाही. एक वाजून पाच-दहा मिनिटे झाली आणि पांढऱ्या शुभ्र साडीतील प्रसन्नमुख इंदिराजी व्यासपीठावर चढल्या.

□

# चार

इंदिरा सभेत आली आणि दिल्लीच्या भाषेत सभेचा 'माहोल' क्षणार्धात बदलला. पुरुष ती नीट दिसावी म्हणून उगाचच उभे राहिले, बाया बापड्यांनी आपले हात जोडले. मात्र सभेत तशी कोणतीच घोषणा उठली नाही. लोकांनी आपल्या लाडक्या नेत्याचे गगनभेदी आवाजात स्वागत करावे असे काही घडले नाही. साऱ्या सभेतून इंदिरा प्रेमाची एखादी लहर किंवा शिरशिरी म्हणा हवी तर थरारून गेली असे काही वाटले नाही.

पण बाई बोलायला उठल्या आणि काळजाचा ठोका चुकला. दिल्लीकरांना बाईंची भाषणे नवीन नाहीत. १५ ऑगस्टपासून, मुसलमानांनी भारतीय संस्कृतीवर काय उपकार केले हे त्यांच्या परिषदेत सांगण्यापर्यंत बाई सर्वत्र बोलतात. भाषणांच्या व समारंभाच्या रमीचे वेड असलेले आमच्यासारखे काही

हौशी ही भाषणे ऐकावयास जातात. बाकीच्यांना ती दूरदर्शनवर सक्तीने पहावी व ऐकावी लागतात. १५ ऑगस्टला लाल किल्ल्यावर भाषण देताना बाईंनी मधेच औषधाची गोळी कशी व का खाल्ली यावर सब्जी मंडी पासून ऑफिसपर्यंत रसिकतेने चर्चा होतात. बाईंचे ते १५ ऑगस्टचे भाषण आता पर्यंत नेहरू, शास्त्री वगैरेंना न जमणारे कसे अप्रतिम होते हे खुशवंतसिंग मग महिनाभर लिहीत बसतो, हे सारे क्षणार्धात आठवते; पण तरीही काळजाचा ठोका चुकतोच !

कारण आजचा आवाज. हा आवाज बाईंचा नाही. आयुष्यात अगदी प्रथमच राणा भीमदेवी सुरात बाईंचा आवाज चक्क टिपेला पोचलाय. खरं सांगायचं तर बाई जवळजवळ सरळ किंचाळतच बोलताहेत. बाईंच्या आत्ता-पर्यंतच्या कुठल्याही भाषणात हे मी कुठेही अनुभवलेले नाही. बाईंची अनेक भाषणे ऐकलेल्या माझ्या कुठल्या मित्रांनी व दिल्लीच्या वार्ताहरांनी पण हा आवाज कधी ऐकला नाही. हा जमलेला अथांग जनसमुदाय. बाईंच्यावरही याचा काही परिणाम झालाय का ? –मनावरचे काही फार मोठे दडपण कमी झाल्याचा वा मनावर असे काही दडपण अचानक आल्याचा हा परिणाम आहे का ? आणि तसे असेल तर हे दडपण कुणाचे ? कुठले ?

' भारतीय किसानांनो, मी तुमचे स्वागत करते. त्यासाठी मी येथे आले आहे. ' या भावपूर्ण शब्दांत भाषणाची सुरुवात होते. ' द्वारका से लेकर पुरीतक, कश्मिर से लेकर कन्याकुमारीतक, नागालँड आसाम सारा भारत आज मेरे सामने खडा है ' हे म्हणताना तर बाई चक्क रडणार असे वाटावे असा त्यांचा आवाज दाटून येतो. आणि नंतर सतत चाळीस मिनिटे अगदी टिपेला पोच-लेल्या आवाजात बाई बोलत राहतात.

' प्रथम बाई कोपरखळी मारतात ती चरणसिंगांना. त्यांचे नाव न घेता त्या म्हणतात, ही रॅली काँग्रेसने बोलावली आहे पण ही काँग्रेसची नाही– ये पार्टीकी रॅली नही, देशकी–भारतकी रॅली है– आज असा मेळावा भरवणे चुकीचे आहे असे अनेक जण म्हणताहेत. मजेची गोष्ट अशी की, आज असे म्हणणा-ऱ्यांनीच मागे अशी रॅली भरवण्याचा प्रयत्न केला होता. ती रॅली केवढी मोठी झाली होती आणि तुमच्यापैकी खरेच किती जण त्याला आले होते मला माहीत नाही. कारण....कारण.... उस समय एक नही कई सौ तालियोंके अंदर मैं तिहार जेल में बंद थी ! '

त्यानंतर बाई सांगतात, कुरबानी द्यावी लागली तरी चालेल, पण शेतकऱ्यांची स्थिती सुधारायचीच म्हणून मी ठरवलंय— चाहे जेल जाना हो चाहे सीर कटाना हो ! त्यानंतर बाई वळतात काँग्रेसच्या इतिहासाकडे. त्या म्हणतात आज

कोठ छोटी-मोठी शेतकरी आंदोलने होताहेत. आणि काँग्रेस शेतकऱ्यांच्या साठी काही करत नाही. म्हणून ते लोक डांगोरा पिटताहेत. अरे, काँग्रेसची सुरुवात झाली ती मुळी बार्डोली आणि चंपारण्यातील शेतकरी आंदोलनांनी. ४७ साली राज्यावर आल्यावर काँग्रेसने पहिली गोष्ट केली शेतकऱ्यांसाठी. आम्ही सर्वप्रथम गाडला तो जमीनदारीचा भस्मासूर. त्यानंतर कागद वगैरे न बघता चार पाच मिनिटांत सहाव्या पंचवार्षिक योजनेत सरकार किसानांसाठी काय करणार आहे याची आकडेवारी फेकतात. त्यातही शहरातील लोकांच्या मानाने खेड्यांतील लोकांसाठी कसे झुकते माप आहे हे खुबीने सांगतात. गन्ना आणि कपास यांचे दर वाढवून दिले आहेत हे सांगून हे सारे तसे यापूर्वीच व्हावयास पाहिजे होते हे पण मान्य करतात आणि त्याच सफाईने सांगतात— ' बिच में हम हार गये थे ना इसकी वजह से ये देरी हुई ! नही तो ऐसा नही होता ! '

भाषणातील शेवटचे किसानस्तुतीचे पर्व मग सुरू होते. बाई सांगतात स्वातंत्र्यानंतर या देशातील शेतीउत्पन्न तीन पटींनी वाढले. बहादूर शेतकऱ्यांनो, तुमच्यामुळे हे झाले. जगातील कोणत्याही देशात हे झालेले नाही. कोणतीही विचारधारा असलेल्या देशाला हे जमलेले नाही. आणि हे थोडे स्पष्ट करून सांगताना बाई थोडी चूक करतात. त्या पुन्हा पुन्हा याच देशांचा उल्लेख करतात. चाहे वो कम्युनिस्ट देश हो. चाहे मार्क्सके विचारोंसे चलनेवाले देश हो चाहे वो साम्यवादी हो।' इतर कोणत्याच देशांचा त्या उल्लेख करत नाहीत.

हा असा बहादूर शेतकरी. याच्यात आणि कामगारांच्यात झगडे लावण्याचा आज काही जण प्रयत्न करताहेत. ते लोक तुम्हाला, शेतकऱ्याला समजलेले नाहीत. प्रत्येक शेतकऱ्याला तीन मुले असतात. एक शेतात असतो. दुसरा शहरात कामगार बनून देशाची सेवा करतो. तिसरा जवान बनून देशाची सीमा सांभाळतो. ही या देशाची एकता आहे. बाई घोळून आणि आवर्जून सांगतात, खऱ्या अर्थाने या देशातील प्रत्येक जण किसानच आहे– ' कौन है इस देश मे जो किसान का बेटा नही है। खाली मै हुँ एक बदनसीब ... ' बाईंच्या या वाक्यावर सभा अक्षरशः हेलावते. ' भारत माता की जय 'ची बाई जमावाबरोबर त्रिवार ललकार देतात आणि चाळीस मिनिटे सुरू असलेले हे नाट्य संपते !

आणखी कोणी यापूर्वी वा यानंतरही बोलावयास नव्हते ते तसे छानच झाले. पण बाईंचे भाषण झाले नि सभा अक्षरशः संपली. बाई गेल्या आणि लगेच संयोजकांनी, आलेल्या आमदार-खासदारांनी आणि पोलिसांनी अक्षरशः घरी

परत पळावयास सुरुवात केली. परीक्षा संपल्यावर असतो तसा ताण संपल्याचा आनंद त्यांच्या चेहऱ्यावर होता. आपण असलो-नसलो तरीही हा जमाव शांततेने आणि रमत गमत परतेल असा विश्वासही त्यांना आलेला असावा. केवळ मजा म्हणूनच आम्ही चौघे मित्र त्या दिवशी रेल्वेस्टेशन आणि अंतरराज्य बस-अड्डा पहावयास गेलो, आणि म्हणूनच आणखी एक नाटक आम्हाला पहावयास मिळाले. कवित्व संपल्यानंतर उरणारा तो बाकीचा भागही तसा अनुभवण्या-सारखा होता! ट्रक आणि बसेस्मधून जाणारे लोक गर्दी सोसूनही मजेत हसत खिदळत जात होते; पण रेल्वेस्टेशनची हालत फार खराब होती. प्रचंड गर्दी! कोणाचा पायपोस कोणाच्या पायात नाही. मुंबईला ऑफिस सुटल्यावर, दोन-तीन तास लोकलसेवा विस्कळित झाल्यावर चर्चगेट, बोरीबंदरला येणारी कळा यापेक्षा बरी असते. स्टेशनात आम्हाला भेटले श्री. सोमाणी. ते पाटणा म्युनि-सिपल बोर्डाचे अध्यक्ष आहेत. पाटण्याला जाणाऱ्या एअरकन्डिशन प्रथम श्रेणीच्या डब्याबाहेर ते संतप्त मनःथितीत उभे होते. आपल्याला दिल्लीत आणून सोडल्यावर संयोजक निघून गेले. आपली व आपल्याबरोबरच्या लोकांची कशी उपासमार झाली वगैरे ते तावातावाने सांगत होते. आम्ही कुठल्यातरी दिल्ली-तील वर्तमानपत्राचे वार्ताहर आहोत असा त्यांचा समज झालेला होता. आम्हाला मात्र त्यांना पाहून त्यांनी आणखी काही उपाय करणे अगत्याचे आहे असे सांगण्याचा अगदी अनावर मोह होत होता. तेवढ्यात आम्हाला वार्ताहर सम-जून श्री. व सौ. श्रीवास्तव आमच्यासमोर येऊन उभे राहिले. त्यांची शोकां-तिका तर याहूनही अधिक होती. त्यांनी १ महिना आधी दिल्लीहून हावऱ्याला जाण्यासाठी प्रथमश्रेणी एअरकन्डिशनची तिकिटे आरक्षित केली होती. 82 DN हावरा एक्सप्रेसच्या डबा क्रमांक १०६६ वर लावलेल्या आरक्षकयादीत पाच मिनिटांपूर्वीपर्यंत त्यांचे नावही होते; पण आत्ताच येऊन रेल्वेच्या एका ऑफिसरने त्यांचे नाव खोडून तेथे बिहारचे समाजकल्याणखात्याचे मंत्री श्री. मिश्रीसादा यांचे नाव लिहिले होते आणि मंत्री सपत्नीक जाऊन त्यांच्या जागेवर बसलेसुद्धा होते! मंत्र्यांचा स्थितप्रज्ञ चेहरा पाहून त्यांच्या या समाज-कल्याणाला हसावे की रडावे हेच आम्हाला समजत नव्हते. श्रीवास्तवांच्यावर झालेला अन्याय आम्ही समजू शकत होतो; पण त्याचे आम्हाला काही फारसे वाटले नाही. इतर लोकांना जे आज हरघडी भोगावे लागते ते वरच्या वर्गातील माणसाला एखादे वेळी भोगावे लागले तर त्यात तसे काय बिघडले? आम्ही श्रीवास्तवांना मात्र अगदी लोकसभेपर्यंत त्यांची तक्रार न्यावयाचे आश्वासन दिले. बाकी द्वितीयश्रेणी आरक्षित डब्यांना मुंबईच्या लोकलचे स्वरूप होते; पण त्यातही आम्हाला नवे काही नव्हते. दर दिवाळी-दसऱ्याला उत्तर भारतातील

साऱ्याच स्टेशनवर आरक्षित डब्यात हाच प्रकार असतो. अगदी मधू दंडवते असतानाही सुरू होता! पण गर्दीतही डब्यातील लोक तसे खुशीत होते. फार काही पाहिले. एका मोठ्या नाटकात सामील झालो, जत्रेतही भटकलो असा आनंद त्यांच्या चेहऱ्यावर होता. आम्हीही खूप दमलो होतो; पण किमान त्या क्षणी तरी आमची पण भावना तीच होती. आम्हाला रॅली अक्षरशः चढली होती!

□

## पाच

मेळावा भरवला आणि संपला! या मेळाव्याने अनेकांना चकवले. खरे पाहता भोवतालच्या लोकांना अगदी नजीकच्या सहकाऱ्यांनासुद्धा सफाईने चकवणे हा बाईंच्या राजकारणाचा तसा कणा आहे. दिल्लीतील काही परदेशी वार्ताहर याला आता Ladies grace असे म्हणतात. बाईंच्या मनात काय आहे, हे भोवताली तरंगणाऱ्या एकालाही तसे कधी समजत नाही. बाईंनी आपले शेवटचे पान खाली टाकेपर्यंत त्यांच्या विश्वासातील सारेच जण ' मया जितम् ' च्या धुंदीत राहू शकतात.

—मेळावा भरण्यापूर्वीची गोष्ट. विरोधी पक्षापासून आज अस्तित्वात नसलेल्या यूथ काँग्रेसपर्यंत अनेकांनी अनेक खाजगीतले अंदाज व्यक्त केले होते. विरोधी पक्षाच्या एका नेत्याने नव्हे तर काँग्रेस आयच्या तिकिटावर महाराष्ट्रातून निवडून आलेल्या एका खासदाराने बाई या मेळाव्यात अध्यक्षीय पद्धतीचे सूतोवाच करतील म्हणून विश्वासाने सांगितले होते.

मेळावा फारच मामुली स्वरुपाचा भरेल आणि झालेली अव्यवस्था काबूत आणता आणता आणि जमावाच्या थिल्लरपणाने होणारी बदनामी भरून काढताना नाकी दम येईल असाही अंदाज व्यक्त झाला होता आणि हाही अंदाज काही विरोधी पक्षांचा नव्हता– जगदीश टायटलर आणि त्याचे यूथ काँग्रेसचे निकटचे सहकारी यांचा हा अंदाज होता! आणि त्यांची तरी काय चूक? संजय नसतानाचे सोडा, संजय असतानाही गुंडागर्दी जमावावयास किती आणि कसा वेळ व पैसा लागतो आणि शेवटी त्यातूनही किती गर्दी जमते हे त्यांनी अनुभवले होते. मेळावे संपवून परत जाताना जमवलेली बाळे रेल्वेत काय रंग उधळतात ते पण त्यांनी भोगले होते! त्यातूनही आपणाला संपूर्णपणे डावलून असे काही

दिल्लीत होऊ शकते ते पण त्यांना समजत नव्हते, पचत नव्हते. टायटलर वगैरेंचे सोडा. युवा काँग्रेसच्या या सर्व चण्याफुटाण्यांच्या गर्दीत खुशवंतसिंग म्हणजे तसा बत्तासा! पण या मेळाव्यापूर्वी खुशवंतसिंगांशी मेळाव्याबाबत काही बोलावयाचा प्रयत्न केला तेव्हा फक्त सरदारजीलाच जमू शकेल अशा भाषेत त्यांनी या मेळाव्यावर तोंड पाखडले.

शेवटी आपण संपत आहोत, संपलो आहोत याची जाणीव केवढी विलक्षण भेदक असते! या मेळाव्यानंतर एखाद्या विरोधी पक्षाने लिहावे तसे खुशवंत-सिंगांनी आपल्या सहीसह 'हिंदुस्थान टाइम्स'मध्ये लिहिले 'या असल्या मेळाव्यामुळे फार पैसा उगाच खर्च होतो. लोकांचे दैनंदिन जीवन विस्कळीत होते. आजारी माणसांना रुग्णालयात वगैरे न्यावयास त्रास होतो वगैरे वगैरे!' पण काँग्रेसचे नसलेल्या 'स्टेटस्‌मन'ने त्याच दिवशी याला एक उत्तर दिले होते. स्टेटस्‌मनने लिहिले होते, 'हा एक आल्हाददायक अनुभव होता. एवढी प्रचंड गर्दी; पण किती शिस्तबद्ध! कॅनॉट प्लेसला नोकरीला जाणाऱ्या लोकांसाठी राजपथ सोडून इतर अनेक रस्ते मोकळे ठेवले होते. दिल्लीतील साऱ्या कचेऱ्या आणि कारखाने नेहमीप्रमाणे काम करत होत्या.' एक वरिष्ठ पोलिस अधिकारी म्हणाला, 'लोक पोलिसांना उगाचच नावे ठेवतात. खरे पाहता प्रत्येक छोट्या-मोठ्या मेळाव्याच्या वा सभेच्या वेळी कागदावर पोलिसांची व्यवस्थेची योजना इतकीच व्यवस्थित व संपूर्ण असते; पण कोणत्या तरी क्षणी मोठी गर्दी हाता-बाहेर जाते. सारी व्यवस्था कोलमडून पडते.' या वेळचे जमावाचे वागणेच तसे इंडियावाल्यांना अद्‌भत होते. सामूहिक शिस्त ही खेड्यापाड्यात नकळतच रुजलेली आहे का? गुंडागर्दी, हुल्लडबाजी या लोकांच्या प्रकृतीतच बसत नाही का? तसे असावे. खरे बोलायचे तर युवा काँग्रेसचे सोडा, पण हुल्लडबाजी आणि नारेबाजी म्हणजेच सारे काही मानणाऱ्या इंडियावाल्यांना प्रथमच भारतीय जनता म्हणजे काय हे पहावयास मिळाले!

या मेळाव्याला किती आणि कसा खर्च आला हा तसा वादाचा प्रश्न आहे. आलेल्या माणसांपैकी अगदी एकानेही आपल्या खिशातला छदामसुद्धा खर्च केला नाही हे पण एक अगदी उघड गुपीत आहे. आलेल्या खर्चाचा अंदाज दहा कोटींपासून शंभर कोटींपर्यंत सांगितला जातो. खेड्यापाड्यातील लोकांच्या साठी इतका खर्च झाला हीसुद्धा माझ्या मते तशी जमेचीच बाजू. मोठ्या कंपन्यांचे अधिकारी, कामगारांचे बोनस यावर या देशात केवढा प्रचंड पैसा खर्च होत असतो! नुसते पेट्रोलचे दर वाढले तर देशाचे पाच हजार कोटी रुपये परकीय चलनात जातात आणि तरीही रस्त्यांवर वाहनांना जागा नाही, अशा गर्दीने महानगरात खाजगी वाहने असतात आणि तीस वर्षांपूर्वी खाजगी गाडी

वा खाजगी वाहन माहिती नसलेल्या आम्हा लोकांना हे लागते. एक वेळ कोणत्याही कारणाने खेड्यातील काही लोकांच्यासाठी त्यांना 'जिवाची दिल्ली घडावी' म्हणून अगदी शंभर कोटी रुपये खर्च झाले तरी काही बिघडत नाही हे किमान माझे तरी व्यक्तिगत मत आहे.

–असो ! हा मेळावा उत्स्फूर्त नव्हता. फार प्रयत्नपूर्वक जमवलेली ही गर्दी होती. नियोजनपूर्वक काटेकोरपणे हे सारे आखलेले होते पण म्हणूनही काही बिघडत नाही. दारासिंगच्या वल्लभभाई पटेल स्टेडियमवरच्या साऱ्याच कुस्त्या अशा असतात म्हणून त्यांची रंगत काही कमी होत नाही. त्यातूनही काही कुस्त्या फसतात. काही नुसत्या चालतात. काही कलेच्या व धंद्याच्या दृष्टीनेही जाम यशस्वी होतात. शेवटी साऱ्याच नाटकांचे प्रयोग बसविलेले असतात. तरीही आपण ते पहातो आणि त्यांचे कौतुक करतो. त्यातूनही प्रयोगाच्या वेळी एखादा प्रयोग कळतनकळत फार वरची पातळी गाठतो.

या नाटकात फक्त एक ठरलेला नट आला नाही. राजीव मेळाव्यात भाषण देईल, किमान व्यासपीठावरून दर्शन देईल असा अंदाज नव्हे विश्वास मेळाव्याच्या संयोजकांचा होता. विरोधी पक्षांचा होता. युवा काँग्रेसचा पण होता. पण त्या दोन भावांत दोन ध्रुवांचे अंतर आज तरी दिसत आहे. राजीव राजकारणात उतरणार यात तसा दिल्लीत आज कोणालाच संदेह नाही; पण त्याची सारी पद्धतच भावापेक्षा वेगळी असेल. तो व्यासपीठावर गेला नाही; पण त्याने झाडून साऱ्या छावण्यांना भेट दिली. शेतकऱ्यांच्या आणि त्यांच्या प्रमुखांशी तो बोलला.

—पण मग या नाटकाचे प्रयोजन काय होते आणि त्याची फलश्रुती काय हा आपला पहिला प्रश्न अजून तसा बाकी उरतोच. त्याला दोन-तीन उत्तरे संभवतात.

–पहिले म्हणजे, राजीवने पुढे-मागे आपल्या वाटेत वजीर बनून आडवे येऊ शकणारे, आपली वहिनी मनेका हिचा झेंडा खांद्यावर घेऊन पुढे येणारे, खुशवंतसिंग, युवा काँग्रेस वगैरेंचे प्यादे निकालात काढले. आता हे प्यादे राजीवने संपवले की राजीवला वापरून मध्यंतरी दूर फेकले गेलेल्या काँग्रेसमधील जुन्या जाणत्या लोकांनी हे केले हे समजावयास आणखी काही काळ थांबावे लागेल.

दुसरे आणि महत्त्वाचे म्हणजे विरोधी पक्षाला काही काळ तरी भोवळ यावी असे इंदिराबाईंनी त्यांना आपल्या सामर्थ्याचे, जनमानसावरील आपल्या पकडीचे, आपल्या संघटनाकौशल्याचे आणि आपल्या वेठीला असलेल्या अमाप साधनसंपत्तीचे दर्शन घडवले. शेतकऱ्यांचे आर्थिक प्रश्न हातात घेऊन, आप-

त्याला रस्त्यात येऊन गाठणारा एखादा राजकीय नेता आणखी काही काळ तरी उभा राहू शकणार नाही, याचा त्यांनी बंदोबस्त केला!

—पण फक्त एवढ्या दोन-तीनच गोष्टी घडल्या का? मला असे वाटले नाही. माझ्याबरोबरच्या माझ्या मित्रांनाही असे वाटले नाही. म्हणजे असे-नेहमी फक्त इतरांनाच धक्के देणाऱ्या खुद्द बाईंनाच या मेळाव्याने काही धक्का दिला का? — सभेच्या सुरुवातीलाच बाईंचा गळा इतका दाटून का आला? सभेत ज्याला खरोखर किंचाळणे म्हणावे असा बाईंचा आवाज टिपेला का पोचला? कोणत्या कारणाने झालेले कृष्णाचे 'विश्वरूपदर्शन' कोणाही संमोहित अर्जुनाला भ्रमनिरास करावयास पुरेसे असते. ही संख्या, ही शिस्त, आपल्या प्रश्नांची या लोकांना होत असलेली पहिलीवहिली जाणीव. राजकारणात मुरलेल्या बाईंना हा पहिलावहिला हुंकार देणारा ज्वालामुखी नक्कीच जाणवला असेल!

भाषणात शरद जोशी वा कांदा आंदोलन याचा त्यांनी एकदाही उल्लेख केला नाही; पण नाव न घेता तसे बाईंनी हे सारे सांगितलेच की! किसानांचे वेगळे आर्थिक प्रश्न आहेत हे त्यांनी मान्य केले. कपास आणि गन्ना यांचे दर वाढले आहेत आणि ते आणखीही वाढले पाहिजेत म्हणून सांगितले. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे शहर आणि खेडी असा लढा उभा राहू नये म्हणून शेतकऱ्यांना भावनात्मक आवाहन केले — 'शेतकऱ्याला तीन मुलं असतात. एक शेतात, एक कारखान्यात, एक सीमेवर. सारा देशच शेतकऱ्यांचा आहे—खाली मैं हूँ एक बदनसीब जो किसानकी बेटी नहीं' असे म्हणेपर्यंत हे भावना हेलावणारे आवाहन गेले.

कारण आपल्या सामर्थ्याचे व राजकीय कौशल्याचे प्रदर्शन करून विरोधी पक्षांना आपण वाकवू शकू, शेतकऱ्यांची पण काही काळ दिशाभूल करता येईल; पण एक संपूर्ण समाज ढवळून काढणारा, प्रचलित घडी मोडीत काढणारा, नवा आर्थिक विचार या मार्गाने संपवता येणार नाही हे त्यांना जाणवले आहे.

आणि हे सारे सांगितल्यावर एक गोष्ट उरतेच. विचाराचा मुकाबला जसा विचारांच्या पातळीवर करावा लागतो तसाच विचारांचा प्रचार आणि प्रसारही विचारांच्या पातळीवरच करावा लागतो. जाणीवपूर्वक, नियोजनपूर्वक, निष्ठापूर्वक व्हावा लागतो. विचार ही आग असली तरी ती वणव्यासारखी आपोआप पसरत नाही. संघाची पठडीतील बौद्धिके, गांधीजींची सूतकताई आणि साम्यवाद्यांची अभ्यासमंडळे म्हणूनच जरुरीची असतात. शेवटी शेतकऱ्यांचे ज्वलंत वेगळे आर्थिक प्रश्न आहेत. या देशात त्यांच्यावर कळत नकळत अनेक दशके फार मोठा अन्याय होतो आहे. त्यांच्यावर काही अक्सीर उपाय आहेत, हा एक

नवा तर्कसंगत शास्त्रशुद्ध विचार आहे, या विचारावर निष्ठा असलेले लोक हा भारतभर, सर्वसामान्य शेतकऱ्याजवळ किती झपाट्याने आणि किती प्रभावीपणे पोचवणार हा खरा प्रश्न आहे आणि आज तरी या विचाराजवळ असा काही भारतव्यापी कार्यक्रम आहे असे दिसत नाही. त्याच्याजवळ असा काही भारत-व्यापी कार्यक्रम असणे ही काळाची गरज आहे. नाही तर असले डोळ्याचे पारणे फेडणारे मेळावे भरवून वा दिंड्या काढून भारतीय शेतकऱ्याची आपण आणखी काही दशके तरी सहज दिशाभूल करू शकू हे इंडियावाल्यांनी त्यांना दाखवून दिलंय!

* * *

# सात आंधळे आणि एक अप्पू

## एक

लोकमान्य टिळकांचे एक झकास वाक्य आहे : 'पैशाची भांग घेतली की, कल्पनाच कल्पना सुचतात !' पण हे केवळ तसेही नाही. तापात, गुंगीत असलेल्या माणसासमोर घटनांचे असंबद्ध संबंध उलगडत जातात. खरे पाहता काहीच समजत नसते; पण समजते असा भास होतो. जी. ए. कुलकर्णींची कथा मज्जातंतूंचा गुंता करीत पुढे सरकत जाते. नक्की काय ते समजत नसताना मर्ढेकरांची कविता पुन्हा पुन्हा वाचावीशी वाटते आणि थोडे काही समजले आहे असे वाटत असतानाच समजलेले अधिक अधिक अस्पष्ट आणि गूढ वाटू लागते. तरीही पुन्हा एक सूर मारून आपण त्या कवितेत शिरतोच. उगाच वेळेचा अपव्यय की, कळत नकळत भोगलेले आयुष्यातील काही फार मोलाचे क्षण. काही सुद्धा तसे समजत नाही. संवेदनाक्षम माणसाचे विसरा, तुमच्या–माझ्यासारख्या बधिर, संसारी माणसानेही अस्वस्थ व्हावे असे काही झपाट्याने गेले एक वर्ष माझ्याभोवती घडतंय. उद्यापासून त्याचा कळसाध्याय सुरू होणार. – गेल्या वर्षभरातले सारे असंबद्ध तुकडे मनात कसे गर्दी करून उभे आहेत !

□

## दोन

प्रथम आशियाड हा शब्द सारेच जण तसा सहजपणे घेत होते. नक्की काय होणार आहे हे तसे कोणाच्याच लक्षात आलेले नव्हते. एकेकाचे नशीब असते !

आशियाडला राजनारायण आणि चरणसिंग यांनी विरोध केला होता आणि या दोघांनी विरोध केलेली कोणतीही गोष्ट चांगलीच असणार असेही वाटत होते ! हळूहळू नकळत घटनांनी वेग घेतला — भोवळ यावी असा वेग घेतला ! पुरात सापडल्यावर आपला स्वतःवर ताबा असूनही तो सुटलेला असतो. पाणी नेईल तसे थोडे वाहात जावे लागते. मिळतील त्या गटांगळ्या आणि डुबक्या खाव्या लागतात. आपण पुरात पोहलो वा पुरात पोहणारे लोक पाहिले एवढेच, म्हटले तर मोलाचे समाधान नंतर आपल्यावरोबर असते. आशियाड या शब्दाभोवती गेले वर्षभर नक्की असेच काही तरी घडते आहे. राजीवच्या मर्जीतून उतरलेले म्हणून जगमोहन यांची दूर गोव्याला बदली झाली. आशियाडच्या अखेरीस तेवढ्याच तातडीने या कार्यक्षम माणसाला पुन्हा दिल्लीचे राज्यपाल बनविले गेले. नको त्या ठिकाणी प्रचंड पूल उभे राहिले आणि पाहिजे तेथील हलवले गेले. विश्वास बसणार नाही अशा वेगाने कामे झाली. आग्रा येथील बुलंद दरवाजाने अवाक होऊन पहात बसावे अशा वास्तू उभारल्या गेल्या. अक्षरशः शेकडो कोटी रुपये पाण्यासारखे खर्च झाले ! ठेकेदार एका रात्रीत कोट्याधीश बनले. या सर्वांची काही जरुरी होती का ? या सर्वांनी आपण नक्की काय मिळवले ? — खरे पाहता हे प्रश्नसुद्धा तसे मनात येत नाहीत. आपण नुसते भयचकित होऊन पाहत उभे असतो; पण तुमची–माझी गोष्ट सोडा. मला अजिबात न आवडूनही मी ज्यांना अतिशय मानतो त्या इंदिराजी पण आयुष्यात प्रथमच बावचळलेल्या दिसतात. काल त्यांनी खेळनगरीत भारतीय खेळाडूंना संबोधित केले. त्या म्हणाल्या,

‘ आम्ही राज्यावर आलो त्या वेळी खूप निर्णय आधीच घेऊन ठेवलेले होते. डावपेचांच्या दृष्टीने त्यापासून परत फिरणे चुकीचे होते. आशियाड भरविणे चुकीचे आहे असे वाटणाऱ्यांनी आधीपासूनच काही ठाम निर्णय घ्यावयास हवे होते....पण आशियाड भरवणे पण तसे चूक नाही. भारता-सारख्या मोठ्या देशाला आपणही हे करू शकतो, आम्हीही कोणी आहोत ( हम भी कुछ है ) हे जगाला दाखवणे फार जरुरीचे आहे....मला खरी भीती एकच वाटते आहे. तुम्ही खेळाडू तिथे काही करून दाखणार आहात की नाही ? बाकी देशांच्यासमोर क्रीडास्पर्धेत तुम्ही आपली अब्रू तर घालवणार नाही ! नाक तो नही कटवाअेंगे ? हसू तर नाही करून घेणार ? ’

बाई वाटेल ते शब्दप्रयोग वापरत होत्या. बाईंना नक्की काय म्हणावयाचे आहे ते मला समजले नाही बाईंनाही बहुधा समजलेले नसावे !

☐

# तीन

आपण कोणाच्या प्रेमात पडलो तर ते मोकळेपणे मान्य करावे. माणसाच्या, संस्थेच्या, कवितेच्या, कोणाच्याही. मी दिल्ली शहराच्या तसा प्रेमात पडलोय. या शहरात स्वतःचे तंबू उभारत आणि गुंडाळत मी मनसोक्त भटकलोय. या शहरात नक्की नवे असे काय आहे ? नव्या दिल्लीतील हिरवळींनी वेढलेले प्रशस्त रस्ते. त्यावरून बागडणारी तुरळक वाहतूक. बघणाऱ्याच्या काळजाचा ठोका चुकावा अशी जुन्या दिल्लीतील माणसांची आणि वाहनांची गर्दी. सायकली, स्कूटर्स, सायकलरिक्षा, ऑटोरिक्षा, बैलगाडी, हातगाडी, घोडा-गाडी आणि इंपोर्टेड गाड्या, साऱ्या एकमेकांशी स्पर्धा करत या गर्दीत उभ्या आहेत. भाजून काढणारा उन्हाळा आणि गोठवणारी थंडी आहे. आपण अनेक शतके या साऱ्या देशावर सहजपणे आणि मन मानेल तसं राज्य केलंय याची जाण येथील प्रत्येक माणसात कशाला, प्रत्येक वास्तूत आहे ! परोठेवाल्यांच्या गल्लीतील राजनारायणने दहा पिढ्यांत फक्त खानदानी माणसांसाठी परोठे बनविलेत. जामा मसजिदीजवळच्या करीमच्या हॉटेलात बेहतरीन कबाब मिळ-तात. त्याच्या खापरपणजाच्या पणजांनी खुद्द बाबराला कबाब खिलवलेत !— दिल्लीतील प्रत्येकपिढीजात माणसाचा आवाज डेलकार्नेजीने त्याची शिकवणी ठेवावी इतका गोड आणि आदबशीर आहे. प्रत्येकाची नजर तेवढीच बेरकी आणि मतलबी आहे. यातील मला नक्की काय आवडले ? पण आपण कोणाच्या प्रेमात का पडलो याचा माणसाने कधी पंचनामा करू नये !

माझी ही आवडती दिल्ली माझ्यासमोर झपाट्याने बदलते आहे. दिल्ली स्वच्छ, सुंदर आणि प्रशस्त करावयाचा विडा उचलला गेला आहे. या सर्वांची खरी जरुरी आहे ती जुन्या दिल्लीला; पण तिला कोणी हातही लावत नाही ! नवी दिल्ली आधीच खरे पाहता या सर्व बिरुदावलींनी सुशोभित आहे; पण नवी दिल्लीच अधिक स्वच्छ आणि प्रशस्त करावयाचा प्रयत्न आहे. आश्रम, राजघाट, मुळचंद हॉस्पिटल, तीन-चार ठिकाणी रिंग-रोड आणखी रुंद केला जातोय. रस्त्यावरील दिवे बदलताहेत. रंगसंगती, साफसफाई सुरू आहे. बागा आणि हिरवळी उठवल्या जाताहेत; पण छाती दडपून जावी अशी गोष्ट म्हणजे अनेक प्रचंड पूल ( fly over ) उठवले जाताहेत. हे पूल कसले, हे तर चक्क सेतू आहेत ! नव्या दिल्लीची वाहतूक या बांधकामामुळे पार विस्क ळीत होऊन गेलीय. तिला पण जुन्या दिल्लीची कळा आली आहे. सुंदर दिल्लीसाठी आणि आशियाडसाठी हे सहन करा म्हणून जागोजाग फलक

लावलेत. कोणी तरी टाइम्समध्ये मिस्किल पत्र लिहितो. आशियाडचे ब्रीदवाक्य 'Friendship fraternity forever' असे आहे, त्याऐवजी ते 'friendship fraternity flyover' असे असावयास हवे होते!— या सेतूंनी लोकांना जाम वैताग आणलाय. त्यांची नक्की काय जरुरी आहे हे कोणालाच समजत नाही. दिल्ली हे बाळसे धरते आहे की, सूज चढते आहे असा प्रश्न पडतो. कारण हे पूल नक्की जेथे नको तेथे उठताहेत! फार पूर्वी लक्ष्मणचे एक अफलातून व्यंगचित्र आले होते. एका नदीवरील पुलाचे उद्‌घाटन होते. इंजिनीअर, मंत्र्यांनी पैसे दिले म्हणून त्यांचे कौतुक करत होता. मंत्री इतका चांगला पूल बांधला म्हणून इंजिनिअरचे आभार मानत होता. इतक्यात मध्येच एक खेडूत हस्तक्षेप करत म्हणतो, 'साहेब, या पुलात काही तांत्रिक चूक झाली आहे. नदी पलीकडच्या बाजूला आहे!' इन्द्रप्रस्थ-जवळचा सेतू, मुळचंदजवळचा सेतू, जनक सेतू यांचे प्रयोजन लोकांना समजत नाही. इन्द्रप्रस्थजवळ बहुतेक सारी वाहतूक उजव्या बाजूला वळून बाराखांबा-कडे जाते. सेतू मात्र त्या साऱ्या वाहतुकीचा आणखीनच खोळंबा करून सरळ पुढे निघून जातो. प्रत्येक ठिकाणी न चुकता असे होते. दिल्लीतील काही फार मोठ्या उद्योगपतींना गाझियाबाद, फरिदाबाद वगैरे ठिकाणच्या आपल्या कारखान्याला कोठेही न थांबता सरळ वीस मिनिटात पोचता यावे म्हणून हे सेतू उभारले जाताहेत. याचा आशियाडशी काडीमात्र संबंध नाही; म्हणून कुजबूज सुरू होते.— या कुजबुजीत अडकून पडलेले बहुसंख्य लोक जे पाहा-वयाचे ते नेमके पाहत नाहीत. हे सेतू ज्यांच्यापुढे 'किस झाडकी पत्ती' ठरावेत अशा प्रचंड वास्तू सध्या दिल्लीत उठताहेत! दिल्लीतील जामा मसजीद, कुतुबमिनार, लाल किल्ला या गोष्टी कदाचित या वास्तूंपुढे खुज्या ठरतील. परकीय वास्तुशास्त्रज्ञ ज्याच्यावर विश्वासही ठेवावयास तयार नाहीत अशा प्रचंड गतीने तेथे काम सुरू आहे!— दिवसरात्र तेथे मुंग्यांसारखी माणसे काम करताहेत आणि मरताहेत!

□

# चार

आमच्यासमोर ज घडते आहे ते अस्वस्थ करणारे, अंगावर शहारे आणणारे आहे. हा अमानुष असंस्कृतपणा आहे. मध्ययुगात गुलामांची पद्धत होती. त्यांचे व्यापार चालत. इंग्रजी सिनेमात रोम वगैरेमधे चाबकांच्या फटक्या-

खाली मजुरांच्या जथ्यांकडून काम करवून घेतलेलं आपण पाहतो. वेठबिगार-पद्धती वगैरेसुद्धा आपल्या परिचयाची आहे; पण समोर जे घडते आहे ते त्यापेक्षा अनेक पटींनी भयंकर आहे! लाल किल्ल्याचे वा कुतुबमिनारचे दगड रचताना पण माणसांना असे वापरले नसेल! सारे कामगार-कायदे, कामगार-पुढारी, कामगार-मंत्री वगैरे अस्तित्वात असताना विसाव्या शतकाच्या अखेरीस हे भारताच्या राजधानीत घडतंय!

काही लोकांना रमीचे वेड असते. आम्हा काही मित्रांना टिवल्याबावल्या करत भटकावयाचे वेड आहे. बांधकाम सुरू असलेल्या प्रत्येक ठिकाणी जे काही घडतंय ते पाहून आम्ही मोडून पडतोय, चक्रावून जातोय. राजघाटच्या थोडे पुढे, पॉवरहाऊसच्या समोर इंद्रप्रस्थ स्टेडिअम उभा राहतोय. राजघाटाला अक्षरशः बगलेत घालून हा स्टेडिअम उभा राहात आहे. याचा एकून आकार आणि प्रकार राक्षसांच्या गोष्टीतही मावण्याच्या पुढचा आहे. एकशेदहा एकर जमिनीवर हा सारा पसारा उभा राहील. जमिनीची उंची यमुनेच्या पुराच्या पातळीवर नेण्यासाठी दहा लाख घनमीटर माती वापरली जाते आहे. दीडशे इंजिनिअर्स, पन्नासहून अधिक वास्तुशास्त्रज्ञ आणि पन्नासाहून अधिक बांधकाम करणाऱ्या कंपन्या या एका प्रकल्पात गुंतल्या आहेत! युद्धपातळीवर काम सुरू आहे. एका रात्री, खूप मातीची जरुरी होती. पाच हजार ट्रक्स एका रात्रीत जमा करून वापरले गेले. जे येथे घडतंय तेच खेळग्रामात घडतंय. दोनशे इंजिनिअर्स इथे गुंतलेत! फक्त खेळग्रामासाठी ज्या विटा वापरल्या जाताहेत त्या एका रांगेत उभ्या केल्या तर नव्या दिल्लीपासून कॅनडापर्यंत लांबीची एक रांग बनल! जे पोलाद वापरले जाते आहे त्यातून यमुनेवर आरपार असे पूल तिनदा बांधून होतील. वापरले जाणारे सिमेंट सारा कॅनॉटप्लेस-विभाग सिमेंटखाली बुडवून काढू शकेल. जवाहरलाल नेहरू स्टेडिअमची भव्यता तर याहूनही अधिक आहे!

अगदी अद्ययावत यंत्रसामुग्री वापरली तरी इंद्रप्रस्थ स्टेडिअम बांधावयास सहा वर्षे आणि खेळग्राम बांधावयास पाच वर्षे लागतील म्हणून जर्मन आणि अमेरिकन तज्ज्ञांनी सांगितले होते. आपण हे दोन्ही स्टेडिअम फक्त दोन वर्षांत बांधून दाखवणार आहोत. आणि प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी आल्यावर हे तुम्ही तसे सहज कराल म्हणून अमेरिकन आणि जर्मन तंत्रज्ञ मोकळेपणे मान्य करताहेत! मनुष्यबळ म्हणजे काय आणि ते कसे वापरले जाते हे येथे समजते. फक्त इंद्रप्रस्थ स्टेडिअम बांधावयास बारा ते पंधरा हजार कामगार वापरले जाताहेत. भाकरा धरण बांधण्यासाठी पण आपण एवढे कामगार उभे केले नव्हते. खेळग्रामावर दहा हजार कामगार खपताहेत! या देशात दारिद्र्य,



मराठी ग्रंथसंग्रहालय ठाणे
दा. क्र. ........
ग्रंथ

उपासमार आणि बेरोजगार केवढ्या थराला पोचला आहे याचे हे एक जिते-जागते चित्र आहे. साऱ्या हिंदुस्थानातून ट्रक्स, रेल्वे मिळेल त्या वाहनांनी ठेकेदारांनी हे अर्धपोटी, अर्धनग्न, अस्थिपंजर लोक उभे केलेत! स्त्री, पुरुष, म्हातारे, तरुण, कोवळी पोरे सारे या फौजेत जमा आहेत. वेळेचे, सुट्टीचे कसलेही बंधन येथे नाही. दिवस-रात्र यांना पिळून काढणारे कामाचे चक्र फिरतंय. जवळच त्यांना फाटके तंबू दिलेत. दिल्लीच्या थंडीत आणि उन्हाळ्यात; लज्जासुद्धा पुरी झाकू न शकणाऱ्या कपड्यात; मद्रास, राजस्थान, केरळ, महाराष्ट्र येथील दुष्काळग्रस्त विभागातून आलेले मजूर खपताहेत. त्यांच्या तंबूंना लागून राजरोसपणे हातभट्टीची दुकाने चालविली जाताहेत. या कामगारांच्या मुलांच्यासाठी म्हणून एक शाळा चालवण्याचे नाटक होते आहे. मुले कामावर जातात आणि शाळेत येत नाहीत म्हणून शाळेला भले मोठे कुलूप कायमचे लावलेले आहे. ज्यांना कधीच पाणी येत नाही असे नळ आहेत. गुरांच्यासाठी असतात तसे शेवाळ्यांनी भरलेले हौद या लोकांना पाणी पुरवताहेत. संडास वगैरेची सोय कोणत्याच बांधकामावर नसते. पंधरा हजार कामगार एकाच ठिकाणी असलेल्या ठिकाणी हे शक्य पण नसेल! स्त्री, पुरुष, मुले ' लोटा 'परेडीसाठी एका रांगेत बसताहेत. ओकारी यावी अशी दुर्गंधी पसरलीये. माशा घोंगावताहेत, त्याला लागून लांबलचक खानावळी आहेत आणि आधाशासारखे कामगार चहा, पकोडे, भात, रोट्या ओरपताहेत!

माओने पण आपले मनुष्यबळ वापरून, रशियन तंत्रज्ञांना अशक्य वाटणाऱ्या गोष्टी झपाट्याने करून दाखवल्या होत्या. पण त्याने धरणे आणि कालवे बांधले. आपणही हे मनुष्यबळ आणि साधनसामुग्री वापरून राजस्थानचा कालवा पुरा करू शकलो असतो. हे आपण का आणि कशासाठी करतोय तेच आमच्या अजून लक्षात येत नाही! सारे रोम जळत असताना निरो सारंगी वाजवत होता; पण त्याने किमान इतरांना तरी त्रास दिला नाही. रशियात दुष्काळ असताना स्टॅलिनने भुयारी रेल्वे उभारल्या; पण कामगारांना किमान सोयी पुरवल्या. येथे मात्र काही ठेकेदार आणि सरकारी अधिकारी एका रात्रीत लक्षाधीश व्हावेत म्हणून माणसे चक्क मारली जाताहेत! सारे बांधकाम एवढे धोकादायक आहे आणि ते एवढ्या झपाट्याने करावयाचे आहे की, काही माणसे मरणे अपरिहार्य आहे आणि जगभर साऱ्या मोठ्या बांधकामात असेच होते म्हणून दिल्ली विकास विभागाचे उपसंचालक व्ही. एस. अलवाडी यांनी जाहीरपणे सांगितले. मरणाऱ्या प्रत्येक माणसाच्या कुटुंबियांना आपण मोजून पस्तीसशे रुपये देतो म्हणूनही ठणकावून सांगावयास ते विसरले नाहीत! देवा, आम्ही कोणत्या काळात वावरतोय? आमच्या डोळ्यांसमोर

१०-१५ वर्षांची कोवळी पोरे शेकडो फूट उंचीवरच्या घुमटाकार छताला सुशोभित करावयास वर चढताहेत. कारण कोणतेच यंत्र हे काम करू शकणार नाही! पाय घसरून ही मुले आमच्या नजरेसमोर नारळाप्रमाणे खालच्या लाकडी जमिनींवर फुटताहेत. याच जमिनीवर आणखी काही महिन्यांनी चिनी आणि जपानी कसरतपटू आम्हाला आपले कर्तृत्व दाखवतील! मेलेली मने सुद्धा बंड करून उठतात. दिल्लीतील काही तरुणांनी या कामगारांची संघटना बांधावयाचा प्रयत्न केला, आपण किती बच्चे आहोत ते त्यांना समजून आले. फोडा आणि झोडा हे तंत्र ठेकेदारांना माहीत आहे. प्रत्येक प्रांतातील कामगार वेगळे ठेवलेत. आपापसात लढत ठेवलेत. संघटना थोडी कुठे मूळ धरत होती, एका मद्रासी कामगाराने एका पंजाबी बाईची छेड काढली म्हणून आवई उठली. दोन्ही बाजूचे चारशे कामगार मिळेल ते हत्यार हातात घेऊन 'इज्जतीचा सवाल' म्हणून मारामारीला आले. किमान चाळीस पन्नास कामगार जबर जखमी झाले. दोन ठेकेदारांनी व अंमलदारांनी फार कुशलतेने परिस्थिती हाताळली म्हणून त्यांना बक्षिसे देण्यात आली आणि उषा राई यांनी त्यांचे खूप कौतुक केले!

त्यानंतर मजुरांना जवळ वगरे आणावयाचा प्रयत्न कोणी केला नाही. नरमेधयज्ञ अव्याहतपणे सुरू राहिला. सरकारी आकड्यांप्रमाणे चाळीस पन्नास मजूर कामी आलेत. प्रत्येकी ३५०० रुपये घेऊन! हा आकडा नक्कीच खूप जास्ती असेल. आम्हा मित्रांच्या डोळ्यांसमोर अठरा वर्षांचा एक तरुण चिंध्या होत उंचावरुन खाली कोसळलाय; पण आम्ही पेटून उठूच शकत नाही. आम्ही सारे विझून गेलेले संसारी लोक आहोत. संध्याकाळची भाजी वेळेवर पोचली नाही तर घरी काय महाभारत घडेल आणि ऑफिसात साहेब रागावला तर प्रमोशनचे काय होईल याची चिंता वाहणारे आम्ही मित्र अस्वस्थ होण्यापलिकडे काही करत नाही. शेवटी लव्हाळीतला नामदेव सटकर आणि बिढारमधील चांगदेव पाटील हे आमचे प्रतिनिधी आहेत. आम्ही फक्त तिकडे फिरावयास जाणे बंद करतो. आणि आमच्या अनेक रात्री झोपेशिवाय अस्वस्थ होत पुढे सरकतात! इतिहास या वास्तूंना, त्या बांधणाऱ्यांना आणि त्यावेळी षंढाप्रमाणे हे सारे पाहणाऱ्यांना नक्कीच क्षमा करणार नाही!

□

## पाच

आज एक नोव्हेंबर. गुरुपरब, गुरु नानकजयंती! आशियाड फक्त पंधरवड्यावर येऊन ठेपला. आज जेहलम एक्सप्रेसनं मंचरच्या आवटे कॉलेजचे

प्राचार्य पानवळ येणार आहेत. वहिणीचे पत्र आहे, त्यांना स्टेशनवर जाऊन भेट. बऱ्यापैकी मध्यमवर्गीय हॉटेलात त्यांची सोय कर. साऱ्या हॉटेलात जागा मोकळ्या आहेत. आशियाडसाठी लोकांनी अजून फारशा जागा राखून ठेवलेल्या नाहीत म्हणून हॉटेलचालक थोडे नाराजच आहेत. आवश्यक वस्तूंचे दर वाढलेले नाहीत. अंड्यांचे दर एक-दीड रुपयांपर्यंत चढतील असा सार्वत्रिक समज होता; पण अंडे अजूनही आठ आण्यालाच मिळते. दर वाढणार नाहीत म्हणून जगमोहन ठामपणे सांगताहेत आणि लोकांचा त्यांच्यावर विश्वास आहे. वस्तू साठवून वगैरे ठेवण्याच्या फंदात कुणी पडलेले नाहीत. निरनिराळ्या राज्यांत वा परदेशांत पाठविलेली तिकिटे परत येताहेत अशा बातम्या आहेत. हे नक्की असे का होते आहे ते आता बरोबर समजले. माझ्या घरापासून दिल्लीस्टेशन म्हणजे २०-२५ मिनिटांचा गाडीचा रस्ता! पण त्या दिवशी गाडीने तब्बल दोन तास घेतले. माझे आणि पानवळांचे नशीब चांगले म्हणून जेहलम नेहमीप्रमाणेच दोन तास उशीरा होती.

दरवर्षी गुरुनानकजयंतीला चांदणीचौकातील प्रमुख गुरुद्वारात येणाऱ्या सरदारांची सोय व्हावी म्हणून तेथील वाहतूक वगैरे बंद ठेवतात. यावेळी दिल्लीत जेथे जेथे गुरुद्वार आहेत तेथे तेथे सरदारजींच्या मिरवणुकांना वगैरे त्रास होऊ नये म्हणून वाहतूक अडवून ठेवलीय. सारी वाहतूकव्यवस्था कोलमडून पडली आहे. पुण्यात प्रत्येक मारुतीमंदिराजवळची वाहतूक मारुतीभक्तांसाठी रोखली तर जे काही होईल त्यातला हा प्रकार आहे. कोठून आणि कसे पुढे जावे हेच समजत नाही. चक्रव्यूहातून वाट शोधावी तसे गुरुद्वार नसलेले रस्ते शोधत मार्ग काढला. सरकार सरदारजींना जाम टरकलंय! त्यानंतर दररोज दिल्लीवरचा ताण जाणवावा इतका वाढतोय. गांधीवधानंतर ब्राह्मण व ब्राह्मणेतर तणाव, शिवसेनेच्या वेळचा मराठी-दाक्षिणात्य बेबनाव, बांगलादेशनिर्मितीच्या वेळची शेख मुजीबची भाषणे, हे सारे क्षण मनात कळत नकळत गर्दी करतात. पंजाबातून येणारे हिंदू विश्वास ठेवू नये अशा बातम्या देताहेत. अकाली सरकार वाटाघाटी सुरू होतात आणि मोडतात. दिल्लीबाहेरून दिल्लीत येणारी प्रत्येक गाडी अडवून तिची कसून झडती घेतली जात आहे. तीन-चार ट्रक भरून तलवारी मिळाल्या म्हणून जबाबदार वृत्तपत्रामधील बातम्यांमध्ये म्हटलंय. काहीतरी अकल्पित भयंकर होणार हे प्रत्येक जण जाणून आहे. सरदारजींचे काही खरे नाही. ते स्वतःचे तरी बारा वाजवतील नाहीतर आशियाडचे तरी! विमानात केवढी कसून तपासणी घेतात; पण यांनी दोनदा विमाने पळवून दाखवली. मुख्यमंत्र्यापुढे केवढा बंदोबस्त असतो; पण त्यांच्यासमोर जोरदार बॉंब फोडला. स्टेडियमवर जरी बॉंब फोडला तरी झालेल्या गोंधळात बाहेर पडताना शेकडो लोक चिरडून

मरतील. त्यानंतर हिंदू लोक अल्पसंख्यांक असलेल्या सरदारांच्यावर सूड घेतील. माझ्या शीख मित्रांनी या वेळी दिल्लीत न राहता पंजाबात जावयाचे ठरवलंय. साऱ्या दिल्ली शहरावर भीतीची एक दाट छाया आहे. सरकारी बंदोबस्त पण कडेकोट आहे. दररोज सुरक्षिततेची नवी नवी थक्क व्हावी अशी फर्माने सुटताहेत. आपण राज्य करणे म्हणजे काय हे जाणतो म्हणून आपणाला मत द्या म्हणून बाईंनी निवडणुकीच्या वेळी सांगितले होते. राज्य करणे म्हणजे काय ते बाई आणि जगमोहन आज दिल्लीकरांना समजावून द्यायला निघालेत. सारा कार्यक्रम शांतपणे पार पडेल म्हणून त्यांनी आग्रहपूर्वक ठामपणे पुन्हा पुन्हा सांगितलंय. जवाहरलाल नेहरू स्टेडिअमवर जाणाऱ्या ऐंशीहजार स्त्री पुरुषांची दयामाया न करता कडक तपासणी होईल हे त्यांनी जाहीर केलंय, पण हे कसे शक्य आहे ! वेळ पडली तर सारा स्टेडिअम फक्त सात मिनटांत खाली करता येतो आणि अर्ध्या तासात बाहेर उभे असलेले बसगाड्यांचे थवे तुम्हाला सुखरूपपणे स्टेडिअमपासून दूरवर घेऊन जातील म्हणून सांगितलंय.कार्यक्रम पाहावयास येणाऱ्या माणसांनी ट्रान्झिस्टर, दुर्बिणी वगैरे राहू देत, खायचे डबे वा पाण्याच्या बाटल्याही बरोबर ठेवावयाच्या नाहीत. स्कूटरचालकांनी शिरस्त्राणे स्कूटरमध्येच सोडावयाची आहेत. सारे वातावरण युद्धभूमीचे वा दंगलग्रस्त विभागाचे आहे. पोलिसांच्या छावण्या, गस्त घालणाऱ्या गाड्या यांच्याबरोबर सकाळपासून हेलिकॉप्टर्स स्टेडियमवर घिरट्या घालून निरीक्षण करावयास लागतात' सुरक्षा विभागात फार वरचा अधिकारी असलेला माझा एक मित्र मला तरीही निरोप पाठवतो कार्यक्रमाला जाण्याचा वेडेपणा करू नकोस ! केवळ म्हणूनच मी या कार्यक्रमाला जायचे नक्की करतो. आपल्याला असले काही बघावयास अधिक आवडते हे नाकारण्यात काय अर्थ आहे ?

स्टेडिअमवर जाताना माझी गाडी वाटेत अडवली जाते. काही खास गाड्या सोडून स्टेडिअमच्या जवळपाससुद्धा गाडी उभी करावयास परवानगी नाही. चार-पाच मैलांवर असलेल्या प्रगती–मैदानासमोर गाडी उभी करावी लागेल. तेथून बस घ्यावी लागेल. माझा ड्रायव्हर दिल्लीकर आहे. पुरा बेरकी ! गाडीच्या चाव्या माझ्या हातात सोपवत तो समोरच्या गर्दीत नाहीसा झाला. पाच मिनिटात 'खास पाहुण्यांसाठी' म्हणून असलेला गाडीवर चिकटवण्यासाठी असलेला कागद तो घेऊन आला. कोणा हवालदाराला पन्नास रुपये देऊन त्याने तो मिळविला होता. दिल्लीत काय आणि कसे चमत्कार होतात त्याचा तो पुरावा होता. स्टेडिअमवर जे होणार त्याची ती चाहूल पण होती. पास बरोबर घेऊन गेलेल्या हजारो लोकांना निष्ठुरपणे स्टेडिअमवरून परत पिटाळण्यात आले होते. हे दोन-तीन कारणांनी झाले होते. स्टेडिअम उद्घाटन

समारंभाला ओथंबून वाहात होता म्हणून कोणीही कितीही आवर्जून सांगो. पोलिसांना असलेल्या आदेशाप्रमाणेच स्टेडिअम ८०-८५ टक्क्यांहून अधिक भरावयाचे नव्हते. कोणतीही आफत आली तर परिस्थिती हाताळावयास सोपे जावे म्हणून हे केलेले होते. त्यातून प्रत्येक रांगेत दोन-तीन साध्या वेशातील पोलीस पण बसवले होते. त्यांच्यासाठी आणखी दहा टक्के लोकांना प्रवेश नाकारणे जरुरीचे होते. साऱ्या कार्यक्रमाच्या रंगीत तालमी एवढ्या झाल्या होत्या की, स्वयंसेवक, पोलीस, राखीव पोलीस, सीमा सुरक्षा दलाचे लोक यांचे छान साटेलोटे जमले होते. आपल्या ओळखीच्या अनेकांना त्यांनी 'गेटावर भेटावयास' सांगितले होते. हे सारे होऊनही काही हजार लोकांनाच परत जावे लागले, याचे कारण इतकेच की, काही तरी अकल्पित होणार असे समजून तिकिटे असलेले अनेक लोक घरीच बसले होते !

–गाडी उभी करावयाचा खास पास तर मिळाला; पण येथे उतरल्यावर महाभारत होते. पोलीसतपासणी म्हणजे काय ते आयुष्यात प्रथमच बघावयास मिळाले. काही तपासावयाचे त्यांनी बाकी ठेवले नाही. वाटेत कुत्रे उभे होते. वासावरून दारूगोळा शोधावयास तयार केलेले ते कुत्रे भेदक नजरेने जाणाऱ्या माणसांकडे बघत होते. गेल्या चार दिवसात हे कुत्र्यांचे पथक स्टेडिअमच्या कानाकोपऱ्यातून फिरवले होते. ही एवढी सारी सुरक्षाव्यवस्था असूनही स्टेडिअमच्या बाहेर एक निदर्शन सुरू होते. सात अपंग खेळाडू ते निदर्शन करत होते. इराण-इराक युद्धात पांगळा झालेला, माँट्रियल ऑलिंपिक सामन्यातील कुस्तीचा सुवर्णपदक विजेता मोरादाली शिरानी त्यांचे नेतृत्व करत होता. अमेरिकन साम्राज्यवाद आणि युद्ध यांच्यावर बहिष्कार घाला म्हणून त्यांचे सांगणे होते. शिरानीची नजर मनावर कोठे तरी एक चरा ओढून गेली !

□

स्टेडिअममध्ये आलो आणि मनावरचा ताण क्षणात नाहीसा झाला. रंगाच्या आणि सुरांच्या प्रवाहात आकंठ बुडून गेलो. आपला देश हे सारे करू शकतो हा विश्वास बसू नये असा सुखद अनुभव होता. इंदिराजी आल्यावर आज त्यांचा वाढदिवस आहे याची आठवण करून देण्यात आली. साऱ्या स्टेडिअमने उत्स्फूर्तपणे जोरदार टाळ्या वाजवल्या. इंदिराजी या स्वागताने मनोमन सुखावलेल्या दिसल्या. बरोबर तीनच्या ठोक्याला राष्ट्रपती आले आणि त्यानंतर ठरल्याबरहुकूम सेकंदाप्रमाणे नव्वद मिनिटे पुढील कार्यक्रम झाला. प्रत्येक प्रांताचे नृत्यसंघ होते. खरे पाहता २६ जानेवारीला होतो त्यापेक्षा हा कार्यक्रम वेगळा नव्हता; पण रंगसंगती अधिक चांगली होती. दर

वेळी महाराष्ट्र कोळयांचा नाच वा लावणी असा लोकांना न आवडणारा कार्यक्रम करतो. यावेळी करूलेल्या संघांनी साऱ्या प्रेक्षकांना दिवाणे करत लेझमी वाजवल्या. लेझीम वाजवत वाजवत सहजपणे आशियाडचे जंतरमंतर आणि अप्पू करून दाखवले. केरळातून आणलेले शृंगारलेले हत्ती डौलात हिंडले. जी ज्योत पुढील काही दिवसात दहा लाख रुपयांचा गॅस खाणार ती पेटवली गेली. रंगीबेरंगी कपडयांतील खेळाडूंनी संचलन केले. भारतीय चमूचे नेतृत्व करणसिंग करत होते जपानी खेळाडूंनी आपल्या सर्वात उंच आणि सर्वात बुटक्या खेळाडूला जवळ उभे करून कार्यक्रमाला खेळाडूपणाचा स्पर्श केला. एकाची उंची होती सहा फूट पाच इंच. दुसऱ्याची चार फूट चार इंच. आपल्या चमू समोरून स्त्री खेळाडूने जाणे इस्लामच्या विरुद्ध आहे म्हणून त्याला नकार देणाऱ्या इराणी खेळाडूंनी आपल्या गमतीजमतीने लोकांची मने जिंकली आणि स्त्री प्रेक्षकांच्याकडे उत्साहाने हातातील फुले फेकली ! पण प्रेक्षकांनी सर्वांत अधिक टाळया वाजवून स्वागत केले ते पाकिस्तानी खेळाडूंचे ! हे का घडले ? दूर झालेल्या भावांच्यात कोणती शतकाशतकांची नाती गुंतून पडलीत ? लोकांचा आनंद शिगेला पोचला तो प्रचंड अप्पू आकाशात सोडला आणि दोन हजार फुगे आणि पाच हजार पांढरीशुभ्र कबुतरे अकाशात उडाली तेव्हा ! साऱ्या कार्यक्रमाला परिकथेतील वातावरणाचा गंध होता. नरेंद्र शर्मांनी लिहिलेल्या आणि पंडित रविशंकर शर्मांनी स्वरबद्ध केलेल्या ‘ आनंद मंगल मंगलम् अथ स्वागतम् शुभ–स्वागतम् ’ या गाण्यांनी आपण कोठल्या कोठे अंतराळात फेकले जात आहोत असे वाटत असतानाच अमिताभने वाचलेले त्याचे इंग्रजी भाषांतर सुरू झाले. रुबाबात उभे राहून अमिताभने लोकांना नेहरूंच्या थाटात हात हलवून अभिवादन केले. रंगांच्या आणि स्वरांच्या लाटांवर सारे प्रेक्षक हेलावत होते. —बाहेर पडलो त्यावेळी आयुष्यातील एक दिवस वसूल झालाय, तो खराखुरा जगलोय असे वाटत होते.

साऱ्या दिल्लीकरांनी हा कार्यक्रम पहिला. साऱ्या दिल्लीला त्या दिवशी दुपारी सुट्टी होती. सारे रस्ते त्यावेळी सूर्यग्रहणाच्या वेळी मागे झाले तसे झाडून निर्मनुष्य झालेले होते म्हणे ! सरकारने अनेक ठिकाणी दूरदर्शन लावलेले होते. —पण लोक शेवटी अजब असतात. आम्हा कार्यक्रम पहावयास गलेल्या लोकांना कोणीच हा कार्यक्रम कसा वाटला म्हणून विचारले नाही. रंगीत दूरदर्शनवर हा कार्यक्रम पाहणाऱ्याला प्रत्येकजण हा सोहळा कसा वाटला ते विचारत होते. रंगीत दूरदर्शनवर हा कार्यक्रम पाहणारे भाग्यवान लोक देहभान विसरून पुन्हा पुन्हा तेच रंगसंगतीचे चऱ्हाट लावत होते. घरात रंगीत दूरदर्शन असलेल्या लोकांनी घरावर ‘ हाउसफुल्ल ’चे फलक लावायचे काय ते

बाकी ठेवले होते. —आपल्या दृष्टीने आशियाडचे हिरो खरे दोनच आहेत. एक अप्पू आणि दुसरे रंगीत दूरदर्शन ! मात्र तेरा नोव्हेंबरच्या 'कॉमर्स'मध्ये सरकारचा एक अस्वस्थ करणारा लेख आहे. साखर, तांदूळ, सिमेंट या जीवनावश्यक वस्तू निर्यात करून भारत शेकडो कोटी रुपयांचे परकीय चलन कसे मिळवतो आहे व ते सारे पैसे रंगीत दूरदर्शनवर कसे उधळले जाताहेत ते त्यात साधार आकडेवारीने दाखवलंय ! हा लेख या वेळी वाचला नसता तर बरे झाले असते !

□

# सहा

आमच्या लहानपणी कसोटी सामने सुरू झाले की, पावसाळी छत्र्यांप्रमाणे आमचे क्रिकेटचे खेळ सुरू होत— आज माझ्या आठ वर्षांच्या मुलीने आणि तिच्या मैत्रिणींनी घरातल्या साऱ्या गाद्या गोळा करून त्यावर उलट्या-सुलट्या कोलांट्या उड्या मारावयास सुरुवात केली आहे. त्या सर्वांच्यात माझ्या मुलीचा भाव अधिक, कारण भारतातर्फे खेळणारी मुलगी करंदीकर म्हणजे कर वरून मराठी वगैरे असावी म्हणून ! साऱ्या दिल्लीकरांना चिनी आणि जपानी कसरतपटूंनी वेडं केलंय. रबराप्रमाणे त्यांची शरीरे लवचिक आहेत. वेताच्या छडीप्रमाणे ती लवलवताहेत. तालबद्ध, लयबद्ध ! बाकी सारे स्टेडिअम मोकळे जात असताना कसरतपटूंच्या भोवतालचे प्रेक्षागृह तुडुंब भरून वाहतंय. आम्हा लोकांचे एक बरे आहे. खेळ कसे बघावयाचे असतात हे सुद्धा आम्हाला नीटपणे माहीत नसते. कसरतपटूंचे गुण वगैरे आता कुठे थोडे थोडे लक्षात यावयास लागलेत. दूरदर्शनसमोर बसून पंचांनी सांगण्याच्या आधी आपण गुण सांगावयाचे व त्यावर पैजा खेळावयाच्या येथवर दिल्लीकरांची प्रगती झाली आहे. कसरतपटू हे दिल्लीकरांचे आज हिरो आहेत. चीनच्या सोळा वर्षांच्या जीआनी वूने दहापैकी दहा गुण मिळवून रशियाच्या नाडिआने यापूर्वी केलेला उच्चांक गाठला त्या वेळी आपल्या घरच्याच कोणी तरी पराक्रम केलाय असा लोकांना आनंद झाला. लोक खेळाडूंच्या किती चटकन प्रेमात पडतात !

आता अशा वेळी या म्हाताऱ्या बिजंदरवर कोण विश्वास ठेवणार ? त्याचे ऐकावयास तरी कोणाला कोठे वेळ आहे ? बिजंदर हा राजस्थानातील वंजारी म्हणजे डोंबारी माणूस. आपल्या परिवारासह तो काल इंद्रप्रस्थ स्टेडिअमवर हे कसरतीचे प्रयोग पहावयास गेला होता. स्टेडिअमवर चिनी आणि जपानी खेळा-

डूंना पडणाऱ्या टाळ्या पाहून हा म्हातारा बेफाम झाला. शेलारमामाच्या आवेशात म्हणाला, ' साहेब, मला परवानगी द्या. कदाचित माझे डोके फुटेल; पण या वयात यातील प्रत्येक कसरत मी यांच्यापेक्षा अधिक चांगली करून दाखवेन!' —त्याचा मुलगा भूरानट याने नंतर ' हिंदुस्थान टाइम्स 'च्या वार्ताहराची भेट घेतली. ' देशभर आपल्या बिरादारीतील दहा हजार डोंबारी ढोलकी वडवीत आणि पोट वाजवीत दिवसातून वीस-तीस वेळा हे खेळ करून दाखवताहेत आणि खेळ पहावयास लोक येण्याची मारामार होते आहे हे समजावून दिले. आज कदाचित आम्ही एवढा चांगला खेळ करून दाखविणार नाही; पण आमच्या रक्तात या उड्या भरल्यात. फक्त पाच वर्षे आमच्यातील निवडक शंभर मुलांच्या पोटापाण्याची काळजी घ्या, आम्ही यांच्यापेक्षा चांगल्या कोलांट्या मारू म्हणून त्याने सांगितले. भूरानटाचा मुलगा शाम आणि सून शामराणी पण त्याच्याबरोबर होती. सारा परिवार त्याच खेळात आहे. अगदी शामराणीच्या चार वर्षांच्या मुलापासून सारे जण! शाम आणि शामराणी यांना खरोखरच काही होईल असे वाटते आहे. म्हाताऱ्या भैरोसिंगचा मात्र यावर विश्वास नाही. अनेक वेळा अनेक जण काही करू म्हणून सांगून बेपत्ता झालेत असे तो निराशेने म्हणाला. खरे सांगायचे तर अगदी आज सुद्धा दिल्लीत कोणीच भैरोसिंगचे काही ऐकण्याच्या मनःस्थितीत नाहीत. अगदी मीसुद्धा! समाज नेहमीच आपल्या संस्कृतीपेक्षा आपल्या हिरोंच्यावर अधिक प्रेम करतो. आज आम्हा सर्वांना चीनच्या ' जीआनी वू 'ने पार झपाटलंय!

□

# सात

प्रचंड, अतिप्रचंड, भव्य हे सारे शब्द येथे थिटे पडतात. इंद्रप्रस्थ स्टेडिअम मी बांधताना अनेक वेळा पाहिला होता; पण या भव्यतेवर, रंगसंगतीवर विश्वास बसत नाही. या भव्यतेचे वर्णन करावयास आचार्य अत्रेच हवेत! त्यांनी याच्यावर सरळ अग्रलेख लिहिला असता! गेल्या दहा हजार वर्षात आपण असले काही पाहिलेले नाही आणि पुढील दहा हजार वर्षांत आपण असले काही नवे पाहू शकणार नाही म्हणून सरळ सांगितले असते! लाल किल्ल्यात एक श्लोक लावलेला आहे ' गर फरदौस बर रुला जमी अस्त, हमी अस्त, हमी अस्त, हमी अस्त ' म्हणून. या जमिनीवर स्वर्ग कोठे असेल तर येथेच आहे म्हणून ठामपणे सांगणारा श्लोक इंद्रप्रस्थ स्टेडिअमवर शोभून दिसेल!

दिल्लीत नव्याने येणाऱ्या माणसाने आता लाल किल्ला आणि कुतुबमिनार यांच्याबरोबर इंद्रप्रस्थ स्टेडिअमला पण भेट दिली पाहिजे. या स्टेडिअमवर २५ हजार लोक बसू शकतात आणि आशियातील हा सर्वांत मोठा स्टेडिअम आहे, यावरून याच्या भव्यतेची कल्पना येणार नाही. पंधरा मजली इमारत आपल्या पोटात घेईल एवढ्या उंचीवर याचे छप्पर आहे. घुमटाकार छपराचा व्यासच मुळी १५० फूट आहे आणि ॲल्युमिनियमच्या या घुमटाखाली चार एकर जमीन बंदिस्त झालेली आहे. जवळजवळ ऐंशी फूट व्यासाच्या वर्तुळावर पक्के लाकूड चढवून आतले क्रीडांगण बनवलंय. आतल्या खुर्च्या, क्रीडांगण, –छत इंद्रधनुष्याची आठवण यावी अशी कलात्मकपणे रंगांची उधळण या सर्वांच्यावर केलीये. तीस हजार टन शक्तीचे शीतयंत्र लावून साऱ्या स्टेडिअमला गारवा पुरवलाय. पाहिजे तर जमिनीवर बर्फ तयार करून बर्फावरचे खेळ खेळता येतील अशी व्यवस्था आहे. ध्वनी आणि प्रकाशव्यवस्था अप्रतिम आहे. ती तशी नसेल तरच नवल ! फक्त प्रकाशव्यवस्थेवर १ कोटी रुपये खर्च केलेत; पण या स्टेडिअमचा खास विशेष म्हणजे, या स्टेडिअमचे दोन स्टेडिअममध्ये रूपांतर करू शकणारा, स्टेडिअमच्या मध्यभागी लावलेला पडदा ! हा पडदा लावण्याची कल्पना भारतीय तंत्रज्ञांची, प्लॅस्टिकच्या बनलेल्या ह्या पडद्याची उंची २२ मीटर आणि एकूण क्षेत्रफळ ५००० मीटर वर्ग आहे. त्याचे वजन चाळीस टन आहे. तो ध्वनिनिरोधक आहे आणि केवळ सात मिनिटांत तो उघडता वा बंद करता येतो. या पडद्याला लागून असलेल्या क्रीडांगणावरील खेळ कोणत्याही कोपऱ्यात बसून पाहिला तरी छान दिसतो. रंगीत पडद्याला लागून असलेल्या दाट हिरव्या रंगाच्या क्रीडांगणावर रंगीबेरंगी कपड्यांतील खेळाडू हॉलीबॉल खेळताहेत आणि रंगीबेरंगी कपड्यातले उच्चभ्रू लोक डोळ्यांवरचा गॉगल सावरत खेळ पाहताहेत. हे सारे भोगणे म्हणजे पण एक अनुभव आहे.

मी गेलो त्या वेळी भारत विरुद्ध कोरिया हा मुलींचा हॉलीबॉलचा सामना सुरू होता. कोरियाचा संघ काही चांगला नव्हे. तो अंतिम फेरीत सुद्धा पोचला नाही; पण आपल्या संघाला त्यांच्याविरुद्ध एकसुद्धा गुण करता आला नाही. चक्क शून्यावर आपण दोन्ही खेळ हरलो! काहीही येत नसताना खेळाडू निवडले कसे जातात आणि आपण खेळतो तरी का हा तसा अनेक खेळांबाबत विचार करण्यासारखा प्रश्न आहे; पण खरे सांगावयाचे तर पहावयास आलेले अनेक लोकही खेळ वगैरे पहाण्यापेक्षा थोडे भटकावे, स्टेडिअम वगैरे बघावा, अमिताभ, जया, शत्रुघ्न सिन्हा वगैरे मंडळी आलीत का ते शोधावे म्हणून आलेले वाटले आणि हे असे बघत हिंडावयाचे असेल त्यांना या आशियाडमध्ये

खूप पाहण्यासारखे आहे. खेळनगरी हीसुद्धा अशीच एक यक्षनगरी आहे. आखीव, रेखीव, चकचकीत एक हजार इमारती; त्यात असलेल्या पाच-सहा हजार खोल्या; दोनशे-तीनशे बंगले; प्रत्येक घर, प्रत्येक बंगला, प्रत्येक खोली वास्तुशास्त्राचे आणि सजावटीचे नवे मानदंड निर्माण करणारे. ऑलिंपिक ॲसोसिएशननं घालून दिलेले सारे कस सहजपणे पास करणारे. हिरवळी, बागा, झाडी आणि सहजपणे डौलात इकडून-तिकडून जाणारे छोटे-मोठे रस्ते. या रस्त्यांचीच लांबी चाळीस किलोमीटर होईल; पण हे सारे सांगूनही हे सारे एकत्रित पाहताना मनाला जो सुखद हळुवार स्पर्श होतो तो शब्दात आणता येत नाही. या अजबनगरीत काय नाही ? अडीच हजार प्रेक्षकांना सहजपणे सामावून घेईल असे भव्य थिएटर आहे. ज्यात सातशे–आठशे माणसे मावतील अशी तीन-चार सभागृहे आहेत. एकाच वेळी ज्यात दोन हजार लोक बसून जेवण घेऊ शकतात, असा भव्य जेवणाचा हॉल आहे. ज्यात लावलेल्या विद्युत-भट्टीची किंमतच दोन कोटी रुपये आहे असे भव्य सुसज्ज स्वयंपाकगृह आहे; पण या सर्वांवर शब्दशः कळस चढवलाय तो छप्पन्न मीटर उंचीच्या मिनारा-मुळे. हा मिनार म्हणजे या देशातील अनेक गोष्टी एकाच वेळी सामावून घेणारी सर्वांत उंच इमारत आहे म्हणून सांगितलं जातंय. मिनाराच्या पहिल्या मजल्यावर नाचण्यासाठी प्रशस्त दिवाणखाना आहे. दुसऱ्या मजल्यावर सुसज्ज उपाहारगृह, घरे, खोल्या, कार्यालय वगैरे. सर्वांत वरून जुन्या आणि नव्या दिल्लीचा मनोहारी देखावा दिसतो. अठरा मीटर व्यासाच्या एका प्रशस्त गोलात हे सारे सामावलंय. हा असला प्रचंड गोल पण या देशातील पहिलाच आहे !

मेहमानबाजीत आपण कोठेच कमी पडणार नाही याची आपण कसून काळजी घेतोय. सुरक्षाप्रबंध फारच कडक आहेत; पण एकदा आत घुसलात तर सारी मजाच मजा आहे ! सर्व प्रकारची शीतपेये फुकटात मिळताहेत. फळांचे ढीग इथे आहेत. संत्री, चिक्कू, अननस, सफरचंदे पाहिजे तशी फळे पैसे न मोजता उचलून तुम्ही जाऊ शकता. जेवताना चिनी, युरोपियन, भार-तीय साऱ्या पद्धतीचे जेवण पैसे मोजून पण रुचकर मिळतंय. सातशे आचारी, पाणके आणि वाढपी तुमचा वेळ फुकट जाणार नाही याची काळजी घेताहेत. खेळाडू आधीच भोजनप्रिय असतात ! त्यातून स्पर्धकांच्या अन्नातून रोज पाच हजार कॅलरीज पोटात जातील याची खास काळजी घेतली जाते आहे. हे खेळाडू दररोज वीस हजार अंडी, दहा हजार लिटर दूध आणि पावाच्या वीस हजार फोडी न्याहारीला फस्त करताहेत ! त्यांच्या जेवणासाठी दररोज तीन हजार कोंबडया आणि तीन हजार किलो मटन शिजवले जाते आहे. पाव

दिल्लीबाहेर नेण्यावर आपण प्रतिबंध घातलाय तो दिल्लीत कमी पडू नये म्हणून !

मात्र या जगातील श्रीमंत–गरीब ही दरी आपल्याला कल्पना येणार नाही एवढी वाढलेली आहे. खेळनगरीतील एकूण व्यवस्था फार तुजबी आहे असे समजून कुवेती संघातील लोकांनी बाहेर पंचतारांकित हॉटेलात जाण्याची इच्छा प्रदर्शित केलेली आहे. नशीब एवढेच की, प्रथम ते मुंबईच्या पंचतारांकित हॉटेलात राहून दररोज तीन चार खास विमानांनी येऊन परत जाणार होते. शेवटी कसेबसे दिल्लीतील मौर्या हॉटेल काही बदल करून त्यांना पसंत पडलंय. दिवसाला हजार ते चार हजार रुपये खोलीमागे देऊन तेथे खोल्या राखून ठेवल्या आहेत; पण कुवेती लोकांचे सोडा. कोकणातल्या आमच्या शेतात पेट्रोल लागले तर मीसुद्धा उद्या असाच वागेन ! पण आपल्या या असल्या मेहमानबाजीने आपण आशियात बनलेली आपली प्रतिमा बदलू शकतो का हा खरा प्रश्न आहे. मलेशियाचे खेळाडू येताना बरोबर चारशे किलो तांदूळ आणि बटाटे घेऊन आलेत. त्यातून भारतातले पाणी दूषित असते म्हणून पिण्याचे दोनशे गॅलन पाणी त्यांनी बरोबर ठेवलंय. दिल्लीत मध्यंतरी 'फ्ल्यू 'सारखा डेंगू ताप आला होता. क्रोसिन आणि रेसोचिन ही दोन औषधे त्या वेळी कमी पडली होती. पाकिस्तानी खेळाडू बरोबर दहा हजार क्रोसिन आणि रेसोचिनच्या गोळ्या घेऊन आलेत. दिल्लीच्या दूषित हवेत खेळाडू आजारी पडू नयेत म्हणून ते आपल्या खेळाडूंना त्यांच्या खुराकावर ठेवणाराहेत. हा म्हणजे अगदी कहर झाला. ' बुंदसे गयी वह हौजसे नही आती ' हे शेवटी अनेक अर्थांनी खरे असते !

□

# आठ

तीन दिवसांपूर्वी मलेशियाचा राष्ट्रीय खेळ असलेल्या मलेशिया बॉलचे प्रात्यक्षिक झाले. फारच थोडे लोक खेळ बघावयास गेले होते; पण त्या खेळाची झलक रात्री दूरदर्शनवर दाखविली आणि दिल्लीकर त्या खेळाने झपाटले गेले. खेळाची झलक आधी दूरदर्शनवर दाखवली असती तर क्रीडांगण प्रेक्षकांनी फुलून गेले असते. दिल्लीकर या खेळावर खूष आहेत. खेळावर गप्पा मारणारा प्रत्येकजण या खेळाबाबत न चुकता चार शब्द कौतुकाने बोलतोय. खेळ काहीसा हॉलीबॉलसारखा आहे; पण खेळ हाताऐवजी पायाने खेळला जातो. बॉल

व्हॉलीबॉलसारखा.च; पण वजनाने व आकाराने थोडा लहान वाटत होता. प्रत्येक संघात फक्त चारच खेळाडू होते; पण खेळात एक विलक्षण गती होती. व्हॉलीबॉलसारखा सूर ( drop ) मारतात तसा पायाने जाळीवरून सूर मारून बॉल पाडण्याचे कौशल्य तर अप्रतिम होते! खेळ कौशल्यपूर्ण आणि मनोरंजक तर खराच; पण त्याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे एखाद्या नव्या खेळाचे प्रात्यक्षिक कसे दाखवावे याचे ते सुंदर उदाहरण होते.

आज माझ्या आवडत्या कबड्डीचे प्रात्यक्षिक आहे. 'माझ्या आवडत्या' या विशेषणाचा उपयोग करणे दोन कारणांनी जरुरीचे आहे. हा खेळ माझा आवडता नसता तर त्याचे प्रात्यक्षिक झाले हे मला समजलेच नसते! प्रात्यक्षिक सामन्याची प्रसिद्धी सुमार आणि अपुरी आहे. आमच्या कचेरीत आलेल्या आमंत्रणपत्रिका कोणीही जराही उत्सुकता न दाखवल्याने तशाच रद्दीच्या भावात पडून आहेत. मी ऑफिस वगैरे चुकवून इतर खेळ सोडून हा खेळ बघावयास जाणार म्हटल्यावर साऱ्या मित्रमंडळीत हास्याची एक लकेर पसरून जाते. हुतुतू या खेळात बघण्यासारखे काही आहे हेच मुळी कुणाला पटत नाही! मला मनोमन वाईट वाटते. मी या खेळावर खूप प्रेम केलंय. लहानपणी या खेळाच्या नादात स्वतःचे कपडे फाडून घेतलेत. तरुणपणी या खेळात गुडघ्यांची आणि घोट्यांची हाडे सरकवून घेतलीत. राष्ट्रीय पातळीवर या खेळात खेळलोय. माझ्या आयुष्यातील पहिला लेख कॉलेजात असताना मी कबड्डीवर लिहिला होता. लेखाचे नाव होते 'कबड्डी आमचा राष्ट्रीय खेळ होईल का?' किर्लोस्कर मासिकाने त्या वेळी तो लेख प्रसिद्ध केला होता. ही गोष्ट १९६० सालची.

माझ्यासमोर पडलेल्या आमंत्रणपत्रिकेवर 'भारताचा राष्ट्रीय खेळ कबड्डी याचे प्रात्यक्षिक' म्हणून लिहिलेले आहे. आमंत्रण-पत्रिका रद्दीच्या भावात जाताहेत. खेळ बघावयास प्रमुख पाहुणे म्हणून पंतप्रधान, राष्ट्रपती, राजीव यांपैकी कोणीच येणार नाहीये. कसेबसे बुटासिंग यांनी यजमानपद स्वीकारलंय. कोणताही प्रमुख स्टेडिअम या खेळाच्या वाट्याला आलेला नाही. नवी दिल्ली रेल्वेस्टेशनसमोरच्या एका आडरस्त्यावर रेल्वेचे स्टेडिअम आहे. त्या जागेवर या खेळाची बोळवण झालीय. खेळ ठीक साडेचार वाजता सुरू होणार होता. मी चार वाजताच तेथे पोचलो. स्टेडिअमवर तसा शुकशुकाटच आहे. आमच्या लहानपणी हा खेळ बघावयास जागा मिळत नसे! हेच सामने मुंबईच्या कामगार-विभागात झाले असते तर क्रीडांगण प्रेक्षकांनी दुथडी भरून वाहून गेले असते. आपल्याकडे समाजाच्या प्रत्येक स्तरात आणि प्रत्येक प्रांतात वेगवेगळा खेळ अमाप लोकप्रियता मिळवून आहे. या साऱ्या देशाला एका

सूत्रात गोवेल अशी भाषा राहू दे असा एखादा खेळही आम्ही गेल्या पस्तीस वर्षांत विकसित केलेला नाही! असो. हळूहळू तुरळक गर्दी जमू लागते. सव्वाचार वाजता श्री. शरद पवार, दादा साळवी येतात. त्यानंतर थोड्या वेळाने बुटासिंग. त्यानंतर मोकळ्या स्टेडिअमवर श्री. यशवंतराव चव्हाण येतात. भारतीय कबड्डी फेडरेशनचे अध्यक्ष श्री. शरद पवार त्यांना फारशी ओळख वगैरे दाखवत नाहीत. श्री. यशवंतराव थोडा वेळ खेळ पाहून उठून जातात.

मजा म्हणजे बांगला देश, पाकिस्तान यांचे संघसुद्धा खेळात भाग घ्यावयास आलेले नाहीत. हे संयोजकांना का जमू नये हे समजत नाही. खरे पाहता या आशियाडमध्ये अधिकृत खेळ म्हणून कबड्डीचा समावेश का करता येऊ नये हे एक गूढ आहे. राजकीय नेत्यांना स्वतःची प्रतिमा बनवावयास सहकारी संस्था, महाविद्यालये आणि खेळ ताब्यात हवे असतात. त्यांच्या दृष्टीने त्यांच्या हातातील प्यादयांपेक्षा या गोष्टींना महत्त्व नसते. त्यांच्या राजकीय चढउतारावर या खेळांचे चढउतार ठरतात!

भारत विरुद्ध भारत आणि नेपाळ विरुद्ध भारत असे स्त्री–पुरुषांचे दोन सामने ठेवलेत. पाकिस्तान कबड्डी फेडरेशनचे अध्यक्ष पण खेळ पहावयास आलेत. खरे पाहता हुतुतू हा एक दमदार खेळ आहे. व्यक्तिगत आणि सांघिक कौशल्यातील सारे गुण येथे कसाला लागतात. प्रत्येक क्षणी प्राप्त परिस्थितीचा अंदाज घेऊन आपले धोरण बदलणारा कर्णधार लागतो. खेळात कोणत्याही क्षणी होणाऱ्या चढउतारामुळे खेळातील अनिश्चितता व रोमांचकता कायम असते. दुसऱ्या महायुद्धापूर्वी अमरावतीच्या हनुमान व्यायाम मंडळाने हुतुतू–खोखोची प्रात्यक्षिके जर्मनीत दाखवली होती. खेळाची माहिती जर्मन भाषेत छापून वाटली होती. मात्र आज जे आहे होते ते भयंकर आहे. कबड्डीची अवहेलना मी यापूर्वी कधी पाहिलेली नाही. नेपाळचा संघ म्हणजे तर चक्क गावातले गुरखे पकडून आणलेले दिसतात! नेपाळचे विसरा; पुरुषांच्या भारतीय संघाबाबतही काही वेगळे मत बनत नाही. एखाद्या खेळाचे प्रात्यक्षिक कसे दाखवू नये याचे हे प्रात्यक्षिक आहे! नशीब आपले; परदेशी खेळ पहावयास एकही माणूस आलेला नाही! नाहीतर त्याने त्यानंतर आयुष्यात कबड्डीवर एकही शब्द ऐकावयाचे नाकारले असते. सारे खेळाडू कॅनव्हासचे सफेद बूट घालून खेळताहेत. पकड करताना हमखास बूट सुटून हातात येतो आहे. खेळ गतिमान ठेवा असा या खेळाडूंना आदेश दिलेला आहे. त्यामुळे प्रत्येक चढाईत पकड झाली पाहिजे असा खेळाडूंनी निर्णय घेतलेला दिसतो. बास्केटबॉलमध्ये वाढतात तसे गुण वाढताहेत! व पकडीतले आणि चढाईतले कौशल्य म्हणजे काय हे कोणीच समजावून देत नाही. खेळातले ताण आणि तणाव म्हणजे काय

हे समजावून देणे तर मग फार दूरची गोष्ट. दूरध्वनीवरून खेळाचा अतिशय रद्दी वृत्तांत ( Comentry ) दिला जात आहे. या खेळाचे चित्रण होऊन ते मुंबई दूरदर्शनवर दाखवले जाणार हे प्रेक्षकांनी नीट बघावे म्हणून ही विनंती आहे. मोकळया स्टेडिअमचे 'प्रेक्षकोंने खचाखच भरा हुआ स्टेडिअम' म्हणूनही वर्णन होतंय, ताकदीने भरलेला सरदारजी उडया मारत चढाया करतो आहे. त्यांनी चढाया केल्या की प्रेक्षक 'अप्पू अप्पू' म्हणून ओरडताहेत. कोणत्याही नव्या प्रेक्षकांचे हा खेळ ताकदीचा आहे व लोकनाटयासारखा हा काही प्रकार असून तुम्ही किती जणांचे व कसे बूट उतरवलेत यावर खेळातले कौशल्य अवलंबून आहे असे नक्की मत बनले असेल! भारत विरुद्ध भारत हा मुलींचा सामना मात्र फार छान झाला. शकुंतला चव्हाण, इंद्रायणी गायकवाड, नाईक आणि मुजुमदार या मुली दृष्ट काढावी इतक्या सुरेख खेळल्या. या खेळातल्या पकडी आणि चढाया म्हणजे काय ते प्रेक्षकांना त्यांनी छान दाखवून दिले. एखाद्या कसरतपटूच्या डौलात गायकवाडने चढाया केल्या. पाहणाऱ्यांनी चकित होऊन पहात बसावे असे सूर मारून चव्हाणांनी पकडी केल्या.

सामने संपवून रिकाम्या क्रीडांगणावरून परत येताना मनावर तसे मळभ दाटून आले होते. पुरुषांचे सामने आकर्षक करता आले असते. पाकिस्तान व बांगलादेश येथून संघ आणणे पण जड नव्हते. रेल्वे स्टेडिअमऐवजी क्रीडा-नगरात या खेळाचे आयोजन केले असते व आकर्षक धावता वृत्तांत सांगून वेगवेगळया भाषांतील खेळावरच्या पुस्तिका वाटल्या असत्या तर केवढे तरी काम झाले असते. पण तरीही हुतुतू हा तसा भाग्यवान खेळ! खोखोसाठी तर एवढेही झाले नाही. क्रीडांगणावरून परत जाताना एक मुलगा फार उत्साहाने कागद वाटत होता. मुलगा फारच बालसुलभ उत्साहात होता. त्याने माझ्या हातात मला न जुमानता जाहिरात कोंबलीच! आशियाडमुळे निम्म्या दरात विक्री करीत आहोत वा चाळीस रुपयांत आग्रा मथुरा पाहून घ्या म्हणून सांगणारी ती एखादी व्यापारी जाहिरात असावी असे वाटले; पण जाहिरात भारतीय खोखो फेडरेशनची होती. आलेल्या लोकांना दाखविण्यासाठी ते दूर कोठे तरी टोकाला खो खो खेळाचे प्रात्यक्षिक दाखविणार होते. त्याला या म्हणून ते आग्रहाचे आमंत्रण होते. राम-लक्ष्मणांना फक्त चौदा वर्षांचाच वनवास घडला होता, हुतुतू-खोखो या दोन भूमीतील राष्ट्रीय खेळांना किती दशकांचा वनवास सहन करावा लागणार आहे कुणास ठाऊक! झालेल्या कबड्डीच्या सामन्याचे एकही चित्र दूरदर्शनने दाखविले नाही हे एका अर्थाने बरेच झाले, त्यावर काही बातमी वगैरे पण दिली नाही; पण परिस्थिती नक्की बदलेल. २ डिसेंबरला

रात्री दहा नंतर दिल्ली दूरदर्शनवर पुण्याच्या लोकांनी बनविलेली खोखोवरील अप्रतिम सुंदर फिल्म दाखवली गेली; धावते वर्णन उत्कृष्ट होते. खेळातील सारे बारकावे त्यात चित्रित होते. बाकी इतर अनेक खेळांबरोबरची तुलना विश्वास बसणार नाही इतक्या सफाईने दाखविली होती. कबड्डी खोखोवर अशा फिल्म काढून त्या अनेक देशात दाखविल्या आणि योग्य प्रकारे पाठपुरावा केला तर पुढील आशियाडला काय ऑलींपिकला हे दोन खेळ पोचतील ! या फिल्मचे वर्णन करावयास आपल्याकडे शब्द नाहीत. ही फिल्म पाहिलेले सारे दिल्लीकर आज ' खोखो 'वर लुब्ध आहेत !

□

## नऊ

ताजमहाल पहावयाचा असेल तर तो चांदण्यात न्हाऊन निघालेला पहावा. भर दुपारी पाहिलेला ताजमहाल आणि चांदण्यातील ताजमहाल यात अरसिकाला सुद्धा समजावा एवढा जमीन अस्मानाचा फरक असतो. नेहरू स्टेडिअमची पण खरी शान पहावयाची असेल तर रात्री जावे. रात्रीच्या प्रकाशात न्हाऊन निघालेला हा स्टेडिअम हा एक खास अनुभव आहे. रात्र आणि दिवस यातील फरक कळेनासा होतो. परदेशात रात्रीचे क्रिकेट कसे काय होत असेल ते समजते. चमचम करणारे भले मोठे घड्याळ आणि उघडझाप करणारे सूचनाफलक. चारही कोपऱ्यांतून प्रकाश ओतणारे दिवे. चकचकीत प्रकाश. पेटलेली भव्य ज्योती; ज्योतीतून बाहेर पडणाऱ्या धुराचा साऱ्या स्टेडिअमवर हलकासा शिडकावा. ज्योतीच्या खाली दिसणारी नेहरूंची स्वाक्षरी. सारे वातावरण कसे मंतरलेले आहे ! रात्रीच्या प्रकाशात तुम्ही कोठेही बसलात तरी खेळ किती छान दिसतो. त्या काळोखातील झगझगीत प्रकाशात स्टेडिअमच्या भव्यपणात आणखीनच भर पडते.–उन्हाळयाच्या दिवसांत गच्चीवर झोपून आकाश पाहतो आहोत व कृत्रिम तारांगणात ( प्लॅनेटोरिअम ) मध्ये बसलो आहोत असे काहीसे वाटते. समोर बालकवींनी सांगितलेल्या हिरव्या हिरव्यागार गालीच्यावर रंगीबेरंगी कपड्यातील खेळाडू खेळताहेत. साऱ्या वातावरणाला परिकथेतील जादूनगरीचा स्पर्श होतो. दूरदर्शनवरून सामना पाहताना आपण नुसते हे वातावरणच चुकवत नाही तर सारा सामनाच चुकवतो हे येथे तीव्रतेने जाणवते. येथे कोठेही बसला असला तरी साऱ्या खेळाडूंची प्रत्येक हालचाल किती रेखीव दिसते !–दूरदर्शनसाठीच जन्मलेल्या बैठ्या पिढीला हे समजणार नाही !

स्टेडिअमच्या बाहेर बसस्थानकावर गर्दी आहे; पण शिस्तबद्ध. दर दोन मिनिटाला तेथे बस लागते आहे. दर दोन मिनिटांनी बस सुटते आहे. रेल्वेचे डबे वाटावेत अशी बसची लांबलचक रांग उभी आहे. स्टेडिअमच्या बाहेर अक्षरशः जत्रा दाटलीये. छोट्या-मोठ्या पोलीसचौक्या. चहा, फराळ, पान, बिडी यांची दुकाने. भोवताली उघडउघड 'शेअरबाजार' आहे. हा तिकिटांचा काळाबाजार नाही! 'लिया, दिया' करत पाच रुपयांपासून पन्नास रुपयांपर्यंतचे तिकीट दोन ते वीस रुपयांस विकत घ्या.-पाहिजे त्या स्टेडिअमवर पाहिजे तेव्हा जा! टिवल्या-बावल्या करत तिकीट विकत घ्या. पाहिजे तेवढा वेळ सामना पहा. कंटाळा आला की बाहेर या. मिळेल त्या किंमतीत तिकीट विका. चहा पाणी घेत समोर तुमची वाट पहात उभ्या असलेल्या बसमधे चढा. दुसऱ्या स्टेडिअमची वाट धरा!

आज नेहरूस्टेडिअमवर कुवेत विरूद्ध कोरिआ हा उपान्त्यपूर्व फेरीचा सामना आहे. पन्नास-साठ हजार लोक जमलेत. स्टेडिअमवर अजूनही पंधरा-वीस हजार लोक सहज सामावले जातील. आपण आपले खेळ पण प्रांतवार वाटलेत! जमलेले भोवतालचे बहुसंख्य लोक बंगाली आहेत. मराठी लोकांचे नाटकावर वा लखनौच्या लोकांचे शेरशायरीवर असते तसे या लोकांचे फूटबॉलवर प्रेम आहे. कलकत्त्यातून हिंडत असल्याप्रमाणे आपल्याभोवती लाडे लाडे बोबडया बंगालीत आवाज उठताहेत. ते आवाज आपले कान सुखावतात. त्यातील आशय, भाषा येत नसताना पण समजतो.-काल स्टेडिअमवर शेवटच्या दोन मिनिटात झालेल्या गोलमुळे भारताचा, म्हणजे बंगालचा संघ इराण विरुद्ध सामना हरला त्यावेळी संघातील खेळाडू आणि त्यांचे उस्ताद क्रीडांगणावर अक्षरशः रडले! साऱ्या प्रेक्षकांचे डोळे पाणावले. तसे पाहावयाचे तर साऱ्या स्टेडिअमवर एक एकत्रित हुंदका उठावयाचेच काय ते बाकी उरले होते! दोन दिवसांपूर्वी जपानवर हॉकीत विजय मिळवल्यावर दक्षिण कोरिआच्या खेळाडू मुली आनंदाने अक्षरशः ओक्साबोक्शी रडल्या होत्या!- खरे सांगावयाचे तर खेळापेक्षा, खेळात स्वतःला एवढे झोकून देऊन, हळवे होऊन त्याच्याबरोबर वाहावत जाणारे खेळाडू आणि प्रेक्षक पहावयासच अधिक मजा येते!

कुवेत विरुद्ध कोरिआचा सामना सुरू होतो. कोरिआचा संघ नक्कीच अधिक चांगला आहे. अनेकदा तो सुंदर आक्रमक पवित्रे रचतो. मात्र मध्यंतरापर्यंत कोणीच काही गोल करत नाही. साऱ्या प्रेक्षकांनी कोरिआचा संघ आपला संघ म्हणून निवडलाय आणि मध्यंतरानंतर पंचाच्या एका चुकीच्या निर्णयाने कुवेतचा संघ विजयी होतो. पंच चुकला असे सर्वांनाच वाटत होते. हे वाटणे कदाचित बरोबर पण असेल; पण या खेळाच्या नियमातील नक्की बारकावे

माहीत नसलेल्या आमच्यासारख्यांना पण तसेच वाटत होते. समुदायाला स्वतःचे असे एक मत असते. त्यातून या पंचाने कुवेतच्या राजाकडून फार मोठी रक्कम घेतली आहे अशी स्टेडिअममध्ये एक अफवा उठते. त्या क्षणी तरी ती अफवा आम्हा साऱ्यांना मनोमन पटते. सामना संपल्यावर कोरिआचे खेळाडू आणि कसरतपटू त्या थायलंडच्या पंचाची अक्षरशः धुलाई करतात! कुवेतचे खेळाडू चपळाईने निघून गेलेले असतात. म्हणूनच एक फार मोठा अनर्थ टळतो. रक्तबंबाळ अवस्थेत त्या पंचाला क्रीडांगणावरून पोलीस दंगल काबूत आणून घेऊन जात असतानाही प्रेक्षकांची सहानुभूती कोरिअन लोकांच्याबरोबर आहे! नशीब आपले, त्यावेळी कुवेत विरूद्ध भारत असा सामना नव्हता! नाही तर हे सारे प्रेक्षक सरळ मैदानात घुसले असते. शेवटी सुरक्षिततेसाठी केलेले सारे प्रयत्न तुजवी ठरून तिथे रणांगण उभे राहिले असते. आशियाडचे नशीब खरोखरच बलवत्तर आहे. गालबोट लागल्यासारखे असले एक-दोन प्रसंग होऊन हे सामने सुखरूपणे पार पडताहेत! कोरिआच्या खेळाडूंनी केलेली निर्णयाविरुद्धची तक्रार दुसऱ्या दिवशी फेटाळून लावली जाते. ती तशी फेटाळून लावली जाईल याची प्रत्येकाचीच खात्री होती. कुवेतच्या राजाला दुखवावयाची आपली हिंमत नाही! या साऱ्या खेळांच्यावरसुद्धा राजकारणाची पोलादी पकड आहेच!

□

# दहा

आंबेडकर स्टेडिअमवर सतपाल आणि कंपनीचे नाटक नेहमीप्रमाणेच सुरू आहे. पुन्हा तेच! प्रत्येक स्टेडिअमचा आपापला प्रेक्षकवर्ग ठरलेला आहे. छबिलदासमधील प्रेक्षकवर्ग रुचिपालट म्हणूनही कामगार रंगभूमीवरील नाटके पहात नाही आणि खिशाला परवडत असूनही कामगार विभागातील निष्ठावान प्रेक्षकगण रवींद्रमंदिरात पाय टाकत नाही. सगळीकडेच टिवल्या-बावल्या करत हिंडणाऱ्या आम्हा काही लोकांचे त्यामुळे चांगले फावते!—आंबेडकर स्टेडिअम नेहमीप्रमाणेच खचाखच भरलाय, आपल्या कुस्तीगीरांची जाम तंतरली आहे. कुस्ती हा जुन्या दिल्लीचा आवडता खेळ. गुरु हनुमानच्या विलायती आखाड्याचा आणि यमुनाकाठी उभ्या असलेल्या चांदगीरामच्या आखाड्यांचा रुबाब काही और आहे. त्याचबरोबर पहाडीवरून वा जुन्या दिल्लीतून नुसते फिरलात तरी दंड-बैठकांमुळे न्हाऊन निघालेली आणि लालमातीचा लेप अंगावर

घेतलेली शंभर-दीडशे टाळकी आढळतात. हे सारे लोक मला चांगले ओळखतात. ' माणूस 'साठी दिल्लीच्या कुस्तीवर एक विशेषांक काढायचाय म्हणून गेले दोन महिने मी यांच्यातून हिंडतोय. या मुलांच्या खुराकाची काळजी वाहणारे अनेक धनिक आहेत. त्यांच्या शरिराला प्रेमाने मसाज करणारे म्हातारे आहेत. आपल्या म्हशी दोन-तीन किलोमीटर अंतरावरून त्यांच्या घरासमोर आणून त्यांना दूध पाजणारे गवळी आहेत. हे एक वेगळे अद्भुत विश्व आहे. दिल्लीने जपलेला हा आपला एक खानदानी आरसा आहे. शाहूमहाराजांच्या कोल्हापूरची येथे नकळत आठवण होते. महाराष्ट्र आणि कोल्हापूर याबाबत येथील प्रत्येकाच्या मनात आदरयुक्त प्रेम आहे. तेथे सध्या काय सुरू आहे ते यांना माहीत नाही ते बरे आहे !

सारे प्रेक्षक अवाक होऊन पाहताहेत. गावरानी, व्रज, हिंदीत शेलक्या शिव्या उठताहेत. गेले एक वर्ष पहिलवान आणि हे रसिक झपाटलेल्या मनःस्थितीत होते. सुवर्णपदक न मिळाल्यास हातात कंकण भरावयाचे विडे जामामसजिदीला आणि लाल किल्ल्याला साक्षी ठेवून उचलले गेलेत. मी वृद्ध गुरु हनुमानांच्याकडे बघतो. त्यांची थट्टा करावयाचा मोह टाळतो. पहिलवान मंडळींचे काही खरे नाही !—त्यातून त्यांच्या वृद्ध अनुभवी डोळयांत कधी नव्हे ते पाणी तरळतंय. भारताला फक्त दोन कास्य पदके मिळालीत ! सिनेनट शोभावा असा गुरु हनुमानचा देखणा चेला कर्तारसिंग अंतिम फेरीसाठी सामन्यात उतरतो. उमदा कर्तारसिंग मला फार आवडतो. तो माझा जवळचा दोस्त आहे. बँकॉकला सुवर्णपदक मिळालेला कर्तारसिंग इराणच्या मोहम्मद हसनशी खेळताना काही तांत्रिक साध्या चुका करतो. त्याच्याकडून ही अपेक्षा कोणीच केलेली नसते; पण तुमचे नशीब हे शेवटी तुमचेच नशीब असते ! मिळालेल्या रजत पदकात गुरू आणि चेला या दोघांनाही रस नसतो. सुवर्णपदक मिळण्याच्या साऱ्या वाटा आता रोखलेल्या आहेत. सतपाल हा फार कलात्मक कुस्ती खेळणारा कलावंत आहे; पण तेहरानला कास्य आणि बँकॉकला रजतपदक यापलीकडे त्याची धाव गेलेली नाही. कारण जिंकण्यासाठी ' मरू किंवा मारू ' अशी जी खुनी जिद्द लागते ती त्याच्याकडे नाही ! पण भोवतालचे बनलेले वातावरण ही जिद्द सतपालला देते आणि त्याला सुवर्णपदक मिळते. एक भला मोठा अनर्थ टळतो ! भारतीय कुस्तीगीरांचे म्हटले तर यश, म्हटले तर अपयश मला अस्वस्थ करते. राजाश्रय नसला तरी लोकाश्रय आहे. गामा-गुंगांची परंपरा आहे. तरीही आपण मागे पडतो आहोत. बिजिदर आणि त्याचे डोंबारी मित्र जे म्हणतात ते ऐकताना त्यांच्या जिद्दीचे कौतुक करत असतानाच, आपणाला चीन-जपानच्या तोडीचे कसरतपटू बनावयास काय दिव्य करावे

लागेल ते अभ्यासावे लागेल. किंबहुना या बक्षिसांचा नक्की कशाशी संबंध आहे हे आपणाला पुढे शोधावयाचे आहे.

●

माडगावकरांच्या अठराशेपन्नास साली लिहिलेल्या मुंबईवर्णन पुस्तकात लेखक नुसता काय आणि कसे पाहावे हे न समजून भांबावून गेलाय. काय हो सांगावे, म्हणून पुन्हा पुन्हा न राहवून काही नवे सांगत राहतोय. माझी नेमकी तशी स्थिती झालीये काय पहावे, कसे पहावे, किती पाहावे हेच समजत नाही. जमेल तसे या लाटांवर नुसते मनसोक्त तरंगावयाचे. दिल्ली विद्यापीठात हँडबॉल आणि धनुर्विद्येचे सामने आहेत. जवळजवळ वर्षभर कायम संपावर असणारे कर्मचारी या सामन्यांसाठी असेल कदाचित संपावर नाहीत. खेळग्रामात वजन उचलण्याच्या स्पर्धा आहेत. आंबेडकर स्टेडिअम, मॉडेल टाऊन स्टेडिअम आणि जवाहरलाल नेहरू स्टेडिअम अशी फूटबॉलची त्रिस्थळी यात्रा आहे. इंद्रप्रस्थ स्टेडिअमवर व्हॉलीबॉल, कसरती, बॅडमिंटन सुरू आहे. हौस खायला लॉन टेनिसचे वेगळे मैदान आहे स्त्रियांची हॉकी शिवाजी स्टेडिअमवर आणि पुरुषांची सुमारे एक कोटी रुपये खर्चून घातलेल्या नॅशनल स्टेडिअमवर आहे. प्रगती मैदानावरील हॉल आणि स्पोर्टसमध्ये टेबलटेनिस आणि बॉक्सिंग सुरू आहे. बॅडमिंटन, बॉक्सिंग, टेनिस यांचा नेहमीचा प्रेक्षकवर्ग सोडला तर कोठेच तशी गर्दी नाही. पाहिजे तेव्हा पाहिजे तेथे जा. लोकांना सर्वांत आवडलाय तो टालकटोरा येथे बांधलेला पोहण्याचा तलाव! तो प्रेक्षकांनी तुडुंब भरून वाहतोय. प्रत्येक स्टेडिअमवर झालेला खर्च तसाच मोठा आहे. पोहण्याच्या तलावातील पाणी-शुद्धीकरणासाठी बसवलेले यंत्रच मुळी एक कोटी रुपयांचे आहे! पाहिजे ते तपमान येथील पाण्याला अचूकपणे दिले जाते. हा तलाव एक तास चालू ठेवावयाचा तर येणारा खर्च पंचवीस हजार रुपये असेल! या सामन्यानंतर आपण या सर्व स्टेडिअमचे काय करणार आहोत? एखादे पंचतारांकीत हॉटेल-सुद्धा हा पोहण्याचा तलाव वापरायला घेणार नाही. प्रगतिमैदानावर आपण कायम इमारती उठवून ठेवल्यात आणि तेथे वर्षभर व्यापारी मेळे भरवतो. भारत पुढील वर्षी आफ्रो आशियाई देशांचे सामने भरवणार आहे अशी एक वदंता आहे!

●

कोणत्याच खेळात आपल्या खेळाडूंनी वाघ मारलेला नाही! महिलांचा हॉकी संघ हा याला अपवाद; पण पाकिस्तानी महिलांनी हॉकीत भाग घेतलेला नव्हता! आपल्या मुक्केबाजांनी एक सुवर्ण, दोन कास्य आणि एक रजत पदक पटकावले! आशियाई विजेता कौरसिंगने इराकच्या सुलेमानला गुणावर

पराभूत केले. २७ वर्षांचा राजकुमार पुनेडा हा अन्त्य सामन्यात कोरिआच्या नाम ली या आशियाई विजेत्याकडून हरला. त्याची हार मान्य नसलेल्या प्रेक्षकांनी कोरिआचे राष्ट्रगीत सुरू असताना शेमशेमच्या घोषणा दिल्या. पुनेडा खेळला चांगला; पण त्याच्यात नाम लीची चपळाई नव्हती. डोळ्यावर मोठी जखम झाल्यामुळेपण त्याच्या खेळावर परिणाम झाला. सेनादलाच्या घोडेस्वारांनी बक्षिसे मिळवली; पण घोडेस्वारात खरी कमाल केली ती कुवेतच्या दोन वहिणींनी ! पुरुषांना मागे टाकून त्यांनी सुवर्ण व रजत पदके मिळवली. त्या दोन कॉलेज-सुंदरींना पाहून मध्ययुगातील दोन राजकन्या घोड्यांवरून जाताहेत असा भास झाला ! नेमबाजीत नेहमीप्रमाणे महाराणा करणसिंग आणि शरद यांनी आपला अधिकार दाखवला. मर्सी मॅथ्यूजने सव्वासहा मीटर लांब उडी मारून रजत पदक पटकावले. केवळ तीनदा रेघेच्या पुढे जाऊन उडी मारल्याने तिचे सुवर्णपदक गेले ! गीता झुत्शी, शातम्मा, सुरेश यादव, सीताराम आणि राजकुमारने भारतीय ॲथलेटसचा दमदारपणा दाखवला. यश-अपयशाच्या सीमारेषा नाहीशा कशा होतात ते ४०० मीटर्सची रिले शर्यत पहाताना जाणवले. भारताचा पवित्रसिंग काय अफलातून पळाला ! आपल्याच कामगिरीने रोमांचित झालेल्या पवित्रसिंगने प्रेमचंद्रनच्या हातात काठी देताना चूक केली आणि आपण हरलो. कुलदीपने थाळीफेकीत दुसरा क्रमांक पटकावला.

–खरे सांगावयाचे तर दोन दिवसांपूर्वी शांतम्मा, मर्सी मॅथ्यूज, सुरेश यादव, सीताराम, कुलदीप यांची नावे आपल्यापैकी बहुतेकांना माहीत नव्हती. आणखी दोन दिवसांनी पण त्यांची नावे आपण विसरून गेलेले असू !– आपणाला पाठ असतात त्या फक्त आपल्या क्रिकेट–खेळाडूंच्या वंशावळी ! भारताचा पुरुष हॉकी संघ हरला म्हणून सुतक पाळणारे आणि स्त्री संघाचे कौतुक करणारे आपण त्या संघातील खेळाडूंची नावेसुद्धा सांगू शकणार नाही ! –खेळाडूंना शेवटी नुसता लोकाश्रय नको असतो; लोकप्रेम पण हवे असते. भारताचा मॅरेथॉन विजेता शिवराम म्हणाला होता, ‘ माझा मुलगा फार होतकरू आहे. मी त्याला ‘ मॅरेथॉनरनर ’ बनवून त्याच्या आयुष्याचा बट्ट्याबोळ करणार नाही ! मी त्याला क्रिकेट शिकवीन ! ’ – या असल्या वातावरणात आपल्या खेळाडूंनी येवढे करणे म्हणजेसुद्धा तसे खूपच झाले !

□

# अकरा

Every hero is bore as last! – तेरड्याचा रंग तीन दिवस! काहीही म्हणा, तात्पर्य एकच. लोकांचा खेळातील उत्साह झपाट्याने कमी होतोय. पहिले काही दिवस वातावरण आशियाडमय होते. आता तो उत्साहाचा पूर ओसरत चाललाय. बोलताना कोणाला किती पदके मिळाली याच्यापलीकडे काही फारशी चर्चा होत नाही. दूरदर्शनवरचे लोकप्रिय कार्यक्रम गायब झालेत आणि छायागीत; सिनेमा वगैरे रात्री अकरानंतर गेलेत म्हणून छोटे मंडळी उघडउघड नाखूष आहेत. आणखी काही काळ हे सुरू राहिले तर दूरदर्शनमुळे बैठी बनलेली ही शाळकरी मुले मोर्चे वगैरे काढतील या खेळाविरुद्ध! – फ्रान्समध्ये आपले रणगाडे घुसविण्यापूर्वी जर्मन सेनानी म्हणाला होता, ' मी फ्रान्सच्या लष्करी तयारीची छदाम माहिती गोळा केलेली नाही. त्याची काही जरुरीही नाही. एखाद्या राष्ट्रातील तरुण पिढी काय खेळते, काय वाचते व काय बघते यावरून आम्ही त्या राष्ट्राच्या कुवतीचा अंदाज घेतो! ' असो. आशियाडच्या दोनच खुणा आता दिल्लीवर बाकी आहेत. एक म्हणजे आशियाडसाठी सुरू असलेली अप्रतिम बस सेवा! प्रमुख ठिकाणी नव्या मोकळ्या बसेस तुमची प्रतीक्षा करत उभ्या आहेत. बसमधील कर्मचारी सौजन्यशील आहेत. दोन रुपयात दिल्लीत कोठेही कितीही वेळा तुम्ही प्रवास करू शकताय. दर दोन मिनिटांनी बस सुटते आहे. शासनयंत्रणेने ठरवले तर ती किती व काय करू शकते याचा हा अनोखा अनुभव आहे. दुसरी गोष्ट म्हणजे सरकारी बंदोबस्त! त्यात कोठेही ढिलाई आलेली नाही. स्टेडियमच्या आत-बाहेर जाताना तीच भेदक नजर अजून तुम्हाला शोधते आहे. काल सीमा सुरक्षादलाच्या जवानांनी राजीव गांधींची गाडी थांबवून त्यांची आमंत्रणपत्रिका तपासली. माहितगार लोक म्हणतात, राज्यपाल जगमोहन यांनी आपल्या फर्डा इंग्रजीत, ' हा काय प्रकार आहे?' म्हणून सीमासुरक्षा दलाच्या इन्स्पेक्टरजनरल जोग यांना विचारले. जोगांनी आपल्या मराठी बाण्याला स्मरून आपल्या मराठी इंग्रजीत त्यांना सुनावले, ' माझ्या जवानांनी झेंडा असलेली माझी गाडी पण तपासलेली आहे. तुमची गाडी पण तपासली जाईल! मी आशियाडच्या संरक्षणाची जबाबदारी घेतलेली आहे. तुमच्या आणि माझ्या मानापमानाची नाही! ' – दिल्लीकर जोगांच्यावर खूप खूष आहेत. काहीही गैरप्रकार होऊच शकणार नाही हा त्यांना आता विश्वास आहे.

या ओहोटीला लागलेल्या लोकांच्या उत्साहाला पुन्हा एकदा उधाण आले

ते हॉकीच्या सामन्याने. त्या दिवशी त्या सामन्यानिमित्ताने सर्व सरकारी कचेऱ्या बंद ठेवण्यात आल्या. सुट्ट्या घेण्यात आणि देण्यात आशियातच काय पण जगातही आपला कोणी हात धरू शकणार नाही! उद्या एखादे वेळी 'गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डस्'मध्येसुद्धा आपल्या देशाचे याबाबत नाव झळकेल! खाजगी कचेऱ्यासुद्धा बंद राहिल्या वा त्यांनी कचेरीतच हॉकी दाखविण्यासाठी दूरदर्शन बसविले. स्टेडिअमवर दहा रुपयांचे तिकीट काळ्या बाजारात चारशे रुपयांना विकले गेले! सामन्यात जे काही झाले तो आता काळा इतिहास आहे. खेळ सुरू असताना संतापलेल्या प्रेक्षकांनी भारतीय संघाला 'शेम शेम'च्या अविरत घोषणा दिल्या. भारतीय संघाचा गोलरक्षक आणि आघाडीची फळी यांच्यातला समतोल पार बिघडला होता. योग्य वेळी व्यूह-रचना बदलण्याइतका लवचिकपणा भारतीय संघाने दाखविला नाही. प्रेक्षकांच्याकडून आलेल्या दडपणामुळे त्यांचाही तोल गेला असावा. दोनदा तर गोल होताना गोलरक्षक दूर उभा राहिला! 'अरे, तो क्रीडांगणावर नाही. घरी रंगीत दूरदर्शनपुढे बसून सामना बघतोय!' म्हणूनही प्रेक्षकातून हेटाळणीचे सूर उठले. लोक जाम चिडलेले होते. खेळ हा खेळाच्या भावनेने घ्यावयाचा असतो याचे कोणालाच भान नव्हते. अधिकारी पण तेवढेच गेंड्याच्या कातडीचे असतात. हॉकी असोसिएशनचे माजी अध्यक्ष अश्विनीकुमार यांनी, 'आमचा हा संघ चांगलाच आहे; पण तांत्रिक चुकीमुळे आमचा पराभव झाला!' म्हणून सांगितले. हे म्हणजे नेफा पराभवाच्या वेळी, 'मी माझ्या सैन्याची चांगली तयारी केली होती' म्हणून कृष्ण मेनन यांनी सांगण्या-सारखे झाले! असो. हॉकीतील पराभवामुळे आपणासमोर तसे थोडे वेगळेच प्रश्न येतात. कसरत आणि कुस्ती यांना धरून आपण आणखी एक पाऊल आपल्या उत्तराच्या शोधात पुढे येतो. आपल्या डोंबाऱ्यांना लोकाश्रय वा राजाश्रय नाही म्हणून ते काही करू शकत नाहीत. परंपरा आणि लोकाश्रय असूनही भारतीय कुस्ती राज्याश्रय न मिळाल्याने काही फार करू शकत नाही. आपल्या हॉकीला परंपरा आणि राज्याश्रय व काही प्रमाणात लोकाश्रय असूनही आपण कमी पडतो.- शेवटी कशामुळे सारे राष्ट्र एकसंघ आणि गतिमान बनते आणि सहजपणे सुवर्णपदके मिळवत सुटते?

आज दिल्लीत या प्रश्नाचा कोणालाच विचार करावासा वाटत नाही. लोक अजून हॉकी-पराभवाच्या सुतकातच वावरत आहेत. आपल्या लोकांना जयंती वा मयंती साजरी करणे एवढेच माहीत आहे. लोकांचा आशियाडमधला उत्साह झपाट्याने कमी झालाय. एशियाडच्या या परतीच्या प्रवासात नोंद करण्यासारख्या फक्त एक दोनच गोष्टी आहेत. शेवटच्या दिवशी खेळग्रामात

केलेले दारूकाम चिनी, जपानी, कुवेती साऱ्या लोकांना मनापासून आवडले. सांगता-समारंभही फार छान झाला. फुलांनी सजवलेला अप्पू, राष्ट्रपतींच्या घोडेदलांनी केलेली कवायत, सेनादलाच्या तिन्ही शाखांनी केलेले बँडवादन सारेच काही सुरेख होते;– पण या सांगता-समारंभात खरा लक्षात राहिला तो फक्त कृतकृत्यतेने, समाधानाने उजळून निघालेला इंदिराबाईंचा चेहरा!

□

# बारा

फार झगमगाटात सुरू असलेले नववे आशियाई खेळ संपले. आपला नंबर पाचवा आला. आपणाला एकूण ५७ पदके मिळाली. त्यापैकी १३ सुवर्णपदके आहेत; पण आकडेवारी ही अनेकदा फसवेगिरी असते. आपण चीन, जपान व कोरिआ यांच्या जवळ आसपाससुद्धा पोचलो नाही. एकूण वाटलेल्या पदकातील सहावा हिस्सा पदकेसुद्धा आपल्या वाट्याला आली नाहीत! म्हणजे आपल्याला माहीत असलेल्या लोकशाहीच्या भाषेत बोलावयाचे तर या खेळात आपली चक्क 'अनामत रक्कम' जप्त झाली! म्हणजे इंदिरा गांधींनी 'नाक कटवाना' वगैरे जे काही म्हटले होते ते सारे यथासांग पार पडलेच की! गेल्या आशियाई स्पर्धेपेक्षा आपणाला दोन सुवर्णपदके अधिक मिळाली, असले वांझोटे समाधान आपण हवे तर मानू शकतो; पण हा ताळबंद नीटपणे मांडावयाचा असेल तर आपणाला पहिल्या आशियाई खेळ स्पर्धापर्यंत परत जावे लागेल. त्या स्पर्धेतील बक्षिसांची संख्या अशी होती–

| देश | सुवर्ण | रजत | कास्य |
|---|---|---|---|
| जपान | २४ | २० | १६ |
| भारत | १५ | १६ | २१ |
| इराण | ८ | ७ | १ |
| सिंगापूर | ५ | ७ | १ |
| फिलिपाइन्स | ४ | ६ | ७ |
| श्रीलंका | – | १ | – |
| इंडोनेशिया | – | – | ५ |
| ब्रह्मदेश | – | – | ३ |

चीन आणि कोरिआ या स्पर्धेत नव्हते हे खरं; पण जपानला मागे टाकून पोहण्याच्या शर्यतीत आपण चार सुवर्णपदके संपादन केली होती. त्यातूनही

महत्त्वाचे म्हणजे खेळाचा असा कोणताही प्रकार नव्हता की, ज्यात आपण पदक पटकावले नव्हते ! शरीरसौष्ठवस्पर्धेत इराणी स्पर्धकाचा पराभव करून परिमल दासने सुवर्णपदक मिळवले होते. के. पी. थापर आणि लेवी पिंटो यांनी प्रत्येकी दोन दोन सुवर्णपदके मिळवली होती. पिंटोंनी तर शंभर मीटर धावण्यातील आशियाई विक्रम मोडला होता !

पण याहीपेक्षा अनेक पटींनी मोलाचे म्हणजे सारे खेळ कसे घरगुती खेळीमेळीच्या वातावरणात झाले होते. शाळकरी मुलांनी पाहुण्यांना उत्साहाने आपल्या कवायती दाखवल्या होत्या. आपली स्पर्धा संपल्यावर बक्षिसे वगैरे घेण्यापूर्वी हे खेळाडू प्रेक्षक मुलांच्यामध्ये घुसून त्यांचे गालगुच्चे घेत त्यांना चॉकलेटी वाटत स्वाक्षऱ्या देत होते ! 'खेळाच्या भावनेने खेळाडूंसारखा खेळ खेळा ! ' हा मंत्र जवाहरलालनी त्यांना खेळापूर्वी दिलेला होता आणि साऱ्या कार्यक्रमावर नेहरूंच्या प्रतिमेचा चैतन्यस्पर्श झालेला होता. याच मंतरलेल्या वातावरणात आपल्या खेळांचा त्यानंतर काही काळ प्रवास झाला. टोकिओला झालेल्या आशियाई स्पर्धेतून मिल्कासिंग दोन सुवर्णपदके मिळवून परत आला आणि आशियातील सर्वोत्कृष्ट खेळाडू म्हणून त्या स्पर्धेत त्याचा गौरव झाला. परत आलेल्या संघाला नेहरूंनी त्रिमूर्तीवर जेवावयास बोलावले. प्रत्येक खेळाडूशी मनमोकळेपणे गप्पा मारल्या. मिल्कासिंगचे आईवडील फाळणीच्या वेळी मारले गेलेत आणि त्याचे लहानपण फार हालात गेले हे ऐकून पंडितजींच्या डोळ्यांत अश्रू तरळले. त्यांनी मिल्काला सांगितले, 'माझ्या वयाचे, माझ्या पिढीतील सारेच भारतीय, तुझे आईवडील आहेत. काही काळजी करू नकोस ! आपणा दोघांना मिळून हा देश खेळात फार मोठा करावयाचा आहे हे विसरू नकोस ! '

त्यानंतर चीन, पाकिस्तान अशी तीन युद्धे आपण खेळलो. कोणी मानो अथवा न मानो या प्रत्येक युद्धानंतर आपले आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक राजकीय जीवन फार ढवळून निघाले, आपण स्वतः स्वतःलाच ओळखणार नाही इतके बदलून गेलो. जवळच्या मित्रमंडळींनी घरून डबे आणावेत आणि चांदण्या रात्रीत हिरवळीवर वा गच्चीवर बसून काव्यशास्त्रविनोद करत चांदणी भोजन करावे असे पहिले आशियाड होते. आपण सारेचजण आज जीवनाच्या साऱ्याच क्षेत्रात ते चांदणीभोजन विसरून गेलोय. आज आपण मित्रमंडळींना कटविण्यासाठी आणि आपल्या ऐश्वर्याने दिपवण्यासाठी पैशाचा धूर सोडत त्यांना पंचतारांकित हॉटेलात बफे देतो. आजचे आशियाड असल्या पंचतारांकित हॉटेलातील बफेसारखे झाले. □

# तेरा

' जगातील स्वर्ग जर कोठे असेल तर तो येथेच आहे ' म्हणून सांगणारे एक वाक्य लाल किल्ल्यात कोरलेले आहे हे आपण मागें पाहिले. त्यानंतर दिल्लीत बसून राज्य करणाऱ्या प्रत्येकाने ते वाक्य आदर्श मानून या देशावर राज्य केले. असे राज्य करणाऱ्या राज्यकर्त्यांनी आपणाला आजचा आशियाड करून दाखविला. ' न मिळे पहाया पुन्हा नरा ' असा एक अतिभव्य सोहळा झाला आणि संपला ! बघणाऱ्यांच्या डोळ्यांचे अक्षरशः पारणे फिटले; पण हे सारे जवळून पाहूनही नक्की काय झाले ते सांगणे आपले काम नव्हे. ते सांगावयास पानिपतच्या लढाईचे वर्णन करणाऱ्या रगनभाऊंची प्रतिभा हवी ! अक्षरशः शेकडो कोटी रुपये पाण्यासारखे वापरले गेले ! अनेक जण एका रात्रीत कोट्याधीश झाले. भारताच्या वाट्याला नगण्य वाटावीत अशी पदके आली.–पण त्याचबरोबर, आमचे राष्ट्र, आमचे तंत्रज्ञ, आमचे प्रशासक ठरलेल्या वेळात पाहिजे त्या दर्जाच्या गोष्टी उभारू शकतात आणि लोकशाहीतील सारे स्वातंत्र्य देऊनही शिस्तबद्धपणे, सुरळीतपणे, खेळीमेळीच्या वातावरणात आम्ही या साऱ्या गोष्टी सहजपणे पार पाडू शकतो हे पण आपण सिद्ध केलेच की !

जमा-खर्चाच्या या अनेक बाजू लक्षात घेऊनही या सोहळ्यांचे नक्की फलित काय या प्रश्नावर आपण पुन्हा एकदा थबकतो. समजा, या आशियाडसाठी आपण हजार कोटी रुपये खर्च केले. एवढे पैसे नुसते बँकेत ठेवले असते तरी त्याचे वर्षाला १००–२०० कोटी रुपये व्याज मिळाले असते ! दरवर्षी ही एवढी रक्कम नियोजनपूर्वक आपल्या खेळावर खर्च केली तर आपल्या खेळाडूंचा दर्जा केवढा तरी वाढला असता आणि आपणाला खूप पदके मिळाली असती; पण हा असला कुशाभाऊ कारकुनाचा कारकुनी विचार करण्याचे तरी काय कारण आहे ? दरवर्षी आणखी १००–२०० कोटी रुपये खेळावर खर्च करावयास आपणाला कोणी मना केली आहे का ? आणि संतापायचे, तर फक्त आशियाडच्याच खर्चाच्या नावाने बोटे का मोडावयाची ?–अमेरिकेला भेट देताना इंदिरा गांधींनी एक मजेशीर हिशोब मांडून दाखविला होता. एक अण्वस्त्र वा एक क्षेपणास्त्र बनवावयास जेवढा खर्च येतो, तेवढ्या खर्चात विकसनशील देशातील दहा लाख मुलांच्या शिक्षणाची सोय होईल ! एक लाख लोकांना एक वर्ष जेवण देता येईल आणि दहा हजार खेड्यांना पाणी पुरविता येईल म्हणून सांगितले होते. बाईंच्या त्या विधानाला आपण त्यावेळी अमाप प्रसिद्धी दिली होती; पण त्यावेळी चिनी वृत्तपत्रप्रतिनिधीने बाईंना विचारलेला प्रश्न आपण

विसरलो होतो. त्याने विचारले होते, 'भारतात आपण दरवर्षी जेवढ्या मोटारगाड्या आणि स्कूटर्स बनविता तेवढ्या खर्चात आपण किती खेड्यांना पिण्याचे पाणी पुरवू शकाल ते सांगाल का ?'

हे असले अवघड जागी असलेले प्रश्न बाजूला ठेवले तरी एक मुद्दा बाकी उरतोच. अगदी आपण खेळांना खूप महत्त्व दिले तरी या पदकांना किती महत्त्व द्यावयाचे हा खरा प्रश्न आहे. या बक्षिसांचा आणि राष्ट्रातील सर्वसामान्य माणसाच्या खेळामधील सहयोगाचा व कौशल्याचा काही संबंध असतो का ? चीन वा रशिया स्पर्धेतील खेळाडू कसे तयार करतात ते क्षणभर बाजूला ठेवू. फक्त ऑलींपिकमधील मॅरेथॉन शर्यतीवर आधारलेला गेम्ससारखा सिनेमा पाहिला तरी या स्पर्धेतील तयारीची, जीवघेण्या स्पर्धेची व राजकारणाची घृणा येते. समजा, आपण आपले पाच हजार खेळाडू निवडून पुढील पाच वर्षे त्यांच्यावर वारेमाप खर्च करून आणि त्यांना यांत्रिक पद्धतीने तयार करून शेकड्यांनी बक्षिसे मिळविली. तर त्याचा सर्वसामान्य माणसाच्या खेळामधील सहयोगावर काही परिणाम होईल का ? त्यापेक्षा खेड्यापाड्यातील मुले संध्याकाळी देहभान विसरून स्वतःला हॉकी वा कबड्डीच्या क्रीडांगणावर झोकून देत असतील तर ते अधिक चांगले आहे का ? किंवा आज जर्मनीत करतात तसे नवे खेळ शोधून गावातील साऱ्या लोकांनी खेळाची मौज-मजा लुटत व्यायाम करणे अधिक हितावह नाही का ?

यातील कोणत्याच कल्पनेवर मला अधिक चर्चा करावयाची नाही. कारण प्रथमच सांगितल्याप्रमाणे, 'पैशाची भांग घेतली की कल्पनाच-कल्पना सुचतात !' हे टिळकांचे वाक्य मला पुरते माहीत आहे. त्याहूनही महत्त्वाचे म्हणजे 'सात आंधळे आणि एक हत्ती' ही गोष्ट मला फार चांगली माहीत आहे. हा हत्ती केव्हा शेतीमालाचे भाव बनून आपल्या भेटीला येतो तर केव्हा 'अप्पू' बनून ! आपणाला अशा वेळी तो हत्ती समजला नाही आणि आपण आंधळे झालोय एवढे समजले तरी खूप असते ! एखाद्या डोळसाची मदत घेता येते. जगातील स्वर्ग येथेच आहे म्हणून मग्रुरीने सांगणाऱ्या दिल्लीतील राज्यकर्त्यांच्या राजवाड्याला लागूनच राजघाट आहे. गांधीजींच्या समाधीजवळ जाण्यापूर्वी जेथे पायातील चप्पल काढून ठेवावी लागते तेथे गांधीजींचे एक वचन लावलेले आहे.

"I am giving you the talisman. मी तुम्हाला एक निकष देतोय. आपण करतो ते चूक की बरोबर अशा संभ्रमात तुम्ही पडाल तेव्हा एक साधी गोष्ट करा. तुम्हाला माहीत असलेला सर्वात पददलित माणूस तुमच्या मनासमोर आणा. तुमच्या करण्याने त्याचा थोडा तरी फायदा होणार



मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
३७६४
दा. क्र. २.५.८८
शाखा (स्थळ प्रत)

आहे का ते बघा. तुमच्या प्रश्नाचे उत्तर तुम्हाला मिळालेले असेल !"

गांधीजींच्या या वाक्यातील आशय समजला तर आशियाडच्या निमित्ताने आपण निर्माण केलेल्या अनेक प्रश्नांची उत्तरे आपणाला अगदी सहजपणे सापडतील आणि ती उत्तरे अशी मिळत असतानाच आपल्या दैनंदिन जीवनातील अनेक जमाखर्चाचे ताळेबंद आपण पुन्हा एकदा नीटपणे नव्याने मांडले पाहिजेत हे पण आपणाला जाणवेल !

* * *

# कतले आम....

## एक

अधाशी वाचक म्हणून यापूर्वी मी खूप वाचलंय. फाळणीच्या वेळी झालेल्या ' कतले आम 'ची वर्णने वाचलीत. विजय परुळेकरांनी दाखवलेली व्हिएतनाममध्ये नापाम बाँबमध्ये जळून विद्रूप झालेल्या मुलांची काळीज हलवणारी छायाचित्रे पाहिलीत. स्वतःसुद्धा खूप हिंडलोय. खूप पाहिलंय.

पण आज माझ्याभोवती ही प्रचंड धग आहे. या धगीत माझे आतापर्यंचे अनुभव, संवेदना, भावना, आकार सारे पार वितळून गेलेत. मज्जातंतूंचा पार भुगा झालाय. मी बधीर आहे. कशालाही स्पर्श करू न शकणारी एक बोथट महारोगी संवेदना साऱ्या शरिराला वेढून उरलीये.

सभ्यता, संस्कृती, राग, शिसारी, घृणा, वेदना, शरम, मान, अपमान, सूड, पेटलेले रक्त, गोठलेले डोळे कोणत्याही शब्दांना आज काही अर्थ उरलेले नाहीत. लिहिणे, बोलणे, विचार करणे याला खरोखरच काही अर्थ उरलेला नाही.

पण काही तरी लिहिल्याखेरीज मला अजिबात चैन पडणार नाही. मी भेदरलोय, गांगरलोय. शब्दांच्या कुशीत शिरल्याखेरीज मला झोप येणार नाही. शब्द कदाचित बोट धरून मला थोडा धीर देतील.

□

# दोन

सुरुवात तशी कोठूनही करून चालेल. थोडी सुसंगत वाटणारी पेलणारी सुरुवात. आज बुधवार तारीख ३१ ऑक्टोबर. आज सकाळी उठलो त्या वेळी अनेक दिवसांनी अगदी मोकळा मोकळा आणि प्रसन्न होतो. खूप दिवसांनी किती निवांत आणि छान वाटत होते. माझे या वर्षी अंटार्क्टिकावर जाण्याचे नक्की झालंय. गेले काही आठवडे मी त्याच्याच धमाल गडबडीत होतो. त्या संदर्भात हिमालयात ' हाय अल्टिट्युड वॉर फेअर स्कूल 'मध्ये प्रशिक्षण होते. तेथे करावयाच्या प्रयोगांची आखणी आणि जुळवाजुळव सुरू होती. माझी या मोहिमेसाठी कदाचित नेता म्हणून होणारी निवड तशी झालेली नाही म्हणून दुखावलेल्या मनाची समजूत घालावयाची होती. त्रिवेंद्रमला डॉ. वसंत गोवारीकरांना भेटून आणि डॉ. कासीम यांना सांगून अंतराळ संशोधनाचे कार्य आणि अंटार्क्टिकाची गरज यांची सांगड घालावयाची होती. माझी सारी कामे अगदी मनाजोगती छान पार पडलीत. त्यातच काल किर्लोस्करचे संपादक ह. मो. मराठे यांचे पत्र आलंय. मी ' माणूस ' वा इतर कोणाला कमिट केलेले नसेल तर त्यांना माझे अंटार्क्टिका प्रवासवर्णनाचे लेख हवेत. माझा अहंकार यामुळे सुखावलाय. तोंडावर एक वेगळीच चव रेंगाळते आहे. हा अनुभव मला जपून ठेवावयास हवा. मनाची ही स्थिती मला आयुष्यात पुढे कधी मिळणार आहे कुणास ठाऊक.

मी निवांत आणि मजेत आहे. टिवल्याबावल्या करायला संपूर्ण मोकळा आहे. उठल्या उठल्या या खुशीत पहिला फोन मी महाराष्ट्र टाइम्सच्या अशोक जैनला लावतो. त्याला एकदा आमच्या संशोधन संस्थेत येऊन आमचे कार्य पहायचंय. माझे अंटार्क्टिकावर करावयाचे प्रयोग समजावून घ्यायचेत. फोटोसकट माझी मुलाखत महाराष्ट्र टाइम्सला छापावयाची आहे ! मी फोनवर म्हणतो, ' गुरु, आजवर मी अनेकांच्या मुलाखती घेतल्या. माझी तू मुलाखत घेणार ही कल्पनाच धमाल आहे. उद्या दुपारी बारा वाजायच्या सुमारास ये, निवांतपणे बोलू. चायनीज वगैरेमध्ये जेवावयास जाऊ. ' तो म्हणतो, ' उद्या येणं कठीण आहे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री येथे येणार आहेत; पण तुझ्याकडून चायनीज जेवण मिळणार ही विश्वास न बसणारी गोष्ट आहे. त्यांना वाटेला लावून व्यवस्थित तेथे वेळेवर येतो. त्यानंतर मी डॉ. निशिकांत मिरजकरांसाठी फोन करतो. त्यांना व डॉ. सौ. ललिता मिरजकरांना पण येण्यासाठी निरोप ठेवतो. त्यांच्याकडे मी अनेक पुख्खे झोडलेत. एकदा तरी त्यांना बोलवावयास हवेच. नंतर

मला आठवण होते श्रीकृष्ण खडपेकरांची. ते विनया खडपेकरांचे काका आहेत. ६५ वर्षांचे खडपेकर तसे स्थापत्यशास्त्रज्ञ आहेत; पण साहित्य, संगीत, कला यात त्यांना विलक्षण गती आहे. सध्या नवभारत मासिकात त्यांचे भाषाशास्त्रावरील लेख प्रसिद्ध होताहेत. मी खडपेकरांना दोन-तीनदा फोन फिरवतो. तो लागत नाही. तुमचा रक्तदाब वाढू नये अशी इच्छा असेल तर दारू, धूम्रपान आणि टेलिफोन्स टाळा हे लक्ष्मणचे व्यंगचित्र मला आठवते. आज मला माझा मूड अजिबात बिघडवायचा नाही. खडपेकर फक्त एक फर्लांग अंतरावर राहतात. ती खरी आमच्याच ऑफिसची इमारत आहे. बाहेरचे भाडेकरू म्हणून खडपेकर तेथे आहेत. त्यांचा शेजारी म्हणून माझा मित्र डॉक्टर बलकारसिंग राहतो. त्यांचे ब्लॉक एकमेकांना लागून आहेत. ऑफिसातून बलकारबरोबर त्यांना निरोप पाठवावयाचे ठरवून मी ऑफिसात जातो.

माझ्या घराच्याच मागे आमचे संशोधनकेन्द्र आहे. किंवा खरे सांगायचे तर संशोधनकेन्द्राच्याच आवारात दिलेल्या घरात मी राहतोय. दिल्लीत माझे दोन छोटे परिवार आहेत. एक माझे घर. मी, बायको व आमची मुलगी. दुसरा परिवार म्हणजे आमचे ऑफिस. आम्हा मध्यमवर्गीयांना घर आणि ऑफिस सोडून आयुष्यात दुसरे काही नसतेच ! माझ्या हाताखाली सत्तर-ऐंशी लोक काम करतात आणि माझ्या खोलीला लागूनच माझ्या तिन्ही स्टेनो बसतात. त्यातील दोन सरदारणी आहेत. एक बलजीत, दुसरी उत्तम, तिसरी आहे हरियाणातील जाट निर्मल. या तिघींचा माझ्यावर खूप लोभ आहे. आपापसात विश्वास बसणार नाही एवढे हेवेदावे आहेत.

बलजीत वयाने सर्वात मोठी म्हणजे पस्तीस वर्षांची प्रौढ कुमारी आहे. तिची पासष्ट वर्षांची आई अर्धांगाने अंथरुणातच पडून आहे. तिच्या सैन्यातून सेवानिवृत्त झालेल्या बहात्तर वर्षे वयाच्या वडिलांचे एका डोळ्याचे ऑपरेशन झालंय. ते ऑपरेशन फार जोखमीचे आहे. त्यांना आणि तिच्या आईला अंथरुणापासून हलवायचे नाही. बलजीतचा धाकटा भाऊ फ्रान्समध्ये जाऊन स्थायिक झालाय. त्याने फ्रेंच मुलीशीच लग्न केलंय. एकटी बलजीत हसतमुखाने घरचा व ऑफिसचा गाडा ओढते आहे.

दुसरी उत्तम. तिचे वर्षापूर्वीच लग्न झालंय. नव्या संसारात ती रमलीये. सध्या तिला सहावा महिना सुरू आहे.

तिसरी निर्मल. निर्मलचा नवरा भारतातर्फे आंतरराष्ट्रीय सामन्यातून कुस्ती खेळलाय. तो माझा जवळचा मित्र आहे. निर्मलला दोन छोटी मुले आहेत. निर्मल निर्भय, हसरी, सडेतोड, फटकळ, पण सरळ स्वभावाची मुलगी आहे.

राजधानी दिल्लीच्या दूरदूरच्या तीन वेगवेगळ्या सुरक्षित, सुसंस्कृत विभागा-

तून या तीनजणी दररोज आमच्या ऑफिसात येतात.

—पण पुढील चार दिवसांत बलजीतचे सर्वस्व लुटले जाणारे—

—उत्तमचा गर्भपात होणारे—

—पाहिलेल्या घटनांनी अस्वस्थ होऊन भेदरून निर्मलच्या छोटया मुलांना न थांबणाऱ्या ओकाऱ्या सुरू झाल्याने दवाखान्यात ठेवावे लागणार आहे. माझे व माझ्या भोवतालचे हे छोटे जग एका प्रचंड वादळी राक्षसी झंझावातात, आणि अग्निप्रलयात पार बदलून जाणारे. केवळ चार दिवसांत ओळखता येणार नाही एवढे बदलणार आहे. आमचे स्वतःचेच चेहरे बदलणार आहेत. नियतीच्या हातातील पाने केवढी विलक्षण असतात; पण आपल्याला त्याची आधी कधी पुसटशीही कल्पना येत नाही. आता आम्ही सारेजण किती मजेत आहोत.

□

दिवस कसा मजेत खुशीत पुढे सरकतोय. सकाळचे दहा-साडेदहा वाजलेत. क्षणार्धात सारीकडे एक बातमी पसरते. **इंदिराजींवर गोळया झाडल्यात.** प्रत्येकजण आपण ही बातमी पहिल्यांदा ऐकली आहे असे समजून दुसऱ्याला सांगण्याचा प्रयत्न करतोय. पुढची बातमी काहीच मिळत नाही. वातावरण खूप गोंधळलेले आणि थोडेफार तंग आहे. लोक ऑफिसात आणि बाहेरही थव्याने जमून चर्चा करताहेत. किती गोळया मारल्या, कोणी मारल्या, कशा व कोठे मारल्या याचेच निरर्थक चर्वण सुरू आहे. राजधानी दिल्लीत आपल्याला सविस्तर सत्वर बातमी मिळत नाही हा अनेकांना स्वतःचा अपमान वाटतो. बातमी काढण्यासाठी अनेकजण अनेक दिशांनी पांगतात. पण खरे सांगायचे तर बातमी काही मिळत नाही, सर्वत्र गोंधळच आहे.

दुपारी तीन वाजायच्या सुमारास इंदिराजी गेल्याची आजची पहिली अधिकृत बातमी येते. अजूनही दूरदर्शन, आकाशवाणी यांनी ही बातमी दिलेली नाही. पण बाई गेल्या याबाबत आता कोणाच्याच मनात संदेह नाही. माझ्या मनावर थोडा ताण आलाय. काही तरी हिंसक प्रकार घडणार असे मला वाटतंय. निर्मल तर पक्की इंदिराविरोधी होती; पण तिला वाईट वाटतंय. बलजीत तर पुरती इंदिराभक्त आहे. कधीच न रडणारी ती मुलगीमाझ्या खोलीत येऊन स्फुंदून रडू लागते. मला थोडे चमत्कारीक वाटते—माणूस दिवाळी अंकातील रामदास भटकळांचा स्नेहलताबाईंवरचा लेख वाचूनही अशा वेळी काय करावे हे मला समजत नाही! मी आपला नुसता वेड्यासारखा तिच्याकडे बघतच बसतो. असे हे रडणे वगैरे म्हणजे शुद्ध वेडेपणा आहे असे मला वाटते. तिच्या या रडण्यामुळे माझ्या मनावरचा ताण कमी झालाय असेही काहीसे वाटत असते.

तेवढ्यात डॉक्टर बलकारसिंग माझ्या खोलीत घुसतो. तो घाबरलाय. त्याची बायको ऑल इंडिया इन्स्टिट्युट ऑफ मेडिकल सायन्समध्ये मानसशास्त्र-विभागात मानसशास्त्रज्ञ म्हणून काम करते. हत्येची बातमी आली त्या वेळी तो लगेच आपल्या गाडीतून बायकोकडे गेला होता. तो म्हणतो काही तरी हिंसक भयंकर घडणारे. वातावरण फार झपाट्याने चमत्कारिकपणे बदलतंय-मी जाट शेतकरी आहे. माझे व्यवहारज्ञान फारसे चुकत नाही हे तुला माहीत आहे. बायको, मुलगा, मुलगी यांना घेऊन आज तुझ्याकडे रहावयास येऊ का ? तिथल्यापेक्षा कॉलनी सुरक्षित आहे.

मी मनापासून त्याही परिस्थितीत हसलो. पंजाबात माझ्याबरोबर गेल्या महिन्यात वाघासारखा हिंडलेला, सहा फुटांचा तगडा दणकट बलकार भयंकर घाबरलाय. मी म्हणतो, 'बलकार व्यवहारज्ञान वगैरे काही नाही. जाट शेतकरी वगैरे काही नाही. तू पण आता मध्यमवर्गीय बनला आहेस. उगाचच काही तरी कारण किंवा निमित्त शोधून घाबरतोस.'

मला खरोखरच नवल वाटत होते. दंगल, जाळपोळ होईल ती सरदारांच्या-विरुद्ध होईल, हे मी नक्की ओळखत होतो. माझी बाळपणातील पहिली आठवण गांधीवधाच्या वेळी सातारला माझ्या घरासमोर झालेल्या जाळपोळी-चीच आहे; पण दिल्लीत दंगल झाली तरी त्याची धग मल्कागंजमधील भर चौकात जवाहरनगरसारख्या गजबजलेल्या इमारतीत चौथ्या मजल्यावर राहणाऱ्या बलकारसिंगला पोचेल असे मला मुळीच वाटत नव्हते. त्या इमारतीत चाळीस-पन्नास कुटुंबे आहेत. त्यात वीस-पंचवीस कुटुंबे आमच्याच ऑफिसा-तील आहेत. त्यातून उरलेली कुटुंबे पण सारी चांगली आहेत. या चाळीस-पन्नास कुटुंबात दोनच सरदारकुटुंबे आहेत. एक बलकारसिंगचे. दुसरे एका सधन शीख व्यापाऱ्याचे. हा साराच विभाग खूप सुरक्षित आहे. मल्कागंजचा प्रमुख बसस्टॉप त्याच्या घराला लागून आहे. जवळ टॅक्सी स्टॅण्ड आहे. चार-पाच मिनिटांच्या अंतरावर दोन मोठी पोस्ट-ऑफिसे आहेत. पोलीसचौकी आहे. या घरांच्या एका बाजूला घंटाघर सब्जीमंडीसारखा गजबजलेला जुना बाजार आहे. दुसऱ्या बाजूला दिल्लीतसुद्धा उठून दिसावी अशी कमलानगरची नवी नटलेली बाजारपेठ आहे. अनेक प्रकारच्या नव्या आकर्षक वस्तूंनी ही बाजारपेठ नुसती भरलीय. आत छान हॉटेल्स आहेत. कमलानगरमधून हिंडताना कसे हवेत तरंगल्यासारखे वाटते! त्याला लागूनच चंद्रावळची तशी झोपडपट्टी आहे; पण हे लोक येथे अनेक पिढ्या राहताहेत. तेथेच गाईंचे, म्हशींचे गोठे आहेत. बाकीचे लोक तसे चंद्रावळला जायला घाबरतात; पण तेथेही माझे आणि बलकारसिंगचे मित्र आहेत. हे लोक म्हटले तर गुंड आहेत,

म्हटले तर फार फार चांगले आहेत !

सर्वांत महत्त्वाचे म्हणजे बलकारसिंगच्या घरापासून फक्त दोन किलोमीटर्स अंतरावर राज्यपालभवन आहे. दिल्लीचे प्रशासन बघणारा राज्यपाल तेथे राहतो. त्याच्याच जरा पुढे राजधानी दिल्लीचा पोलीस कमिशनर राहतो. थोडे पुढे गेले की, ल्युडलो कॅसलची दोन भव्य स्कूल्स् लागतात. त्यांना वळसा घातला की, आपण रिंग रोडवर येतो. एकदा रिंग रोडवर आले की, लाल किल्ला, राजघाट, सिव्हिल लाइन्स हा भाग दहा-पंधरा मिनिटात गाठता येतो. मी बलाकारसिंगला म्हणतो, 'काही झाले तर पंधरा मिनिटांत आपण राजघाटावर जाऊन गांधींचे दर्शन घेऊन आत्मबळ मिळवू शकतो वा लाल किल्ल्यात वा सिव्हिल लाइन्सला जाऊन सैन्याला बोलावू शकतो! आपण काही रस्त्यावरची फालतू माणसे नाही. या राजधानी दिल्लीत अनेक सरकारी अंमलदार, पोलीस-अधिकारी, सैन्यातले अधिकारी सारे आपले जवळचे मित्र आहेत !

बलकारसिंग म्हणतो, तू म्हणतोस ते कळते पण पटत नाही आणि बलकार-सिंगचे म्हणणे एका अर्थाने खरे आहे. त्याच्या घरापेक्षा आमची कॉलनी अधिक बंदिस्त आहे. मल्कागंज पेट्रोलपंपाच्या समोर विद्यापीठ रस्ता सुरू होतो. त्या रस्त्यावरील पहिली इमारत आमच्या संशोधनकेंद्राची आहे. शेवटची इमारत विद्यापीठाची आहे. भोवताली महाविद्यालये, त्यांचे निवास, वसतिगृहे पसरलीत. आमच्या संशोधनकेंद्राला आणि कॉलनीला चारी बाजूंनी भक्कम दगडी कुंपण आहे. आत फक्त तीस-चाळीसच कुटुंबे राहतात. चार-पाच पहारेकरी नेहमी आत असतात. बाहेरच्या दारावर तर बंदूक घेऊन एक पहारेकरी उभा असतो ! मी त्याला चिडवत म्हणतो, 'तुझे म्हणणे मला पटत नाही; पण या निमित्ताने तरी तू सहकुटुंब माझ्या घरी येणार याचा मला खरंच आनंद होतोय.'

पडत्या फळाची आज्ञा घेतल्यासारखा बलकारसिंग यांत्रिकपणे उठला आणि केवळ पाच मिनिटांत बायका-मुलांना घेऊन माझ्या घरी पोचलासुद्धा !

□

# तीन

रात्रीचे आठ वाजलेत.

दूर बडा हिंदूरावजवळ आकाशात लाल लाल उजेड पसरलाय. आमच्या घराच्या छतावरून तो लखख प्रकाश अगदी स्पष्ट दिसतोय. तो प्रकाश पहाव-

यांस घराला छत नसलेले मित्र आमच्या छतावर जमलेत. गेल्या चार-पांच तासात बाहेर आणखी काही झाले आहे असे आम्हा कोणालाच वाटत नाही. जवळपास हिंडून आलेले मित्र पण तसेच सांगताहेत. आमच्या विभागात वातावरण तंग आहे. लोक अस्वस्थ आहेत एवढेच. बाकी आणखी काही नाही. तो प्रकाश आगीचा आहे की, त्या विभागात अलीकडे लावलेल्या निऑन वगैरे दिव्यांचा आहे याचाच आम्ही आपापसात विचार करतोय ! आजकाल दूरदर्शन सोडून वर गच्चीवर कोण जातो कशाला आणि आकाशात बघतो तरी कशाला ? पण हळूहळू तो प्रकाश आणखी मोठा होतो. मागे पुढे हलू लागतो. तो आगीचाच आहे हे आमच्या लक्षात येते; पण दिसणाऱ्या आसमंतात ही फक्त एवढी एकच आग पेटलेली आहे. छतावरून खाली परत येतो तर मला माझ्या वरिष्ठांचा फोन आलाय. ते दूर ग्रीनपार्कला राहतात. त्यांच्या घराजवळ थोडी दंगल सुरू आहे. त्यांच्या सरदार ड्रायव्हरलाच वेदम मारलाय. तो त्यांना बंगल्यावर पोचवून सायकलवरून त्याच्या घरी चालला होता. तो मेलाय असे समजून त्याला रस्त्यावर सोडून जमाव पुढे गेला. त्याला जाळावयास पेट्रोल न मिळाल्याने तो वाचलाय. रक्तबंबाळ स्थितीत तो त्यांच्या घरी पोचलाय. भोवताली काही तरी भयंकर घडलंय. ते मला उद्या ऑफिस बंद ठेवण्याची सूचना देतात. आज जाण्यापूर्वी फक्त अंत्ययात्रेच्या दिवशी ऑफिस बंद ठेवण्याचे आम्ही ठरवले होते. कारण तोच दिवस सरकारी शोकदिवस असतो. काही वेळाने आणखी एका जबाबदार मित्राचा फोन येतो. ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्ससमोर जाणारी प्रत्येक गाडी जमाव रस्त्यावर थांबवतोय. आत सरदार असेल तर त्याला खेचून बाहेर काढतोय. एकही सरदार यातून सुटत नाही. त्याला चेचून-ठेचून मग पेटवलं जातंय ! तो समोरच राहतो म्हणून हे सारे बघतोय. माझा त्या मित्रावर विश्वास आहे; पण तो जे सांगतोय त्याच्यावर माझा त्या क्षणी अजिबात विश्वास बसत नाही.

सकाळी आम्ही ऑफिस बंद असल्याची सूचना लावावयास जातो. त्याची जरुरी नाहीच. कारण कॉलनीत राहणारे लोक सोडून बाकी कोणीच ऑफिसात आलेले नाही. ऑफिस बंद केल्यावर तीन-चार जण मल्कागंजपर्यंत फेरी मारून यावयाचे ठरवतो. आमचा विभाग तसा शांत आहे; पण काल रात्री समोरच्या मल्कागंज पेट्रोलपंपाच्या साऱ्या काचा जमावाने दगडफेक करून फोडलेल्या आहेत. मल्कागंज टॅक्सीस्टँडवरील सरदारांच्या साऱ्या टॅक्सींची कमी-जास्त मोडतोड झालीये. ज्या टॅक्सीज सरदाराच्या मालकीच्या नाहीत त्या मात्र सुरक्षित आहेत. टॅक्सीस्टँड निर्मनुष्य आहे. मल्कागंज-चौकातील सरदाराची एक लॉन्ड्री फोडून सरळसरळ लुटलेली आहे. मी म्हणतो,

' त्यांयला, सरदाराला त्रास देण्याचा हा चांगला मार्ग आहे! दुकान त्याचे, सारे कपडे आमचे! त्रास आम्हालाच झालाय!' अजून मी हे सारे सहजपणे घेतोय. एवढी दंगल होणार हे तर मलाही त्या क्षणी माहीत होते. फक्त चाळीस–पन्नास पोलीस माझ्याकडे दिले तरी आमच्या विभागातील ही असली दंगल मी सहज मोडून काढीन, इतकेच नव्हे तर लॉन्ड्रीतून लुटून नेलेला माल परत मिळवीन असे मला वाटले.

–पण मी अजून कच्चा आहे. मला अजून खूप शिकायचंय हे मला त्या क्षणी माहीत नाही. हे सारे 'एकच प्याला' मधील सुधाकरासारखे आहे.

–अजराक, अंदाधुंदी याचा पहिला घोट घेतला की, जमावाला त्याची सवय होते, चटक लागते किंवा व्यसन जडते! महत्त्वाचे म्हणजे दारूहूनही झपाट्याने जमावाला अराजक व अंदाधुंदी चढते! त्याहूनही महत्त्वाचे म्हणजे संसर्गजन्य रोगासारखे किंवा प्लेगसारखे हे सारे झपाट्याने भोवताली पसरते.

घरी आल्यावर आम्ही सारे गच्चीवर गेलो आणि काय होतेय याचा पहिला अंदाज आला. कोणत्याही बाजूला पहा. सारी दिल्ली पेटलीये. चारी बाजूंनी धूर आणि आग आकाशात वर चढते आहे. ज्वालामुखीच्या विवरातून धूळ आणि धूर बाहेर यावा तसा अनेक नव्या ठिकाणांहून धूर वर उठतोय. सारी भोवतालची दिल्ली पेटलीये. शहर कसे जाळतात ते मी आयुष्यात प्रथम पाहतोय. या आगी शक्तिनगर, सिव्हिल लाइन्स, कमलानगर, घंटाघर, सब्जीमंडी या विभागात कोणत्या दुकानांना वा गुरुद्वारांना लागल्यात याची आम्ही चर्चा करतोय. बलकारसिंग आज सकाळपासून बाहेर पडलेलाच नाही. त्याला हे सारे पहाण्यासाठी एक जण वर बोलावतो. समोर काही अंतरावर हंसराज कॉलेजचे वसतिगृह आहे. त्याच्याही गच्चीवर खूप मुले आहेत. ती मुले बलकारसिंगला पाहून हिंस्त्र पशूसारखी पण समूहाने काही ओरडतात. सापांच्या जिभा फिराव्यात तसे त्यांचे हात त्याच्या दिशेने हवेत उठतात. बलकार भयंकर घाबरतो. आम्ही सारेच जण घाबरतो. खाली घरी जाऊन बसतो. बाहेरून हिंडून आलेले लोक सांगतात काल रात्री बडा हिंदूरावसमोरील तीन मजली सुंदर गुरुद्वार जाळून भस्म केलाय. त्याच्या समोरची सरदारांची टायर्स दुरुस्त करणारी आठ–दहा दुकाने अजूनही जळताहेत. आझादनगरचा टॅक्सीस्टँड जळून भस्म झालाय. त्या विभागातील अनेक घरे लुटलीत आणि जाळलीत. शक्तीनगरला तेच सुरू आहे. वास्तुकलेचे सुंदर रूप दाखविणारे तेथील गुरुद्वार पेटून उठलेत; पण बाहेर भटकायला काही हरकत नाही. दाढी-फेटा नसलेला कोणीही बाहेर सरळ हिंडू शकतोय!

आम्हाला थोडी हिंमत येते. बारा वाजायच्या सुमाराला आम्ही काही जण

मल्कागंज, घंटाघर सब्जीमंडीपर्यंत हिंडावयास बाहेर पडतो. आता या विभागातील अनेक दुकाने उघडून लुटावयास सुरुवात झालेली आहे. ही दुकाने तयार कपडयांची आहेत, क्रॉकरीची आहेत, चैनीच्या छानछोकीच्या वस्तूंची आहेत. निवांतपणे बाजारहाट करावा अशी दुकाने लुटली जाताहेत! तीन चार पोलीस चकरा मारताहेत. झपाट्याने लोक येताहेत, सामान काखोटीला मारून घेऊन जाताहेत. माझा माझ्या डोळयांवर अजिबात विश्वास बसू नये असा हा देखावा आहे. अजून सरदारांची काही दुकाने लुटायचीत. त्यात सेठी बेकरी आहे. दूरदर्शन विकणारी दुकाने आहेत. सोन्याचांदीची दुकाने आहेत. मी म्हणतो, लोकांना अजून भूक लागायची आहे. दोन वाजायच्या सुमारास बेकरी फुटेल व रात्री वा सकाळी सोन्याचांदीचे दुकान फुटेल!

मी थोडा चुकलोय. सहा वाजता परत आलो तर सेठी बेकरी बरोबर दोन वाजता लुटलेली आहे. दुरदर्शनचे दुकान पाच वाजता फुटलंय. जमाव मोठा झालाय, खूप खूप मोठा! पोलिसांसमोर दूरदर्शन आणि व्हिडिओ तीनशे ते पाचशे रुपयांपर्यंत विकले जाताहेत; पण सोन्याचे जवाहिरांचे दुकान त्याच्या थोडं आधी फुटलंय! हा माल न विकता लोक घेऊन गेलेत. आधी लुटलेल्या दुकानातील लाकडी सामान बाहेर काढून ते पेटविण्यात आलंय. लाकडी सामान त्यापूर्वीच पेटविलेल्या, त्याआधीच्या मोकळया दुकानांना आगी लागताहेत. रस्त्यावर शिळोप्याच्या गप्पा मारत हिंडताहेत असे वाटावे असे पोलीस हिंडताहेत. मल्कागंज, घंटाघर, कमलानगर या विभागातील सरदारांची सारी दुकाने -झाडून सारी दुकाने- लुटली जाताहेत. नियमाला अपवाद असावा म्हणून फक्त मल्कागंज कोपऱ्यातील 'जॉली ऑटो शॉप' सोडलंय. त्यात खूप माल आहे; पण त्या मालाचा कोणालाच काही उपयोग नसावा. तो लगच विकता येण्यासारखा पण नाही. या विभागातून हिंडताना रस्त्यावर सर्वत्र होळी आहे आणि भोवताली भडकलेल्या दुकानांच्या आगी. पंजाब फूट वेअर्सचे दुकान लुटलंय. त्याच्या समोरचे 'पंजाबदिहट्टी' हे सुकी फळे आणि मेवा विकणारे प्रचंड दुकान संपूर्णपणे लुटून त्याला आग लावलीये. ती तीन मजली प्रचंड इमारत धडाडून पेटून उठलीये. वरच्या मजल्यावर लोक रहातात. हिंदू कुटुंबे पण राहतात. त्यांचे काय झालंय माहीत नाही. काही जण सांगतात -पाठीमागून चार-पाच जळलेली प्रेते काढलीत. सर्वात अधिक विध्वंस सुंदर कमलानगरचा झालाय. 'ब्राईट ड्रेसेस' हे येथील तयार कपडयांचे फार मोठे दुकान. ते सारे लुटलंय. त्याचा मालक बलकारसिंगचा मित्र आहे. म्हणून पाठीमागच्या त्याच्या प्रचंड घरात त्याला भेटायला गेलो. त्याची बायको धाय मोकलून रडते आहे. दुकान लुटताना पाहून तिचा तगडा नवरा हृदय-

विकाराच्या झटक्याने मरण पावला. सारेजण भेदरलेत. त्याचे प्रेत कसे बाहेर काढावयाचे याचीच सर्वांना चिंता पडलीये.

घरी आलो तर आमचा सिक्युरिटी ऑफिसर माझी वाट पहात होता. तो तसा आमचा सिक्युरिटी ऑफिसर नाही. आम्ही आमच्या सिक्युरिटीचं कंत्राट एका कंपनीला दिलंय. ती कंपनी अनेक संस्थांची सिक्युरिटी सांभाळते. कपूर त्या कंपनीचा अधिकारी आहे. तो त्याच्या साऱ्या केंद्रांना दिवसभर भेटी देऊन आलाय. तो म्हणतो तुमचा विभाग फार शांत आणि सुरक्षित आहे ! बाहेर अग्निप्रलय आहे. मी स्वत: जी. टी. कर्नलरोडवर जळणारी दहा प्रेते मोजलीत. कोकाकोलाची फॅक्टरी जळून भस्म झालीये. हिंसक थवे सर्वत्र हिंडताहेत. सरदार बदला घेणार असे पण म्हणताहेत. आमच्या सुरक्षिततेवर विश्वास ठेवू नका. कॉलनीसाठी तुमची पण गस्त सुरू करा ! आमच्या या कॉलनीत फक्त दोन सरदारकुटुंबे आहेत. एक मिसेस गुरुचरण कौरचे, दुसरे डॉ. सुरेंद्रसिंगचे. सुरेंद्रसिंग मला सांगतो, ‘ त्याच्या मेव्हण्याचा फोन आला होता. तो सदर बाजारला राहतो. त्याचे सारे दुकान लुटलंय; पण तो वाचलाय कारण त्याने दाढीमिशी केली ! म्हणजे तो मोना बनलाय. तो पुढे मला म्हणतो, ‘ साऱ्या कॉलनीवर माझ्यामुळे काही संकट येणार असेल तर मी पण मोना बनायला तयार आहे.’ मी म्हणतो तू उगाच घाबरला आहेस. येथे काही होणार नाही. अजिबात काळजी करू नको.

पण खरे सांगायचे तर मी घाबरलोय. मला काळजीही वाटते आहे. त्यापेक्षा मी अधिक गोंधळलोय. पोलिसांचे विसरा. ही राजधानी आहे. पाच मिनिटांत सैन्य इकडून तिकडे हवे तसे हलवता आले पाहिजे. आणखी एका गोष्टीचं मला नवल वाटतंय. दिल्लीतील सारी यंत्रणा पार कोसळली आहे आणि नेमक्या यावेळी नेहमी काम न करणारे टेलिफोन्स विश्वास बसू नये इतक्या चांगल्या प्रकारे काम करताहेत. सकाळपासून दूरचे–जवळचे सारे टेलिफोन्स मिळताहेत. सकाळपासून मी स्वतःच पुण्याला तीन मोठे टेलिफोन्स केलेत. एक माणूस कचेरीत. दुसरे दोन देवदत्त दाभोळकरांना.

मात्र याचाही विचार करायला त्याक्षणी वेळ नाही. भेटणारा प्रत्येक माणूस, येणारा प्रत्येक फोन त्याच गोष्टी पुन्हा पुन्हा ओकतोय. साऱ्या दिल्लीत सर्वत्र यंत्रणा कोलमडलीये. प्रचंड प्रमाणात लूटमार, जाळपोळ, कत्तल सुरू आहे. आमचा विभाग त्यामानाने सुरक्षित आहे. माझा मावसपुतण्या एक दिवस आधी दिल्लीत आलाय. तो हौसखासला त्याच्या मित्राकडे उतरलाय. तो मुंबईत विल्सन कॉलेजात प्राध्यापक आहे. त्याचे वडील मुंबईत डेप्युटी पोलीस कमिशनर होते. मुंबईतील अनेक दंगली त्याने जवळून पाहिल्यात. तो फोनवर म्हणतो, हे सारे

विश्वास न बसणारे आहे. आमच्यासमोरचे सरदारांचे बंगले फोडून सोफा, कपडे, दूरदर्शन सारे लोक डोक्यावर ठेवून घेऊन जाताहेत.

–घडतंय, दिसतंय, जे ऐकू येतंय ते खरेच काही समजत नाही. सारेच विश्वास न बसण्यासारखे आहे. रात्री आणखी काहीच करण्यासारखे नसल्याने हे सारे का होतंय ? कोण करतंय ? कसं करतंय ? याचीच आम्ही चर्चा करीत बसतो. कोणी म्हणतो झोपडपट्टीतील लोक हे सारे करताहेत. महारोग वाढावा तशी देशात सर्वत्र झोपडपट्टी वाढली आहे. त्यांच्यासमोर उंच इमारतीतील स्वर्गसुख भोगणारे लोक आहेत. या महारोगी झोपडपट्टीत बोथट, संवेदनाक्षम, सूडाने पेटलेली मने असणारच. दुसरा जण म्हणतो, हे झोपडपट्टीतील लोक नाहीत. दिल्लीला लागून असलेल्या सीमेवरील प्रांतातील खेड्यापाड्यातील लोक यात मोठ्या प्रमाणावर आहेत. प्रचंड दारिद्र्य असलेली भुकेकंगाल खेडी या समृद्ध, ऐषारामी ऐतखाऊ दिल्लीला वेढून आहेत ! खेडी विरुद्ध शहरे या उद्याच्या अटळ लढाईमधील ही पहिली फेरी आहे. मी म्हणतो, तुम्ही म्हणता ते मला थोडेफार पटते; पण मला वाटते आपण सारेचजण गुन्हेगार म्हणून यात सामील आहोत. थोडेफार नट म्हणून, थोडेफार प्रेक्षक म्हणून, थोडेफार टीकाकार म्हणून—सर्वांत महत्त्वाचे म्हणजे आपण सर्वजण या क्षणी आहोत अफवा निर्माण करणारे कारखानदार ! सारे पाहून–ऐकून अजूनही माझ्या मध्यमवर्गीय मनाला यातील बऱ्याचशा गोष्टी अफवाच वाटताहेत !

□

## चार

दुसरा दिवस उगवलाय.

अफवा आता अफवा उरल्या नाहीत. त्यातील धग आता सर्वांनाच जाणवू लागलीये. सकाळी पहिलाच फोन येतो प्रकाशसिंगचा. आमच्या ऑफिसात एकूण दहा–बारा सरदार आहेत. प्रकाशसिंग त्यापैकी एक. प्रकाशसिंग हा एक फार चांगला संशोधक आहे. त्याने सध्या केलेल्या काही संशोधनामुळे ‘ यु.नी.डो. ’ पुढील महिन्यात तीन महिन्यांसाठी त्याला जर्मनीत पाठविणार आहे. प्रकाशसिंग फार साधा आणि सरळ आहे. माझ्या अनेक सरदारमित्रांपैकी हा फक्त एकच असा आहे की, खलिस्तान, भिंद्रनवाले, आतंकवादी याचा हा नेहमी जोरदारपणे निषेध करत असतो. प्रकाशसिंग दूर जहांगीरपुरीला राहतो.

त्यातून त्याचे घर दुसऱ्या मजल्यावर आहे. प्रकाशसिंग फोनवर म्हणतो, ' सर, मी माझे कुटुंबीय अगदी सुखरूप आहोत. काही काळजी करू नका.' मला चेष्टा करावयाची लहर येते. मी म्हणतो, ' बेटा, तुला काय होणार ? तू पुरता सरदारविरोधी. खरे पाहता तूच ही सरदारविरोधी जाळपोळ करत असशील असे मला वाटते ! ' पण माझा हा विनोद निम्म्यावरच राहतो. प्रकाशसिंग सांगतोय, ' सर, माझे सारे सारे लुटले गेलंय. माझी स्कुटर, दूरदर्शन सारे माझ्यासमोर जाळलंय. बाकी सारे काही लुटून नेलंय. आम्ही सारेजण पळून गेलो म्हणून वाचलो. जिन्यावरून गच्चीवर जाऊन एका गच्चीवरून दुसऱ्या गच्चीवर उड्या मारत आम्ही नाहीसे झालो. माझी दहा वर्षांची मुलगी मात्र घरात राहिली होती; पण ती बाथरूममधील माळ्यावर जाऊन लपली म्हणून वाचली, प्रकाशसिंग काय सांगतोय ! काय बोलतोय ते मला कळत नव्हते. तो नुसता अनेक वेळ फोनवर बोलत होता. हे सारे दोन तासांपूर्वी घडले होते आणि पहिला फोन त्याने मला केला होता. तो काय सांगतोय ते त्यालाही समजत नव्हते आणि मला पण. थोडा थोडा बोध होत होता. हे सारे घडले त्या वेळी तो, त्याची बायको, तीन मुले आणि त्याचा भाऊ घरात होते. त्याचा भाऊ कॅनडात स्थायिक झालेला आहे. कॅनडाचा नागरिक आहे. त्याच्या घरात आता गॅससिलेंडर, रेशन कार्ड, पंखा, चपला काही म्हणजे काही उरलेले नव्हते. अंगावरील कपडे सोडून त्याच्याकडे काहीसुद्धा नव्हते. त्याला काय सांगावे मला कळेना. मी म्हटले इकडे कॉलनीत ये. तो म्हणाला, ' सर, तसे नको. येणे फार धोक्याचे आहे. मी आलो तर तुम्हाला पण सर्वांना कदाचित त्रास होईल. माझ्या भावाची काही काळजी करू नका.'– प्रकाशसिंग म्हणत होता ते सारे खरे होते. त्याच्या भावाचा काही प्रश्न नव्हता. तो काही भारताचा नागरिक नव्हता ! तो कॅनडाचा नागरिक होता ! कॅनडाची भारतातील वकिलात केवळ दोन तासांत त्याला सुखरूप ठिकाणी घेऊन जाऊन स्वतःच्या खर्चाने कॅनडाला घेऊन जावयास तयार होती. त्याचा देश त्याच्यामागे उभा होता. प्रश्न होता या देशावर मनापासून प्रेम करणाऱ्या प्रकाशसिंगचा !

मी विमनस्क अवस्थेत फोन खाली ठेवतो. माझ्यासमोर पसरलेली सारी वर्तमानपत्रे अशीच सुन्न करणारी माहिती देताहेत. ' स्टेट्समन 'ने शेवटच्या पानावर एक लुटालुटीचे चित्र दिलंय. पंचकुईयारोड या नव्या दिल्ली स्टेशनजवळील रस्त्यावर सुंदर फर्निचर विकणारी खूप दुकाने आहेत. हे फर्निचर लुटून नेले जातंय आणि ही लुटालूट पोलीस करताहेत. आपल्या पोलिसांच्या मोठ्या ट्रकमध्ये भरून पोलीस फर्निचर पळवून नेताहेत असे हे छायाचित्र

आहे. टाइम्स, हिंदुस्तान टाइम्स अशा जबाबदार वृत्तपत्रांनी त्रिलोकपुरीत झालेल्या महाभयंकर कत्तलीची छोटी वर्णनं दिलीत. केरकचरा भरावा तशी दोन ट्रक्स भरून प्रेते–कुजलली, तुटलेली, सडलेली, नेलीत म्हणून लिहिलंय. जमनापार हे असं घडतंय आणि दूरदर्शन व आकाशवाणी जमनापार 'चुट-पूट घटनाएँ' सुरू आहेत म्हणून सांगताहेत ! आम्ही काही मित्र जमनापार फेरी मारून येण्याचे ठरवतो. मी मध्यातूनच परत फिरतो. माझे पाहण्याचे धैर्य संपलंय. माणूस आणि पत्रकार म्हणून मी आयुष्यात पहिल्यांदा पराभूत झालोय. वाटेत माझ्यासमोर दोन माणसे जिवंत जाळली गेलीत. एक दूर-दर्शनचे दुकान फुटलंय. क्रुद्ध, हिंस्र, प्रचंड जमाव दूरदर्शन तेथून ओरबाडून नेतोय. समोरच्या घरातून बारा-तेरा वर्षांची एक मुलगी सगळ्यांची नजर चुकवून आरडत-ओरडत तेथे पळत आलीये. ते तिच्या वडलांचे दुकान आहे. 'हम बरबाद हो जाएंगे, पपा मर जाएंगे' असे बडबडत ती त्या दुकानाचे रक्षण करावयास मधे येते. बीभत्सपणे, हिंस्रपणे हसत त्यातीलच एक–दोन दूरदर्शन तिच्या डोक्यावर आपटून चेचून जमाव तिला बेशुद्ध करतो आणि त्या दूरदर्शनसकट तिला जाळून देतो.– या देशात आलेल्या दूरदर्शन 'व्ही. डी. ओ.' संस्कृतीने आपला पहिला बळी माझ्या डोळ्यांसमोर नोंदवलाय, मी भेदरून गोठून कोपऱ्यात उभा आहे. हिजडेसुद्धा इतके अगतीकपणे आणि असमर्थपणे उभे रहात नसतील !

एका तिरमिरीत मी आणि माझे मित्र घरी परततो. मी आता अजिबात बाहेर न पडण्याचे ठरवलंय. मी घाबरतो म्हणून नव्हे. खरे पाहता सरदार सोडून इतर कोणाला रस्त्यावर घाबरण्यासारखे काही नाहीच; पण हे सारे सहन होण्याच्या पलीकडचे आहे. मी काहीही घरी बोलत नाही. चिडिचूप पांघरूण अंगावर घेऊन अंथरुणात पसरतो. मला अजिबात झोप येत नाही. नक्की काय झालंय हे मला अजिबात समजत नसते. रात्री १२ वाजण्याच्या सुमारास फोन घणघणतो. आमच्या ऑफिसचा डॉक्टर जैन चांदणी चौकात राहतोय. दिल्लीतील पाण्यात 'पोटॅशियम सायनाइड'सारखे जालीम विष मोठ्या प्रमाणावर मिसळलंय म्हणून त्याने ऐकलंय. चांदणीचौक विभागात सर्वत्र तेच बोलताहेत. त्याने त्याला ही बातमी समजल्यावर दूरदूरच्या तीन चार मित्रांना फोन केला. प्रत्येकाने आपण ही बातमी आधीच ऐकल्याचे त्याला सांगितले आहे. मला व कॉलनीतील मित्रांना ही बातमी समजली आहे का हे तो विचारत होता. मी ही बातमी पहिल्यांदाच ऐकत होतो. कॉलनीत कोणाला माहीत आहे का नाही मला माहीत नव्हते. कारण मी नंतर घरी आल्यावर कोणालाच भेटलो नव्हतो; पण कसली तरी अनाकलनीय उदा-

सीनता माझ्या मनाला वेढून उरली होती. कोणाला काही विचारावे, कोणाला काही सांगावे असे मला काही वाटत नव्हते. मी फोन खाली ठेवला आणि अंथरुणात घुसलो. रात्री दोन वाजण्याच्या सुमारास मला अचानक घाबरून जाग आली. दरदरून घाम सुटला होता. आपण फार मोठी चूक करतो आहो हे माझ्या अचानक लक्षात आले होते. मी घरातील सर्वांना उठवतो. घरातील उरलेसुरलेले सारे पाणी आम्ही फेकून देतो. रात्री उठून झोपेत कोणी पाणी प्यावयास जाऊ नये म्हणून नळांना फडकी बांधून त्यांना बंद करतो; पण त्या वेळीही कॉलनीत आणखी कोणाला घरी जाऊन वा फोनवरून हा निरोप सांगावा असे आम्हाला कोणालाच वाटत नाही.

सकाळी आम्हा सर्वांनाच उशीरा जाग आली आहे आता काय करायचे हा प्रश्न अंथरुणातच मनात आहे. आता चहा मिळणार नाही. तोंड धुवावयाचे नाही. पाणी प्यावयाचे नाही. प्रयोगशाळेत जाऊन बाष्पीभवन करून पिण्याएवढे पाणी गोळा केले पाहिजे. एवढ्यात दूरदर्शनवर पाणी विषारी नसल्याची बातमी येते. एक दोन वृत्तपत्रात पण ते छापून आलंय. एका क्षणात मनावरचे दडपण गेलंय. फार छान हलके हलके वाटते. कालचा प्रसंग तर मी विसरूनच गेलोय. फार मोठा ताण गेलाय. अगदी प्रसन्न आनंदी वाटतंय. मला नवल फक्त एकाच गोष्टीचे वाटत राहते. काल रात्री बारा एक वाजावयाच्या सुमारास आम्हा सर्वांनाच कॉलनीत ही बातमी समजली आहे आणि आम्ही कोणीच दुसऱ्या कोणाला ही बातमी सांगावयाचा त्या वेळी प्रयत्न केलेला नाही !

□

# पाच

आज रविवार तारीख ४ नोव्हेंबर.

आज घराबाहेर पडायला हवेच. बलकारसिंग आणि त्याचे कुटुंब फक्त अंगावरचे कपडे घालून माझ्या घरी आले होते. त्यांना त्यांच्या घरून आणखी काही किमान कपडे हवे आहेत. मी पण आता थोडा निवळलोय. मनावरचा ताण उतरलाय. आता बाहेर पडावयास पाय पुन्हा थोडे तयार आहेत.

काल इंदिराजींची अंत्ययात्रा होती. मी ती निवांतपणे दूरदर्शनसमोर बसूनच पाहिली. अंत्ययात्रेला अजिबात गर्दी दिसत नव्हती. माझ्यासारखे अनेक हवशे, गवशे, नवशे घरातच बसलेले दिसतात; पण तरीही अंत्ययात्रेतील ती

मामुली गर्दी पाहून आम्हाला आश्चर्यच वाटते. एक जण म्हणतो, ‘ आपल्या अंत्ययात्रेला एवढी कमी गर्दी आहे हे समजले तर बाई रागाने एकदम उठून बसतील ! भोवतालच्या सर्वांची पंचाईत करतील ! ’

काल आम्ही केलेले हे असले अरबट चरबट विनोद आठवीत मी बलकारसिंगच्या घरी पोचतो. त्याच्या घरासमोर दोन गाडया जळून त्यांचे सांगाडे टाकलेत. त्या गाडया त्याच्या इमारतीत राहणाऱ्या सरदार व्यापाऱ्याच्या आहेत. काल तिकडे इंदिरा गांधींच्या पार्थिव शरीराला अग्नी देत होते आणि हे लोक इकडे या गाडयांना अग्नी देत होते. घरी बसल्यामुळे आम्हाला काहीच समजले नव्हते. तो सरदार दुकानदार मात्र वाचलाय. काल प्रचंड बंदोबस्तात त्याला शरणार्थी शिबिरात घेऊन गेलेत. तेथे राहणारा दुसरा एक मित्र अनाहूत बातमी देतो. हे संरक्षण देण्यासाठीसुद्धा पोलिसांनी त्याच्याकडून वीस हजार रुपये घेतलेत ! माझ्या मनावर पुन्हा एकदम अचानक दडपण येते. माझे कुणाकडेच लक्ष नाही, कशातच मन नाही. मी बलकारसिंगच्या घराचे कुलूप काढतो. सौ. खडपेकर लगेच येतात व म्हणतात, ‘ कालपासून वाटेल ते गुंड येथे येऊन हिंमत करून ‘ ये सरदार कहाँ है ’ म्हणून मला पुन्हा पुन्हा विचारताहेत. ’ काल रात्री छतावर जाऊन त्याच्या घरात डोकावून तो तेथे कोठे लपून बसलाय का हे गुंड पाहून गेलेत. मी त्या दोघांशीही काही बोलत नाही. मुकाटयाने मिळतील ते कपडे चपला वगैरे हातातील दोन पिशव्यात भरतो आणि झपाझप पावले उचलीत घराकडे परत निघतो. माझी दाढी थोडी वाढलीय. पायात चपला, अंगात टीशर्ट. मी थोडा चालतो तोच विरुद्ध दिशेने येणारे दोन तरुण मला थांबवतात. त्यांच्याही हातात पिशव्या आहेत पण त्या मोकळया आहेत. मित्रत्वाच्या भावनेने ते मला विचारतात, ‘ अजून कोणत्या दुकानात माल बाकी आहे ? ’ काय होतंय हे मला खरेच समजत नाही. झोपेत अंगावरून सरपटत झुरळ, पाल, साप सरसरत चालत जावे आणि आपल्याला शहारून जाग यावी असे काही वाटते, मी कसावसा धडपडत घरी पोचतो.

घरी पोचतो तर एक वेगळेच झमेले माझ्यासमोर उभे आहे. डॉ. बलकारसिंग भयंकर घाबरलाय. जाम घाबरलाय. तो चुकून एक मिनिट गच्चीत जाऊन उभा राहिला होता. आणि त्या वेळी आमच्या कॉलनीच्या आत माझ्या घरासमोर उभे राहून मोटारसायकलवरून आलेले तीन तरुण त्याच्याकडे रोखून पाहताहेत हे त्याने पाहिले होते. तो काय म्हणतोय ते मला समजत नाही. ते तीन तरुण अजून तेथेच उभे होते. मी, आमचा ॲडमिनिस्ट्रेटिव ऑफिसर, सिक्युरिटी ऑफिसर असे तिघेजण आम्ही त्या तिघांच्याकड जातो.

ते तिघे येथे असे का उभे आहेत म्हणून विचारतो. त्या तिघांनी आमच्या प्रश्नाला अजिबात उत्तर दिले नाही. अगदी उर्मट आवाजात त्यातील एकाने विचारले, ‘ तुमच्या घरात तो सरदार राहतो तो काय तुमचा नातेवाईक लागतो ? आणि त्याची ती गाडी तुमच्या घरासमोर का उभी आहे ? ’ आम्ही तिघेही तसे मुरलेले प्रशासक आहोत. मी तर नुसत्या नजरेने समोरच्या माणसाला वाचतो आणि वाकवतो असा माझा लौकिक आहे ! खरे पाहता साहेब आणि बायको या दोघांना सोडून आम्ही इतर कोणाला या जगात घाबरत असू असे मला कधीच वाटले नव्हते. पण आम्हा तिघांचीही अक्षरशः फाटली आहे. आमचा ॲडमिनिस्ट्रेटिव ऑफिसर बनिया म्हणजे चतुर आहे. तो सहजपणे म्हणाला, ‘ सरदार साले कुत्ते है. लेकिन कुत्ताभी वफादार होता है. तो सरदार येथे आश्रय मागायला आलाय. पण त्याची दाढी करून त्याच्याच गाडीत घालून आम्ही त्याला ल्युडलो कॅसलच्या शरणार्थी शिबिरात पाठवतोय. अगदी विश्वास ठेवा. ’

ते तिघे समाधान पावून आणि कृतकृत्य होऊन निघून गेले. आम्ही बलकारसिंगची गाडी झपाट्याने अज्ञात ठिकाणी हलवली. बलकारसिंगची बायको विचारी सरळ आहे. ती म्हणाली, ‘ तू खरेच दाढी मिशा का काढत नाहीस ? ’ फारसा न चिडणारा बलकार त्या क्षणी भयंकर उखडला. म्हणाला, ‘ मी तुम्हाला जड झालो असेन तर मला घराबाहेर काढा. मी दाढी मिशा काढल्या असे नुसते जरी समजले तरी खेड्यात माझे वडील आत्महत्त्या करतील ! ’ माणूस कोणते मानदंड मानतो ? कोणत्या भावनात अडकून पडलेला असतो त्यांचे हे भांडण कसे मिटवायचे हेच मला कळेना. आम्ही त्यांना आमच्याच घरात आणखी थोडे आत हलवले. अडगळीच्या एका खोलीत तो त्याची बायको मुले यांना जवळजवळ बंदिस्त करून ठेवले !

मी अंतरबाह्य घाबरलोय. माझ्या घशाला कोरड पडली आहे हे मला आयुष्यात पहिल्यांदाच समजलेय. माझा कणा किती लिबलिबीत आहे हे मला समजलंय. भोवतालच्या व्यवस्थेच्या तटबंदीतच मी फक्त सुरक्षित असतो. अधिकार गाजवू शकतो. ती भोवतालची यंत्रणा, व्यवस्था कोलमडली की मी कोलमडतो. आणि खरी गोष्ट अशी की राजधानीतील सारी यंत्रणा पार कोसळून पडलेली आहे. सर्वत्र नुसती अंदाधुंदी आहे.

—आजच्या काळात दुसऱ्या एखाद्या देशाला अगदी ठरवून प्रयत्न करून सुद्धा आपल्या राजधानीत फक्त चार दिवसांत अशी अंदाधुंदी माजवून दाखविता येणार नाही.

□

# सहा

आज सोमवार तारीख पाच नोव्हेंबर. सरकारी सूत्राप्रमाणे दिल्ली आता शांत आहे. किमान आमचे ऑफिस आज प्रथमच उघडले आहे. मी माझ्या खोलीत जाऊन बसतो. सारे काही विसरून काम करावयाचे ठरवतो. माझ्या तीन स्टेनोंपैकी फक्त निर्मल आलेली आहे. निर्मलला मी काही गोष्टी समजावून देतोय.

एवढ्यात एक शास्त्रज्ञमित्र माझ्या खोलीत येतो. आम्हा लोकांचा विनोदाचा सेन्स जरा जादाच आहे. जादा कसला, आमचा विनोद असतो अजागळ आणि क्रूर! मागे बलजीतला खोलीत रडताना पाहून मला रामदास भटकळचा लेख आठवला होता! प्रकाशसिंगचा फोन आल्यावर मी पहिल्यांदा विनोदच मारला होता! बाईंच्या अंत्ययात्रेला गर्दी कमी पाहून पण आम्हाला विनोदच सुचला होता! माझा हा शास्त्रज्ञमित्र सहजपणे म्हणतो, 'निर्मल, आज तुझ्या अंगावर भलतीच उंची नवी साडी दिसते!'–त्याला सुचवायचंय निर्मल, तू खुशीत दिसते आहेस किंवा तुझ्या नवऱ्याने पण कोठे तरी हात मारून नव्या साड्या, सूट, बूट वगैरे घरात भरलेत! मी चमकून त्या मित्राकडे पाहतो आणि निर्मलकडे पण. –निर्मल आज अक्षरशः नवी ठेवणीतील साडी घालून आली आहे. नेहमी कधी फारशी न नटणारी निर्मल खूप नटली पण आहे.

काही तरी विचित्र घडलंय. निर्मल त्याला सडेतोड वर्मावर घाव करणारे एखादे उत्तर देणार असे मला वाटते. निर्मल ही एक हसतमुख, भांडकुदळ, सडेतोड पण प्रेमळ आणि संवेदनाक्षम मुलगी आहे. आणि होते वेगळेच. निर्मल ओक्साबोक्सी रडू लागते. निर्मल आत्तापर्यंत माझ्यासमोर कधी रडलेली नाही. ती कधी अतिशयोक्ती करेल असेही मला वाटत नाही. देवदत्त दाभोळकर दिल्लीला येतात त्या वेळी निर्मल त्यांचे नेहमी स्वागत करते. ते निर्मलला चांगले ओळखतात. निर्मल अतिशयोक्ती करू शकणार नाही हे ते सुद्धा सांगतील. निर्मल सांगते आहे. 'मॉडेल टाउनमधील त्यांच्या घराच्यामागे टॅक्सीस्टँड जाळला. मिळतील तेवढे सरदार ड्रायव्हर आणि इतर सरदार एका टँकरमधे ढकलले. त्याला आग लावली आणि तो पेटवला. दुकाने लुटताहेत आणि जाळताहेत. पळालेला एक सरदार त्यांच्या घराच्या गोल चक्करपर्यंत आलाय. त्याला मारून बेशुद्ध केला. वर तेल ओतले. त्याला पेटवला आणि जवळपास बायका-मुलांना हसत बसावयास सांगितले! त्यांच्या घराजवळच्या तीन मजली प्रशस्त कोठीवर घोंगावणारा बेहोश जमाव चालून गेला. गच्चीवर

जाऊन सरदारने हवेत घाबरून किंवा लोकांना घाबरवण्यासाठी बंदूक उडवली. लोकांनी चारी बाजूंनी इमारत पेटवली. त्या सरदाराजवळ त्याची बायको आणि तिला चिकटून दोन छोटी चार-पाच वर्षांची मुले उभी राहतात. ' मला मारा; पण माझ्या बायकोला आणि या मुलांना सोडा ! ' म्हणून तो ओरडून सांगतोय; पण दोन मुले अंगाला बिलगलेल्या अवस्थेत ती बाई जळून मेली. निर्मल हमसूनहुमसून सांगते आहे. त्यानंतर गेले दोन दिवस आपण काय केलंय, कसे वागलोय हे निर्मलला नीट आठवतही नाही आहे. हे सारे पाहून किंकाळ्या ऐकून, तिच्या पाच वर्षांच्या गौरवला न थांबणाऱ्या ओकाऱ्या सुरू झाल्यात. त्याला डॉक्टरकडे हलवलाय. आज सकाळी उठल्यावर आपण काय केलंय हे निर्मलला आठवतच नाही आहे. तिने खूप सौंदर्यप्रसाधन केले आहे. नटलीये आणि ठेवणीतील साडी घालून ऑफिसात आली आहे.

निर्मलचा एकूण तोलच पार ढळला आहे; पण माझ्या विभागातील तीस-चाळीस जण आलेत. दिल्लीच्या वेगवेगळ्या विभागांतून ते आलेत. इतर जण न येता हे लोक आलेत म्हणजे यांचे विभाग आता तसे शांत असावेत. हे सारेजण संशोधनक्षेत्रात काम करतात. समोरची गोष्ट, घटना, तोलून, मोजून, मापून, पारखून घ्यावी हे व्यवसाय म्हणूनही हे सारे जण ओळखतात. हे सारे जण सांगताहेत ते विचित्र आहे. गुडगाव, फरीदाबाद, गाझियाबाद या सरहद्दीवरील शहरांतून पण हे लोक आलेत. सगळीकडे हेच घडलंय. हजारो ट्रक्स आणि गाड्या जाळल्या, हजारो घरे आणि दुकाने लुटली, नारायणा व इतर ठिकाणी जाळलेल्या गुरुद्वारांवर येथे आता हनुमानमंदिर उभारणार म्हणून पाट्या लावल्या आणि भिंतीवर गिचमीड अक्षरात ' पंजाबात एक हिंदू मारला तर दिल्लीत दहा सरदार कापू ' म्हणून लिहिले, येथवरच ही दंगल मर्यादित नाही. या दंगलीत न समजणारा, न कळणारा एक वेगळाच प्रवाह आहे. हे सारेजण जे सांगताहेत त्यातून तो अजिबात समजत नाही. समजला तरी त्याचे नीट आकलन होत नाही. हे सारे जण तसे या क्षणी माझ्यासारखेच भयचकित आहेत. बधिर आणि सुन्न आहेत. यातील प्रत्येकाने विश्वास बसू नये असे एक प्रदीर्घ भयानक स्वप्न पाहिलंय !

आमच्या ऑफिसात एकूण तेरा सरदार आहेत. त्यापैकी दोन जण बरबाद झालेत. संपूर्णपणे लुटले गेलेत. एक जण मारला गेलाय. आमच्या ऑफिसातील महेंदरसिंग छग्गर मला खूप आवडायचा. छग्गर दणकट, उमदा आणि हसरा तरुण होता. त्याला तीन छोटी मुले आणि बायको आहे. तीस तारखेला ऑफिस कामासाठी आम्ही छग्गरला ग्वालेरला पाठवले होते. तो अद्याप आलेला नाही म्हणून आम्ही ग्वालेरला फोन लावतो. तो एक तारखेला सकाळी ' उत्कल

एक्सप्रेस ' मध्ये चढलाय. त्याला स्टेशनवर आणून त्या गाडीत बसवलेल्या त्याच्या मित्रानेच आम्हाला तसे सांगितलंय. आम्ही निजामउद्दीन स्टेशनवर माणूस पाठवतो. स्टेशनमास्तर सांगतो त्या दिवशी त्या बाजूने येणाऱ्या पंजाब एक्सप्रेस, जयंतीजनता, जेहलम एक्सप्रेस या गाड्यांमधून आम्ही मोजता येणार नाहीत एवढी सरदारांची प्रेते काढलीत. त्यातील अजिबात ओळखता येणार नाहीत, कोणी मागितली नाहीत अशी सत्तावीस प्रेते तर आत्ताच पोलिसांनी जाळलीत. त्या प्रेतांचे फोटो तो बघावयास द्यावयाचे नाकारतो. ते फोटो अजून डेव्हलप केले नाहीत म्हणजे खरे सांगायचे तर त्यांनी त्यांचे फोटो काढलेलेच नाहीत हे आमच्या लक्षात येते. आमचा माणूस स्टेशनमास्तरला सांगतो माझा मित्र तर ' उत्कल एक्सप्रेस ' मध्ये होता त्याचे काय झाले ? – स्टेशन मास्तर म्हणतो उत्कल एक्सप्रेसमधून एकही प्रेत येथे आलेले नाही. कारण ग्वालेरपासून ४५ किलोमिटर्स अंतरावर मोरीनाला त्या गाडीतील प्रत्येक सरदार जिवंत जाळलाय ! मोरिना हे ग्वालेरनंतरचे पहिले स्टेशन आहे. आशा चिवट असते. छग्गरचा मित्र अवनिशकुमार आम्ही विमानाने ग्वालेरला पाठवतो. तेथून तो टॅक्सीने मोरिनाला जातो. मोरिना स्टेशनवरचे लोक सांगतात त्या गाडीतील एकही सरदार सुटणे शक्य नाही. दहा हजारांच्या जमावाने गाडीतील प्रत्येक सरदार जिवंत पेटवलाय. त्याच गाडीतून त्याच डब्यातून प्रवास करणारा दिपक आम्हाला भेटतो. तो दिल्लीला 'ॲबोट लॅबोरेटरीचा ' वैद्यकीय प्रतिनिधी म्हणून काम करतो. त्याने महेंदरसिंगला शेवटचे पाहिलंय. त्याच्याच समोर एकूण दहा सरदारांना मारलंय. त्यापैकी एक जण डब्याचा कंडक्टर होता, दोन जण सेनादलातील अधिकारी होते. महेंदरसिंग छग्गरच्या बायकोला आणि तीन अजाण मुलांना जाऊन काय सांगावयाचे आम्हाला अजिबात समजत नाही !

त्याच दिवशी दुपारी मी लोधीरोडवर डॉ. कासिम यांच्या ऑफिसात जातो. अंटार्क्टिका मोहिमेबाबत काही ठरवायचे आहे म्हणून तेथे सैन्यदलातील अधिकारी भेटतात. अंटार्क्टिका मोहिमेत खूप मोठ्या प्रमाणावर सैन्यदलातील लोक असतात. ते अधिकारी सांगतात एक तारखेला रेल्वेगाड्यात मारले गेलेल्या लोकांत सैन्यदलाचे सर्वांत अधिक लोक आहेत. कारण एक तारखेला सैन्यदलाचे सुट्टीवर जाणारे लोक सोडून आणखी फारसे कोणी प्रवासच करत नव्हते. तेथूनच परत येताना दुपारी बरोबर तीन वाजता मी रिंगरोडवर आहे. माझी गाडी लालकिल्ला आणि निजमबोधघाट याच्या अधेमध्ये कोठे तरी आहे. जवळून पोलिसांचा एक ट्रक जातो. ड्रायव्हरने नाकावर फडके बांधलंय. गाडीत कचरा भरावा तशी प्रेते भरलीत. मी आणि माझ्याबरोबरचा माझा

सहकारी सूद असे दोघेही हा ट्रक पाहतो. माझा गाडीच्या चाकावरचा ताबा सुटतो आहे असे वाटते. तीन दिवसांपूर्वी ट्रक्स भरून प्रेते हरवल्याची वृत्तपत्रात बातमी होती. माझा त्याच्यावर विश्वास बसत नव्हता. आणि आजही भर दुपारी ट्रक भरून प्रेते हालवली जाताहेत !

ऑफिसात परत आलो आणि आमचे ऑफिस हे एकटे वा अपवादात्मक नाही हे समजले. जवळच्या दुसऱ्या आमच्या माहितीच्या प्रत्येक ऑफिसात हेच घडलंय. आमच्याजवळ 'पटेल चेस्ट इन्स्टिटयूट मधील एक कारकून मारला गेलाय. 'सी. एस. आय. आर'च्या डॉ. जोहरींचा स्टेनो जाळलाय. 'हिमाचलप्रदेश एम्पोरिअम'च्या मॅनेजर शहाचा फोन येतो. त्यांचा एक संशोधनप्रयोग आम्ही सध्या करतोय. तो आता येणार होता. त्यांच्याकडे कोणी सरदार नाही म्हणून तो तरी यातून सुटला असावा असे वाटत होते. तो म्हणाला एक टॅक्सी आम्ही नेहमी ठरवत असू. त्या टॅक्सीचा मालक माझ्या खोलीत बसून रडतोय. त्याच्या जावयाचे आणि मुलाचे केस एकमेकास बांधून त्याच्याच टॅक्सीत घालून त्या दोघांना जाळलंय ! मला वाटते दिल्लीत चुकूनसुद्धा असे एखादे ऑफिस मिळणार नाही की जेथील एक तरी सरदार मारला वा लुटला गेलेला नाही. या सर्वांत भर घालीत बाहेरून आलेला एक मित्र सांगतो की, सब्जीमंडी बर्फखान्याजवळ कुजलेली, सडलेली काही प्रेते पोलीस तेथेच आडोशाला जाळताहेत.

मी घरी येतो तर 'आर्मी पब्लिक स्कूल'चा फोन आलाय. मी अंटार्क्टिका प्रशिक्षणासाठी काश्मिरात गेलो त्या वेळी ब्रिगेडिअर बलवंतसिंग रंधावा यांनी व त्यांच्या बायकोने माझे फार चांगले स्वागत केले होते. त्यांचा एकुलता एक मुलगा गोगी दिल्लीला आर्मी पब्लिक स्कूलमध्ये आहे. त्यानी मला गोगीला भेटायला सांगितले होते. मी गोगीला भेटलो होतो. चौदा वर्षांचा कोवळा पण उंचापुरा धिप्पाड गोगी मला फार आवडला होता. तो मला म्हणाला होता, 'अंकल, मला गोगी नाही गौरव म्हणा ! गोगी म्हटले की मुले चिडवतात.' मी गोगीला माझ्या घरी बोलावले होते. त्यामुळे माझा पत्ता आणि टेलिफोन नंबर त्याच्या टेबलावर होता. आणि फोनवर आता मला आर्मी पब्लिक स्कूलचा वॉर्डन सांगत होता, 'गोगी मारला गेलाय. त्याच्या कोणत्याच स्थानिक पालकांचा पत्ता मिळत नाही. तुम्ही घेताय त्याचे प्रेत ताब्यात ?'

मी हे सारे फार संयमाने लिहितोय. लेखणीसारखे भयंकर दुधारी हत्यार नाही. सावरकरांना प्रेषित मानूनही 'लेखणी मोडा बंदुका घ्या' हे त्यांचे विधान मला अजिबात पटलेले नाही. लेखणीसारखे ताकदवान आणि भयंकार या जगात दुसरे आणखी काही नाही असे मी मानतो-लेखणी विकून अतिश-

योजती करून भडकवणारे लिहून नाव वा चार पैसे मिळवावयाची मला अजिबात खाज नाही. मी लिहिलेली प्रत्येक गोष्ट नाव, पुराव्याने युक्त आहे व ती कोणत्याही आयोगासमोर सिद्ध करता येईल.

माझी अडचण थोडी वेगळी आहे. लेखणी संयमाने वापरावी हे माझ्यावरील संस्कार आहेत. मी मध्यमवर्गीय डरपोक माणूसही आहे. काही गोष्टी सांगावयाचीसुद्धा मला शरम वाटते! घडलंय ते मी लिहिलंय, त्यापेक्षा अधिक भयंकर आहे, नादिरशहानेसुद्धा अशी 'कतले आम' केली नव्हती! आणि त्रिलोकपुरी, मोगलपुरी येथे जे घडलंय ती नुसती 'कतले आम' नाही. ते ओंगळवाणे आणि बीभत्स आहे. या देशाच्या ज्ञात इतिहासात यापूर्वी असले काही घडलेले नाही.

रावणाने सुद्धा लक्ष्मणरेषा ओलांडली नव्हती. दुर्योधनानेसुद्धा सभ्यतेचे आणि संस्कृतीचे असे वस्त्रहरण केले नव्हते.

□

# सात

आज मंगळवार तारीख सहा नोव्हेंबर. कालचा दिवस अगदी अस्वस्थतेत पण शांत गेलाय. आज सकाळीच सहाच्या सुमारास माझ्या घरातील घंटा कर्कश वाजते. घंटा खूप वेळ वाजत असावी. नेहमी लवकर उठणारा मी अजून झोपेत आहे. झोपेत कसला गुंगीतच! त्रासलेल्या चेहऱ्याने, तारवटलेल्या डोळ्यांनी मी दार उघडतो. दारात आमच्या कॉलनीत राहणारी मिसेस गुरुचरण कौर उभी आहे. गुरुचरण कौर माझ्याकडे फारशी न येणारी, माझ्याशी फारसे न बोलणारी. ती भयंकर भेदरलेली आहे. माझी स्टेनो बलजीत कौर तिची मैत्रिण आहे. ती म्हणते बलजीतचे सारे काही लुटून नेलंय. ती, तिची आई तिचे वडील हे सारे प्रसादनगर पोलिसस्टेशनमधील शरणार्थी शिबिरात आहेत. ते सारे गेले चार दिवस तेथे आहेत. बलजीतला आईवडिलांना घेऊन गुरुचरणच्या घरी यायचंय; पण पोलिसांच्याकडे त्यांना आणून पोचवावयास वाहन नाही.

माझी झोप आता थोडी संपलीये. मेंदू थोडा तल्लख झालाय. विचार आणि चर्चा करावयास मी आता मोकळा आहे. मी गुरुचरणला म्हणतो, 'तुझा काही तरी गैरसमज झालाय. तू सांगतेस ते मला अजिबात पटत नाही. बलजीत करोलबागेमध्ये देवनगर विभागात राहते. दिल्लीत फक्त करोलबाग या एकाच

विभागात दोन तारखेच्या सकाळपासून सैन्य गस्त घालते आहे. तेथील ' अजमल खॉ पार्क 'मध्ये सैन्याच्या मोठ्या छावण्या लागल्यात. त्यातून बलजीतचे वडील सैन्यामधून सेवानिवृत्त झालेले सुभेदार आहेत. त्या सर्वांना काही होणार नाही. त्यातून चार दिवसांपूर्वीच ती शरणार्थी शिबिरात गेलेली असेल तर यापूर्वीच येथे आली असती. त्यातून तिला आज यावयाचे असेल तर ती एकटी पण सर्वांना घेऊन येऊ शकते. काल तर मी स्वतः दिल्लीतून हिंडून आलोय. महत्त्वाचे म्हणजे सरकारी सूत्राप्रमाणेसुद्धा दिल्ली आता अगदी शांत आहे ! '

माझ्या तर्कशुद्ध विचारांकडे गुरुचरणचे अजिबात लक्ष नाही. ती चिडते. ती म्हणते, ' बलजीत तेथे आहे हे मला नक्की माहीत आहे. मला तसा निरोप आलाय. तुम्ही तिला आणावयास तुमची गाडी देणार का ते फक्त मी विचारायला आले आहे. होय किंवा नाही, काय ते सांगा ! उगाच चर्चा करीत बसू नका! ' मी माझ्या ड्रायव्हरला बोलावतो. काम कळल्यावर तो माझ्या चेहऱ्याकडे चमत्कारिक नजरेने पहातो. सरळ नाही म्हणून सांगतो. गेले तीन चार दिवस त्याच्या पोटात दुखतंय.

गाडी घेऊन स्वतः जावयास हवे हे समजल्यावर परिस्थितीचे गांभीर्य माझ्या थोडे लक्षात येते. काल मी फक्त रिंगरोडवर गाडी चालवली होती. रस्त्यातही मला कोठे सरदार आढळले नव्हते. आता मला गाडी बर्फखाना, फिलिमस्तान या असल्या रस्त्यावरून न्यावयाची होती. मी गुरुचरणला म्हणतो, ' एक कर. बायांना सरदारीण म्हणून कोणी रस्त्यात ओळखत नाही हे खरे; पण तरीही तू साडी घाल, कुंकू लाव, माझ्या बायकोचे मंगळसूत्र गळ्यात घाल, आपण बलजीत आणि तिच्या आईला तरी घेऊन येऊ. तिच्या वडिलांचे काय करावयाचे ते तेथे गेल्यावर ठरवू. आम्ही लगेच निघालो. सारा रस्ता सुना सुना आहे. फिलिमस्तानसमोर चार दिवसांपूर्वी पेटविलेली सरदारांची टायर विकणारी तेराही दुकाने अजून पेटलेली आहेत. म्हणजे ती अजून आतून धुमसताहेत. आत पेटते निखारे आहेत.

मी पोलिसचौकीतल्या त्या शरणार्थी शिबिरात शिरतो आणि सुन्न होतो, बधिर होतो, विमनस्क होतो ! हे शब्द आता पुन्हा पुन्हा किती वेळा वापरू ? मला माहीत असलेले माझ्या भाषेतील सारे शब्द मी वापरून वापरून गुळगुळीत केलेत ! खरे सांगायचे तर माझ्या साऱ्या भावना, संवेदना पण गुळगुळीत झालेल्या आहेत; पण तरीही आत पाऊल टाकल्यावर माझ्या पोटात कालवते. मी कोलमडतो. तोंडात ओकारी दाटून येते. अजून मी कोणतेच शरणार्थी शिबिर पाहिलेले नाही. ती सारी भयाण असणारच हे मला माहीत होते; पण

हे पोलिसचौकीच्या प्रशस्त इमारतीमधील शिबिर आहे. म्हणजे शरणार्थी शिबिरामधील सर्वात अधिक सुव्यवस्था असलेले भाग्यवान शिबिर! सारे संडास तुडुंब भरून वाहताहेत. आणखी कसले सहन न होणारे वास सुटलेत. मिळेल त्या जागेत मिळेल ते अंथरुण घालून वा काहीही अंथरुण न घालता माणसे पसरलीत. पुरुष, स्त्रिया, म्हातारे, तान्ही मुले, सारे जण! माणसे फार दाटी-वाटीने कोंबलीत. फारच थोडया लोकांना पांघरुणे मिळालेली आहेत. जवळ-पासच्या काही माझ्यासारख्या सज्जन दानशूर माणसांनी ती आणून दिली! गेले चार दिवस सर्वांना भाकरतुकडा मिळतोय; चहा नावाची चैन यांच्या वाट्याला आलेली नाही! किमानपक्षी बलजीत आणि तिचे कुटुंबीय यांना तरी त्याचे दर्शन झालेले नाही!

बलजीतला आणि तिच्या कुटुंबियांना हे सर्वात अधिक सुस्थितीत असलेले शिबिर मिळालंय यालाही कारण आहे. बलजीत फार सफाईने आणि सुंदर इंग्रजी बोलते आणि तुम्ही चांगल्या इंग्रजीत बोललात की, या देशातील सर्व-सामान्य जनताच नव्हे तर नोकरशाहीसुद्धा तुम्हाला टरकते! मी बलजीतकडे पाहतो. तिच्या डोळ्यातील समुद्र केव्हाच आटून गेलेत. ती अजिबात रडत नाही. गुन्हेगाराचा वाटावा असा तिचा चेहरा कठोर आणि दगडी बनलाय. मला तिच्याकडे पाहण्याचे अजिबात धैर्य होत नाही. बलजीत अगदी शांतपणे सांगत आहे. मी मान खाली घालून ऐकतो आहे. एक तारखेची सकाळ. दहा अकरा वाजायची वेळ. बलजीत आपल्या घरात बसून दूरदर्शन पहात होती. अर्धांगाने अंथरुणाला खिळलेली तिची आई खिडकीजवळच्या पलंगावर झोपली होती. आई बलजीतला म्हणते, मला काही तरी जळल्याचा वास येतोय. बाहेर धूर दिसतोय. बलजीत आईकडे फारसे लक्ष देत नाही. आई दिवसभर असेच काही तरी बडबडत असते असे समजून. एवढ्यात बाहेर प्रचंड गलका होतो. 'सरदार का घर है ये सरदार का घर है' म्हणून काहीसे जमाव ओरडत असतो. समजण्यापूर्वीच धक्के मारून दार फोडले जाते. प्रचंड थव्यांनी वावटळीसारखी माणसे आत घुसलीत. बलजीतला काही समजत नाही. काही दिसत नाही. डोळ्यांपुढे सारा अंधार. पायातील सारी ताकद गेलेली; पण ती आईला काखोटीला मारते. वडिलांचा हात धरते. जवळच्या हिंदू शेजाऱ्याच्या घरात शिरते — भानावर येते तेव्हा आपले सारे काही लुटले गेलंय हे बलजीतच्या लक्षात येते. तिच्या घरात काही म्हणजे काही बाकी उरलेले नाही. गॅसचा सिलेंडर, कपाट, भांडी, सोफा, पंखा हे सारे नेलंय यात काही नवल नाही; पण कपडे, चपला, झाडू वगैरे काहीसुद्धा सोडलेले नाही. बलजीतच्या अंगावर फक्त नायटी आहे. बलजीत तशी व्यवहारदक्ष मुलगी

आहे. वाढलेल्या वयाने आणि न पेलणाऱ्या जबाबदाऱ्यांनी तिला व्यवहारदक्ष बनवलंय. बँकेचं पासबुक, बँकेतील ठेवी यांचे क्रमांक ती वेगळ्या वहीत लिहून ठेवते. ठेवींच्या पावत्यांच्या फोटोकॉपीज काढते. जवळ असलेले थोडेफार दागिने काळजीपूर्वक पेटीत बंद करून ती पेटी गोदरेज कपाटाच्या आतल्या खणात ठेवते. या देशात या कशालाच काही अर्थ नाही हे तिला आता समजलंय. ऑफिसात येण्यासाठी कपडे कसे विकत घ्यावेत ही या मुलीपुढील या घडीला एकमेव समस्या आहे! धारदार आवाजात ती मला विचारते, ' सर मी या कपड्यात ऑफिसात आले तर चालेल तुम्हाला ? '

पोलिस मला सांगतात, बलजीत आणि तिच्या आईला घेऊन जावयास हरकत नाही; पण तिच्या वडिलांना घेऊन जाणे धोक्याचे आहे. हा म्हातारा दाढी-मिशा काढत असेल तर गोष्ट वेगळी! आकाशवाणी आणि दूरदर्शन घसा खरवडून राजधानी दिल्ली शांत असल्याचे सांगताहेत आणि येथे एका प्रमुख पोलिस स्टेशनमध्ये एक पोलिसअधिकारी मला हा सल्ला देतोय. बलजीत आणि तिची आई, वडिलांना सोडून यावयास अजिबात तयार नाहीत. मी पोलीसअधिकाऱ्याला म्हणतो, तुम्ही घरापर्यंत एक शस्त्रधारी पोलीस माझ्याबरोबर गाडीतून पाठवा ना. तो या गोष्टीला साफ नकार देतो. त्याच्याकडे फार कमी पोलिस बंदोबस्तासाठी आहेत. काय करावे हे मला समजत नाही; पण राजधानी दिल्लीचे ' शानोशौकत ' आणि नखरे मी फार जवळून पाहिलेत. समोरच्या माणसाला कसे वाचावे आणि वापरावे हे समजण्याइतके माझ्याही कानामागचे केस आता पांढरे झालेत. महत्त्वाचे म्हणजे ' दिडक्यां-सारखा मित्र नाही ' हे रवींद्र पिंगेचे सुभाषित मी मार्गदर्शक मित्रासारखे नेहमी माझ्याबरोबर ठेवतो! खरोखर खिसा मोकळा करून खिशात घालावयास माणसा-सारखा दुसरा सरळ प्राणी या जगात नाही! मी ते करावयाचे ठरवतो. मी कोपऱ्यात बंदूक घेऊन उभ्या असलेल्या एका हवालदाराकडे जातो आणि खिशामधून पन्नास रुपयांची नोट काढून त्याच्यापुढे फडकावतो.

—आणि मी हवेत उडतो! माणसे अजून मेलेली नाहीत. कोपऱ्यातील तो मामुली फाटका पोलिस–उत्तरप्रदेशातील तो पृथ्वीपाल–माझ्यावर जाम उखडलाय. तो म्हणतो, ' साहेब, मी पैसे खात नाही असे नाही; पण मलाही बायका-मुले, आई, बहीण, वडील आहेत. हा कसला भयंकर प्रसंग आहे! मला त्यांना मदत करावयाची आहे. तुम्ही त्यांना मदत करताय म्हणून मला तुमच्याबद्दल आदर वाटतोय; पण माणसे खरेच फार कमी आहेत. येथे आम्ही फक्त वीसजण आहोत. प्रत्येकजण दिवसातून किमान अठरा-वीस तास काम करतोय. आम्ही सारे फार थकलोय. दंगल फार विस्तृत आणि मोठी आहे.

त्यातून सारे सरदार पोलिस आम्ही वरी बसवलेत, लोक त्यांनाच मारतील या भीतीने. दोन दिवसांपूर्वी आझादपूरला सरदार डी. एस. पी.ला जमावाने ठेचलाय आणि अजूनही परिस्थिती फारशी सुधारलेली नाही. अगदी बंदुकी-सकट मी बरोबर असतानासुद्धा फिलिमस्तानच्या रस्त्याने जाणे धोक्याचे आहे ! मी तुमच्याबरोबर येतो; पण आपण रिंगरोडच्या लांबच्या रस्त्याने जाऊ. तुम्ही मला परत पुन्हा येथे आणून सोडले पाहिजे !

मी भांरावून स्तब्ध होऊन त्याच्याकडे पहात होतो. गेल्या सात दिवसात पहिल्यांदा मला पुन्हा एकदा माणूस भेटला होता. साक्षात्कार झाल्यासारखा मला आनंद झाला होता. स्वतःवरचाच पार उडालेला विश्वास थोडा परत आला होता. या देशात कोठेही जा. कोणत्याही थरात हिंडा. आमच्या भावना, आमचे संस्कार अजून सर्वत्र विखुरलेल्या स्वरूपात बाकी आहेत. मात्र या घडीला आम्हा सर्वांना एकत्र करणारा, एका सुसूत्रात गोवणारा, आमच्यात जान ओतून आम्हाला कार्यरत करणारा कोणी महात्मा मात्र या देशात नाही !

□

# आठ

आपण बोलणारे, वाचणारे, लिहिणारे मध्यमवर्गीय म्हणजे एकूणच धमाल लोक आहोत. काही दिवस संघात किंवा राष्ट्रसेवादलात जाऊन कवायत करणे आणि जोरदार आवाजात क्रांतिगीते म्हणणे ही आपली राष्ट्रकार्याची कल्पना आहे ! अधीमधी कधीतरी आपण भलतेच फॉर्मात किंवा लाडात येतो. लष्करी शिक्षण घेतो किंवा रात्रीची गस्त घालणे अशा तुफान विनोदी गोष्टी करतो. मला बासष्ट सालची गोष्ट आठवते. त्या वेळी चीनचे आक्रमण झाले होते. त्या वेळी मी दादरच्या कीर्ती कॉलेजात डेमॉन्स्ट्रेटर होतो. आम्ही प्राध्यापक-मंडळींनी लष्करी शिक्षण घ्यावयास सुरुवात केली होती. आम्हाला शिकवावयास सुभेदार पवार येत असत. आम्हा लोकांना शिकवताना त्यांच्या तोंडात अक्षरशः फेस येत होता. एक दिवस त्यानं विचारले, ‘ लहानपणी तुमच्यापैकी कोणी संघात राष्ट्रसेवादलात वगैरे जावयाचे का ? ’ आम्ही सर्वांनी एका आवाजात हो म्हटले. तो म्हणाला, ‘ साहेबान, म्हणूनच मी तुम्हाला पुन्हा पुन्हा सांगून तुम्ही सारेजण ती बंदूक काठीसारखी धरताय ! ’ नंतर पासष्ट साली गोरेगावच्या टोपीवालावाडीत रात्रीची गस्त घालण्याचे महत्कार्य मी केले होते. —आता सध्या आम्ही गेले सात दिवस आमच्या कॉलनीत रात्रीची गस्त



३७०८ २५८६ मराठी ग्रंथ संग्रहालय

घालतोय. आता या गस्तीचा सातवा दिवस आहे. म्हणजे हे प्रकरण लवकरच ढेपाळणार हे आम्हा सर्वांच्याच लक्षात आलंय! या रात्रीच्या गस्तीचा एक फायदा असतो. यामुळे दुपारी घरी वा ऑफिसात सद्सद्विवेक बुद्धीला त्रास न होता आपला हा हक्क आहे असे समजून झोपता येते! कोणाच्या तरी घरी जाऊन रात्री एक-दोनदा चहा ढोसायचा, मन मानेल तशा सिगारेट फुंकायच्या आणि 'जागते रहो' म्हणून दंडा आपटत कॉलनीत फिरायचे असे या गस्तीचे स्वरूप आहे; पण गप्पा-मुक्त गप्पा, पोटभर गप्पा, गप्पांचे गुऱ्हाळ हा या गस्तीचा खरा प्राण आहे! सारे रोम जळत असताना निरो सारंगी वाजवत होता. इकडे सारी दिल्ली पेटली असताना आम्ही आमच्या गप्पांचे आणि वादविवाद-कौशल्याचे तुणतुणं वाजवतोय!

या गप्पांमधून काही गोष्टी हळूहळू माझ्या लक्षात आल्या होत्या. दंगल होईल, एवढ्या मोठ्या प्रमाणावर आणि भयानक होईल हे केवळ मीच नव्हे तर इतर सर्वांनीच स्वतःच्या मनाशी फार पूर्वी ओळखले होते; पण मजेची गोष्ट अशी की, प्रत्येकाने आतापर्यंत ही गोष्ट स्वतःपाशीच गुप्त ठेवली होती! सध्या प्रथमच आम्ही प्रत्येक जण ते मत दुसऱ्या कोणाला सांगत होतो! -दंगल का झाली याबाबतीतही प्रत्येकाचे वेगवेगळे सिद्धान्त होते. एका मित्राचा सिद्धान्त फार जबरदस्त होता. तो म्हणाला, हे असेच होणार हे मला माहीत होते! प्रत्येक शहराला स्वतःचा म्हणून एक आत्मा असतो. दिल्ली पाच हजार वर्षे या देशाची राजधानी आहे. अठराशेसत्तावन्न साली राजधानी दिल्ली पुन्हा एकदा शंभर दिवस स्वतंत्र झाली होती. फक्त दिल्लीभोवती स्वातंत्र्यसैनिकांनी ब्रिटिशांच्या बाजूने लढणारे चार हजार सैनिक कापून काढले होते हे दिल्ली-तील स्मारकस्तंभावर ब्रिटिशांनीच लिहून ठेवलंय; पण केवळ शीख सैन्याच्या गद्दारीमुळे हे स्वातंत्र्ययुद्ध फसले. मोजता येणार नाहीत एवढे स्वातंत्र्यसैनिक आणि लोक त्यानंतर ब्रिटिशांनी दिल्लीत मारले, हे सारे शीख सैन्याच्या गद्दारीमुळे घडले. राजधानी दिल्लीने शिखांच्या त्या देशद्रोहाची किंमत त्यांना आज चुकती केली आहे! या महापुरुषाचे म्हणणे आम्हा कोणालाच पटले नाही. आम्ही म्हटलें, शहराला आत्मा असतो हे समजण्याच्या आध्यात्मिक पातळीवर आम्ही अजून पोचायचोय; पण कोणी सांगावे हे सारे असेच सुरू राहिले तर माणसाला नाही तर फक्त शहरालाच आत्मा असतो असे आम्हा-लाही वाटायला लागेल!

पण आज आम्ही त्या मित्राची चेष्टा करायला विसरलो होतो. आजच्या गप्पांना एक वेगळी खुमारी आहे. आज वर्मा परत आलाय. तो एकतीस तारखेला इंदूरला होणाऱ्या 'अखिल भारतीय टेक्सटाइल कॉन्फरन्स'साठी

गेला होता. कॉन्फरन्स वगैरे काही झाली नाही. स्वतःच कसावसा वाचून परत आलाय. तो आणि इतर प्रतिनिधी इंदोरला हॉटेल कांचनमध्ये उतरले होते. हॉटेल सरदाराचे म्हणून जमावानें हॉटेल पेटवले. पाठीमागून उड्या मारून पळताना एका प्रतिनिधीचा तर पाय मोडला हा मात्र सुखरूप परत आलाय. तो म्हणतो इंदूर आणि भोवतालच्या खेड्यापाड्यात जवळजवळ दिल्लीसारखंच घडतंय. मी म्हटले, 'या गोष्टीचे मला अजिबात नवल वाटत नाही. किंबहुना हे असेच घडणार हे मला नक्की माहीत होते! माझी तशी खात्री होती. या देशात अनेक वार अनेक ठिकाणी केलेल्या भ्रमंतीत मला तीन-चार गोष्टी नक्की समजल्यात. माझ्यापुरतेच म्हणाल तर या गोष्टी जवळजवळ सिद्धान्त-पातळीवर पोहचल्यात. त्यापैकी एक सिद्धान्त असा आहे की, या देशातील उत्तर भारतातील किंवा हिंदी विभागातील सारी जनता नेहमी भावनात्मक पातळीवर तरंगत असते. आपल्याला न कळलेल्या कोणत्या तरी अज्ञात माध्य मातून हे सारे लोक एका क्षणात एकमेकांशी संपर्क साधतात. एका लाटेवर आरूढ होतात. अठराशेसत्तावनचे स्वातंत्र्य युद्ध, सत्याहत्तर साली बाईंचा झालेला पराभव, ऐंशी साली त्यांना मिळालेला विजय, आजची दंगल हे सारे या लाटेमुळे घडलंय. महत्त्वाचे म्हणजे धाकट्या भावाने थोरल्या भावाच्या मागे जावे तसे हे नंतर हळूहळू दक्षिण भारतात घडते. माझा सिद्धान्त तुम्हाला पटत नसेल तर या सिद्धान्तावर आधारलेले एक भविष्य तुम्हाला सांगतो. पुढील दहा वर्षात केव्हाही एका क्षणात हा सारा विभाग शेतकरी आंदोलनाने पेटून उठेल. या देशाच्या इतिहासाला निर्णायक कलाटणी देणारी ती घडी असेल. खरे पहाता शेतकरी-आंदोलन महाराष्ट्र, कर्नाटक, गुजरात, पंजाब अशा ठिकाणी सुरू न होता उत्तर प्रदेशात सुरू झाले असते तर हे कदाचित यापूर्वीही झाले असते; पण हे असे झालेच असते असे मात्र मी खात्रीपूर्वक सांगू शकणार नाही. कारण हे लोक एखाद्याला आपला नेता का मानतात किंवा का मानत नाहीत हे मात्र मला अजून अजिबात समजलेले नाही.'

पण माझ्या मित्रांना माझी बकवास ऐकावयाची नाही. त्यांना स्वतःचीच सुनवायची आहे. ते म्हणतात तू उगाचच यावरून नाककान काढतोस. यात सिद्धान्त वगैरे काही नाही. भावनात्मक पातळी पण नाही. हा साधा कायदा आणि सुव्यवस्था यांचा प्रश्न आहे. साऱ्या उत्तरभारतात ती मामुली आहे. प्रथम थोडी दंगल सुरू झाली. ते तसे घडणे अटळ होते. दंगल पाहणाऱ्या प्रत्येकाने आणखी एक गोष्ट सांगितली आहे. प्रथम पोलिसांनी दंगलीला सहाय्य दिले किंवा किमानपक्षी प्रोत्साहन दिले किंवा त्याच्याकडे दुर्लक्ष केले. हे असे घडणे स्वाभाविक होते. मागे पंजाबात पोलिस आतंकवाद्यांच्याकडे दुर्लक्ष कर-

तात असे आपणही म्हणत होतो; पण एका क्षणी ही दंगल पोलिसांच्या व शासनाच्या हातातून निसटली. वाघावर स्वार होण्याची हिंमत आणि ताकद नसलेल्यांनी वाघावर स्वार होऊ नये ही गोष्ट हे लोक विसरले होते. तुला सांगतो दिल्लीत त्या दिवशी मोरारजी, वाजपेयी, चव्हाण, जगजीवनराम असे कोणी पंतप्रधान असते तर हे झाले नसते. बाईंनी आपल्याभोवती दुय्यम दर्जाचे, सुमार कर्तृत्वाचे लोक जमवले होते. बाईंचा नंबर एक धरला तर दोन ते दहा या क्रमांकावर येईल असा एकही नेता त्यांनी निर्माण होऊ दिला नाही. त्यांनी निर्माण केलेले नेते दंगल काबूत आणावयास नव्हे तर समजावून घ्यावयासही असमर्थ होते.

मी म्हटले, तू म्हणतोस ते मला बरेचसे पटते; पण संपूर्णपणे पटत नाही. अगदी बाई जिवंत असत्या तरी त्यांना ही दंगल टाळता आली नसती. कारण बाईंनी आपल्याभोवती फक्त दुय्यम दर्जाचे नेतेच नव्हे तर दुय्यम दर्जाचे लाचार होयबा प्रशासक पण जमवले होते. शांतपणे विचार कर. या दंगलीपेक्षा बाईंचा खून ही अधिक भयानक गोष्ट आहे. जगभर राजकीय नेत्यांचे खून होत नाहीत असे नव्हे, ते तर तसे होणारच; पण बाईंच्या विश्वासू अंगरक्षकाने हा खून केलाय. दहा वर्षे सावलीसारखा हा माणूस बाईंच्या बरोबर होता. बाईंची घडणारी प्रत्येक गोष्ट, होणारी प्रत्येक चर्चा या माण-साला समजत होती किंवा छोटा टेपरेकॉर्डर बसवून त्याला समजावून घेता येत होती. ही हत्या करणारे लोक हे एवढे मोक्याचे प्यादे गमावू शकले म्हणजे ही माहिती द्यावयास, ही माहिती मिळवावयास त्यांच्याकडे आणखीही दुसरे मार्ग असले पाहिजेत. त्याहूनही महत्त्वाचे ' सी. बी. आय. 'च्या प्रमुखाने बाईंना हा माणूस, ही माणसे, येथे तुमच्या संरक्षणासाठी ठेवणे धोक्याचे आहे, चुकीचे आहे म्हणून सांगितले होते. देशाची, स्वतःची निधर्मी प्रतिमा कायम ठेवण्यासाठी बाईंनी त्याला नकार दिला होता. या वेळी या ' सी. बी. आय. 'च्या प्रमुखाने आपण असे का सांगतोय ते बाईंना पटवून देऊन तसे करावयास भाग पाडावयास हवे होते नाही तर त्यांच्यासमोर आपला राजीनामा फेकावयास हवा होता. आशियाडच्या वेळी सीमा सुरक्षा दलाचे इन्स्पेक्टर जनरल ऑफ पोलिस असलेल्या आमच्या जोगांनी हे करून दाख-विलंय, त्या वेळी दिल्लीची डेप्युटी कमिशनर ऑफ पोलिस असलेल्या किरण बेदीसारख्या जहांबाज बाईला त्यांनी केवळ निमंत्रणपत्रिका बरोबर नाही म्हणून स्टेडियमच्या गेटवरून परत पाठवले होते. राजीव गांधींची गाडी वाटेत थांबवून संपूर्ण तपासली होती. वर ठणकावून सांगितले होते. ' मी आशियाडच्या संरक्षणाची जबाबदारी घेतलीये. तुमच्या मानापमानाची नाही. झेपत असेल

तर बघा, नाही तर हा माझा राजीनामा!' हे मी त्या वेळीही माणूसमध्ये लिहिलंय, – हुकूमशाही वाईट; पण त्याहीपेक्षा लोकशाहीचा मुखवटा चढवून केलेली हुकूमशाही वाईट आहे. तो महाभयंकर प्रकार आहे. बाई तो प्रकार करत होत्या. आपला विश्वास बसणार नाही एवढ्या मामुली कुवतीची हांजी हांजी करणारी माणसे त्यांच्याभोवती निर्माण झाली होती. मोक्याच्या साऱ्या जागा अडवून बसली होती. 'सी. बी. आय.'च्या प्रमुखाने मराठी जोगांसारखा राजिनामा हवेत भिरकावला नाही हे मी समजू शकतो. अशी हिंमत थोडी महाराष्ट्रीयन माणसे सोडून आज भारतात कोणाकडेच नाही! पण किमान पक्षी या सरदारांवर चोवीस तास पाळत ठेवावी एवढे समजण्याइतपत अक्कल पण याच्याकडे नसावी? त्यातून हा काही बाईंच्या खुनाचा पहिला प्रयत्न नव्हे. गेल्या चार महिन्यांत त्यांच्या खुनाचे दोन महत्त्वाचे प्रयत्न झालेत. ते वृत्तपत्रात आलेले नाहीत; पण मला माहीत आहेत.

मात्र मित्र माझे ऐकून घेण्याच्या मन:स्थितीत नाहीत. त्यांना वाटते मी आपले माझ्या मराठी माणसांचे घोडे पुढे दामटतोय! मित्र मला एकदम चिडवायला लागतात. ते म्हणतात, 'दाभोळकर, तू मुंबई सोडून कारण नसताना दिल्लीला नोकरीला आला आहेस. पाहिजे तसा भारतभर हिंडतोस. हवे त्या माणसाला भेटू शकतोस. वाटेल ते छापून आणू शकतोस. खरे पाहता तुझ्या विषयाचा आणि अंटार्क्टिकावर होणाऱ्या संशोधनाचा अजिबात काही संबंध नाही तरी आता अंटार्क्टिकावर चालला आहेस. आम्हा सर्वांना असे वाटते की, तू खरा 'सी. बी. आय.'चा माणूस आहेस. आपल्या साहेबांची नोकरी आता नक्की जाणार याची खात्री झाल्यावर त्याच्याविरुद्ध हवे ते बोलून घेतो आहेस.

माझा एक मित्र माझ्या मदतीला येतो. तो म्हणतो, दाभोळकर, काही 'सी. बी. आय.'चा माणूस वाटावा इतका बुद्दू नाही! या देशात आज गुप्तहेर, विचारवंत, शास्त्रज्ञ, पत्रकार हे शब्द शिवी देण्यासाठी वापरले जातात! या साऱ्या लोकांनी गेल्या वीस वर्षांत आपल्या कर्तृत्वाने ही कमाई केली आहे! पण हा माणूस म्हणतो ते मला पटते. बाई जिवंत असत्या तरी आता एकदा केव्हा तरी हे घडलेच असते; पण त्याचे कारण वेगळे आहे. बाईंनीच मुळी असे ठरवून ठेवले होते. आपण केंद्रीय मंत्रिमंडळाचे खाजगी सल्लागार आहोत अशा विश्वासाने तो सांगतोय! तो म्हणतो, 'बाईंनी दोन पर्याय पुढे ठेवले होते. एक शिखांना समजावून घेऊन आंजरून-गोंजारून जिंकून घ्यावयाचा. ज्या क्षणी ते जमणार नाही असे लक्षात येईल त्या क्षणी त्यांना चिरडून टाकावयाचा. कायमचा धडा शिकवायचा.'

आम्हाला कोणालाच त्याचे म्हणणे पटत नाही. आम्ही म्हणतो, शीखांना समजून घेण्याचा प्रयत्नच झाला नाही किंवा झाला असेल तर अर्धवटपणे आणि गबाळेपणाने झालाय. शिखांना चिरडावयाचा प्रयत्न अगदी अशा गबाळेपणाने न करता अक्कलहुशारीने केला तरी जमणार नाही. आधी हे करणे चुकीचे. करावयाचे म्हटले तर प्रशासनाकडे एवढी कुवत नाही. सुवर्णमंदिरावरील हल्ल्याच्या वेळी पेटून उठलेले जवान या दंगलीची 'व्ही. डी. ओ. रेकॉर्डिंग' पाहिल्यावर शांत बसतील हा भ्रम आहे. ती व्ही. डी. ओ. रेकॉर्डिंग घेतली गेलीत. मोठ्या प्रमाणात घेतली गेलीत; पण या वेळी कदाचित माथे भडकावून हे लोक एकदम रस्त्यात येणार नाहीत. नीट आखणी करून येतील; पण केवळ दोन ट्रक करून डोके भडकलेले सैनिक दारूगोळा घेऊन सूड घेण्यासाठी दिल्लीवर आले तर भयंकर हानी होईल. फार मोठे यादवी युद्धपण त्यातून सुरू होईल. त्यातून मध्यंतरी 'इलस्ट्रेटेड विकली' मध्ये लिहिलेल्या जगजीतसिंग अरोरांच्या लेखाप्रमाणे सेनादलात तीन टक्के सरदार आहेत. त्या सर्वांची शस्त्रे काढून घेणे तुम्हाला अजिबात जमणार नाही. अगदी तसे केलेत तरी त्यांच्याकडे आपली अनेक गुपिते आहेत. ती सारी ते शत्रुराष्ट्राकडे देतील. देशाच्या सुरक्षिततेला आणि एकतेला आज भयंकर धोका आहे. आपण खलिस्तानच्या उंबरठ्यावर उभे आहोत!

मात्र आमचा एक मित्र या आमच्या तात्त्विक चर्चेवर भलताच चिडतो. तो म्हणतो, 'देश गेला खड्ड्यात! इथे चायला आम्हाला दिल्लीत उद्या काय होणारंय याची भ्रांत पडलीये! तुम्हाला देश सुचतोय! तुम्हाला माहीत आहे, दिल्लीत मोठ्या प्रमाणावर पळापळ सुरू आहे. सायकलरिक्षावाले, झोपडपट्टीवाले, बांधकामात कंत्राटावर काम करणारे लोक मोठ्या प्रमाणावर दिल्ली सोडून चाललेत. गेले दोन दिवस दिल्ली सोडून उत्तरेकडे जाणाऱ्या, इतरत्र जाणाऱ्या, साऱ्या गाड्या नुसत्या दुथडी भरून वाहताहेत. रेल्वेस्थानकावर पाय ठेवायला जागा नाही.' मी म्हणतो, 'रेल्वेगाड्यांत खूप गर्दी झालीय हे मलाही माहीत आहे; पण त्यालाही अनेक कारणे असू शकतात. साधे कारण असे की, गेले चार दिवस गाड्या सुरू नव्हत्या. हे तुंबलेले प्रवासी असतील. त्यातून या लोकांनी फार लूटमार केली आहे आणि घेतलेला माल घेऊन ते पळून जाताहेत, यावर तर माझा अजिबात विश्वास नाही. लोकांची संख्या या शहरात एवढी प्रचंड आहे की, लुटीत त्यांच्या वाट्याला फारच थोडे आले असेल. घरी जाऊन बसून खावे एवढे या सर्वांना कधी काही मिळणारच नाही. यांचे पोट कायमचे हातावर आहे. हे लोक मोठ्या प्रमाणावर बाहेर जात असतील तर त्याला फक्त एक शक्यता आहे. आता दंगल संपलीये. आता पोलिसांचा पुरुषार्थ सुरू

होईल ! पोलीस पाहिजे त्याला पकडून मारहाण करून त्यांना तुरुंगात ठेवतील. हे लोक पोलिसांइतके देवाला आणि कुणालासुद्धा घाबरत नाहीत. दंगलीला तर हे लोक अजिबात घाबरत नाहीत ! अगदी सरदारांनी दंगल केली तरी यांचे काही बिघडणार नाही. यातून सरदार दिल्लीत दंगल करतील असे मला अजिबात वाटत नाही.

माझा मित्र माझ्यावर रागावतो. तो म्हणतो, 'तुला काही माहीत नाही. शरणार्थी शिबिरात हिंडून आतंकवादी 'हिंदू शेर हो गए, बदला लेता है।' म्हणून सांगताहेत. त्यामुळेच तर आपण ही आपल्या रक्षणासाठी गस्त घालतोय !' ही गस्त मी गेले काही दिवस सरदारांचा हल्ला होईल या भीतीने घालतोय हे मला प्रथमच समजत होते ! आधीच माझ्या डोळ्यांत झोप आणि जाग्रण दोन्ही दाटून आलीत. मी चिडचिडा बनलोय. मी म्हणतो, 'तसे असेल तर मी उद्यापासून गस्त घालावयास येणार नाही. न वाचलेल्या आणि वाचले असेल तर न समजलेल्या धर्मग्रंथासाठी युद्ध खेळून गाझी होण्याची माझी अजिबात तयारी नाही. माझा उपाय आता सोपा आहे. मी नाटक-कंपनीमधून दाढीमिशा घरी आणून ठेवतो. सरदार चालून आले तर त्या लावून 'वाहगुरुकी खालसा' म्हणून त्यांचे स्वागत करीन. हिंदू आले तर दाढीमिशा काढून डरकाळ्या फोडत त्यांना सामील होईन !'

माझ्या एका मित्राला मनापासून वाईट वाटते. तो म्हणतो, 'धर्म नावाची सुंदर आवश्यक गोष्ट विसाव्या शतकाच्या अखेरीस या प्राचीन सुसंस्कृत देशात या पातळीवर आणू नकोस; पण तू म्हणतोस ते मला पटते. सरदार संघटितपणे मोठ्या प्रमाणावर प्रतिकार करतील असे मला वाटत नाही. झालेला हल्ला एवढा अकस्मिक आणि भयंकर होता की, त्यातून सावरावयासही त्यांना काही महिने लागतील ! त्यातून आपण थोडा जरी प्रतिकार केला तरी चिरडून जाऊ ही भीती आता त्यांच्या मनात कायमची बसली आहे. आतंकवादी, उग्रवादी काही मोठी विघातक कृत्ये करतील; पण सर्वसामान्य शीख त्याला सहानुभूती आहे असे सुद्धा दाखविणार नाही. रस्त्यात तर येणारच नाही. 'अपने गली मे शेर ' म्हणून पंजाबमध्ये कदाचित काही तीव्र प्रतिक्रिया होतील; पण सैन्य तेथे असताना तसे होण्याची शक्यता कमी आहे. तेथेही बहुधा आतंकवादीच मोठ्या प्रमाणावर विघातक कृत्ये करतील. पंजाबात एक कोटी सरदार आहेत व सत्तर लाख हिंदू. दहा लाख सरदार परदेशात आहेत. उरलेले तीस लाख सरदार भारतभर पसरलेत. या दंगलीतील आणखी एक अगदी वेगळी गोष्ट लक्षात घे. भारतात कोठेही छोटी मोठी जातीय दंगल झाली तर त्यात दोन्ही जमाती भाग घेतात. दोन्ही जमाती हात धुऊन घेतात. जामा मसजिदीपासून

मालेगावपर्यंत सर्वत्र हे घडते; पण या वेळी सरदारांनी अजिबात संघटित प्रतिकार केलेला नाही. एखाद्याने मिठाई वाटली वा बंदूक उडवली हे खरे आहे; पण झालेल्या दंगलीच्या मानाने या फारच मामुली घटना आहेत. सरदारांनी सामुदायिक प्रतिकार केला नाही, कारण झालेला हल्ला फार मोठा व अकस्मित होता हे म्हणणे थोड्याफार प्रमाणात खरे आहे; पण माझ्या मते महत्वाचे कारण वेगळे आहे. आज भारतातील बहुतेक सर्व सरदार मध्यमवर्गीय सुखवस्तू वा श्रीमंत सुखवस्तू आहेत म्हणूनच ते घाबरट किंवा डरपोक आहेत. घडणाऱ्या सर्व गोष्टीकडे हताशपणे बघत बसतील आणि सहन करतील. हे सारे विसरून हसत हसत उद्याला सामोरे जातील. ते आता गुरु गोविंदसिंगचे सरदार उरलेले नाहीत. ते पण लिबलिबीत कणा असलेले मध्यमवर्गीय बनलेत.

माझ्या या मित्राचे म्हणणे मला बरेचसे पटले पण गस्त संपवून घरी परत आलो तर एक नवीन भानगड उपस्थित होती. डॉ. बलकारसिंगची बायको रडत होती. ते सारे जण गेले सात–आठ दिवस आमच्याकडे राहताहेत. म्हणजे आता कधीतरी माझ्या बायकोचे व हिचे फाटणार आणि वाजणार हे मी आणि बलकार दोघेही ओळखून होतो; पण हे सारे इतक्या लवकर होईल असे दोघां-नाही वाटले नव्हते ! पण तिच्या रडण्याचे कारण वेगळे आहे. ती म्हणते आता कलकत्त्याहून प्रोफेसर भट्टाचार्यांचा फोन होता. तो आमच्या यंदाच्या अंटार्क्टिका मोहिमेचा नेता आहे. त्याने तुम्हाला २२ नोव्हेंबरला गोव्याला पोचावयास सांगितलंय. २७ नोव्हेंबरला तुम्ही अंटार्क्टिकासाठी भारत सोडणार. मी म्हटले, ‘ वहिनी, यात घाबरण्यासारखं आणि रडण्यासारखं काय आहे ? अंटार्क्टिका म्हणजे काही भारत नव्हे ! तो खूप सुरक्षित आहे ! त्यातून तेथे माणसे रहात नाहीत तर पेंग्विनसारखे सर्वांवर प्रेम करीत त्यांचे स्वागत करणारे सुंदर पक्षी राहतात. मी गोव्यात चार पाच दिवस असणार याचीही काळजी करू नका. सारे धर्म भारतात फक्त तेथे हातात हात घालून आनंदाने राहताहेत. केवळ सभ्यतेवर आणि संस्कृतीवर प्रेम करणारा एवढा सुंदर प्रदेश आज साऱ्या भारतात कोठेच नाही ! ’ पण त्यांच्या रडण्याचे कारण वेगळेच आहे. त्या म्हणतात, ‘ एक दोन दिवसात आम्ही हे घर सोडू. तुम्ही पण निघून जाल. नंतर पुन्हा दंगल झाली तर आम्ही कोणाकडे रहावयास जाणार ?’ आयुष्याची सर्व चाळीस वर्षे दिल्लीत काढलेल्या आणि भरपूर मित्र असलेल्या या मानस-शास्त्रज्ञ बाईसमोर दुसरे कोणतेही सुरक्षित घर येत नाही ! मी म्हणतो, ‘वहिनी’ तुम्ही उगाच घाबरताय. आताही आणखी दोन सरदार कुटुंबे आम्ही कॉलनीत लपवली आहेत. तुम्हाला वा इतर कोणालाच सांगितलेले नाही. ’ मी त्यांना हे सारे सांगत होतो; पण माझाच माझ्यावर विश्वास नव्हता. परवा तीनऐवजी

तीस माणसे घरावर चालून असती तर मी यांना घराबाहेर काढलेच नसते याची खात्री मी स्वतःलाच देऊ शकत नव्हतो.

–आम्ही सारेच मध्यमवर्गीय स्वतःवर आणि दुसऱ्यावर विश्वास नसलले त्रिशंकू आहोत !

□

## नऊ

आज बलकारसिंग ऑफिसात आलाय. काल गुरुनानकजयंती होती. शिखांचा हा शहिदी दिवस. काही तरी होणार अशी धास्ती सारेचजण बाळगून होते—अगदी पोलीससुद्धा; पण हा दिवस अगदी शांतपणे पार पडलाय. आणखी काही गोष्टी लक्षात आल्यात. आमच्या अगदी जवळचा, तसा मोकळ्यावर–उघड्यावर असलेला दिल्ली विश्वविद्यालयाचा सारा भाग या दंगलीतून वाचलाय. या विभागातील मोकळ्यावर असलेले सरदार प्राध्यापकांचे बंगले वाचलेत. राजेंद्रनगरसारख्या काही भागातही दंगल अजिबात झालेली नाही; पण हे अपवाद आहेत. मात्र यांच्यातूनही एक गोष्ट लक्षात येऊ शकते. लोकांनी फार मोठ्या समृद्धीने भरून वाहणारे बंगले लुटलेत आणि जाळलेत. बाजार आणि बाजारपेठा लुटल्यात. त्या लुटल्यावर किंवा लुटताना तेथे जवळपास असलेली सरदारांची घरे लुटलीत; पण रस्ता वाकडा करून सरदारांचे घर म्हणून रस्ता मुद्दाम शोधत ते मध्यमवर्गीय सरदारांच्या वाटेला गेलेले नाहीत ! संपत्तीची लूट हा या दंगलीतील एक प्रमुख आणि महत्त्वाचा प्रवाह आहे. झालेली कत्तल हा दंगलीतील दुसरा प्रवाह आहे. हे खून, ही कत्तल कोणत्या संघटनेने वा गटाने सुरू केली हे नीटसे समजत नाही. सर्वांत प्रथम हे खून 'ऑल इंडिया इंन्स्टिटयूट ऑफ मेडिकल सायन्स' समोर सुरू झाले. चिडलेला, प्रक्षुब्ध झालेला, तोल ढळलेला फार मोठा जमाव बाईंना उपचारासाठी तेथे आणल्यावर तेथे जमलेला होता. अमेरिका, पाकिस्तान, ब्रिटन, कॅनडा, भारतात असलेल्या साऱ्याच प्रमुख वकिलातीचे गुप्तहेर वा खबरे त्या वेळी त्या जमावात असणार. 'ऑल इंडिया इन्स्टिटयूट ऑफ मेडिकल सायन्स' मध्ये होणारी प्रत्येक गोष्ट अगदी त्या वेळीही, त्या क्षणी, 'बी. बी. सी.' आणि 'व्हॉइस ऑफ अमेरिकाला' समजत होती. माझ्या देशाने दिलेल्या अधिकृत माहितीप्रमाणे एकतीस तारखेला दुपारी अडीच वाजता माझ्या पंतप्रधानांचे निधन झाले; पण व्हॉइस ऑफ अमेरिकाने दुपारी एक

वाजताच माझ्या देशाचे पंतप्रधान मरण पावल्याची बातमी दिली आणि दीड वाजता माझ्या देशाला शोकसंदेश पाठवण्याची प्रेसिडेंट रेगन यांची हिंमत झाली ! अगदी त्याच वेळी व्हॉइस ऑफ अमेरिकाने भारतात फार मोठी गडबड होण्याची शक्यता असल्याने अमेरिकन प्रवाशांनी आपली भारतभेट पुढे ढकलावी म्हणून त्यांना विनंती केली आणि भारतात असलेल्या अमेरिकनांनी घरातच बसावे असा त्यांना सल्ला दिला. याच्यानंतर काही तासांनी ऑल इंडिया इन्स्टिटयूटपुढे जमलेल्या जमावातील काही लोकांनी सरदारांना त्यांच्या गाडीतून बाहेर काढून ठेचावयास आणि मारावयास सुरुवात केली. बाकीचे लोक प्रथम बघ्यासारखे बघत राहिले आणि नंतर नकळत त्यात सामील झाले. हा गट त्यानंतर रिंगरोडवर आला. तेथेही गाडीतून वा ट्रकमधून सरदार बाहेर काढून त्याला जाळणे सुरू झाले. या दंगलीतील पहिला किंवा प्रमुख प्रवाह अजूनही फक्त जाळपोळ आणि लूटमार यातच गुंतलेला होता. या गोष्टीला विरोध करणाऱ्या एखाद्या सरदाराला यांनी ठोकले होते वा मारले होते; पण तो त्यांचा प्रमुख उद्देश नव्हता. रिंग रोडसारख्या प्रमुख रस्त्यावर जे घडत होते ते या लुटालूट करणाऱ्या जमावाला लगेच समजत होते. हे धर्मयुद्ध आहे आणि या भ्याडपणे केलेल्या हल्ल्यामध्ये पुरुषार्थ आहे असे त्या जमावाला वा त्या जमावातील काही लोकांना तरी त्या क्षणी वाटले. त्यानंतर काही वेळाने काही हत्या केल्यावर त्या जमावाच्या डोळ्यांवर खून चढला. आपण काय करतो आहोत याची अजिबात शुद्ध गमावून बसलेला जमाव त्या वेळी निर्माण झाला. या दंगलीत त्रिलोकपुरी, मोगलपुरी येथे जे झाले तो या दंगलीतील तिसरा आणि आणि सर्वांत भयंकर प्रवाह आहे. आपण ज्याची कल्पनासुद्धा करू शकणार नाही असे काही तरी तेथे घडले. हा सारा कंगाल, बकाल, झोपडपट्ट्यांचा विभाग आहे. येथे जे घडले ते वर्गयुद्ध होते की धर्मयुद्ध होते याची छिनाल चर्चा आपण कोणीच न केलेली बरी ! भारतातील कोणत्याही झोपडपट्टीत, कोणत्याही दोन गटात कोणत्याही कारणाने, कोणत्याही क्षणी, झगडा सुरू झाला आणि त्या वेळी पोलिसयंत्रणा कोसळून पडली वा पोलिसांनी तिकडे संपूर्ण दुर्लक्ष केले तर नेमके हेच घडेल.

या दंगलीमधील हे तिन्ही प्रवाह एखाद्या स्वप्नाप्रमाणे आता संपून गेलेत. सारे कसे शांत शांत आहे. राजधानी दिल्लीची गाडी आता झपाट्याने रुळावर आली आहे; पण तरीही बलकारसिंग हा आज ऑफिसात आलेला एकमेव सरदार आहे. तोसुद्धा कॉलनीत राहतोय म्हणून आलाय. बलकारसिंग दिवसभर बावचळलेल्या किंवा बावरलेल्या मनःस्थितीत आहे. तो फक्त आठ दिवस घराबाहेर पडलेला नाही. आठ दिवसात बाहेरच्या जगाशी आम्ही

त्याचा संबंध येऊ दिलेला नाही; पण या आठ दिवसांत त्याच्या भोवतालचे, त्याच्या परिचयातले जग पार बदललंय. त्याचा अगदी ' रिपव्हॅन विंकल ' झालाय !

संध्याकाळी घरी परत आल्यावर बलकार मला म्हणातो, ' मला ऑफिसात साऱ्या मित्रांशी बोलताना फार थंडगार वाटत होते ! बहुतेक साऱ्या मित्रांची सहानुभूती माझ्याबरोबर नाही तर दंगलीबरोबर आहे असे मला वाटले. ' मी म्हटले, ' बलकार, कोणी असे काही म्हणाले का ? ' तो म्हणतो, ' कोणीच असे उघडपणे म्हणाले नाही. पण तुला आठवतंय आज ऑफिसात आपला मित्र डॉक्टर ××× त्याच्या डोळ्यांसमोर घडलेली घटना सांगत होता. सरदाराला व त्याच्या मुलाला बाहेर काढून जमावाने चोपले. अर्धमेले होऊन ते रस्त्यात पडले होते. पाण्यासाठी त्यांच्या जिभा बाहेर येऊन वळवळत होत्या. जमावाने त्यांच्याच दुकानातील सॉसची बाटली आणली आणि हसत-खिदळत त्यांच्या जिभेवर ओतली. ' किती अलिप्तपणे त्याने तो प्रसंग तुला आणि मला वर्णन करून सांगितला. मला वाटतंय माझ्या सर्व मित्रांची सहानुभूती दंगलीबरोबर आहे. झाले ते बरेच झाले. सरदार लेकाचे फार माजले होते. त्यांना एकदा कोणी तरी धडा शिकवावयास हवाच होता. थोडया जास्ती प्रमाणात झाले हे खरे. ' असे काहीसे माझ्या बहुतेक साऱ्या मित्रांना वाटतंय असे मला अगदी प्रामाणिकपणे वाटतंय. '

मी म्हटले, ' बलकारसिंग, या देशाच्या दुर्दैवाने तुझे म्हणणे बरोबर आहे. पण मला आणखी जे सांगावयाचे आहे ते ऐकून घे. माझ्यावर न रागावता समजावून घेण्याचा प्रयत्न कर. खूप काही गेले दोन वर्षे दररोज घडत होते. भिंद्रनवाले नव्या नव्या ' हिट लिस्ट ' बाहेर काढत होता. दोनदा बसमधील उतारूंची निर्भय भ्याड हत्या झाली होती. मनचंदा, खासदार तिवारी अशा भल्या देशप्रेमी माणसांचे नामर्द खून झाले होते. भिंद्रनवालेचा निषेध करावयाची हिंमत नसलेले धर्मगुरू संतासिंगला सुवर्णमंदिरात प्रवेश देण्यास नकार देत होते. आपण इंदिरा गांधींच्या खुनाचा निषेध केलेला नाही. त्याची निंदा केलेली नाही म्हणून स्वतःला धर्मगुरु म्हणणारा माणूस निर्लज्जपणे सांगत होता. माझ्या कोणत्याच सरदार मित्राने याचे समर्थन केलेले नव्हते; पण माझ्या साऱ्या सरदार-मित्रांची–अगदी तुझीसुद्धा एक सहानुभूती त्या सर्वांच्या बरोबर आहे असे त्या वेळी मला वाटत होते !—होते आहे ते थोडे जास्ती होते आहे पण सरदारांच्यावर होणाऱ्या अन्यायाला उत्तर द्यावयास दुसरा मार्ग नाही असे तुम्हाला वाटतंय, तुमची मूक सहानुभूती या सर्वांबरोबर आहे, असे साऱ्या भारतभर सर्वांना वाटत होते.

खरे पाहता या प्रत्येक वेळी भारतात सर्वत्र त्याची काही हिंसक प्रतिक्रिया होणे अगदी सहज होते. या देशातील दुसऱ्या अल्पसंख्यांक जमातीने हे केले असते तर अगदी अटळपणे त्याच्या प्रतिक्रिया सर्वत्र उठल्याही असत्या; पण प्रत्येक क्षणी एक अस्वस्थ शांतता केरळपासून आसामपर्यंत सर्वत्र बहुजन समाजाला वेढून उरली होती—या घटना घडवून आणणाऱ्या, हा कट करणाऱ्या परकीय शक्तींना हे असे का होते आहे हे समजत नव्हते. या परकीय शक्तींना आपला हा देश कधीच समजला नाही. स्वकीयांचे शंभर अपराध मोजण्याची आणि पोटात घालण्याची या देशाची परंपरा आहे! तो आपल्याला न कळत आपल्या स्वत:मधून पुढे आलेला आपला वारसा आहे. सरदार हे या देशात सर्वांना स्वकीय होते. पण नव्याण्णव अपराध मोजले गेले होते. इंदिराजींची हत्या वा इतर कोणत्याही छोट्या मोठ्या गोष्टीतून हेच महाभारत घडले असते. कारण हा या संस्कृतीला मंजूर नसलेला शंभरावा अपराध होता. उंटाच्या पाठीवर चढवलेली ही शेवटची काडी होती. इतके दिवस मनात साचलेले, साकळलेले, ठसठसणारे बेभानपणे बाहेर पडले. मनात साठवत गेलेली साठवून ठेवलेली वेदना ज्वालामुखीसारखी बाहेर पडते. वेळच्यावेळी क्रियाप्रतिक्रिया अशा खुल्लमखुल्ला गोष्टी झाल्या असत्या तर हे कदाचित टळले असते.

बलकारसिंग म्हणाला, 'हे केवळ 'लोहारकी एक' असे झालेले नाही. बाकीच्या समाजाने आम्हाला आमची जागा दाखवली आहे. दोन टक्के शिखड्यांनी अल्पसंख्य जमात म्हणून कोपऱ्यात बसावे असे सांगितलंय. १८५७ मध्ये 'बिहार रेजिमेंट' व बिहार यांच्याबाबत जे घडले ते आता आम्हा शीखांच्याबाबत घडणार आहे. १८५७ पर्यंत 'बिहार रेजिमेंट' व बिहारी लोक ब्रिटिशांचे आवडते होते. रणजितसिंगचा पराभव याच शूर बिहारी रेजिमेंटने केला होता. सरकारी नोकऱ्यांत त्यांना मानाचे स्थान होते; पण १८५७ मध्ये 'बिहार रेजिमेंट' स्वातंत्र्ययुद्धात उतरली. फसलेल्या स्वातंत्र्य-युद्धानंतर त्यांची दैना दैना झाली. चांगले सैनिक पुरवणारा हा बिहार एका पिढीत भारतभर फक्त घरगडी पुरवू लागला. बिहार बनला एक कंगाल आणि भिकार प्रांत! आम्ही जर लगेच खलिस्तान मिळवला नाही तर पंजाबचा आता बिहार होईल. आम्हाला मिळणाऱ्या सरकारी खाजगी नोकऱ्या आता झपाट्याने कमी होतील. सैन्यात आम्हाला फार प्रचंड प्रमाणात असलेले स्थान जाईल. जगजीवनरामबाबूंचा कायदा झपाट्याने अंमलात येईल. दोन टक्के समाजाला सैन्यात जास्तीत जास्त फक्त दोन टक्के नोकऱ्या मिळतील. आमच्या सैन्यातील नोकऱ्या गेल्या तर पंजाबच्या शेतीवर त्याचा फार वाईट

परिणाम होईल. तुला आठवते, गेल्या वर्षी पंजाबमधील शेतकऱ्यांचा पाहुणचार घेत त्यांच्या शेतीवर मनमुराद हिंडताना आपणाला एक गोष्ट जाणवली होती. पंजाबी शेतकरी तंत्रज्ञान आणि विज्ञान फार मोठ्या प्रमाणावर आणि सहजपणे वापरतो आहे. पण हे काही पंजाबच्या कृषिक्रांतीचे प्रमुख कारण नाही. साऱ्या भारताप्रमाणेच पंजाबमध्ये पण शेती हा आतबट्टयाचा व्यापार आहे. तेथेही शेतीत 'उतरत्या नफ्याचा नियम' (Law of diminishing return) थैमान घालतोय. पण या बुडत्या शेतीला सैन्यामधील नोकरीसारखा दुसरा पूरक जोडउद्योग नाही. सैन्यातील नोकऱ्या गेल्या तर पंजाबची कृषिक्रांती कोसळून पडेल.'

मी म्हटले, 'बलकारसिंग, तू म्हणतोस तसे घडण्याची शक्यता मी नाकारत नाही; पण अजूनही, अगदी या शेवटच्या निसटत्या क्षणी, तू आणि मी, आपण सर्वांनी थोडा प्रयत्न केला तर ही परिस्थिती वा खलिस्तान या दोन्ही गोष्टी आपण टाळू शकू. हा प्रश्न आणि या प्रश्नांचे उत्तर शोधावयाचे असेल तर आपणाला भारतीय जनतेपासून सुरुवात करावी लागेल आणि सर्वांत भयंकर गोष्ट अशी आहे की, या आपल्या लोकांना आपण कधी आपले मानलेले नाही वा समजावून घेण्याचा प्रयत्न केलेला नाही. या जनतेने पण गेल्या पन्नास वर्षांत महात्मा गांधी सोडून आपल्यापैकी कोणाला त्यांचे मानलेले नाही व समजावून घेतलेले नाही !

मला या देशातून हिंडताना ज्या दोन-तीन गोष्टी जाणवल्या आहेत त्या तुला सांगतो. या देशातील सर्वसामान्य माणसाजवळ आहे तेवढे व्यवहारज्ञान आणि अक्कलहुषारी जगातील इतर कुठल्याच देशातील जनसमुदायाकडे नाही. या आपल्या लोकांची अक्कलहुषारी किंवा 'सहावे इंद्रिय' फार प्रबळ आहे. हे असे आहे त्याला दोन कारणे असू शकतील. हा शेकडो वर्षांच्या अतूट, प्रवाही संस्कृतीने दिलेला वारसा असेल. कदाचित दुसरीही शक्यता आहे—ज्याप्रमाणे आंधळ्या माणसाची इतर ज्ञानेंद्रिये न कळत आपोआप अधिक तीव्र बनतात त्याप्रमाणे विसाव्या शतकाच्या अखेरीस विज्ञान, साक्षरता या किमान गोष्टींची साधी तोंडओळखही न होता जगावे लागत असल्याने या जनसमुदायाचे हे व्यवहारज्ञान किंवा सहावे ज्ञानेंद्रिय फार तीक्ष्ण झालंय !

मला आणखी एक गोष्ट जाणवली आहे. या साऱ्या जनसमुदायाच्या सुप्त मनात फक्त दोन प्रमुख मानबिंदू आहेत. एक म्हणजे या सर्वांचे एकत्र मोठ्या कुटुंबावर मनापासून प्रेम आहे. ते त्यांना मनापासून आवडते. त्यासाठी त्याग करणारे लोक आवडतात. ते कुटुंब मोडणाऱ्यांचा त्यांना राग येतो.– त्यांच्या धर्मग्रंथात आणि लोककथांमधूनच नव्हे तर आजच्या सिनेमामधूनही अजून

हेच लोक नायक आणि खलनायक बनतात.

त्याहूनही महत्त्वाचे म्हणजे या लोकांचे या देशाच्या एकतेवर, अखंडतेवर खूप प्रेम आहे. या देशात पूर्वीही वेगवेगळी राज्ये होती. राजपुतांचे, मोगलांचे, मराठ्यांचे, टिपूचे, रणजितसिंगाचे; पण खऱ्या अर्थाने अनेक राज्ये असतानाही हा देश अखंड होता.– हे एक वेगळ्या स्वरुपाचे अस्थिर संघराज्य होते. त्यामुळे देशाची पहिली फाळणी गळयात मारली गेली तेव्हा काय होतंय, आपण कोणत्या जाळ्यात सापडतोय हे या लोकांच्या लक्षात आलेच नाही; पण गेल्या सदतीस वर्षांत या देशातील सर्वसामान्य जनतेने एक गोष्ट हेरलीये. त्यांचे गेल्या सदतीस वर्षांतील बहुतेक सारे प्रश्न, दुःखे, लढाया, परावलंबन हे सारे या पहिल्या फाळणीतून निर्माण झालेत.

—वाट्टेल ती किंमत मोजून वा कोणताही धोका स्वीकारून या देशाची फाळणी टाळा असे म्हणणारे सावरकर आणि गांधी एवढे दोघेच बरोबर होते. फाळणीमुळे प्रश्न संपत नाहीत तर ते कल्पना करता येणार नाहीत एवढे वाढतात. आमची आणखी एक फाळणी झाली तर आम्ही आणखी गरीब बनू, अधिक कमकुवत बनू. कायमचे आपापसात भांडून आपले रक्त सांडून बसू. आम्हाला शस्त्रे विकून गबर होणाऱ्या देशांची शस्त्रविक्री मात्र शंभर टक्क्यांनी वाढेल. आमची अगतिकता आणि परावलंबन वाढेल.— आपण ज्यांना अडाणी, अशिक्षित, म्हणतो त्या जनसमुदायाने आपल्या मनाशी हे ओळखलंय !

–या लोकांच्या मनात सारा भारत हासुद्धा त्यांच्या एकत्र कुटुंबासारखा आहे. मोठे एकत्र कुटुंब टिकविण्याचे दोन मार्ग असतात. घरातील एखाद्याचे डोके फिरले, त्याने आक्रस्ताळेपणा केला तर इतरांनी त्या वेळी त्याच्याशी न भांडता त्याला समजावून घ्यावयाचे असते. तीस ऑक्टोबरपर्यंत सारा भारत शिखांबाबत हे करत होता– हे आम्ही अजूनही अधिक काळ अधिक आपुलकीने करावयास हवे होते असे मला वाटते; पण नेते हा प्रश्न अजिबात सोडविणार नाहीत. हा चिघळतच राहणार हे एकतीस ऑक्टोबर या दिवशी या देशातील जनतेला जाणवले किंवा त्यांना मंजूर नसलेला शेवटचा शंभरावा अपराध घडला आणि मग एकत्र मोठे कुटुंब टिकविण्याचा दुसरा एक अघोरी मार्ग असतो. घरातून वेगळे होणार म्हणणाऱ्या सुना या दिल्लीत दर दिवशी सहजपणे जाळल्या जातात ! सासरा, नवरा, सासू, नणंद, दीर या सर्वांकडून मिळून जाळल्या जातात !

माझ्या देशातील माझ्या सर्वसामान्य जनतेचे व्यवहारज्ञान फार चांगले आहे हे मी तुला सांगितले; पण ते व्यवहारज्ञान अठराव्या शतकातील आहे.

भावनात्मकदृष्टया हे सारे लोक अजून अठराव्या शतकातच आहेत. विसाव्या शतकाशी त्यांची अजून तोंडओळखही झालेली नाही. विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात सूड जाळून एकत्र कुटुंब टिकवता येणार नाही आणि असले पाशवी अत्याचार करून देशाची दुसरी फाळणी वा खलिस्तान टाळता येणार नाही, हे या लोकांना समजावून देण्यास तू आणि मी अयशस्वी ठरलोय !

आता तरी आम्ही सर्वांनी झालेल्या साऱ्या भयानक गोष्टींबाबत सरदारांची खुलेआम आणि प्रामाणिकपणे अगदी मनापासून माफी मागितली पाहिजे. त्याचे नुकसान दामदुपटीने दिले पाहिजे, झालेल्या केलेल्या घटनांबाबत काही प्रायश्चित भोगले पाहिजे; पण हे करण्याची अजिबात इच्छा आणि कुवत नसलेले नेते आज आपणासमोर आहेत. सारी दिल्ली पेटली होती त्या वेळी नौखालीतून हिंडणाऱ्या गांधीजींची हिंमत असलेला यांच्यात कोणी नाही हे आपणाला माहीत होते. आपल्या कोणाचीही त्यांच्याकडून तशी अजिबात अपेक्षा पण नव्हती; पण त्या वेळी दूरदर्शनवर येऊन लोकांना धीर देण्याची, दिलासा देण्याची, विनंती करण्याची, त्यांचे काळीज हलवणारे आव्हाने करण्याची, कुवत नसलेले भिकार नेते आपणासमोर असतील असे आपणाला वाटले नव्हते. फार उशीरा एक-दोनदा छापील ठोकळ्यासारखी चौकोनी चेहऱ्याने पाच मिनिटांचे भाषण देत काही मान्यवर नेते आकाशवाणी आणि दूरदर्शनवर आले. अशी मामुली भाषणे देणाऱ्या मुलाला आपण शाळेच्या वक्तृत्वस्पर्धांतसुद्धा उभा करणार नाही ! अगदी त्याही वेळी त्यांचे भाषण ऐकून काही दिलासा मिळण्याऐवजी आपणाला त्यांचीच कीव आली. कालची गोष्ट घे. खरे पाहता कोणत्याच वृत्तपत्रात ही गोष्ट आलेली नाही; पण या घटनेच्या खरेपणाबाबत तुझ्या आणि माझ्या मनात संदेह नाही. कारण त्यावेळी आपला मित्र राकेश तेथे उपस्थित होता. संध्याकाळी सहा वाजायची वेळ. माननीय श्री. भगत गांधीनगरातील गुरुद्वारामध्ये गेले होते. ते या विभागातून खासदार बनलेत. या विभागात आता हा एकच गुरुद्वारा उरलाय. गुरुनानकजयंती असताना त्यांनी तेथे जाणेही योग्य आहे. चिडलेल्या एका मुलाने आपला भाऊ या दंगलीत मारला गेलाय म्हणून त्यांना सांगितले. ते सहजपणे म्हणाले, ' तू हे आवेदनपत्र भरले की, तुला त्यासाठी दहा हजार रुपये मिळतील ! ' ही काय माणसाने माणसाची समजूत घालण्याची पद्धत आहे ? चिडलेल्या त्या मुलाने सारे पोलिस तेथे उपस्थित असताना भगतांच्या गाडीची काच फोडली ! अशा या दिवसात फक्त पाच मिनिटे दूरदर्शनवर आलेले वसंत साठे आपणा सर्वांच्या काळजाला हात घालून गेले. हिंदूंना, सरदारांना, सुशिक्षितांना, अशिक्षितांना ते पटून गेलेत. मनात घर करून

गेलेत. त्यांनी सांगितले होते, ' ये तो साजीश थी दुश्मनों की जिसमे आप फस गये है, वो लोग तो खाली यही चाहते थे ! ' आपल्याला भेटणारा प्रत्येक जण त्यांच्याच त्या विधानाची आणि कळकळीची तारीफ करतोय. बलकार, आपणाला न कळत आपण फार अक्कलहुशारीने लावलेल्या एका जाळ्यात अडकलोय.

आपण जाळ्यात अडकलोय. आपली आता शिकार होणार आहे; पण ही शिकार होण्यापूर्वीचे काही तडफडते, निसटते, शेवटचे क्षण आपल्या हातात आहेत. अजूनही आपण काही करू शकतो. या असल्या पाशवी अत्याचारामुळे खलिस्तान टाळता येणार नाही. या असल्या प्रकारामुळे अपरिहार्य आणि अटळपणे आपण खलिस्तानच्या जवळ जाऊ. खलिस्तान टाळावयाचे असेल तर सरदारांना समजावून घेऊन त्यांना या घडीला सहन करून त्यांच्यावर खूप खूप प्रेम केले पाहिजे हे मी ओळखले पाहिजे; इतरांना समजावून दिले पाहिजे; पण बलकारसिंग, आता तुलाही काही गोष्टी कराव्या लागतील. या देशातील जनतेला सरदार अजूनही आपले वाटतात. तीन चार वर्षांपूर्वीपर्यंत तर साऱ्या भारतभर साऱ्या लोकांना, चेष्टा करावयास आणि प्रेम करावयास सरदारांच्याइतके इतर कोणत्याच प्रांतातले लोक जवळचे वाटत नसत ! सरदारांच्या उमदेपणाबद्दल आणि शौर्याबद्दल सर्वसामान्य माणसांच्या मनात अजूनही प्रेम आहे. तुम्ही मागत आहात ते सारे हा देश तुम्हाला देणार आहे; पण तुमच्या मागण्या दुरूनही, अप्रत्यक्षपणेही, खलिस्तानच्या मागणीशी जोडलेल्या आहेत असे या देशातील लोकांना वाटता कामा नये. तुम्हाला खलिस्तान नको होता; पण तुम्हाला तो हवा आहे, अशी देशातील जनतेची समजूत करून देण्यात आली होती आणि या देशातील सर्वसामान्य जनतेने एक गोष्ट नक्की ठरवलेली आहे. या देशाची दुसरी फाळणी त्यांना मंजूर नाही, त्यासाठी सैन्याचे बंड मोडून काढावे लागले, फार मोठे प्रदीर्घ यादवीयुद्ध खेळावे लागले तरी त्यासाठी त्यांची तयारी आहे. कारण फाळणी टाळण्यासाठी पत्करलेला कोणताही धोका, मोजलेली कोणतीही किंमत कमीच असते हे त्यांना समजलंय. फाळणीमुळे प्रश्न सुटत नाही तर अधिक वाढतात, कधीच सोडवता येणार नाहीत इतके वाढतात हे त्यांनी अनुभवलंय. तुमच्या मागण्या खलिस्तानशी अजिबात संबंधित नाहीत हे तुम्ही आम्हाला पटवून देणे आणि आम्ही ते समजावून घेऊन तुम्हाला झुकते माप देत तुमच्या मागण्या मंजूर करणे हे या क्षणी फार जरुरीचे आहे ! '

□

# दहा

माझे आणि बलकारचे फार मोठे भांडणच व्हावयाचे; पण गोगी किंवा गौरव यांच्यामुळे ते टळलंय. गेली सहा वर्षे माझी आणि बलकारची मते एकमेकांशी शंभर टक्के जुळत होती- म्हणून तर आम्ही जवळचे मित्र होतो! पण या वेळी मी जे सांगितले होते त्यातील एकही शब्द त्याला पटला नव्हता. कदाचित तो म्हणतो तसा मी झोपेत किंवा तापात बरळत असेन किंवा झालेल्या घटनांमुळे बलकार कोलमडून पडलेला असेल. काहीही ऐकून घेण्याची, समजून घेण्याची, विचार करण्याची त्याची कुवत संपूर्णपणे संपलेली असेल-पण त्यामुळे त्याच्यावर प्रेम करत, अधिक प्रेम करत त्याला समजावून घेण्याची माझी जबाबदारी वाढलेली आहे.

बलकार म्हणतो ते खरे असेल. मी सांगितली ती या प्रश्नाची फक्त एक बाजू असेल. या घडलेल्या साऱ्या घटनांना आणखीही काही चेहरे असतील. किडलेली, सडलेली जिवंत माणसे आज थव्याने आपणाभोवती घोंगावत आहेत आणि उद्दामाजी काळेगोरे म्हणत आपणही त्यांच्यापैकीच एक आहोत. त्याहूनही महत्त्वाचे म्हणजे आपण स्वतःसाठी म्हणून जे जीवन जगतो, उपभोगतो त्याचा अपरिहार्य परिणाम किंवा त्याची किंमत म्हणून ही माणसे तयार होताहेत. आपल्याला वर्णनही करता येणार नाही एवढी विषमता आज या देशात आहे. झोपडपट्टीमधून हिंडताना माझे घर मला राष्ट्रपतिभवनापेक्षा अधिक अलिशान आहे असे वाटते आणि एखाद्या उद्योगपतीच्या घरी गेलो तर माझे घर मला झोपडपट्टीपेक्षा अधिक भिकार वाटते. कपड्यांना इस्त्री नसेल तर माझी मुलगी शाळेत जात नाही, तरीही माझी मुलगी साध्या शाळेत जाते म्हणून तिच्याशी न बोलणाऱ्या मुली आहेत आणि या देशातील बहुसंख्य मुलांना मात्र कोणतीच शाळा कधी पहावयास मिळत नाही- ही असमानता आणि किडलेले सडलेले आपण यातून या देशात मिळेल त्या प्रसंगामधून अशा घटना वारंवार घडणार आहेत.

झोपडपट्टीत राहणारी माणसे, गटारातील पाणी पिणारी मुले, कुंटणखान्यात लोटल्या जाणाऱ्या निष्पाप कोवळ्या पोरी या सर्वांना पाहताना माझ्या मनात कवितेच्या दोन ओळी दाटून येत. गेल्या काही दिवसांत माझ्या मनातून त्या ओळी हरवल्या होत्या. माझ्या मनात आता फक्त वडिलांच्या दुकानाचे रक्षण करीत शहीद झालेली ती छोटी मुलगी आहे. माझ्याच मुलीच्या वयाची. दूर कोपऱ्यात हिजड्याहून अगतिकपणे मी उभा आहे. मरेपर्यंत माझ्या मनावर

ओरबाडलेले हे चित्र पुसता येणार नाही. माझ्यासाठी पेटवलेल्या चितेतूनसुद्धा न जळता ते चित्र कदाचित माझ्याबरोबर माझ्यापुढील अज्ञात प्रवासात माझ्या गाठीला असेल !

– पण आत्ता या क्षणी मात्र माझ्यासमोर पेटलेली गोगीची चिता आहे. आम्ही तीन चार जणांनी त्याला भडाग्नी दिलाय. चेहरा एवढा विद्रूप झालाय की हा गोगी आहे हे ओळखताच येत नाही. त्यामुळे कदाचित हा गोगी नसेल असा मनाला एक दिलासा आहे.– पण गोगीच्याच वयाच्या कोण्या एका निष्पाप मुलाचा हा देह आहे– आणखी अशीच तीन–चार विद्रूप भेसूर प्रेते जळताहेत. मी आणि बलकारसिंग स्तब्धपणे उभे आहोत– एकमेकांचा आधार शोधीत पुन्हा एकदा नकळत आम्ही एकमेकांच्या खांद्यांवर हात ठेवलाय ! त्या चिता आता भडकून पेटल्यात; अक्राळ-विक्राळ ज्वाला उठल्यात; पण माझ्या डोळ्यांसमोर मात्र लख्ख अंधार आहे. त्या अंधारात मला आधार देणाऱ्या त्या दोन ओळी मला अचानक सापडल्यात. त्या पेटलेल्या प्रेताच्याकडे पहात, त्या भयाण अंधारात, त्या चितांना श्रद्धांजली वाहिल्याप्रमाणे मी त्या ओळी अगदी सावकाश म्हणतो.

**'... तुमचा गुन्हा एवढाच की**
**तुम्ही या देशात जन्मलात**
**त्याहूनही महत्त्वाचे म्हणजे**
**–आम्ही या देशात जिवंत असताना जन्मलात...'**

□

# प्रकाशाचे गाणे अवसेच्या रात्री....

## एक

लाटांच्या या उग्र कल्लोळांना
आणि पळणाऱ्या या सैनिकांना कळुद्यात...
– हे बुडणारे जहाज मी अजून सोडलेले नाही....

कॉलेजात असताना आम्ही मित्रांनी बाबांची ही कविता कितीतरी वेळा वाचली होती. अगदी अस्वस्थ आणि रोमांचित वगैरे होऊन ! – स्वातंत्र्य मिळून काही वर्षे ओलांडली होती. सावरकर श्रेष्ठ की गांधी श्रेष्ठ ? अहिंसा बरोबर का हिंसा श्रेष्ठ ? देशाची फाळणी टाळता आली असती की नसती ? प्रश्न माओच्या मार्गाने सुटतील की विनोबाजींच्या ? या असल्या वादातून आमच्या मागची पिढी गेली होती. आमचे जग झपाट्याने बदलत होते.- सकाळची महाविद्यालये बंद करणे चूक की बरोबर आणि अशा वेळी राजकीय पक्षांनी विद्यापीठात हस्तक्षेप करावा की नाही ? संयुक्त महाराष्ट्र नाकारण्यात लोकशाही हक्कांचा भंग होतो का ? आणि संघराज्य आणि केंद्र-सत्ता म्हणजे नक्की काय ? एखाद्या विद्यापीठात एखाद्या परीक्षेच्या वेळी एखाद्या विद्यार्थ्याचे चार पाच मार्क प्रॅक्टिकल्सच्या वेळी बदलले जातात हे खरे असेल का ? पंजाबची अफाट वेगाने प्रगती करताना कैरॉं खरेच पैसे खात असेल का ? आणि हे असे करणे बरोबर की चूक ? असे हे सारे सरळ धोपट प्रश्न होते. त्यावर चर्चा, रवंथ वगैरे करताना आम्ही अगदी वैतागून जायचो.

अशावेळी ‘ हे बुडणारे जहाज मी अजून सोडलेले नाही. ’ ही बाबांची ओळ आपल्या मनाला चक्क आधार वगैरे देते आहे असे वाटायचे !

□

दशकांचे गठ्ठे बाजूला पडलेत. मुंबई सोडून मी आता दिल्लीत रुळलोय. – दिल्लीच्या खानदानाला स्मरून पांढरे होणारे केसांचे कल्ले, सफाईने काळया कलपात बुडवून, सराईत बेरक्या धूर्त नजरेने मी राजधानीत हिंडतोय ! एकेका पाण्याचा गुण असतो. राजधानी दिल्लीत राहिले की ही अशी नजर आपोआप तयार होते. – या दिल्लीत पांढऱ्या केसांना समोरच्या माणसाला चुकवणारी काळी तुकतुकी येते आणि काळया कोवळया केसांना पण आपोआप पांढऱ्या केसांचे बेरके शहाणपणा येते !

मागे पडलेल्या या दशकांच्या गठ्ठयात आणि राजधानीतील वातावरणात माझ्या भोवतालचे जग झपाटयाने बदललंय. कॉलेजात असतानाचे आमच्या समोरचे प्रश्न तर अगदी मामुली खुळखुळे वाटताहेत ! – कालपरवा त्याच्या पंडारा रोडवरील मठीत पुस्तकांच्या पसाऱ्यात आणि शास्त्रीय संगीताच्या लयीत बुडालेले मधू लिमये भेटले होते. आपल्या नेहेमीच्या मिस्कील कडवट-पणाने ते म्हणाले, ‘ मी खरा प्रतापसिंग कैरोंचा कडवा विरोधक ! पण आज वाटते आपण उगाच या चांगल्या माणसाच्या मागे लागलो ! – आज भोवताली जी माणसे वावरताहेत ना त्यांच्या मानानी हा तर बिचारा खरोखरच अगदी संत होता ! ’

सांगण्याचा मुद्दा वेगळा. या अशा वातावरणात माझ्या मनातले बाबा आणि बाबांची ती कविता केव्हाच स्मृतीआड झालीये. हे जहाज बुडणार हे आमच्या तयार नजरांनी केव्हाच ओळखलंय ! आणि जरा खाजगीतले सांगतो, हे जहाज बुडण्यापूर्वी या जहाजातील जमेल तेवढा माल स्वतःच्या खिशात कोंबण्यात आम्ही सध्या गुंतलोय !

□

या अशा वेळी, या अशा राजधानीत बाबा येणार आणि जाणार– या अशा खुळांसाठी राजधानी दिल्लीकडे अजिबात वेळ नसतो ! सध्याच्या या अशा वातावरणात तर मुळीच नसतो. दिल्लीतील नोकरशाहीच नव्हे तर गल्ली-बोळातील मुलेसुद्धा फक्त उगवतीचा सूर्य मानतात. फक्त पूर्वेला ओळखतात. दिल्लीत मुळी पश्चिम नसतेच. येथे फक्त उगवत्या सूर्याचे दर्शन घ्यावयाचे असते. त्याला किती वेळ नमस्कार करावयाचा याचे बेरके आडाखे बांधावयाचे असतात. त्यांच्या हातातून सुटणाऱ्या दक्षिणेतील किती आपल्या कनवटीला लागतील हे तपासावयाचे असते. पुन्हा एकदा परवाच्या भेटीत मधू लिमयेंनी

जे सांगितले ते सांगावयाचे तर ' दिल्लीत माणसे फक्त त्यांना लागलेल्या शासकीय बिरुदांनी ( Suffix and prefix ) ओळखली जातात. दिल्लीतील कोणत्याही सरकारी अधिकाऱ्याला तुम्ही कायदा वा नियम विचारलात तर तो तुम्हाला, नियम कोणत्या माणसासाठी हवा आहे हे विचारतो आणि मग तो नियम वगैरे सांगतो !

राजधानी दिल्लीतील राजकीय आणि सांस्कृतिकच नव्हे तर सामाजिक कार्यक्रम सुद्धा पंचतारांकित हॉटेलात सुरू होतात. पाच दहा मिनिटे महत्त्वाच्या बौद्धिक चर्चा वगैरे होतात आणि नंतर रोचक पदार्थांत आणि नशेच्या पायघड्या पुढे पसरणाऱ्या शराबीत सारे कसे आलवेल होते - बाकीचा वेळ राजधानी दिल्ली कुंभकर्णानेच भोगली असेल अशी मुलायम, मखई पानासारखी सुस्त झोप घेते. ही झोप चाळवण्याचे सामर्थ्य फक्त मतांच्या महापुरात असते नाही तर बंदुकीतून बेगुमानपणे सुटणाऱ्या गोळीत. - यापैकी कोणतीच गोष्ट बरोबर नसलेल्यांनी खरं पाहता राजधानी दिल्लीच्या वाटेला जाऊ नये.

— बाबा येणार आणि जाणार या गोष्टीची दिल्लीतील इतर अनेकांच्या किंवा सर्वांच्याप्रमाणे मी पण अजिबात दखल घेतली नव्हती, हे वेगळं सांगावयास नको. आधी आजकाल दूरदर्शनसमोरून उठावयास फारसा वेळ उरलेला नसतो. त्यातून बाबांनी फारशी गर्दी न जमवता, समाज वगैरे ढवळून न काढता आणि अजिबात घराबाहेर न पडता पण बाबा आलेत हे मला समजले. कारण आजकालचे अवलीये दूरदर्शनवरून आणि वर्तमानपत्रांतून जन्माला येतात ! गाडगीळांनी मराठी भातीला स्मरून चांगली प्रसिद्धी दिली. इंग्रजी वृत्तपत्रांनी बाबांच्या दारी चांगला रतीब घातला. लोकांचे कुतूहल त्यामुळे चाळवले. त्यामुळे गरम गरम चहाचे घुटके घेत बाबा म्हणजे नक्की काय प्रकरण आहे हे माझ्या परप्रांतीय मित्रांना माझ्या तर्खडकरी इंग्रजीत आणि मुंबईच्या हिंदीत मी समजावून देण्याचा प्रयत्न केला !

□

## दोन

-- हे सारे एवढेच असते तर बाबांची दिल्ली-भेट मी व आपण विसरूनही गेलो असतो. पण धमाल हा आजकालचा परवलीचा शब्द आहे. बाबांना व त्यांच्या कार्यक्रमाला दूरदर्शन आणि इंग्रजी वृत्तपत्रे प्रसिद्धी देत असतानाच

मराठी वृत्तपत्रांनी त्यांच्यावर टीका करण्यास सुरुवात केली. खरे पाहता दुसऱ्या कोणत्याही प्रांतातील एखादा सोम्यागोम्यासुद्धा काही राष्ट्रीय कार्यक्रम घेऊन राजधानीत आला असता तर त्याच्या भाषेतील सारी वृत्तपत्रे आणि सारे पत्रकार त्याच्या मागे उभे राहिले असते. कारण हे एक संघराज्य आहे आणि संघराज्यात हे असे करणे जरूरीचे आहे म्हणून सांगत ! – पण आपली मराठी माती जरा वेगळी आहे. अगदी खरे सांगतो, एखादा मराठी माणूस पुढे जात असेल तर माझ्यासकट आम्हा सर्व मराठी माणसांना मनापासून वाईट वाटते. आमच्या मनात पहिला विचार हा येतो की, हा कसा काय पुढे जातो ते मी पाहतो. आपल्या माणसावर टीका करावयाची असेल तर आगरकरांचा सडेतोडपणा, रामशास्त्र्यांचा तराजू आणि सावरकरांची धारदार वाक्ये बरोबर घेऊन आम्ही हिंडत असतो.

चहाच्या पेल्यातील वादळ त्यामुळे थोडे मोठे होते. बाबांच्यावर टीका होते आहे की, त्यांची खिल्ली उडवली जाते आहे असा भ्रम पडतो. आणि लवकरच याचा निरासही होतो. मराठी माणसाचे आणखी एक बरे आहे. मराठी वृत्तपत्रांतून बाबांच्याबद्दल हे जे काही येते आहे त्या सर्वांची जंत्री करून विदर्भातील सर्वाधिक खपाच्या नागपूरच्या 'तरुण भारत'ने 'भारत जोडो यात्रेचे फलित !' म्हणून ११ एप्रिलच्या अंकात एक विस्तृत अग्रलेख लिहिला. त्यांनी लिहिले, 'या यात्रेचे शिल्पकार बाबा आमटे यांना जी आगळी-वेगळी प्रसिद्धी मिळाली ती दिल्लीत मिळाली. त्यातही दिल्लीतील काही मराठी पत्रकारांकडून ती जास्त मिळाली. पण ही चर्चा या यात्रेच्या श्रेय-साफल्याची चर्चा नव्हती तर हा बाबांच्या या यात्रेच्या हेतू-संशोधनाचा पोलिसी तपास होता. ही शैलीदार अप्रसिद्धी होती. मराठी पत्रकारांना अनेक शोध लागले. या यात्रेतून बाबांनी नोबेल पारितोषिकाची तयारी चालविली आहे. हा सरकारी संत आहे. हा मदर टेरेसाशी स्पर्धा करणारा करिअरनिष्ठ सेवक आहे, असे अनेक हेत्वारोप बाबांना चिकटवण्यात आले. आपण जणू खोलात शिरून निर्भीड वार्तापत्रे प्रसिद्ध करत आहोत अशा थाटात बाबांनी राजीव गांधींची भेट मिळावी म्हणून कशी कशी राजकारणे केली आणि त्यांना कोणी कोणी साथ दिली अशी आतल्या गोटातील माहिती बाहेर आली – जसे काही राजीव गांधींना किंवा लोकशाहीने निवडलेल्या पंतप्रधानांना चांगल्या माणसाने भेटणे हा गुन्हाच बनलाय !'

हे सारे बाबांच्याही कानावर जात होते. किंवा आमच्या मराठी बाण्याला स्मरून आम्ही काहीजणांनी ते बाबांच्या कानावर घातले ! बाबांची यावरची प्रतिक्रिया पण अगदी थेट आगरकरी मराठी बाण्याची होती. ते म्हणाले,

'जो वृक्ष फळांनी लगडलेला असतो त्याच्यावरच दाभोळकर, लोक दगड मारतात. माझ्याकडे विचार आहे, कार्यक्रम आहे, म्हणून माझ्यावर टीका होते.'

– एकूणच आम्हा साऱ्या मराठी माणसांचे अगदी कल्याण असो!

□

# तीन

हा आपला 'मराठीपणा' आपण सारेच जण जरा बाजूला ठेवू पण बाबा–राजीव भेट अशी बाजूला ठेवता येणार नाही. एका लोकप्रिय पत्रकाराने टाकलेली एक गुगली येवढेच त्या भेटीचे स्वरूप नाही. 'शिवाजी-रामदास' भेटीसारखी दंतकथेच्या स्वरूपात ती भेट आज उपलब्ध आहे. बाबांनी स्वतः-बद्दल काही मागितले असते तर काही प्रश्न नव्हता. पण पंजाबच्या स्फोटक प्रश्नात ती भेट गुंतली गेलीये.

खरे पाहता बाबांनीच दिल्लीत आल्यावर कुलदीप नय्यरला आपण राजीवला त्याच्याकडे जाऊन भेटणार नाही; हवे तर त्याने मला येऊन भेटावे म्हणून अगदी तुकारामाच्या भाषेत सांगितले होते. राजीव-बाबा भेट होणार नाही ही त्याच वेळी काळग्या दगडावरची रेघ बनली होती!– कारण बाबा कितीही मोठे असले तरी बाबा म्हणजे काही इंदिरा गांधी नव्हे की आपली बांधली वळकटी आणि चालल्या पवनारला!–बाबा आपणहून राजीवच्या भेटीला जातील अशी पण अजीबात शक्यता नव्हती. सारेच 'बाबा' हट्टी असतात आणि 'बाबा हट्ट' हा स्त्री हट्ट, बाल हट्ट किंवा राज हट्ट यांच्याहूनही अधिक घट्ट असतो!

पण ही सारी विचित्र कोंडी अगदी विचित्रपणे सुटली. अगदी माझ्या साक्षीनं सुटली. मी नकळत दिल्लीच्या दंगलीत गुंतलो गेलो होतो हे माणूसच्या वाचकांना माहीत आहे. या दंगलीत शेकडोंनी विधवा झालेल्या मातांच्यासाठी 'टिळक विहारला' एक वसाहत झालीये. मी जमेल तेव्हा तेथे जातो. राजधानी दिल्लीला ही वसाहत फारशी माहीत नाही – गावाने गावात ठेवून गावाबाहेर ठेवलेली महारोग्यांची वस्ती असते ना तशी राजधानी दिल्ली या वसाहतीला विसरून जाण्याचा प्रयत्न करते आहे असे मला अनेकदा वाटते!

या अशा वसाहतीत हिंडत तेथील कळाहीन माणसांना आधार देत; त्यांच्यातील माणूस जागा करण्यात तर बाबांची जिंदगी गेली. दिल्लीत बाबा

'टिळक विहारला' जाणार हे मी नक्की ओळखून होतो. त्यानंतर जे काही घडणार ते पण अटळ होते. बाबांनी पाहिले, सरकारी मदत तेथे अजून पोचलेली नाही. सर्वसामान्य माणसांची मदत वगैरे राहू दे, सहानुभूती सुद्धा नाही – बाबांच्याच शब्दांत सांगायचे तर सर्वोदयवादी, खादी ग्रामोद्योगवाले यांचा चरखासुद्धा त्यांना मदत करायला तेथे पोचलेला नाही. या देशात सर्वत्र आता फक्त कॉम्प्युटरचाच जयजयकार सुरू आहे. बाबांना तेथे भेटल्या, तान्ह्या मुलांच्या डोक्यावरच्या विद्रुप जखमा दाखवणाऱ्या तरुण विधवा. त्यांच्या डोळ्यांतले ते आटलेले समुद्र. किंवा पुन्हा बाबांच्याच शब्दांत सांगायचे तर त्यांचे कोंडलेले, घुसमटलेले हुंदके.... Suffocating sobs. बाबा आयुष्यात प्रथमच कोलमडून पडले. मी पाहिले त्यांच्या एका डोळ्यातून बाहेर पडणारे अश्रू आणि दुसऱ्या डोळ्यातून बाहेर येणारे अंगार. त्या बायांची मागणी अगदी साधी होती. कोणीच आपणासाठी काही करत नाही आणि किमान आपली वेदना-दुःख कोणीतरी या देशाच्या पंतप्रधानांच्या कानावर घालावे.

आणि मग बाबा सरळ राजीवच्या भेटीला गेले. दोघे तब्बल ६५ मिनिटे बोलत होते. म्हणजे नंतर मला आलेल्या बाबांच्या अनुभवाप्रमाणे बाबा बोलत असणार आणि राजीव विचारा ऐकत असणार ! या भेटीतील आणखी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे बाबा बसू शकत नाहीत. त्यामुळे बाबा उभे राहून बोलत होते. 'एटिकेट' वगैरे मानणारा राजीव पण त्यामुळे ६५ मिनिटे उभा होता–असो. राजीव आणि बाबा दोघेही ग्रेट ! – त्यानंतर राजीव बाबांना पोचवावयास त्यांच्या बसपर्यंत गेला. हे तसे जरा नवीन, राजीवच्या नेहेमीच्या 'एटिकेट'मधे न बसणारे ! राजीव-बाबा भेटीच्या त्या क्षणी आतली वा महत्त्वाची बातमी मिळाली ती येवढीच, आणखी काही माहिती मिळणे त्या क्षणी तरी शक्य नव्हते. या देशात किमान पंतप्रधानांशी झालेली खाजगी बोलणी तरी अजून सुदैवाने काही काळ तरी गुप्त राहतात – त्याचाही अगदी तिहार तुरुंग झालेला नाही !

पण पंजाबबाबत राजीवने बाबांच्यावर काही खाजगी गुप्त कामगिरी सोपवली आहे, किंवा परत आल्यावर त्यांना झालेले पंजाब प्रश्नाचे दर्शन आपणाला सांगावे म्हणून त्यांना विनंती केली आहे. किंवा याच्या अधीमधी येणारी पंजाबबाबतची एखादी कामगिरी त्यांना आता पार पाडावयाची आहे. अशी दिल्लीत हवा तयार झाली. आणि या सर्वांत नक्कीच काहीतरी तथ्य असणार -कारण बाबांनी दिल्ली सोडण्यापूर्वीच त्यांनी आपणाला येऊन आपल्या गुहेत भेटावे असे बाबांना आतंकवादी तरुणांचे पंजाबमधून खास निरोप येऊन पोचले होते -आणि बाबांना हे असे निरोप आलेत या अफवा

नव्हत्या, ती वस्तुस्थिती होती ! नंतर बाबांनी मला सांगितल्याप्रमाणे पंजाब-मधील हे आतंकवादी तरुण फार कार्यक्षम गुप्तहेरयंत्रणा बरोबर घेऊन आज उभे आहेत !

□

पण ते असो. – ते सारे आपणाला पुढे सविस्तर बाबांच्याकडून समजावून घ्यावयाचे आहे. मात्र बाबांची पंजाब आणि काश्मीर-यात्रा या पार्श्वभूमीवर सुरू झाली हे या ठिकाणी महत्त्वाचे आहे. तसे पाहिले तर 'भारत-जोडो' आंदोलनाच्या दृष्टीनेही पंजाब आणि काश्मीर महत्त्वाचे होते. कारण याच विभागात 'भारत-तोडो' चे नारे बुलंद होते.

बाबांची पंजाब-यात्रा सुरू झाली आणि वृत्तपत्रांतून न आलेल्या आणि विश्वास बसू नयेत अशा बातम्या राजधानीत येऊन थडकू लागल्या. बाबांनी अमृतसरमधे चक्क 'खालसा कॉलेजात' सभा घेतली. अमृतसरचे खालसा कॉलेज म्हणजे आतंकवाद्यांचा बालेकिल्ला. त्यांच्याच शब्दांत सांगावयाचे तर ही त्यांची खडकवासला डेहराडूनसारखी मिलिट्री अ‍ॅकॅडमी – कॉलेजात गेल्या पाच वर्षांत कोणी हिंदू नेता गेलेला मला माहीत नाही. भाषण वगैरे देणे मग फार पुढच्या गोष्टी. बाबांनी तेथे प्रथम कॉलेजातील तरुण तरुणींना बोलावयास दिले. आग ओकत ते तरुण विचारत होते. 'सुवर्णमंदिरात १५ दिवसांची पोरे डोक्यात संगीनी खुपसून मारली गेली. दिल्लीत हजारोंनी तरुणी विधवा झाल्या आणि त्यांची अब्रू लुटली गेली. मथुरेच्या गुरुद्वारात सरदार जिवंत जाळले गेले. शांतीच्या पुजाऱ्या तू त्यावेळी कोठे होतास... !'

बाबा पण तेवढेच नेमके आणि स्पष्ट बोलले. ते म्हणाले, 'तुम्ही असे काही बोलला नसतात तर अमृतसरच्या सरकारी डॉक्टर्सकडून येथील तरुणांची तपासणी करून ते तरुण आहेत का नाहीत ते तपासा म्हणून मी सांगितले असते ! तुमचे आक्रंदन मी समजतो. रक्ताचा सडा शिंपत अपमानाचा बदला घ्यावयाची व स्वतःचे दुःख विसरावयाची तुमची भावना समजतो. त्या वेळी मी तेथे नव्हतो ही तर चूकच झाली. कारण त्या वेळीही मी माझ्या महारोगी मित्रांच्या बरोबर होतो. पण या देशातील रक्तपेशी जाळत हाडापर्यंत जाऊन भिडलेली दुसरी जखम अधिक भयंकर आहे हे समजल्यावर बाहेर पडलोय. 'टिळक विहारातील' घुसमटलेले हुंदके सहन न झाल्याने पंतप्रधानांना आणि तुम्हाला भेटतोय. याक्षणी तुम्ही आणि पंतप्रधान दोघेही महत्त्वाचे आहात.

त्यानंतर बाबा आपल्या मुला-मुलींबरोबर सुवर्णमंदिरात राहिले. रामदास सराईत त्यांनी बोलणी केली. याच्याच आगे-मागे त्यांनी पंजाबात कुठेतरी



१७५८४ २५०८६ २५०८६ शाखा (स्थळ प्रत)

घोषणा केली, 'या देशात पुन्हा कोणत्या धर्मस्थानावर सैन्याचा हल्ला झाला, पुन्हा कधी चुकूनही 'ब्ल्यू स्टार' झाले तर बाबा आत्मदहन करतील. मी भ्याड आहे म्हणून मी हे आत्मदहन करणार नाही तर 'मेरा यह बेहुदा शरीर मेरे आत्माका और दिलका हुक्म नही मानता' म्हणून बाबांची अनेक चमकदार वाक्ये मला आवडतात पण समजत नाहीत, तसे या वाक्याचे पण झाले. समाजात एवढी विचित्र परिस्थिती असेल तर जिवंत राहणे हे पाप आहे असे साने गुरुजींच्यासारखे बाबांना काही तरी वाटले असणार असे वाटले. बाबांची पंजाब यात्रा अशी सुरू राहते. बाबा आतंकवाद्यांना भेटतात. रिबोलोनी ज्यांची फक्त नावे ऐकलीत, पण फोटोही पाहिलेले नाहीत अशा आतंकवादी नेत्यांना भेटतात. बरनाला आणि रे यांना तर बाबांच्या भेटीसाठी ताटकळत बसावे लागते.

बाबांची काश्मीर यात्रापण अशीच नाट्यमय घटनांत पार पडलेली असते. काश्मीर टाइम्स सांगतो त्याप्रमाणे बाबांनी तीस चाळीस हजारांच्या सभा घेतल्या. फारूक, फरुकची आई बाबांना भेटावयास गेल्या. फरुकची आईतर बाबांना पाहून गहीवरली. आणखी आपला विश्वास बसू नये अशी एक विलक्षण घटना घडली. -काश्मीर खोऱ्यामधील बाबांच्या सभेत 'भारत जोडो' या घोषणेला लोकांनी विरोध केला. सभेतून आवाज आला 'भारत जोडो' काय म्हणताय. 'हिंदुस्थान जोडो' म्हणा. आणि जमावाने एक मुखाने या घोषणेला प्रतिसाद दिला !

— आपणा सर्वांना उचंबळून यावे, गहिवरून यावे अशी ही घटना. पण राजधानी दिल्लीत गहिवरून वगैरे यावयास कोणाला वेळ नसतो. या साऱ्या घडणाऱ्या घटनांचा अर्थ असा आहे की बाबा आता राजधानीसाठी मोठे झालेत ! ते परत आल्यावर त्यांना भेटावयास हवे ! — लोक सगळीकडेच एकूण ग्रेट असतात. महाराष्ट्राला बाबांचे मोठेपण समजते त्यांना पु. ल. देशपांडे फौंडेशनकडून देणगी मिळते म्हणून ! दिल्लीला बाबांचे मोठेपण समजते या असल्या पंजाब-काश्मीरमधील घटनांमधून !

□

## चार

बाबा दिल्लीत परत आलेत समजल्यावर मी त्यांना अर्थातच फोन करतो. मी अजून आत्तापर्यंत बाबांना कधी भेटलेलो नाही. पण त्यांना झालेले पंजाबचे

दर्शन मला समजावून घ्यायचंय. बाबा 'आर के. पुरमला' त्यांचे भाऊ डॉ. सदाफळ यांच्याकडे उतरलेत. खरे पाहता डॉ. सदाफळ यांना पण मी अजून कधी भेटलेलो नाही. पण मला अगदी आश्चर्य वाटते. थोडा आनंदही होतो. माझा फोन आहे म्हटल्यावर सरळ बाबाच फोनवर येतात. बाबा म्हणतात, 'दाभोळकर, आपण अजून भेटलेलो नाही, पण मी तुमचे 'माणूस'मधील पंजाबवरचे व दिल्ली दंगलीवरचे लेख वाचलेत. तुमच्याशी भेटून सविस्तर बोलायला मला आवडेल. पण आज मला बरे नाही. छातीत दुखतंय. डॉक्टरांनी पूर्ण विश्रांती घ्यायला सांगितलंय. आज मधू दंडवते, स्पॅरो, गुजराल ही मंडळी तरीही येणार आहेत. उद्या बहुधा पंतप्रधानांना पण भेटावे लागेल. कारण चंदीगडहून मी निघण्यापूर्वीच फोन करून रे यांनी ती भेट नक्की केलीये. डॉक्टर काही म्हणाले तरी उद्या मला काम करावेच लागेल. तुम्ही असे करा, पहाटे चारला या. मी त्या वेळी उठतो. अगदी ताजातवाना असतो. मग निवांतपणे तीन-चार तास गप्पा मारू.'

मी सूर्यवंशी नाही, पण तरीही पहाटे चारला म्हटल्यावर माझ्या पोटात गोळा उठतो. खरे सांगायचे तर मी संघीय आणि सर्वोदयवादी मंडळींबरोबर फारसा हिंडत नाही ते त्यांच्या या लवकर उठण्याच्या सवयीमुळे! याबाबत साम्यवादी, समाजवादी वगैरे मंडळी माणसासारखी वागतात असे माझे मत आहे! त्यातून बाबा राहतात ते आर. के. पुरम् माझ्या घरापासून चांगले वीस-पंचवीस किलोमीटर्स दूर आहे, पण कन्याकुमारी ते काश्मीरपर्यंतचा सारा भारत शंकराचार्यांच्याप्रमाणे आपल्या एका मुठीत घेण्याचा प्रयत्न करणाऱ्या बाबांना मी दूर राहतो हे सांगण्याची मला हिंमत होत नाही.

दिल्लीत तशा कोणत्या बातम्या गुप्त राहत नाहीत. मी बाबांच्या भेटीला पहाटे चारला जाणार हे समजल्यावर वयोवृद्ध मराठी पत्रकार मो. ग. तपस्वी यांचा मला फोन येतो. मी पण तुमच्या बरोबर बाबांच्या भेटीला येतो. त्यांना व तुम्हाला चालत असेल तर जाताना वाटेत मलाही घेऊन चला म्हणून. माझा विश्वासच बसला नाही. तपस्वींनी वयाची साठी ओलांडलीये. एक वर्षापूर्वी झालेल्या जबरदस्त अपघातातून ते अजून सावरलेले नाहीत. वहान वगैरे चालवणे दूरच्या गोष्टी. ते अजून कुबडीचा आधार घेऊन चालतात आणि या परिस्थितीत पत्रकार म्हणून दररोज ते लोकसभेत जातात. मी म्हणतो, 'तपस्वी, माझी काहीच हरकत नाही. बाबांची पण नसावी. पण बाबा आठव्या मजल्यावर राहतात. त्या वेळी विज वगैरे नसेल. लिफ्ट बंद असेल.' तपस्वी म्हणाले, 'तुम्ही काळजी करू नका. तुमच्या आधाराशिवाय सावकाश आठ जिने चढून येईन. मी पत्रकार आहे आणि या क्षणी बाबांना भेटणे महत्त्वाचे

आहे. त्यांचे विचार समजावून घ्यायचेत. त्यांचे आम्हा मराठी पत्रकारांबद्दल काही गैरसमज झाले असल्यास ते दूर करायचेत – या गेल्या पिढीतील माणसांचे काही खरे नाही !

□

# पाच

पहाटे कसे उठावयाचे हा आता प्रश्न नव्हता. मला योग्य वेळी उठवायला न चुकता तपस्वींचा फोन येतो. भल्या पहाटे उठणे हा एक ताप असतो. पण पहाटे, भल्या पहाटे त्रिमूर्तीला वळसा घालून चाणक्यपुरीतून गाडी चालवणे हा एक अविस्मरणीय सुखद अनुभव आहे. दिल्लीत येणाऱ्या प्रत्येकाने एकदा तो घेऊन पाहिला पाहिजे. दिल्लीच्या भाजून काढणाऱ्या उन्हाळ्यातही दिल्लीत भल्या पहटे सुखद गारवा असतो. आपला आपल्या नजरेवर विश्वासच बसत नाही. आपण भारतात आहो असे वाटतच नाही. वॉशिंग्टन, पॅरिस, हॅंम्बूर्ग कोठे तरी आहोत असे वाटत असते. प्रशस्त रस्ते. रस्त्याच्या दोन्ही बाजूला रस्त्याएवढ्याच रुंदीच्या प्रशस्त हिरवळी. हिरवळीत फुललेले इंद्रधनुष्याशी पाठशिवणी खेळणारे फुलांचे ताटवे. दूरवर या देशावर नजर ठेवून असलेल्या निरनिराळ्या देशांतील राजदूतावासांच्या अत्याधुनिक प्रशस्त इमारती...

स्वप्नाप्रमाणे वाटणारा हा रस्ता बाजूला करून आम्ही आर. के. पुरमच्या बाजूला वळतो. येथे आता 'हियात रिजन्सी' या पंचतारांकित हॉटेलच्या जवळपास कोठे तरी बाबा राहतात ती इमारत आहे. आता या भल्या पहाटे कोणाला भेटायचे आणि कोणाला विचारायचे. पण पुन्हा एकदा स्वतःवर विश्वास बसला नाही. समोरून तीस-चाळीस सायकलस्वारांचा जथा या भल्या पहाटे येतोय. ही सारी 'आय्. आय्. टी. दिल्ली' आणि 'ऑल इंडिया इन्स्टिटयूट ऑफ मेडिकल सायन्स'मधली मुले आहेत – बाबा आलेत समजल्यावर भल्या पहाटे बाबांचे दर्शन घ्यावयास आलीत. त्यांच्यातील एकजण सायकलवरून गाडीला मार्गदर्शन करीत घर दाखवायला येतो ! या देशातील तरुणांचा बाबांच्यावर विश्वास आहे. बाबांचा तरुणांच्यावर विश्वास आहे – आणि हे असे तरुण आणि बाबांसारखी माणसे जोवर या देशात आहेत तोवर या देशाला काही फारशी भीती नाही, असे म्हणून तुम्हाला आणि मला निवांतपणे टिवल्या-बावल्या करीत बसावयास काही हरकत नाही !

□

# सहा

बाबांच्या घराचे दार उघडल्यावर मी पटकन बाबांच्या कॉटवर त्यांच्या पायाशी जाऊन बसलो आणि त्यांच्या पायावर डोके ठेवून त्यांना नमस्कार केला. म्हटले तर साधी म्हटले तर मोठी अशी ही घटना. पण प्रथम सांगून ठेवली पाहिजे. नाहीतर कोणी सांगावे मराठी पत्रकार बाबांच्या पाया पडले अशी बातमी यायची. त्यावर अग्रलेख वगैरे यावयाचे. आणि त्यामुळे पुन्हा एकदा बाबांना आणि त्यांच्यामुळे आपणाला प्रसिद्धी मिळावयाची, खरे सांगतो विचार पटण्या न पटण्याचा प्रश्न नसतो. नानाजी देशमुख, नानासाहेब गोरे, मित्राचे वृद्ध आईवडील यांना भेटले की त्यांच्या पायाला हात लावून वंदन करावे असे वाटते. ही आपल्या संस्कृतीमधील एक चांगली गोष्ट आहे आणि तसा नमस्कार केल्याने आपलाच सन्मान होतोय असे मला वाटते.

पण मी बाबांचे पाय पकडून त्यांच्या पायाशी बसलो याला आणखीहीं एक कारण होते. बाबा-राजीव भेटीचा किस्सा मला माहीत होता. म्हटले बाबा चुकून उभे वगैरे राहिले तर घ्या काय. आपला अगदी चक्क राजीव व्हावयाचा ! – रहा आपले तीन चार तास उभे !

संभाषणाची सुरुवात आता कोठे तरी करावयास हवी. मी म्हणालो, ‘ बाबा तुमचे या यात्रेचे काही अनुभव ? ’ बाबा म्हणतात ‘ अरे माझे कसले अनुभव ? पंजाबात जे सांगितले तेच तुला सांगतो, मला सभेत वगैरे बोलता येत नाही हे मला माहीत आहे. कारण गेल्या चाळीस वर्षांत मी सार्वजनिक सभांत भाषण दिलेले नाही. आनंदवनात तरुणांशी काय बातचित केली असेल तेवढीच. मी कोणाचाच टिळा न लावलेला माणूस आहे. मी यापूर्वी बनारस वाराणसीला गेलो नव्हतो. तुमचा विश्वास बसणार नाही पण मी अजून साबरमती आश्रम पाहिलेला नाही. एकाही सर्वोदय संमेलनाला गेलेलो नाही – गेल्या चाळीस वर्षांत स्वतःची ‘ वस्ती ’ सोडून मी मुळी बाहेरच पडलेलो नाही. ’ ....

मी म्हटले ’ ‘ बाबा तुम्ही प्रथमच ‘ वस्तीबाहेरचे जग ’ पाहिलेत. हे जग कदाचित तुम्हाला तुमच्या वस्तीपेक्षा अधिक भयानक वाटले असेल. त्यांना या क्षणी तुमच्या वस्तीपेक्षा आधाराची अधिक जरूरी आहे असे वाटले असेल. पण मला त्याबाबत तुमच्याशी फारसे आत्ता बोलावयाचे नाही. एकतर यात्रा तुम्ही वा तुमच्या बरोबरचे आम्हा सर्वांसाठी सविस्तर लिहितील, पण गेल्या काही दिवसांत काश्मीर पंजाबमध्ये तुम्ही जे पाहिलेत ते सर्वांच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. म्हणूनच काल तुम्हाला बरे नसतानासुद्धा मेजर जनरल स्पॅरो, नंदकुमार

गुजराल, खासदार मधू दंडवते तुम्हाला भेटावयास आले. काही खास बोलणी झाली का?'

बाबा म्हणतात, 'अरे बोलणी वगैरे कसली? मी खरोखरच परत आलोय का? धड परत आलोय का हे पहावयास ते आले होते. बरनाला नंतर दुसऱ्या क्रमांकावर गुजराल, स्पॅरो वगैरेंची हिट लिस्टवर नावे आहेत. ते घाबरलेले असले तर त्यात नवल काही नाही. मी पंजाबात हिंडून परत आलोय याचेच त्यांना आश्चर्य वाटत होते. बाबा पंजाब केसरीचा चार दिवसांपूर्वीचा अंक काढतात, म्हणतात यातली ही बातमी वाचलीस, अलीगडहून पंजाबची पाहाणी करण्यासाठी सायकलवरून जाणाऱ्या १५ जणांचा जथा परत फिरला. पंजाबची परिस्थिती फार गंभीर व धोकादायक असल्याने लालकृष्ण अडवानी यांनी त्यांना परत जायला सांगितले.'– हे लोक असे का करतात मला समजत नाही. यामुळे गंभीर परिस्थिती अधिक गंभीर होते. आधी निघावयाचे नाही. निघाले तर परत हटावयाचे नाही. अरे हा देश आपला असेल तर आपण कुठे आणि कसे न जाता रहाणार आहोत आणि एका विभागात असुरक्षित आहे म्हणून एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी स्थलांतर करणार आहोत?

काल त्या लोकांना सांगितला तो मला काश्मीरमधे आलेला विलक्षण अनुभव सांगतो. काश्मीर खोऱ्यात मी सर्वत्र हिंडलो. अनंतनागपासून आत सर्वत्र झाली ती गोष्ट फार वाईट झाली. हा काश्मीरवरचा कलंक आहे म्हणून सारे जण सांगतात. अगदी फारुकपासून हमालापर्यंत सारेजण. पण आपणही गोष्टी वाढवत असतो. मी अनेक हॉस्पिटलमधून हिंडलो. अनेक घरांना भेटी दिल्या. या दंगलीत संपत्तीची हानी खूप झाली. पण एकही माणूस दगावलाच काय पण दुखावलाही गेला नाही. रक्ताचा एकही थेंब सांडला नाही आणि एकही अत्याचार झाला नाही पण मी तुला सांगत होतो ती गोष्ट वेगळी आहे. तुम्ही काश्मीरमधून स्थलांतर करणार का म्हणून विचारल्यावर साऱ्यांनी मला वेड्यातच काढले. पंडीत जीयाराज मातंड यांनी तर मला उत्तर म्हणून एक कविताच लिहून दिली. बाबा एक वही उघडून ती कविता माझ्या हातत देतात. बाबा म्हणतात मधू दंडवतेंना ही कविता फार आवडली. त्यांनी ती लिहून घेतलीय. बहुधा लोकसभेत वगैरे म्हणून दाखवतील. कविता झाडाची पाने आणि पक्षी, यांच्यातील संवादाची आहे.

आग लगी एक वृक्षको
जलन लगे सब पान
तुम क्यो नहीं उडते पंखी
पंख तुम्हारे साथ!

-फल फुल खाये इस वृक्षके
वीख भरे सब पान
उडना हमारा धर्म नहीं
जल मरना इसके साथ !

सारे झाड पेटलंय. पाने जळायला लागलीत. जळणारी पाने झाडावरील पक्षाला म्हणतात, तुझ्याकडे तर पंख आहेत तू उडून का जात नाहीस ? पक्षी सांगतोय, मी आणि तुम्ही वेगळे कुठे राहिलोय ? मी पण या झाडाचाच एक भाग बनलोय, अशा वेळी या झाडाला सोडून जाणे माझ्या धर्माने मला शिकवलेले नाही !

–मी म्हणतो बाबा मला नेमके हेच हवंय. पंजाबमधे पण तुम्हाला हीच भावना आढळली का ? हेच सारे जाणवले का ? नक्की काय वाटले ते समजावून घ्यायचंय.

□

# सात

बाबा म्हणतात, ' पंजाबची परिस्थिती गंभीर आहे भयंकर आहे. स्फोटक आहे. फाळणीच्या वेळी, त्यापूर्वी वा त्यानंतरही कधी या देशातील एखाद्या विभागात एवढी गंभीर परिस्थिती नव्हती. या देशाच्या इतिहासातील हा एक अगतिक क्षण आहे. हा प्रश्न समजावून घेण्याची, बघण्याची, विचार करण्याची व हिंमत दाखवण्याची कधी नव्हे एवढी या क्षणी जरूरी आहे. आणि याबाबत सारा अंधार आहे. मी पंजाबात जाणार म्हणून ही मंडळी काळजी करत बसतात आणि नंतर मी खरेच सुखरूप परत आलोय का ते पहावयास हे लोक येतात !

अरे किती नावे सांगू. अर्जुनसिंग अरोरा, रिटायर्ड एअर चीफ मार्शल वगैरे मंडळी प्रथम माझ्याबरोबर पंजाबात येणार होती. नंतर हे लोक आले नाहीत. मी याचा उल्लेख केला ना त्यावेळी आतंकवादी खळाळून हसले. उपहासाने म्हणाले...काय म्हणाले सांगू तुला, शब्द फार वाईट आहे...

मी म्हटले, ' बाबा, मी कोणताच शब्द वाईट मानत नाही. मर्ढेकर, पु. शी. रेगे नवकविता, तुकाराम यांच्यावर प्रेम करीत वयात आलोय ! त्यांनी जो शब्द वापरला तो जरूर सांगा. तो शब्दाशी इमान राखून लिहीन. तो तसाच छापून येतोय हे पाहीन. बाबा म्हणाले, आतंकवादी म्हणाले हे लोक गांडू

आहेत ! आमच्या हिटलिस्टवर नाव आले त्याच दिवशी दिल्लीत हे लोक चळचळा कापत असतील. पोलिसांचे वा सैन्याचे संरक्षण घेऊनसुद्धा पंजाबात नुसते पाउल टाकण्याची यांची हिंमत नाही.

तपस्वी म्हणाले, ' मी हा शब्द लिहीत नाही म्हणून वापरला नाही. पण पंजाबच्या संदर्भात अनेकांनी अनेक वेळी हा शब्द वापरलाय. अगदी परवाची गोष्ट सांगतो. माझा जवळचा पत्रकार मित्र चावला हा स्वतः शीख आहे. इंडियन एक्सप्रेस आणि पंजाब केसरीसाठी लिहितो. अकालींनी ज्या वेळी आपले सरबत खालसा अनंतपुरला हलवले त्या वेळी त्याने नेमका हाच शब्द वापरला होता. आज आतंकवादी पुन्हा किती लोक मारताहेत हे महत्त्वाचे नाही. आतंकवादी जोपर्यंत सुवर्णमंदिरात आहेत तोवर त्यांची ताकद कमी न होता दररोज वाढत जाईल हे महत्त्वाचे आहे.'

मी म्हटले, ' बाबा या सुवर्णमंदिराच्या संदर्भात तर तुम्ही फार पुढे गेलाय असे उडत उडत ऐकलंय. तुम्ही सांगितले ' या देशात दुसरे ' ब्ल्यूस्टार ' झाले तर बाबा आत्मदहन करतील यावर विश्वास ठेवा. — बाबा, तुम्ही खरेच असे अमृतसरला म्हणालात का ? याबाबतची तुमची नक्की भूमिका काय आहे ?

बाबा म्हणाले, ' मी असे प्रथम अमृतसरला म्हटले. त्यानंतर पंजाब व काश्मीरमध्ये पण प्रत्येक ठिकाणी हेच सांगितले. मी पंजाब आणि काश्मीर मधे ' इन्स्टंट हिरो ' बनलो. पण हा असा हिरो बनण्यासाठी मी हे वाक्य वापरले नाही.-या देशात कोणत्याही धार्मिक स्थानात सैन्य घुसले तर हा बाबा आत्मदहन करेल म्हणून मी सांगितले. पण हे आत्मदहन म्हणजे भ्याडाचे आत्मदहन नसेल. '

--मी म्हटले बाबा, म्हणजे काय हेच मला नीटपणे समजलेले नाही. बाबा म्हणाले, ' सांगतो. मी सांगितले, मी आत्मदहन करेन कारण... किंवा

" My Soul is imprisoned in my most disobedient body. Please God make my body my friend ...

" मेरा बेहुधा शरीर मेरे आत्माका, और दिलका हुक्म नहीं मानता..."

बाबा तेच वाक्य मराठीत सांगण्यापूर्वी मी बाबांना थांबवले. आजकाल आम्हा मराठी माणसांना मराठीपेक्षा हिंदी आणि इंग्रजीच अधिक चांगले येते आणि समजते व आवडते. म्हटले बाबा तुमचे हे वाक्य मला या दोन भाषांमधूनही त्यामुळे समजलंय ! त्यातून पु. ल. देशपांडेंना जेवढ्या सहजपणे विनोद सुचतात, पाडगावकरांच्या ओठावर जशी नकळत कविता येते, तशी

तुमच्या बोलण्यातून चमकदार वाक्ये बाहेर पडतात हे मला माहीत आहे! पण खरे सांगतो मला हे वाक्य, वाक्य म्हणून आवडलंय. पण त्यातून काहीही अर्थबोध झालेला नाही. पण तुमचे हे वाक्य पण वाचकांच्या पर्यंत पोचवतो- कवीला अभिप्रेत असलेला अर्थ सोडून बाकी इतर सर्व अर्थ नवकवितेतून बाहेर पडतात हे मला माहीत आहे '

तपस्वी म्हणाले, ' बाबा, ' ब्ल्यूस्टार ' वाईट. त्यामुळे साऱ्या प्रश्नांचा गुंता सोडवता येणार नाही इतका वाढला हे खरे. पण आतंकवाद्यांनी सुवर्ण-मंदिराचे शस्त्रागार आणि खुनाची फर्माने सोडणारे स्थान बनवले म्हणून ऑपरेशन ' ब्ल्यूस्टार ' आवश्यक बनले हे कसे विसरता येईल ?

– बाबा म्हणाले, ' मी प्रत्येक ठिकाणी ते पण सांगितलंय. अगदी आतंक-वाद्यांना पण सांगितले. दिल्ली-दंगलीचा निषेध करीत आम्ही त्याच्या संपूर्ण चौकशीची मागणी केली नाही व ब्ल्यूस्टारचा निषेध केला नाही. त्याचबरोबर पंजाबमधील व भारतभरचे शीख भिंद्रनवालेच्यावर प्रेम करीत त्यांना मदत करत होते त्यांनी त्यावेळी त्याचा निषेध करणे जरूरीचे होते हे पण मी सांगितलंय. '

मी म्हटले, बाबा, हा सांगण्या न सांगण्याचा प्रश्न नाही. ऑपरेशन ब्ल्यू स्टार या देशात पुन्हा झालेतर तुम्ही आत्मदहन करणार आहात. पण एखाद्या धार्मिक स्थानाचे शस्त्रागार वा कुंटणखाना बनविण्याचे प्रयत्न झाले तर त्या-वेळी तुम्ही काय करणार आहात ? त्यावेळी तुम्ही काय करणार हा प्रश्न आहे. कारण ' ब्ल्यूस्टार ' मग त्यातून पुढे अपरिहार्य बनते.

बाबा म्हणतात, ' माझी भूमिका जरा नीटपणे समजावून घे. ' – स्वातंत्र्या-नंतरचा या देशाचा इतिहास असा आहे की कोणत्याही कारणाने कोणत्याही विभागात एकदा सैन्य गेले की ते तेथून परत येत नाही. काश्मीर, मिझोराम, नागा, पंजाब ही त्याची उदाहरणे आहेत. या देशाची एकात्मता व लोकशाही टिकवावयाची असेल तर कोणत्याही कारणाणे कोठेही सैन्य बोलावता कामा नये. धार्मिक भावनात ढवळाढवळ करण्यासाठी तर मुळीच बोलावता कामा नये. धार्मिक स्थानांचा जेव्हा सर्वप्रथम दुरुपयोग होतो त्यावेळी तो कायदा व सुव्यवस्था यांचा प्रश्न असतो व तो तसा कणखरपणे सोडवला पाहिजे.

मी म्हणालो, ' बाबा, तुम्ही हे असे विधान का केलेत ते मला अजूनही समजलेले नाही. पण ' इन्स्टंट हिरो ' बनण्यासाठी तुम्ही हे विधान केले असेल असेपण मला वाटत नाही. तुम्ही पंजाबात ते सगळीकडे पाहिलेत, सर्वसामान्य माणसांशी जो संवाद साधलात त्याची अपरिहार्य प्रतिक्रिया म्हणून

हे वाक्य बाहेर आले. आणि त्यामुळे तुम्ही पंजाबमध्ये काय पाहिलेत. काय संवाद साधलात ते समजावून घ्यायचंय.'

□

# आठ

बाबा म्हणतात, ' मी पंजाबात फक्त हिंसा आणि विध्वंसच पाहिला नाही तर दुभंगलेली मने आणि भेदरलेली माणसे पाहिली. दोन तीन उदाहरणे सांगतो. मी बटाल्यापासून पुढे 'हाय वे 'वर भिंड्रनवाल्यांचा गावाजवळ कुठेतरी होतो. त्या राजरस्त्यावर स्पॅरोच्या नावाची एक पाटी लावलीये. ६५ सालच्या युद्धात त्याने केलेल्या कामगिरीची गौरवगाथा म्हणून. त्या पाटीवर आता डांबर फासलंय. जवळच खलीस्थानची घोषणा करणारी पाटी लावलीये. जवळपास सहजपणे विशीतले शीख तरुण उभे असतात. सांगतात हिंमत असेल तर सैन्य घेऊन सुद्धा ही पाटी काढून दाखवा. रक्ताचा सडा पाडू. उद्या पुन्हा नवी पाटी इथे वा तिथे उभारू. तुम्ही स्पॅरोच्या शौर्याचा गौरव करणारी पाटी लावलीत तर पुन्हा त्यावर डांबर फासू. हे तर तसे काहीच नाही, बटालात हात तुटलेला गांधीजींचा पुतळा उभा आहे. रात्र झाली की रस्त्यावरची सहदारी ठप्प पडते. मी फिरोजपूरहून रात्री निघणार होतो. कलेक्टरने मला खूप सांगून पाहिले. नंतर म्हणाला बरे, जाणार तर जा. पण बरोबर तलवारी बंदूका वगैरे किती आहेत? मी म्हटले ' माझ्याकडे बंदूक वगैरे राहू देत. साधे बॉल पेन सुद्धा नाही. मला त्याचाही उपयोग नाही कारण I am a man with frozen arms आणि मी तलवार घेऊन हिंडतोय अशी सर्वसामान्य पोलिसांची खरेच कल्पना झाली होती. कारण प्रत्येक गुरुद्वारात मला प्रेमाचे प्रतीक म्हणून तलवार आणि पागोटे दिले जात होते! ते असो. पण तुम्ही शस्त्राशिवाय हिंडत आहात निर्भय आहात याचा आतंकवादी, सरकार, सर्वसामान्य जनता यांच्यावर खरेच चांगला परिणाम होतो. सर्वसामान्य लोक आणि आतंकवादी मला सांगत होते. येथे पंजाबात तीन प्रकारचे करफ्यू आहेत. एक सरकारन लावलेले, दुसरे जनतेने पुकारलेले, तिसरे आतंकवाद्यांनी सांगितलेले. -- पण बाबा तुम्ही कोठेही जा आणि कोठेही सभा घ्या तुमच्यासाठी हे तिन्ही करफ्यू उठवले जातील.

या निर्माण होणाऱ्या विश्वासाचा फायदा असा असतो की त्यातून संवाद साधता येतो. मी एकदा राजभवनात का कोठेतरी सरकारी पाहुणचार घेत होतो. भोवतालचे कडे पहारे चुकवीत सैन्यातला एक सेवानिवृत्त माणूस

माझ्याकडे आला. त्याचे नाव त्याचा दर्जा माझ्यादृष्टीने महत्त्वाचा नाही. तो म्हणाला ही पहा माझी शौर्यपदके, हा पहा चार वर्षे मी तुमच्या देशाचा गुप्तहेर म्हणून परदेशात काम केल्याचा पुरावा. आणि आज या देशात आमच्याकडे सर्वत्र संशयाने पहाताय !- मंत्र्याच्या नातेवाईकांना, मुलांना, सर्व मिळतंय. आमच्या मुलांच्याकडे मात्र आतंकवादी म्हणून पाहिले जातंय. या देशात फक्त आमच्या धर्मस्थानावर मानबिंदूवर हल्ला होतोय. माझी ही सर्व पदके दिल्लीत परत द्या आणि त्यांना सांगा की मला वाटतंय मी फितूर (Desertee) असतो तर ते अधिक चांगले झाले असते. त्याचे हे बोलणें ऐकून मला खूप धक्का बसला. पण त्याला मी म्हटले, 'तुझी वेदना मी समजतो. तुझ्यावर अन्याय झाला हे पण मी एकवेळ मानतो पण तू ही फितूरीची भाषा करतोस त्यावेळी व्यभिचार करतोस. हे सीतामाईने रामाने अन्याय केला, किंवा रामापेक्षा अधिक चांगला दिसणारा वा वागणारा माणूस दिसल्यावर मांझे त्याच्याशी लग्न झाले असते तर बरे झाले असते असे म्हणण्यासारखे आहे! जीवनात काही मूल्ये, काही निष्ठा आपण स्वीकारायच्या असतात आणि त्यांच्याशी तडजोड करता येत नाही हे मानावयाचे असते. राष्ट्रप्रेम, जीवन-मूल्यांवरचे प्रेम या अशा गोष्टी असतात.

आणि दाभोळकर चांगली गोष्ट अशी की चिडलेल्या माणसांना ही भाषा, हे विचार पटतात. त्याहूनही सर्वात महत्त्वाची जमेची बाजू अशी की खेड्या-पाड्यात, आजवर सर्वत्र अजूनही बंधूभाव, ओलावा बाकी आहे. शेतकरी, कामकरी, वृद्ध बाया त्यांची व्यथा मला सांगत. त्या म्हणत, 'बाबा या बिघड-णाऱ्या वातावरणाचा सर्वांत अधिक त्रास आम्हाला होतोय. आठ दहा वर्षांची नात वा नातू शाळेतून आल्यावर दादी माँला विचारतात! दादी माँ, हिंदू बुरे होते है क्या? तो क्या मेरी नानी और नाना बुरे है?' – त्या शेतकरी बायाच मला समजावून देत बाबा, 'हिंदू शीख' हे एकाच शरीराचे दोन डोळे आहेत. – मग मी त्यांना प्रश्न विचारे. हे शरीर आज असे का झालंय? – एक डोळा एकीकडे पाहतोय दुसरा दुसरीकडे, एक पाय एका गावाला चाललाय दुसरा पाय दुसऱ्या गावाला. आणि दोन हात तर फक्त आपापसात भांडण्यातच गुंतलेत. हे असे का करताय? – माझे महारोगी सुद्धा या असल्या अभद्र शरीरापेक्षा अधिक धडधाकट आहेत!' – माझ्या या अशा प्रश्नावर मात्र त्या बाया गप्प बसत. पण त्यांचे ते मौन शब्दापेक्षा अधिक बोलके असे. त्यांची वेदना त्यांचे डोळे सहजपणे बोलून जात. त्यांना बोलायचे असूनही बोलता येत नसे. त्या पण आतंकवाद्यांना घाबरलेल्या आहेत. त्यांच्या दडपणा-खाली आहेत. हे सहजपणे जाणवे. पण या सर्वांहूनही खेड्यात आजवर हिंदू

शीखांत असलेले प्रेम, बंधुभाव परस्पर विश्वास सहजपणे जाणवत असे. -पंजाबात अजूनही कृपाण आणि त्रिशुळ यांची आपापसांत लढाई झालेली नाही हे महत्त्वाचे आहे.

तपस्वी न राहवून मधेच म्हणतात, ' बाबा, हिंदू शीख जातीय दंगलीचे रूप पंजाबात अजून अजिबात आलेले नाही. मध्यंतरी संघस्थानावर आतंकवाद्यांनी हल्ला केला आणि त्यात एक स्वयंसेवक मरण पावला अशी बातमी आली त्यावेळी आम्ही दिल्लीतील काही लोक म्हणून कमालींचे अस्वस्थ झालो होतो. पण आम्ही लगेच चौकशी केली आणि ती बातमी चुकीची आहे हे समजले. आतंकवाद्यांनी मैदानात जाऊन सरेआम गोळीवार केला. त्यांना हिंदू शीख दोघांनाही मारायचे होते. आजवर आतंकवाद्यांनी तेच केलंय. पण त्याच मैदानात संघाची शाखा पण एका कोपऱ्यात भरत असे. हा अत्याचार सहन न होऊन त्यांना विरोध करण्यासाठी आणि जमेल तेवढया लोकांचे प्राण वाचविण्यासाठी संघस्थानावरचा एक स्वयंसेवक मध्ये घुसला आणि शहीद झाला. – संघ, भा. ज. प. यांनी पण या घटनेचे अजिवात भांडवल केले नाही. '

– बाबा म्हणाले, ' मी हेच सांगतोय. आज पंजाबात कोणतीही किंमत मोजावी लागली तरी चालेल. पण कृपाण आणि त्रिशूळ एकमेकांशी भिडता कामा नयेत. ते अजिबात होता कामा नये. हे जर चुकूनही झाले तर मग मात्र तुम्ही अजिबात घाबरू शकणार नाही अशा एका टोकाला जाऊन पंजाब उभा राहील.

मी म्हटले, ' बाबा, तुमचे म्हणणे मला संपूर्णपणे पटते. पण या देशाच्या दुर्दैवाने कृपाण आणि त्रिशुळ यांची लढाई होणारा तो दिवस फार पुढे ढकलता येणार नाही असे मला आता वाटते. कारण परिस्थितीची सर्व सूत्रे आपण सारेजण आज अगतिकपणे आणि कारण नसताना आतंकवाद्यांच्या हातात देऊन बसलोय. त्यामुळे आतंकवाद्यांच्याबद्दल तुम्हाला काय अनुभव आला ? त्यांना काय हवे आहे ? त्यांच्याबद्दल तुमचे काय मत बनले ? या सर्वांची माहिती तुमच्याकडून हवी आहे.

□

## नऊ

बाबा म्हणाले, ' मी दोन प्रकारच्या आतंकवाद्यांना भेटलो. एक आज तुरुंगात असलेले आतंकवादी. दुसरे आज तुरुंगाच्या बाहेर असलेले, रिबेलोच्या

हिट लिस्ट वर नाव असलेले आतंकवादी. तुरुंगात असलेल्या आतंकवाद्यांच्या बरोबर चर्चा करताना अर्थातच थोडा अधिक मोकळेपणा होता. यांत मेजर जनरल सारखे कैदी आहेत. हे कमालीचे देखणे, उमदे लोक आहेत. त्यांच्या बोलण्यात ऋजुता, मार्दव आहे. वागणुकीत एकूण सभ्यपणा जो म्हणतात तो संपूर्ण भरलाय. पण या तुरुंगातल्या आतंकवाद्यांना काय म्हणायचंय ते यापूर्वी काही जणांनी काही ठिकाणी लिहिलंय. पण मी तुरुंगाबाहेरच्या आतंकवाद्यांना भेटलो तो प्रसंग मात्र...' बोलता बोलता बाबा स्वतःतच हरवून जातात. बाबांच्या आयुष्यातसुद्धा कायम अस्वस्थ करू शकणारी एक आठवण म्हणून तो प्रसंग जणू वज्रलेप झालाय. – बाबा काही क्षण असेच स्वतःत हरवून बसतात, नंतर भोवतालच्या आम्हा सर्वांना विसरून, संपूर्णपणे स्वतःतच बुडालेले बाबा, कुठेतरी शून्यात एकटक नजर लावून बोलू लागतात...

'मी त्या तरुणांना भेटायला गेलो त्यावेळची गोष्ट. तरुण, कोवळी, देखणी, निश्चयी पोरे हातांत तलवारी घेऊन उभी होती. म्हटले, 'बाळांनो ही तलवार कशाला ?' त्या साऱ्या मुलांना गुरुग्रंथसाहेब पाठ आहे. त्यातील प्रत्येक वचन माहीत आहे. ती मुले सांगतात, हे आम्हाला आमच्या श्रीगुरुग्रंथसाहेबने सांगितलंय. 'इतर सारे मार्ग संपतात त्या वेळी शीख बंदा तलवार उपसतो. तलवार हमारा पीर है हे सारे गुरुग्रंथसाहेबात आहे. तुमच्या माओने हे सारे फार नंतर सांगितलंय.'

मी म्हणतो, 'ते सारे खरे पण ही मित्रांना भेटण्याची, भावांना भेटण्याची पद्धत नाही. मी निःशस्त्र आहे. आणि तलवार कोणाला दाखवता ? हे माझ्या खांद्यावरील आणि पाठीवरील तलवारीचे घाव बघा. हम भी पवन पर चलते हैं आगमें जलते हैं'— मुले म्हणतात 'बाबा म्हणूनतर तुम्हाला भेटायला बोलावले. आप नहीं डरते. हम भी नहीं डरते, हम उसके बंदे हैं. तुम्ही पण त्याचेच बंदे आहात. घट्ट एक अजब दोस्ताना है. पण तुमी आम्हाला भेटायला आलाय आम्ही आतंकवादी आहोत म्हणून. प्रथम आतंकवादी म्हणजे काय ते आम्हाला समजावून द्या. अगदी 'युनो'ने सुद्धा अजून आतंकवाद्यांची व्याख्या केलेली नाही. तुमची व्याख्या काय आहे हे जरा समजू देत. मी म्हटले, मी व्याख्या करतो. फार चांगल्या करतो, पण व्याख्यांच्या चौकटीत मी मानवी जीवन आणि माणसांचे वागणे कधी बंदिस्त करत नाही. पण मला एक सांगा, आडवाटेने बसमधून जाणाऱ्या उतारूंना तुम्ही अडवलेत. त्यांतील एका धर्माच्या १५ उतारूंना बाजूला केलेत. त्यातील एकजण तर रडून ओरडून तुम्हाला सांगत होता, माझी मुलगी हॉस्पीटलमधे अत्यवस्थ आहे. डॉक्टरांनी ही चिठ्ठी

लिहून दिलीये. ती औषधे घ्यायला मी चाललोय. किमान त्या मुलीला ही औषधं पोचवा. पण अजिबात दया माया न दाखवता बंदूकीतून गोळ्या सुटल्या. मी याला आतंकवाद सुद्धा म्हणत नाही. मी याला कायरता म्हणतो ! '– ती मुले क्षणभर स्तब्ध होतात. अस्वस्थ होतात. मग म्हणतात, ' बाबा, हे आम्ही केले नाही. आमच्यापैकी कोणीच केले नाही. आम्ही मजहबी आहोत. आम्हाला बदनाम करायला हे सरकारने केलंय. तुमच्यापैकी कोणीतरी केलंय किंवा असे का समजत नाही तुमच्या आमच्या मधे फूट पाडायला एखाद्या परकीय शक्तीने हे केले असेल ! '

मी म्हटले, ' मी तुमचे हे म्हणणे मानतो. पण माझ्या दुसऱ्या एका प्रश्नाचे उत्तर द्या. काल माझ्या सभेत तुमच्या ' ऑल इंडिया शीख स्टुडंट्स फेडरेशनने ' एक हजार पत्रके वाटली. त्यांतील मी आणलेले हे एक पत्रक पहा. या पत्रकात बरनालांना आव्हान आहे. आज तुमचे नाव हिट लिस्टवर पहिल्या क्रमांकाने आहे. पण तुम्हाला आमचा नेता मानून आम्ही तुमच्या मागे कायमचे उभे राहू. पण ' अवर शीख नेशन इज इन बॉन्डेज इन इंडिया ' त्याला मोकळे करायला पुढे या. तुमच्या नेत्यांच्या या पत्रकावर सह्या आहेत. आणि तुमच्या नेत्यांच्या सह्या करावयाची आणि त्यांच्या नावाने पत्रके वाटायची आज पंजाबात कोणा-तही हिंमत नाही. खरे सांगतो हे पत्रक वाचले त्यावेळी तुम्हाला भेटावयासच येऊ नये असे मला वाटत होते. शीख राष्ट्र हिंदू राष्ट्राचे गुलाम आहे असे मानणाऱ्यांना भेटायचे कशाला ? '– पुन्हा क्षणभर सन्नाटा पसरतो. शांतपणे मुले म्हणतात, ' गुस्सेमे आये इसलिए लिख दिया ' त्याचे येवढे काय मनावर घेता. पण आम्हाला एक सांगा काश्मीरला तुम्ही ३७१ कलम देता मग आम्हाला तुम्ही ते का देत नाही ? लालडेंगाशी बोलणी करता मग आमच्याशी बोलणी का करत नाही ? आम्हाला प्रत्येक ठिकाणी ही वेगळी वागणूक का ? मी त्या तरुणांना ' लॉयल्टी टू लाइफ लॉयल्टी टू नेशन ' म्हणजे काय हे मला जमेल तसे समजावून सांगण्याचा प्रयत्न करत होतो. पण डमडम तक्ताजवळ एका जिन्यावर उभे असलेले ते सात आतंकवादी मात्र मला अजूनही आठवतात. ते सांगत होते रिबेलोच्या ' हिट लिस्ट ' वर आमचे नाव आहे. गुरुग्रंथ साहेब ढुंगणाखाली घेऊन बसतात म्हणून आम्ही निरंकारींना मारले. –डमडम तख्ता-जवळ याच जिन्यावर कुठेतरी ' डी आय जी 'चे रक्त सांडलंय. आम्हा सात जणांना पण एकदा मारले जाईल. पण सात मेले तर त्यातून सत्तर निर्माण होतील सत्तर मारले गेले तर त्यातून सातशे, सातशेतून सात हजार आणि सात हजारातून सत्तर हजार –आणि सत्तर हजार मरतील त्यावेळी खलीस्तान आपोआप निर्माण झालेले असेल ' मी उभा असे म्हणून हे आतंकवादी पण उभे असत. हे असे

बोलणे तीन चार तास चालले. मला शरीरविधी करताना पण बसता येत नाही. त्यामुळे मी पाणी पण कमी पितो, पण मी दमलो असेन, थकलो असेन म्हणून ती मुले प्रेमाने खडीसाखर तोंडात घालत. म्हणत हा पण एक अजीब दोस्ताना.

□

# दहा

–स्वतःतच हरवलेल्या बाबांना त्यातून बाहेर आणणे जरूरीचे आहे. मी म्हटले, ' बाबा तुम्ही जे सांगितले ते सारे मला समजलंय. त्या मागचा आशय समजलाय, पण त्या मुलांनी काय सांगितले हे मला नकोय. जगातील प्रत्येक यशस्वी माणूस समोरचा माणूस बोलताना त्यातील खरे किती खोटे किती हे क्षणार्धात मनाशी ओळखत असतो. तुम्हाला मी एक यशस्वी, अनुभवी माणूस म्हणून ओळखतो. त्या तरुणांनी आम्ही ते बस उतारूंचे खून केले नाहीत असे म्हटले. त्यांचे बोलणे, त्यांचे त्यावेळचे चेहरे यावरून ते तरुण खरे बोलताहेत असे तुम्हाला वाटले का ?

बाबा क्षणभर शांत बसतात. मग म्हणतात, ' मला तसे वाटले नाही. ते खून या तरुणांनीच केले असणार. मी रिबेलोशी पण सविस्तर बोललो. त्याच्याकडे या तरुणांची नावे आहेत. त्यांचे फोटो नाहीत. ते तरुण कसे दिसतात हे माझ्याकडून समजले तर तो पहात होता. पण तो म्हणाला, ' बाबा, मी या तरुणांना पाहिलेले नसले तरी त्यांचे टेप केलेले आवाज माझ्याकडे आहेत. कोणाला, कोठे व कोणत्या ठिकाणी उडवायचे, त्याच्या सूचना यातील कोण देतो हे मला माहीत आहे. दाभोळकर, म्हणून या तरुणांशी बोलताना ' धर्मासाठी मरणे सोपे आहे धर्मासाठी जगणे फार कठीण आहे हे मी समजावून देण्याचा प्रयत्न करत होतो. आणखी एक गोष्ट सांगतो. प्रथम ते तरुण ह्या पत्रकाबाबत ' गुस्सेमें आया लिख दिया ' म्हणाले त्यावेळी मी त्यांना म्हणालो. आता राग जरा शांत करा आपण सर्वजण मिळून एक पत्रक काढूया. या देशात आम्ही हिंदू, शीख, मुसलमान, ख्रिश्चन सर्व जग भावाभावाप्रमाणे प्रेमाने राहू इच्छीतो असे लिहून त्यावर आपणा सर्वांच्या सह्या करूया. प्रथम ते तरुण तयार झाले. बाबा ते पत्र काढून मला दाखवतात. हे ते पत्रक. पण त्यावर फक्त माझी सही झाली. शेवटच्या क्षणी आपण काही चूक करतो आहोत, भारताला आपला देश मानतो आहोत, हे त्यातील एकाला जाणवले. तो म्हणाला आत्ता फक्त बाबा

सही करतील. आपल्या सह्यांचे नंतर बघू. हा सह्या करायचा विरोध ' ऑल इंडिया शीख स्टुडंट्स फेडरेशनचा ' वादग्रस्त नेता कालों ( Kalhon ) याने केला. मला तो पाकिस्तानचा गुप्तहेर आहे असे वाटते. ' -पण या तरुणांच्यात तणाव आहेत. आपापसांत फूट आहे. आणि आसामचे तरुण विद्यार्थी नेते राज्यावर आल्यावर ते बिथरलेत किंवा आपल्याकडून काही चूक झालीये असे त्यांना समजलंय असे वाटले ! '

मी म्हटले, ' बाबा आणखी एक माहिती तुमच्याकडून हवी आहे. आतंकवादी, बरनाला आणि अकाली, खेड्यातील आणि शहरांतील लोक या सर्वांना भेटल्यावर तुमच्या मनात पंजाब प्रश्नाची जी एक प्रतिमा तयार झाली असेल ती मला हवी आहे. '

□

# अकरा

बाबा म्हणतात, ' हा मला दुखावलेल्या भावनांचा प्रश्न वाटतो. ऑपरेशन ' ब्ल्यूस्टार ' आणि ' दिल्ली-हत्याकांड ' याची चीड अगदी सार्वत्रिक आहे. माझ्याकडे ज्या प्रश्नाला अजिबात उत्तर नाही असे प्रश्न सर्वजण विचारत. जोन केनडी किंवा राष्ट्रपती गांधी मारले गेले त्यावेळीही झाली नाही येवढी प्रचंड हिंसा शीखांच्याच वाट्याला का आली ? तुम्ही हजारोंनी शीख स्त्रियांना विधवा केलेत त्यांची अब्रू पण लुटलीत. त्याची साधी आमचा विश्वास बसेल अशी न्यायालयीन चौकशी का करू नाही. दंगलग्रस्तांना मदत करून आरोपींना शासन का होत नाही ?--शासन वगैरे दूरच्या गोष्टी. येवढे मोठ हत्याकांड झाले त्यावेळी राजीव म्हणाला, महावृक्ष कोसळतो तेव्हा काही ' किडे मकोडे ' मरणारच. दंगलीत विधवा झालेल्या बाया एकमुखाने टायटलर, भगत यांची नावे घेतात. त्यांची चौकशी, त्यांना शिक्षा वगैरे दूरच्याच गोष्टी. त्यांना तुम्ही मंत्री बनवता--इंदिरा गांधींवर होता त्यापेक्षा म्हणून यांचा राजीववर राग आहे. पंतप्रधानांच्या प्रत्येक विधानाची चर्चा करणारे वा एखाद्या मंत्र्याने छोटा मोठा गुन्हा केला तर त्याचा राजीनामा मागणारे विरोधी पक्ष, विरोधी नेते, राजीवचे हे विधान, या लोकांचे मंत्री होणे याविरुद्ध काहीही बोलत नाहीत त्यामुळे या देशात आपण एकाकी पडलो आहोत असे त्यांना वाटते. -हे प्रश्न सोडवण्याऐवजी प्रत्येक ठिकाणी आपण प्रश्न निर्माण करतोय. २६ जानेवारीला चंदीगड दिले असते तर बरनालांचे हात मजबूत

झाले असते. धोका पत्करूनही बरनालांचे हात मजबूत करावे लागतील. एक गोष्ट सांगतो. ' ऑपरेशन ब्ल्यू स्टारच्या वेळी सिझरिंग ऑपरेशन झालेली एक तरुणी आपल्या १५ दिवसाच्या मुलाला घेऊन त्याचा माथा तेथे टेकवण्या-साठी सुवर्णमंदिरात आलेली होती. कवटीत गोळी घुसलेल्या तिच्या मुलाचे डोके आतंकवादी लोकांना भडकवायला वापरतात. आणि त्या बाईला आतंक-वादी ठरवून जोधपूरच्या तुरुंगात ठेवलंय. या परिस्थितीत तुम्ही आणि मी आतंकवादी बनलो असतो. बरनालाला त्या बाईला सोडणे जरूरीचे वाटते. ती लोकांना शांत करावयास निकडीची गरज आहे. तो मला म्हणाला, ' अरुण नेहरू, सिद्धार्थ रे, माझे याबाबत अजिबात ऐकत नाहीत. माझा आवाज राजीव पर्यंत पोचतच नाही. बाबा राजीवला सांगून त्या बाईला सोडवायला मला मदत करा. पंजाबचा प्रश्न आज राजकारणी सोडवू शकणार नाहीत तर संत सोडवू शकेल असे म्हणूनच लोकांना वाटतंय. '

मी म्हटले, ' बाबा तुम्ही सांगितलीत ती पार्श्वभूमी आज सर्वांना माहीत आहे. तुम्ही विचारलेले प्रश्न वादग्रस्त आहेत. पण शहरातील सर्वसामान्य शीख माणसाला खलीस्तान हवे आहे का ? त्या बाबत त्याची भूमिका काय आहे असे तुम्हाला वाटते ? '

बाबा म्हणतात, ' त्यांना खलिस्तान हवे आहे असे मला वाटत नाही. पण खलीस्तानची भूमिका पक्की नसली तरी कच्ची पण नाही. सर्वसामान्यपणे २९ सालापासून खलीस्थानच्या भूमिकेने झालेले प्रयत्न त्यांना माहीत आहेत. त्यातील फायदे आणि तोटे माहीत आहेत. हे लोक सांगतात ते सार रूपाने एकत्रित असे सांगता येईल. ' गांधी मोठा माणूस होता. त्यांनी सांगितले होते आमच्यावर विश्वास ठवा. पण नेहरू जीना सारे फक्त राजकारणी निघाले. नेहरूंनी काश्मीरला ३७१ कलम दिले आम्हाला मात्र दिले नाही. वल्लभभाई मात्र वस्ताद निघाले. त्यांनी तारासिंगला सांगितले, तुला खलीस्तान पाहिजे आहे ना, मी ते तुला देतो पण ' चप्पा चप्पा खोजके '. भारतातील शीख येथे आणून सोडीन. तुम्ही दोन टक्के आहात. या देशाची दोन टक्के भूमी मिळेल. आणि तुम्हाला अभिप्रेत असलेल्या त्या स्वायत्त संघराज्यात तुम्हाला सैन्यापासून इतरत्र सर्वत्र फक्त दोन टक्के जागा मिळतील याची खात्री बाळग. जीना तर सरळ सरळ बदमाश होता. त्याला खलिस्तान अजिबात नको होते. खलीस्तान द्यावे लागले तर शीख बहुसंख्येने असलेले लाहोर द्यावे लागेल आणि पाकिस्तानसाठी सर्वप्रथम नवी राजधानी शोधावी लागेल. त्यातून मुसलमानांचा कायमचा द्वेष करणारे, आक्रमकवादावर विश्वास ठवणारे एक शीख राष्ट्र कायम शेजारी म्हणून राहील हे त्याने ओळखले होते. त्याने म्हणून शीखांना

सांगितले होते, उरलेला भारत आणि हिंदूधर्म हे प्राचीन प्रचंड वटवृक्षाप्रमाणे आहेत. तो वटवृक्ष एवढा जुनाट झालाय आणि आतून एवढा पोखरलाय की तो एकदा आपोआप जमीनदोस्त होणारे. शीख मात्र त्या वटवृक्षाच्या नव्या जोमाने फुटलेल्या पारंब्यासारखा आहे. ती पारंबी आता जमिनीला टेकलीये. जमिनीत मूळ धरून आहे. हा वृक्ष ज्यावेळी कोलमडून पडेल तेव्हा सारे काही या पारंबीचेच आहे. नवा वृक्ष या पारंबीतून उभा राहणार आहे. मात्र 'ऑपरेशन ब्ल्यू स्टार 'पर्यंत खलीस्तानचे फक्त चाणक्य ( Theorist ) होते. त्यांना सार्वत्रिक पाठिंबा नव्हता. 'ब्ल्यू स्टार 'ने तो मिळवून दिला.'

मी म्हटले, 'बाबा, खलीस्तानच्या या प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे होणाऱ्या मागणीमागे परकीय शक्ती असतील असे तुम्हाला वाटते का ?' बाबा म्हणतात, 'मला असे वाटत नाही. पाकिस्तान याच्या मागे नाही. मात्र पाकिस्तान परिस्थितीचा फायदा उठवतोय. सर्वसामान्य शीख माणसाच्या मनातच नव्हे तर चंदीगड तुरुंगातल्या चिडलेल्या, दुखावलेल्या मेजर जनरल वगैरेंच्या मनात भारताबद्दल प्रेम आहे. आपण हिंदू-शीख मिळून लाहोरच्या लढाईत कसे शौर्याने, जिद्दीने लढलो, लाहोर शून्य मैलाच्या दगडाजवळ जाऊन तेथे कसे गुरुद्वारा आणि मंदीर उभारले ते सांगताना ते गदगदतात. आणि सर्व-सामान्य शीख माणूस तर जालीयनवाला बागेत जाऊन तेथे हिंदू किती मारले गेले किंवा किती शीख कुरबान झाले हे पाहून या म्हणून सांगतात. अमेरिका वगैरे तर या प्रश्नात फार उशीरा आले असावेत. आपण बांगला देशातील असंतोषाचा फायदा उठवला वा त्याला मदत केली. आपले शत्रू आज नेमके तेच करताहेत.'

मी म्हणालो, 'बाबा, आता शेवटचा प्रश्न. या प्रश्नावर काही उत्तर, काही तोडगा आहे असे तुम्हाला वाटते का ? - तसे असल्यास हा तोडगा कोणता ? तुम्ही राजीवला आज संध्याकाळी काय सांगणार आहात ?'

बाबा क्षणभर स्तब्ध होतात. मग अगदी शांतपणे म्हणतात, प्रत्येक राष्ट्रीय प्रश्नावर राष्ट्रीय तोडगा असतो ( Every national problem has a national solution ). पण यापूर्वी आपले प्रत्येक उत्तर हे मुळी नव्या प्रश्नांच्या शोधात बाहेर पडत होते. ( Our all accords were in search of new problem. ) मात्र या क्षणी पंजाबचा प्रश्न चिघळू न देता तुम्हाला त्याच्यावर राजकीय तोडगा ( Political Solution ) हवे असेल तर तुम्हाला पंजाबला ३७१ कलम द्यावे लागेल!'

मी क्षणभर सुन्न होतो. विचारतो, 'बाबा, ३७१ कलम न देता पंजाब प्रश्न सोडवता येईल असा काही दुसरा तोडगा तुम्हाला शक्य वाटतो का ?'

बाबा म्हणतात, ' तेही शक्य आहे, पण त्यासाठी तीन गोष्टी कराव्या लागतील.

( १ ) राजीवने सुवर्णमंदिरात जाऊन डोके टेकून आपण जे केले त्याबाबत शीख लोकांची क्षमा मागितली पाहिजे.

( २ ) दिल्ली दंगलीची संपूर्ण निःपक्षपाती चौकशी ! शीख लोकांचा ज्याच्यावर विश्वास असेल, अशा दोन्ही बाजूंना मान्य असलेल्या एखाद्या व्यक्तीकडून झाली पाहिजे. अपराधी लोकांना शासन करून दंगलग्रस्तांना योग्य मदत मिळाली पाहिजे.

( ३ ) सार्वत्रिक माफी ( General amnesty ) दिली गेली पाहिजे. '

□

# बारा

— बाबांचे बोलणे संपलेय. मी बाबांच्याकडे पाहतो. आता मला बोलायला हवे. बाबा आज संध्याकाळी राजीवला भेटणार आहेत. याबाबत माझ्या व तपस्वींच्या मनात कोणताच संदेह नाही. राजीवच्या चांगुलपणाबद्दल पण माझ्या मनात संशय नाही. पण चांगुलपणा हा अनुभवाला पर्याय होऊ शकत नाही. किंबहुना राजकारणात तरी अनुभवाला दुसरा कोणताच पर्याय नसेल— कदाचित आपण एकाकी आहोत असे वाटणारा, नव्या मित्रांच्या व नव्या विचारांच्या शोधात असलेला राजीव बाबांच्या खूप जवळ जाईल. हा प्रश्न सोडवण्यासाठी मांडला जाणारा दुसरा विचार म्हणून बाबांच्या समोर आता मुद्देसूदपणे मांडावयास हवा. त्याबरची त्यांची प्रतिक्रिया पहावयास हवी.

मी म्हणतो, ' बाबा, तुमचे हे विचार मला पटले नाहीत आणि याला काही कारणे आहेत. तसे पाहिले तर 'ऑपरेशन ब्ल्यूस्टार' झाले त्याचवेळी 'ब्ल्यूस्टार' ही महात्मा गांधी वधाहून भयंकर गोष्ट आहे आणि यामुळे हा प्रश्न सोडवण्याचे सारे जुने मार्ग कायमचे संपलेत म्हणून मी लिहिले होते. त्याच वेळी, पंजाबात आज निवडणुका शांततेने पार पडतील की नाही हे तुमच्या प्रशासकीय कौशल्यावर अवलंबून आहे. पण या अशा निवडणुका घेतल्यात तर अकाली प्रचंड बहुमताने निवडून येतील म्हणून मी ठामपणे लिहिले होते.— शिखांना समजावून घेत, त्यांना झुकते माप देत खलीस्तान सोडून त्यांना हवे ते सर्व आज दिले पाहिजे हे मी त्याचसुमारास आग्रहाने मांडले होते. पंजाब-

बाबतचे माझे सारे अंदाज बरोबर आहेत आणि माझा तोडगा पण बराचसा बरोबर आहे अशा खुशीत मी होतो. पण मी पंजाबबाबत केलेला पण कोठेही न लिहिलेला एक अंदाज साफ चुकला. त्यानंतर मी मागे वा तुम्ही आज मांडला तो तोडगा चुकीचा ठरतो असे मला वाटते. थोडे स्पष्टपणे सांगतो. हे दोन्ही अंदाज मी ऑपरेशन ब्ल्यूस्टार नंतर केले होते. दिल्ली-दंगलीनंतर माझे विचार अधिकच पक्के झाले होते.

पण राजीव लोंगोवाल-करार झाला त्या वेळी परिस्थिती पार बदलली. या कराराबाबत मी मधू लिमयेंना भेटलो होतो. त्यावेळी त्या कराराला विरोध करणारे फक्त एकटे मधू लिमयेच होते म्हणून त्यांना भेटलो होतो. शिखांच्या-वरचे दडपण काढून पुन्हा हा प्रश्न निर्माण होतोय असे त्यांना वाटत होते. त्यांचेच या कराराबाबतचे मी टेप केलेले शब्द सांगतो ' मी इंदिरा गांधींचा कायमचा विरोधक होतो. पण स्वतःचे बलीदान देऊन त्यांनी राष्ट्र वाचवायचा प्रयत्न केला. हा अननुभवी तरुण माणूस मात्र स्वतःचा जीव वाचवण्यासाठी राष्ट्राचा बळी देतोय '— त्या वेळी मला त्यांचे विधान पटले नव्हते. अजूनही पटलेले नाही. पण त्यांच्या विधानाला विचारांची अशी भक्कम बैठक होती की, मी त्यातील एकही शब्द खोडून काढू शकलो नाही. – त्याच सुमारास आतंकवाद्यांचा जोर वाढला. लोंगोवाल शहीद झाले. बाबा जोगींदर सिंगने निवडणुकांवर बहिष्कार टाका म्हणून आव्हान केले.– त्यावेळी लोक निवडणुका-वर त्याचे ऐकून वा घाबरून बहिष्कार टाकतील आणि शीख लोकांनी कमी मते टाकल्याने अकाली पडतील असे मला मला वाटले. पंजाब-निवडणूक झाली त्या दिवशीची गोष्ट सांगतो मी संघाचा माणूस नाही. पण त्या दिवशी माझ्या घरी नानाजी देशमुख, दीनदयाळ केंद्राचे संचालक प्रो. देवेंद्रस्वरूप व मी असे तिघेजण तीन चार तासांची एक बैठक करून बसलो होतो. मला राहून राहून आश्चर्य वाटत होते. नानाजी पंजाब, निवडणुका वा इतर कशा-बद्दलच एक शब्द सुद्धा बोलत नव्हते. गोंडा आणि बीड सोडून त्यांच्यासमोर जणू दुसरे काही जग नव्हतेच. मला अखेर राहवले नाही. मी म्हटले, ' नानाजी, आज पंजाब-निवडणुका आहेत. मला अकाली पडतील असे वाटते. तुम्हाला काय वाटते ?' नानाजी सहजपणे म्हणाले, ' अकाली चांगल्या बहुमताने निवडून येतील याची मला खात्री वाटते पंजाबच्या लोकांना शांतता हवी आहे. हिंदूंनी आपल्यावर विश्वास ठेवून आपणाला मत द्यावे असे बादल, बरनाला सांगताहेत, याचा साधा अर्थ शिखांची मते कोणत्याही परिस्थितीत आपलीच आहेत याची त्यांना खात्री झालीये. बहुमत वाढवायला त्यांना आता हिंदूंची मते हवी आहेत. '

या निवडणुकांच्या निकालानंतर पंजाब प्रश्नाचे समीकरण बदलले. पंजाबातील बहुसंख्य जनतेने मतदान केले आणि मतदान करणाऱ्या लोकांपैकी ऐंशी टक्क्यांहून अधिक लोकांनी राजीव वा लोंगोवाल यांना मत टाकले. याचा साधा अर्थ असा की, लोकांनी आतंकवाद्यांना धुडकावले आणि राजीव-लोंगोवाल करार जे देतो ते आम्हाला पुरेसे आहे, समाधान करणारे आहे म्हणून सांगितले! आज निर्माण झालेला आतंकवाद्यांचा प्रश्न हा मुख्यत्वेकरून 'कायदा आणि सुव्यवस्था' यांचा प्रश्न आहे. समाजातील निवडणुकीत नाकारल्या गेलेल्या मूठभर लोकांनी इतरांना हिंसेच्या मार्गाने त्रास देण्याचा व नमवण्याचा प्रयत्न आहे. त्यामुळे राजीव-लोंगोवाल कराराने जे दिलंय ते सर्व आपण शक्यतो लवकर दिले पाहिजे. हरियाना दुखावला जात असेल आणि काँग्रेसच्या हातातून जात असेल तरीही आपण दिले पाहिजे, असे आपण म्हणू शकतो. पण त्यापेक्षा काहीही जास्त दिले, तर तो आपला कमकुवतपणा आणि आतंकवाद्यांचा विजय ठरतो. त्यांच्या ताकदीचा आणि सामर्थ्याचा विजय ठरतो.

शीख समाजाच्या मनात असलेले ताकदीबद्दलचे प्रेम आणि त्यातले कमकुवत धागे आपण समजावून घेतले पाहिजेत. शीख समाज ताकदीला फार मानतो आणि त्यामुळेच आपल्याहून अधिक ताकदवान शत्रू दिसला की, त्याला मनोमन मानून सलाम करतो. त्यांचा इतिहास पहा. गुरु गोविंदसिंगांची दोन मुले औरंगजेबाने मारली. त्यानंतर शिखांनी औरंगजेबाला मारण्याचा एकही प्रयत्न केला नाही. औरंगजेबाला अंगावर घेत लढावे लागले महाराष्ट्राला. रणजितसिंग म्हणजे शीखांच्या दृष्टीने देवच पण इंग्रजांनी रणजितसिंगाचा पराभव केल्यावर शीख अगदी इमाने इतबारे इंग्रजांशी एकनिष्ठ राहिले. १८५७ च्या वेळी सुद्धा त्यांना उठाव करावासा वाटला नाही. आतंकवाद्यांना समाजापासून वेगळे पाडणे जरूरीचे आहे आणि शक्य आहे हे तुम्ही मगाशी मला सांगितलेच पण शीख समाजापासून आतंकवाद्यांना वेगळे पाडावयाचे असेल तर त्यांच्याहून अधिक ताकद आणि कणखरपणा दाखवून त्यांना मोडले पाहिजे. कारण शीख समाज फक्त ताकदीला मानतो आणि आपल्याहून अधिक ताकद दाखवणाऱ्याला सलाम करतो, हा जो एक दुसरा विचार काहीजण मांडतात तो तुम्हाला पटतो का?'

बाबा म्हणतात, 'मला हे अजिबात पटत नाही. अरे, शीख या देशासाठी कसे शौर्याने लढलेत, या देशासाठी त्यांनी किती वेळा कुरबानी दिलीये, लाहोरच्या लढाईत त्यांनी काय अद्‌भुत पराक्रम केलेत. ते फार देशभक्त आणि शूर आहेत....'

मी बाबांना पुढे बोलूच देत आही. ' मी म्हणतो, बाबा हा दुसरा विचार येथेच येऊन पुन्हा तुमच्याशी टकराव घेतो. सैन्यात जास्ती नोकऱ्या हव्यात म्हणून हट्ट धरायचा आणि मग पुन्हा आम्ही देशासाठी कुरबानी केली म्हणायची. सैन्यात जाणारा माणूस आज्ञेनुसार मरणे आणि मारणे हा व्यवसाय म्हणून जातो. त्यानंतर आपण कुरबानी केले असे म्हणणे म्हणजे सर्कस मध्ये कसरतीची कामे करणाऱ्याने मी लोकांच्या करमणुकीसाठी कुरबानी केली म्हणण्यासारखे होते. गुरख्यांनी पण देशासाठी खूप कुरबानी दिलीये म्हणून काही आपण पुन्हा पुन्हा गुरखे फार देशभक्त आहेत असे म्हणत नाही. बाबा गेले काही दिवस मी हरियाणामधून हिंडतोय. तेथे सार्वत्रिक स्वरूपात जे बोलले जातंय ते मी आपणाला सांगतोय- —दोन टक्के समाजाला सैन्यात मिळालेल्या अमर्याद नोकऱ्या. नोकरी धंद्यात भारतभर मिळालेली संधी यातून शीखांना अमर्याद आर्थिक सत्ता मिळालीये आणि ही आर्थिक सत्ता मिळालेल्या लोकांना आता राजकीय सत्ता हवी आहे. आर्थिक सत्तेतून येणारी मग्रुरी आज शिखांच्याकडे आली आहे. गावातल्या श्रीमंत माणसाने गावातील गरीबांचा द्वेष करत त्यांना हिणकस ठरवावे असे हे होतंय. बाबा तुम्ही आता सांगितल्याप्रमाणे शीख सांगतात, ' सीमापर शीख हो तो सिमेंटकी दिवार. हिंदू है तो रेत की दिवार ' बाबा ही इतरांना तुच्छ मानण्याची प्रवृत्ती आहे. आणि आपल्या प्रत्येक कमकुवतपणानंतर त्यांच्या स्वतःवरचा विश्वास आणि इतरांबाबतचा तिरस्कार वाढत जातोय. – बाबा शीख जमात जास्त शूर आहे हे विधान अगदी वंशशास्त्रावर आणि वंशश्रेष्ठत्वावर विश्वास ठेवला तरी चुकीचे ठरते. वंशश्रेष्ठत्वावर विश्वास ठेवलात तर सारे पंजाबी, मग ते हिंदू, शीख, मुसलमान कोणीही असेल तरी शूर वा श्रेष्ठ आहेत असे म्हणावे लागेल. यापैकी फक्त सरदार जास्ती शूर वा श्रेष्ठ आहेत असे म्हणणे म्हणजे एखाद्या जमातीतील काही लोकांनी एक दोन शतके दाढी वाढवली, पगडी बांधली आणि कडे घातले तर ते लोक अधिक शूर बनतात असे विचित्र समीकरण आपण तयार करतो.

पंजाब-प्रश्नाकडे पाहण्याची ही दुसरी बाजू समजावून घेत असतानाच आतंकवादी कोण आहेत हे आपण समजावून घेतले पाहिजे. बाबा आतंकवाद्यांनी वापरलेला व तुम्ही सांगितलेला गांडू हा शब्द मी फक्त शब्दांची खाज आहे म्हणून लिहून घेतलेला नाही. महाराष्ट्रात, बंगालमध्ये आणि पंजाबमधेपण पूर्वी क्रांतिकारक होते. त्यांपैकी कोणीही हा शब्द कधी वापरला नव्हता. – तर्कसंगत विचार; वादविवाद अजिबात न समजणाऱ्या व फक्त ताकदीवर विश्वास असलेल्या रानटी लोकांनी वापरावयाचा हा शब्द आहे ! आतंकवादी कोण आहेत व कसे आहेत हे समजावून घेतानाच आपण हे आतंकवादी का निर्माण

झाले या प्रश्नाशी परत येतो. किंवा खरे सांगावयाचे तर हा या दुसऱ्या विचाराचा गाभा आहे. या विचाराप्रमाणे शिखांचा प्रश्न हा दुखावलेल्या भावनांचा (Wounded Psyche) प्रश्न नाही तर तो त्या समाजाच्या दुभंगलेल्या मनातून ( Split Personality ) निर्माण झालाय. आर्थिक व मानसिक पातळीवर शीख समाज आज तीन विभागांत वाटला गेलाय त्यातील एक विभाग खेड्यापाड्यात राहणाऱ्या बहुसंख्य शीख लोकांचा आहे. तसे पाहिले तर हे अजूनही गुरुगोविंदसिंगांचे सच्चे शीख आहेत. ते साधे, सरळ व शेजाऱ्यावर प्रेम करणारे आहेत. खेड्यापाड्यात राहणाऱ्या इतर बहुसंख्य भारतीयांप्रमाणे ते पण मानसिक दृष्टया अजून मध्ययुगातच आहेत. शरद जोशींच्या भारतातील इतर भारतीयांप्रमाणे त्यांची पण इंडियावाल्यांच्या कडून पिळवणूक होते आहे. दुसरा वर्ग हा भारतभर पसरलेला, वरिष्ठ नोकऱ्या, व्यापार उद्योगात अमाप चैन भोगणारा सरदारवर्ग आहे. तिसरा या देशापासून दुरावलेला, परदेशात जाऊन आर्थिक दृष्टया स्थिरावलेला पण आपली मुळं आपल्या देशापासून व धर्मापासून दूर जाताहेत याची खंत वाटणारा सरदारांचा वर्ग आहे. या तीन विभागांना एकमेकांबद्दल प्रेम आहे, त्यापेक्षा दुःस्वास आहे. आणि अशावेळी आर्थिक सत्ता जवळ असल्याने राजकीय सत्ता हवी असेलेल्यांनी आतंकवाद उभा केलाय –आतंकवाद हा या तीन विभागात दुभंगलेल्या समाजाला आजच्या क्षणी एका सूत्रात गोवणारा दुवा वाटतो. आतंकवाद्यांच्या मागे परकीय शक्ती फार मोठ्या प्रमाणात नाहीत असे मानले तर आतंकवाद्यांची ताकद खालील चार गोष्टींत सामावलेली आहे असे म्हणावे लागले. यांतील पहिली गोष्ट म्हणजे शिखांच्या हातात आलेली अमर्याद आर्थिक सुबत्ता, दुसरी गोष्ट म्हणजे सर्वसामान्य शीख माणसाच्या मनात ताकदीबद्दल, हौतात्म्याबद्दल असलेले प्रेम. तिसरी गोष्ट म्हणजे हिंदूंच्या या देशात आपणावर अन्याय होतोय ही खेड्यापाड्यांतील शिखांची करून देण्यात आलेली समजूत आणि चौथी गोष्ट म्हणजे त्यांना पंजाबात आज फितूर झालेली नोकरशाही.

हे मान्य केले तर दिल्ली-दंगल आणि राजीव-लोंगोवाल करार याचे महत्त्व वरील चार गोष्टींच्या संदर्भात आपणाला समजावून घ्यावे लागेल आणि त्यानंतरच पंजाब-प्रश्नावरचे आजचे उत्तर कदाचित आपणाला जरा वेगळे वाटेल.--दिल्ली-दंगल ही अमानुष आणि भयंकर होती. त्याची झळ मी जवळून पाहिलीये. पण त्या दंगलीमागचे एक सूत्र आता लक्षात आलंय. पंजाबबाहेरच्या शिखांना आपल्या आर्थिक सत्तेला धक्का लागेल हे समजावून द्यावे आणि आपल्या ताकदीचे दर्शन घडवावे आणि नमवावे असे ते सूत्र होते. हा प्रयत्न समूळ चुकला आणि त्याचा विपरीत परिणाम झाला. कारण आजच्या

काळात एखाद्या समाजाची आर्थिक सत्ता असल्या तात्कालीक दंगलीन मोडता येत नाही. यात ताकदीचे तर अजिबात प्रदर्शन झाले नाही. ही दंगल ही षंढ लोकांनी केलेली दंगल होती. आपणाला कोणताही धोका नाही हे समजल्यावर हिजड्यांच्या जमावाने अचकट विचकट बोलत समोरच्या माणसाला बुकलावे असा हा प्रकार होता. यात पुन्हा झोपडपट्टीत राहणारे खेड्यापाड्यातून दिल्लीत आलेले शीख मोठ्या प्रमाणात मारले गेले. यात आमचे शौर्य अजिबात दिसले नाही, तर आत्तापर्यंत सरदारांच्यावर अन्याय होतो असे कळत नकळत मानणारा, आतंकवाद्यांच्या आत्मबलीदानाला आणि ताकदीला मानणारा बाकीचा शीख समाज अगतिक होऊन आतंकवाद्यांच्या अधिक जवळ गेला. 'ऑपरेशन ब्ल्यू स्टारच्या वेळी पण आतंकवाद्यांना नेमका हाच फायदा मिळाला. भारतात, हिंदूंच्या भारतात, आमच्या श्रद्धास्थानाला अजिबात किंमत नाही आणि आमच्या या श्रद्धास्थानाचे रक्षण करणाऱ्या चार पोरट्यांना चिरडण्यासाठी भारताला सैन्य बोलवावे लागले. 'वा रे मेरे शेर' अशीच खेड्यापाड्यांतील सर्वसामान्य सरदारांची भावना झाली.

या अशा दुखावलेल्या आणि दुरावलेल्या खेड्यापाड्यांतील शिखांनी राजीव-लोंगोवाल-करार प्रचंड बहुमताने स्वीकारला ही म्हणूनच एक अद्भुत गोष्ट वाटली. झाले गेले विसरून या देशात आमच्या खेड्यात आम्हाला आनंदाने, बंधुभावाने राहावयाचे आहे म्हणून त्यांनी सांगितले. या देशातील खेड्यापाड्यांतील सर्वसामान्य माणसांच्या सामुदायिक शहाणपणाचे आणि अध्यात्मिक उंचीचे पुन्हा एकदा दर्शन झाले – किमानपक्षी या क्षणी शिखांच्या प्रश्नामागील, वा आतंतकवाद्यांच्या मागील दुखावलेल्या भावनांचा (wounded psyche) प्रश्न निकालात निघाला !

आपल्यामागील हे एक सामर्थ्य गेल्यामुळे आपल्या हौतात्म्याचे, शौर्याचे अधिक प्रदर्शन करून सर्वसामान्य माणसांना पुन्हा आपल्याकडे ओढून घेणे आतंकवाद्यांना म्हणूनच जरूरीचे वाटले. २६ जानेवारीला चंदीगड दिले नाही म्हणून आतंकवादी वाढले हे अजिबात खरे नाही. कारण २६ जानेवारीपूर्वीच आपल्या ताकदीचे आणि हिंमतीचे प्रदर्शन करीत आतंकवाद्यांनी सुवर्णमंदीर घेऊन तेथे करसेवा सुरू करून दाखवली होती. अशा वेळी बंदुकीच्या गोळीचे उत्तर बंदुकीच्या गोळीने देईन. तुमच्या 'हिट लिस्ट' बाहेर पडल्या तर माझ्या 'हिट लिस्ट' बाहेर पडतील म्हणून सांगणारा रिबेलो बरोबर आहे का हा प्रश्न आहे.

रिबेलो काही करत नाही किंवा फारसे काही करू शकलेला नाही याचे कारण वेगळे आहे का ? पंजाबातील शासनयंत्रणेचे वा सरकारी नोकरशाहीचे

कळत नकळत आतंकवाद्यांना साहाय्य होते आहे का ? — खलीस्तान झाले तर ज्यांचा सर्वांत अधिक फायदा होईल असे हे चाकरनामे आहेत. चाकरनामे हा या देशातील राज्य-यंत्रणेचा कणा आहे. ते खोडया काढू शकतात. त्रास देऊ शकतात. राज्ययंत्र सुद्धा बंद पाडू शकतात, पण त्यांना स्वतःला मात्र कणा नसतो. स्वतःची नोकरी धोक्यात येते त्या वेळी आम्ही सारे कुशाभाऊ सुतासारखे सरळ येतो. त्यातून नोकरशाहीबद्दल प्रेम, सहानुभूती वगैरे काही नसते, तर रागच असतो. नोकरशाहीला वठणीवर आणणे म्हणून कठीण असले तरी अशक्य नसते. – पण हे करण्यापूर्वी नोकरशाहीचे मनोबल खचले आहे, का नोकरशाही आतंकवाद्यांना फितूर आहे ! हे समजावून घ्यावे लागेल. बाबा, तुम्हाला याबाबत काय वाटते ? '

बाबा म्हणतात, ' यांतील दोन्ही गोष्टी आहेत. नोकरशाहीचे मनोबल खचले आहे हे तर खरेच आहे. आतंकवादी मला उर्मटपणाने सांगत होते – पंजाबकेसरीचा खून करणाऱ्या तरुणांना कोर्टाच्या आवारातून, पोलीस बंदोबस्तातून, पोलिसांचा खून करून नेण्यात आले. भोवताली स्टेनगन्स हातात घेतलेल्या पोलिसांचे कडे होते, पण एकही आतंकवादी ते यावेळी मारू शकले नाहीत. स्टेनगन्समधून गोळ्या मुळी सुटल्याच नाहीत. – पण याचबरोबर पंजाबमधील नोकरशाही आतंकवाद्यांना मोठ्या प्रमाणात फितूर आहे हे मान्य करावेच लागेल. एक उदाहरण देतो. विश्वास बसू नये एवढी आतंकवाद्यांची गुप्तहेर यंत्रणा कार्यक्षम आहे. मी हरियाणात कोणत्या मंत्र्याला वा कोणत्या मेजरला भेटलो. ही सर्व माहिती त्यांना अगदी खडान् खडा होती. नोकरशाही तुम्हाला फार मोठ्या प्रमाणात फितूर असल्याशिवाय हे शक्य नसते !

तपस्वी म्हणतात, ' बाबा, कदाचित तुम्ही दुखावले जाल. कदाचित तुम्हाला हा उद्धटपणा वाटल. पण मनात जो प्रश्न आहे तो जरा स्पष्टपणे विचारतो. आतंकवादी फार तल्लख (Master Strategist) आहेत हे तुम्ही मघाशी एकदा सांगितलंय. – पण ते येवढे हुषार आहेत की या क्षणी ते तुमचाही सफाईने उपयोग करून घेताहेत, तुम्हालाही वापराहेत असे नाही तुम्हाला वाटत ? '

बाबा शांतपणे सांगतात 'मला असे अजिबात वाटत नाही. '

□

मी आणि तपस्वी एकमेकांच्याकडे पाहतो. पत्रकारांनी ज्या मर्यादेपर्यंत प्रश्न विचारावेत, गप्पा माराव्यात त्या मर्यादेपर्यंत आम्ही आता आलोय. याच्यापुढे जाणे म्हणजे लक्ष्मणरेषा ओलांडणे होईल. तसा वेळही खूप लोटलाय. तीन चार तास संपलेत. बाबांनी आमची सरबराई फार छान केलीये. चहा, पोहे, उपमा पुन्हा चहा, मात्र बाबा कशालाच हात लावत नाहीत.

म्हणतात, ' बेटा, माझी कवळी खुर्चीत नाही तर झोपून बसवलीये. माझ्या खाण्यावर, हिंडण्यावर खूप बंधने आहेत. '

बाबा खूप दमले असणार. तीन चार तास मुलाखत चाललीये. म्हणजे बाबा बोलताहेत आणि आम्ही ऐकतोय ! मला त्यावेळी तरी काहीच काम नाही. कारण बरोबरचा टेपरेकॉर्डर सारे काही टिपून घेतोय. बाबांच्या शब्दांतून बाबांचा आवेग, बाबांची तळमळ, बाबांची तगमग सारे काही जाणवतंय. त्यांच्या उत्साहाचे आणि आंतरिक शक्तीचे नवल वाटतंय. पण मला आता उठायला हवे. अरुण शोरीचा मी असताना दोनदा फोन आलाय. माझी मुलाखत संपली की, तो साडेनऊला येणारे. मी आणि शोरी यांच्या मधला वेळ मिळाला तर घ्यावा म्हणून ' इंडिया टू डे 'चे लोक येऊन बाजूला ताटकळत बसलेत. – डॉक्टरांनी मना केली असतानाही बाबांचे हे चक्र आता दिवसभर सुरू राहील. त्यानंतर संध्याकाळी बाबा राजीवला भेटणार आहेत.

मात्र बाबांच्याकडून निघताना, बाबा आज संध्याकाळी राजीवला खरेच भेटतील का ? भेटले तर किती वेळ बोलतील ? बाबा राजीवला नक्की काय सांगतील ? यांपैकी एकही प्रश्न माझ्या मनात अजिबात आला नाही. मी अगदी खुशीत आहे. माझा अगदी ' युरेका ' झालाय. लहानपणापासून मला पडलेल्या आणि अजूनही अनुत्तरित असलेल्या एका प्रश्नाचे उत्तर मला आज अगदी अचानक मिळालंय. त्या प्रश्नाचे उत्तर देणारे समीकरण वा सूत्र मिळालंय !

— लहानपणी सातारला आम्ही मित्र सुट्टीत निवांतपणे चर्चा करीत अजिंक्यतारा नाही तर सज्जनगडच्या कड्यावर बसत असू. रामदास आणि शिवाजी खरेच भेटले असतील का ? भेटले असतील तर काय बोलले असतील ? शिवाजी आणि रामदास यांत खरे मोठे कोण ? आणि रामदास कवी होते, संत होते, रामभक्त होते की, राजकारणी होते ?

आता मात्र मला यांतील कोणत्याच प्रश्नात रस नाही. मला एक गोष्ट नक्की समजलीये. रामदास यांतील काही असले वा काही नसले तरी खूप मोठे होते. शिवाजी तर खूप खूप मोठा होता.

-- आणि भयाण अंधारात बेभानपणे घुमणाऱ्या कोणत्याही दोन प्रकाश-गीतांना, त्या अंधारातून पुढे जाताना, केव्हा तरी एकदा अगदी नकळत एकमेकांचा आधार शोधावाच लागतो !

□

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
३९७४
दा. क्र. २१७८६

शरद जोशींनी ज्याला इंडिया म्हटलंय
त्या इंडियाचा गाळीव अर्क येथे राहतो.
येथे राहणाऱ्या माणसांनी हजारो वर्षे
सहजपणे साऱ्या भारतावर राज्य केलंय.
दावत द्यावी आणि घ्यावी
इष्क करावा आणि उधळावा
शेरशायरींनी वातावरण धुंद करावे
वाणीवर मिठ्ठास भरावी... आणि
सहजपणे पाठीत खंजीर खुपसावे...
दूरवरून येणाऱ्या वादळांचा फक्त वासावरून
अंदाज घ्यावा आणि या वादळांना पुडीत बांधून
खिशात घालण्याच्या नव्या हिकमती बांधीत
आणखी एक दावत द्यावी आणि घ्यावी...

अशा या राजधानी दिल्लीत
या दशकात घडलेल्या
चार महत्त्वपूर्ण घटना -
- शरद जोशींचे आव्हान
- सात आंधळे आणि एक अप्पू
- ३१ ऑक्टोबरची कतले आम
- बाबा आमटे यांची दिल्ली भेट

या घटनांचा संवेदनाक्षम मनाने
जवळून पण तटस्थपणे घेतलेला शोध...